।। ॐ ।।

नमः श्रीवर्धमानाय ।

पंडित श्री. कविवर दौलतरामजीविरचित

# छहढाला


मराठी विवेचनकर्ता :

श्री. पं. धन्यकुमार गंगासा भोरे

बी. ए., एल्एल्. बी, कारंजा



प्रकाशक :

श्री कंकुबाई पाठ्य-पुस्तकमाला

पुष्प ८ वे

आवृत्ती सहावी]      वीर नि. संवत २५२२      [मुल्य १२ रूपये

☆

प्रकाशक :

मंत्री, कंकुबाई पाठ्य-पुस्तकमाला

कारंजा

☆

मूल्य : बारा रुपये

☆

आवृत्ती ७ वी

प्रती ३०००

२६ मार्च २००१

गुढीपाडवा

☆

मुद्रक :

नारायण ऑफसेट वर्क्स

२२४, टिकेकर रोड, धंतोली

नागपूर

फोन - ५२२६४२, ५२१९८०

मुमुक्षु जनांना संमत या छोट्या परंतु बहुमोल अशा या छहढाला ग्रंथाची ही सचित्र आवृत्ती सर्व साधारण मुमुक्षु व विद्यार्थ्यांना परवडावी म्हणून श्री महावीर ज्ञानोपासना समितीने रु. ७५०१ थोर अनुदान दिले आहेच. त्यामुळे लागतपेक्षाही कमी दरात म्हणजे १६ रुपयात उपल्बध होऊं शकली. त्यातही आणखी दरामध्ये सवलत देवून १२ रुपयामध्ये मात्र विद्यार्थी व मुमुक्षूंना छहढाला उपलब्ध व्हावी म्हणून खालील दातारांनी उदारतेने ज्ञानदान दिलेले आहे. त्या सर्व दातारांची कंकुबाई पाठ्यपुस्तकमाला ऋणी आहे. त्यांच्या उदारतेमुळे अवघ्या १२ रुपयात ही सचित्र आवृत्ती देणे शक्य झाले आहे. सर्वांना पुनश्च धन्यवाद !

दातारांची शुभनामावली

।। ॐ ।।

नमः श्रीवर्धमानाय ।

पंडित श्री. कविवर दौलतरामजीविरचित

# छहढाला

मराठी विवेचनकर्ता :

श्री. पं. धन्यकुमार गंगासा भोरे

बी. ए., एलूएलू. बी, कारंजा

प्रकाशक :

श्री कंकुबाई पाठ्य-पुस्तकमाला

पुष्प ८ वे

आवृत्ती सहावी]　　वीर नि. संवत २५२२　　[मुल्य १२ रूपये

## प्रकाशकीय

### पुण्यस्मरण

स्व. पू. ब्र. कंकुमावशी यांची समाजसेवा अपूर्व होती. त्या मागच्या पिढीमधील विधायक दृष्टी असलेल्या प्रमुख स्त्री कार्यकर्त्या होत्या. स्वाध्याय, मनन, चिंतन, लेखन इत्यादींनी प्राप्त विचक्षण दृष्टी त्यांनी चांगली सुसंस्कृत केली होती. त्यांचे ठिकाणी तत्त्वज्ञानाविषयी निस्सीम प्रेम होते. धर्मकार्याविषयी जिवंत तळमळ होती. मुंबई श्राविकाश्रम व कारंजा येथील आश्रमाला त्यांचे योगदान लाभले होते. कारंजा श्राविकाश्रमाचा प्रारंभ मावशींच्या स्त्रीधनातून झाला आहे. दक्षिणउत्तर भारतामध्ये सर्वत्र विहार करून धर्मशिक्षणासंबंधीची उदासीनता त्यांनी घालविली व आस्था आणि प्रेमाचे वर्तुळ व्यापक केले. स्वतः धर्मशिक्षणही दिले.

### पाठ्यपुस्तकमालेची सेवा

प्रारंभी महाराष्ट्रामध्ये धार्मिक शिक्षण हिंदी पुस्तकांच्या आधाराने दिले जात असे. धार्मिक पाठ्यपुस्तके मराठीतूनच प्रकाशित व्हावी व होत राहावीत याकरिता त्यांनी आपल्या स्त्रीधनातून काही रक्कम काढून पाठ्यपुस्तकमाला सुरू केली. स्व. श्री. रावजी सखारामजी दोशी यांनी प्रकाशित केलेले जैन बालबोध १ ते ४ भाग, तत्त्वार्थसूत्र, छहढाला याच ग्रंथमालेतून निरंतर प्रकाशित होत राहावेत म्हणून कायदेशीर ठराव करूनही त्यांनी पाठवून दिला. द्रव्यसंग्रह, रत्नकरण्ड-श्रावकाचार, सागारधर्मामृत या ग्रंथांचा प्रामाणिक अनुवाद व प्रकाशन करविले. जैनसिद्धांत प्रवेशिकेचे बालबोधिनी रूप स्व. पं. देवकीनंदनजी व स्वाध्यायपण्डित श्री. प्रद्युम्नसावजी यांच्या देखरेखीखाली श्री. पं. नरेंद्रकुमारजी न्यायतीर्थ यांचेकडून तयार करविले. न्यायदीपिका मूळमात्र छापविली. भारती तत्त्वमालेचा सचित्र पहिला भागही श्री. सुमेर जैन यांनी तयार केलेला याच ग्रंथमालेतर्फे प्रकाशित झाला. कित्येक ग्रंथांच्या अनेक आवृत्याही प्रसिद्ध झाल्या.

## छहढाला-ग्रंथाची ही नवी आवृत्ती

छहढाला या ग्रंथाचे महत्त्व अपरंपार आहे. धर्म समजावा, भाषा सोपी असावी; सर्व काही थोडक्यात असावे; गोडी वाटावी या सर्व भावनांची पूर्तता करण्यास हा ग्रंथ समर्थ आहे. यात काय काय आहे ? या प्रश्नाचे उत्तर यात काय नाही ? हा प्रतिप्रश्न करूनच मिळू शकते. या ग्रंथाचा अनुवाद विशिष्ट पद्धतीने श्री. पं. धन्यकुमारजी भोरे यांनी केला आहे. विद्यार्थ्यांना तर या अनुवादाचा उपयोग होईलच परंतु स्वाध्यायप्रेमी जिज्ञासूंची भूक सुद्धा या ग्रंथाच्या स्वाध्यायाने व अध्ययनाने निश्चित भागावी असे धोरण त्यांनी ठेवले आहे. समयसार, प्रवचनसार, मोक्षमार्गप्रकाशक आदि ग्रंथांच्या अध्ययनाने व अनुवादाने त्यांनी विशिष्ट दृष्टी कमावली आहे. ग्रंथ-ग्रंथकार यासंबंधी प्रस्तावनेमध्ये त्यांनी तोंडओळख करून दिलीच आहे. शिवाय या ग्रंथरत्नामधील विषयांची व्याप्ती किती मोठी आहे, आचार्यकल्प पं. टोडरमलजी यांच्या मोक्षमार्गप्रकाशकादि ग्रंथांमधील मांडणीशी याचा सुमेळ कसा आहे हे त्यांनी केलेल्या रसग्रहणावरून सुस्पष्ट झाले आहे. मार्मिक जिज्ञासूंनी ते गोड रसग्रहण वाचूनच ग्रंथाच्या स्वाध्यायास प्रारंभ करावा अशी आग्रहाची सूचना आहे. माला त्यांच्या योगदानाचे आत्मीय भावनेने स्वागत करीत आहे.

## मालेवरील कृपाप्रसाद

मालेचा आटोप वर नमूद आहे. खटाटोपाचा मोठा वाटा मालेच्या जन्मदात्या परोपकारमूर्ती मावशींनी उचलला आहे. त्यांचा स्वर्गवास दि. ४.६.३९ ला झाला. तदनंतर ध. स्व. मावशींचे सुपुत्र ध. श्री. सेठ मोतीचंदजी यांचा मालेवर पूर्ण कृपालोभ राहिला. त्यांचाही दि. २१.५.६० ला एकाएकी अकाली स्वर्गवास झाल्यावर श्री. ध. कुसुमबाई मो. शहा, बी. ए. यांनीही आपले कृपापूर्ण छत्र अविभाज्य स्वरूपामध्ये कायम ठेवल्यामुळेच मालेचे कार्य धाराप्रवाही होऊ शकले आहे.

## नवी आवृत्ती व सवलतीची दर योजना

वाढत्या महागाईच्या या काळामध्ये धर्मग्रंथ बाल-विद्यार्थ्यांच्या हातामध्ये कमीत कमी दरामध्ये देता यावेत या पवित्र भावनेचे काही उदारधी मंडळींनी अंतःकरणपूर्वक स्वागत केले व आपले मन मोठे करून निस्पृहपणे दान मंजूर केले. त्यामुळेच अत्यंत अल्प मूल्यामध्ये हा ग्रंथ देता येणे शक्य झाले याबद्दल संपूर्ण दातारांची माला अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

या ग्रंथाचे सुरुचिपूर्ण मुद्रण नागपूर येथील नारायण ऑफसेट वर्क्स यांनी अत्यंत आस्थेवाईकपणे करून दिले. याबद्दल माला त्यांची आभारी आहे.

----

या नवीन आवृत्तीमध्ये श्री. मा. पं. नीरजजी जैन, सतना यांनी जुन्या हस्तलिखितावरून शुद्ध करून दिलेल्या प्रतीप्रमाणे एक पाठ घेतलेला आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. मागील आवृत्तीमध्ये ज्या चुका होत्या त्या दुरुस्त केल्या आहेत. क्वचित् भाषा सरळ सोपी असावी म्हणून फरक केलेला आहे, हे जवळपास तृतीय आवृत्तीचे पुनर्मुद्रण आहे.

गरीब विद्यार्थ्यांना व स्वाध्यायप्रेमींना परवडावे म्हणून याचे मूल्य कमी करण्यासाठी ज्ञानोपासना समितीने रु. ५००१/- चे अनुदान दिले आहे. याबद्दल प्रकाशक समितीचे ऋणी आहेत. तसेच श्रीकुंदकुंद कहान तीर्थसुरक्षा ट्रस्ट, मुंबई याचेकडून काही अनुदान मिळत आहे. त्यांचेही ऋणी आहोत.

कागद आणि मुद्रण-जुळणीचे दर अतिशय वाढले आहेत. तरीही त्यांचे मूल्य लागतमात्र ठेवले आहे.

नारायण ऑफसेट वर्क्स यांनी अल्पावधीत सुबक छपाई करून दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद आहेत. समाज या संस्करणाचे स्वागत करील अशी आशा आहे.

– प्रकाशक

# पं. दौलतरामजी आणि त्यांची छहढाला

हिंदी जैन साहित्यामध्ये छहढालेचे स्थान अद्वितीय आहे. हिंदीभाषिक आबालवृद्धांच्या तोंडी छहढाला आहेच. छहढालेचे रचयिता कविवर पं. दौलतरामजी हे हिंदी जैन साहित्यामध्ये श्रेष्ठ दर्जाचे साहित्यकार आहेत.

कविवर पं. दौलतरामजींचा जन्म विक्रम संवत १८५५-१८५६ च्या दरम्यान झाला. ते पल्लीवाल जातीचे असून त्यांचे गोत्र गंगोटीवाल होते. परंतु लोक त्यांनी फतेहपुरी म्हणत. त्यांच्या वडिलांचे नाव टोडरमल्ल आणि काकांचे नाव चुन्नीलाल होते. दोघेही बंधू हाथरसमध्ये कपड्याचा व्यापार करीत असत. अलीगडनिवासी श्री. शेठ चिंतामणी त्यांचे श्वशुर होते.

दौलतरामजी स्वतः छीट छापण्याचे काम करीत असत. काम करताना समोर चौकीवर गोमट्टसार, आत्मानुशासन वगैरे शास्त्र ठेवून कपडा छापताना त्यातील ७०-८० गाथा वा श्लोक प्रायः रोज पाठ करीत. संवत १८८२ मध्ये शेठ मनीरामजी त्यांच्या विद्वत्तेने संतुष्ट झाले व त्यांनी त्यांना मथुरेला नेले. काही काळ तेथे घालवल्यानंतर ते छावणी भागात येऊन राहिले. त्यांना दोन पुत्र होते. मोठ्याचे नाव लाला टीकाराम होते. छावणीमध्ये आजही त्यांचे वंशज आहेत.

छहढाला ही खड्या ब्रज बोलीमध्ये रचलेली आहे. ही भाषा आग्रा शहराच्या सभोवती बोलली जात होती. भाषा सरळ, सुबोध, अर्थवाही आणि भावानुगामी आहे.

दौलतरामजींच्या समकालीन पं. सदासुखदास (रत्नकरंड हिंदी वचनिकेचे कर्ते) पं. बुधजन, कवी वृंदावन, भागचंद आदि होते, त्यांना आपल्या जीवनसमाप्तीची स्पष्ट कल्पना सहा दिवस अगोदरच आलेली होती. म्हणून त्यांनी नातलग व कुटुंबीजनांना एकत्रित करून त्यांना सांगितले, आजपासून सहाव्या दिवशी मी हा देह सोडून अन्य देह धारण करीन. सर्वांना क्षमायाचना करून सं. १९२३ मार्गशीर्ष कृष्ण अमावास्येला देहली मुक्कामी त्यांचा प्राणांत झाला.

पं. दौलतराम जरी १०० वर्षापूर्वी स्वर्गवासी झाले तरी त्यांची छहढाला व पदे त्यांच्या या अमर साहित्यकृती आजही सर्वतोमुखी आहेत. पंडितजींची छहढाला, ''सकलज्ञेयज्ञायक'' ही स्तुती किंवा ''हम तो कबहूं न निज घर आये,'' ''आपा नहीं जाना तूने,'' ''अपनी सुधि भूलि आप....'', ''निरखत जिनचंद्रवदन...'' इत्यादी पदे उत्तर भारतामध्ये आजही सर्वांच्याच तोंडी आहेत. साधक एकाकी अथवा संघासह आत्मविभोर होऊन ती पदे अथवा स्तुती यांमध्ये तल्लीन होतो. त्यांच्या रोजच्या साधनेचे ते आवश्यक अंग झालेले आहे. त्यांच्या या रचनांनी साधकांना अंतर्मुख करून ''जग धोके की ठाठी'' म्हणून सावध केले आहे व स्वपरविवेकाची ज्योत तेवत ठेवण्यात उत्कृष्ट निमित्ताचे काम केले आहे.

जरी त्यांचे साहित्य अल्प असले तरी ते गुणाने बहुमोल आहे. त्यांची छहढाला ही तर एक अजोड साहित्यकृती आहे. ''बिंदूमध्ये सिंधू'' अथवा ''घागर में सागर'' या उक्तीची येथे प्रतीती येते. पंडितजींचा जैनसाहित्य व तत्त्वज्ञानाचा व्यासंग दांडगा होता व जैनतत्त्वज्ञानाचे हार्द त्यांना चांगलेच उमजले होते. जोडीला त्यांना काव्यदृष्टीचीही साथ होती.

----

# छहढाला : एक रसग्रहण

सहा ढालींमध्ये पं. दौलतरामजींनी थोडक्यात जैनधर्माची तत्त्वे व उपदेश वर्णिला आहे. त्यांची या ग्रंथातील बैठक आणि पं. टोडरमलजींची मोक्षमार्गप्रकाशकची बैठक किती एकरूप आहे हे पाहण्यासारखे आहे. दोन्ही ग्रंथांच्या मंगलाचरणातील साम्यच प्रथमतः नजरेत भरते.

तीन भुवनमें सार, बीतराग विज्ञानता ।
शिवस्वरूप शिवकार, नमहु त्रियोग सम्हारिके । (छह.)
मंगलमय मंगलकरण, वीतराग विज्ञान ।
नमो ताहि जातै भयें, अरहंतादि महान् ।।

(मोक्षमार्गप्रकाशक)

दोघांनीही मंगलाचरणरूपाने वीतरागता व विज्ञानतेला नमस्कार केला असून शिवस्वरूप शिवकार व मंगलमय, मंगलकरण हे त्याचे विशेषणही तंतोतंत आहे. संसार हा सुखमय नसून तो स्वयं रोग आहे, अतएव दुःखरूप आहे. सुखाची इच्छा करणाऱ्यांनी संसारमार्गाच्या मागे न लागता मोक्षमार्गाचे अनुसरण करावयास हवे, कारण मोक्ष स्वयं सुखरूप आहे. या संसाररोगाचे निदान व त्या रोगाची लक्षणे मोक्षमार्गप्रकाशकच्या दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायात सांगितली आहेत. तेच अगदी सुलभप्रकारे पहिल्या ढालीत सांगितले आहे. संसाररोगाचे मूळ कारण मिथ्यादर्शनज्ञान - चारित्र असून त्यांपैकी अगृहीत मिथ्यात्वादिकांचे वर्णन मोक्षमार्गप्रकाशकच्या चौथ्या अध्यायात केले असून पाचव्या, सहाव्या, सातव्या अध्यायात गृहीत मिथ्यात्वाचे वर्णन आहे.

ठीक हीच बैठक दुसऱ्या ढालीची आहे. चौथ्या अध्यायातील अगृहीत मिथ्यात्वाच्या तात्विक वर्णनाला अनुभवाची व रसपूर्ण काव्यात्मतेची जोड मिळाल्यामुळे दुसरी ढाल म्हणजे संसाराचे यथार्थ काव्यमय चित्रणच आहे; असे म्हटले तर मुळीच अतिशयोक्ती नाही. सात तत्त्वांचा उल्लेखही न करता त्याबाबत जी सहज विपरीत मान्यता अज्ञानी जोपासतो त्याचे कथन असणारे चार-पाच श्लोक त्यांच्या सूक्ष्म तत्त्वदृष्टीची साक्ष देतील. उत्तरार्धात गृहीत मिथ्यात्वादिकांचे थोडक्यात सुलभ वर्णन केले आहे.

नंतर तिसऱ्या ढालीपासून मोक्षमार्गाच्या निरूपणाला सुरवात होते. मोक्षमार्गप्रकाशकच्या आठव्या अध्यायात चार अनुयोगामध्ये विभाजित जैनसाहित्याचा यथावत अर्थ कसा घ्यावा, त्यातील एकतेचा प्रवाह कसा हुडकावा याचे वर्णन आहे. हा भाग मात्र छहढालेचा आकार व रूप पाहता त्यात येणे शक्य नव्हते. मोक्षमार्गप्रकाशकच्या नवव्या अध्यायापासून मोक्षमार्गाचे निरूपण सुरू होते. सम्यग्दर्शनाच्या लक्षणाचा उहापोह करून आठ गुण व पंचवीस दोषांचे वर्णन करणारा तो ग्रंथ तेथे दुर्दैवाने अपुरा राहतो. यावरून मोक्षमार्गप्रकाशकच्या विशाल स्वरूपाची कल्पना करता येते.

परंतु पंडितजींनी (दौलतराम) मात्र छहढालेमध्ये या विस्तृत मोक्षमार्ग निरूपणाचा आटोप थोडक्यात केला आहे. तिसऱ्या ढालीमध्ये प्रथमतः निश्चय मोक्षमार्ग व व्यवहार मोक्षमार्ग यांचे दिग्दर्शन केले आहे. निश्चय रत्नत्रयाचे वर्णन केले आहे. तत्त्वार्थश्रद्धान हे व्यवहारसम्यग्दर्शनाचे लक्षण आहे. येथे सात तत्त्वे, सहा द्रव्ये यांचे वर्णन करून सम्यक्त्वाचे आठ अंग व पंचवीस दोष यांचे थोडक्यात वर्णन केले आहे व शेवटी सम्यग्दर्शनाचा महिमा सांगितला आहे.

चौथ्या ढालीमध्ये सम्यग्ज्ञानाचे वर्णन करून आत्मज्ञानाचा व सम्यग्ज्ञानाचा महिमा उत्कृष्टपणे वर्णन केला आहे. नंतर उत्तरार्धामध्ये सम्यक् चारित्राच्या वर्णनामध्ये गृहस्थाची व्रते व प्रतिमा यांचे वर्णन आहे.

मुमुक्षू गृहस्थ संसार व धर्म याच्यासंबंधी बारा भावनांचे चिंतवन करून संसारातून निवृत्त होऊन मुनीपदाचा अंगीकार करतो. त्या बारा भावनांचे सरस वर्णन पाचव्या ढालीत आहे.

सहाव्या ढालीमध्ये प्रथमतः मुनींच्या सकल चारित्राचे वर्णन करून नंतर सविकल्प दशेनंतर साधक जी निर्विकल्प शुद्धोपयोग दशा प्राप्त करतो

त्याचे (स्वरूपाचरणाचे) वर्णन केले आहे. अशाप्रकारे वर्णन पूर्ण करून आत्म्याच्या कल्याणासाठी रत्नत्रयाच्या स्वीकारची प्रेरणा केली आहे.

संपूर्ण जैनदर्शनाचे हृदय म्हणजे स्वपरभेदविज्ञान उत्पन्न करणारे अध्यात्म आहे. अध्यात्माची बैठक पं. दौलतरामजी कधीही सोडत नाहीत. त्यांची पदे घ्या, स्तुती घ्या, की छहढाला घ्या. सर्वत्र याचा प्रत्यय येतो. तिसऱ्या ढालीमध्ये निश्चय रत्नत्रयाचे स्वरूप सांगताना याचा प्रत्यय येतो. तिसऱ्या ढालीमध्ये निश्चय रत्नत्रयाचे स्वरूप सांगताना किंवा चौथ्या ढालीत सम्यग्ज्ञानाचा, आत्मज्ञानाचा महिमा सांगताना ''पै निज आतमज्ञान विना सुख लेख न पायो'' असे ते म्हणतात; पाचव्या ढालीत संवरानुप्रेक्षेचे स्वरूप सांगताना ''जिन पुण्य-पाप नहिं कीना आतम अनुभव चित दीना'' पुण्य व पापाच्या अतीत शुद्ध आत्मानुभव हे संवराचे कारण आहे असे ते सांगतात; धर्मानुप्रेक्षेमध्ये ''जो भावमोहते न्यारे दृगज्ञानव्रतादिक सारे । सो धर्म....'' भावमोह व कषायविरहित रत्नत्रय हा धर्म आहे असे ते सांगतात; आणि सहाव्या ढालीत उत्तरार्धामध्ये ते स्वरूपाचारणासारख्या सूक्ष्म विषयाचे सुगम निरूपण करतात. तेथे त्यांनी जैनदर्शनाचे हे हृदय तंतोतंतच प्रगट केले आहे.

छहढालेमध्ये सर्वत्र अध्यात्माची भूमिका जशी आहे तद्वत हृदयंगम काव्याचाही आविष्कार आहे. त्यांच्या काव्यात शांतरस, वैराग्यरस हा स्थायीभाव आहे. तेथे शृंगारादि लौकिक काव्यरसाला अवसरच नाही. कोणत्याही शब्दचमत्कृती अथवा अर्थचमत्कृतीचा बळाने ओढूनताणून वापर न करता उपमा वगैरे आवश्यक तेथे अर्थबोधाकरिताच योजल्या आहेत. ''कुगुरू जन्म जल उपल नाव'' सारख्या उपमा थोड्याच पण किती सार्थ व सुंदर आहेत !

ते वर्ण्य विषयाचे रसपूर्ण वर्णन करतात. त्यांचे काव्य सरळ हृदयाला जाऊन भिडते. पहिल्या ढालीमध्ये ते संसारातील चार गतींचे दुःख वर्णन करतात, दुसऱ्या ढालीमध्ये मिथ्या भ्रमाचे वर्णन करतात, तिसऱ्या ढालीत वर्णन केलेला सम्यक्त्वाचा महिमा, संपूर्ण बारा भावना, सकलचारित्राच्या वर्णनामध्ये मुनीश्वराची भाषासमिती व समतावृत्तीचे ते वर्णन करतात -

'तिन सुथिर मुद्रा देखि मृगपण उपल खाज खुजावते'
'जग सुहितकर सब अहितकर श्रुतिसुखद सब संशय हरै ।'
'भ्रमरोगहर जिनके वचन मुखचंद्रतै अमृत झरैं ।'
'अरि-मित्र, महल-मसान, कंचन-काच, निंदन-थुतिकरण'
'अर्ध्यावतारण असिप्रहारन में सदा समता धरन ।।'

हे मुनींचे वर्णन अंतरंगाला जाऊन भिडणारे असून मुनींविषयी भक्तिभाव जागृत करणारे आहे. अनुभूती व समरसता हेच श्रेष्ठ काव्याचे गमक आहे. त्या कसोटीवर छहढाला ही एक श्रेष्ठ दर्जाची काव्यकृती आहे हे मानावेच लागते.

कवीच्या या अनुभूतीला आचार्यांच्या साहित्याच्या परिशीलनाचे जबरदस्त पाठबळ आहे. संपूर्ण छहढाला अथवा पदे, स्तुती यांवर हा प्रभाव जागोजाग दिसून येतो. दुसरी ढाल वाचताना आत्मानुशासनाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. कुंदकुंदसाहित्याचा विशेषतः समयसार, प्रवचनसार व पंचास्तिकाय यांचा प्रभावही जागोजाग आहे. परंतु कोठेही काव्यात त्यामुळे रूक्षता किंवा बोजडपणा आलेला नाही.

'कोटि जनम तप तपैं ज्ञानविन कर्म झरैं जे ।
ज्ञानीके छिन मांहि त्रिगुप्तितैं सहज टरैं ते ।।'
'मुनीव्रत धार अनंतवार, नव ग्रीवक उपजायो ।
पै निज आतमज्ञान, बिना सुख लेश न पायो'

हे वाचताना प्रवचनसारमधील

जं अण्णाणी कम्मं खवेदि भवसयसहस्सकोडीहिं ।
तं णाणी तिहिं गुत्तो खवेदि उस्सासमेत्तेण ।।३८।। (अ. ३)

ही गाथा सहजच डोळयासमोर येते.

जे पुरब शिव गये, जाहि अब आगे जै है ।
सो सब महिमा ज्ञानतनी मुनीनाथ कहै है ।।

येथे ''भेदविज्ञानतः सिद्धा सिद्धा ये किल केचन'' हा अमृतचंद्राचार्यांचा कलश डोळयासमोर येतो. निश्चयमोक्षमार्ग आणि व्यवहार मोक्षमार्ग यांचे सामंजस्य दाखवितांना त्यांनी पंचास्तिकाय-समयसारमध्ये अमृतचंद्राचार्य देवांनी जे निश्चयव्यवहाराचे सामंजस्य बसविले त्याचा गाभाच थोडक्यात आपणास सांगितला नाही कां ?

यह राग आग दहैं ...
चिर भजे विषय-कषाय अब तो त्याग निजपद बेईये ।
कहा रच्यो परपद में न तेरो पद यहै क्यों दुःख सहै ।

येथे

''आसंसारात्प्रतिपदममी रागिनो नित्यमत्ता । सुप्ता...''

ह्या कलशातील करुणरसाचा पूरच प्रतीत होतो.

अशाप्रकारे जिनागमाचा सागरच खरोखर या छहढालेच्या घागरीमध्ये (अवघ्या ९४ श्लोकांमध्ये) सामावलेला असून साधकाला स्वपरभेद-विज्ञानाची प्राप्ती करून देण्याचे सामर्थ्य या साहित्यकृतीत आहे. संपूर्ण हिंदी जैन पद्यसाहित्यांमध्ये ही अद्वितीय कृती आहे. म्हणूनच ही साधकाची प्रेरणा आहे. साधकाच्या जीवनगंगेच्या प्रवाहात सामावलेली सरस्वती आहे. म्हणूनच सद्गदित अंतःकरणाने छहढालेचा पाठ समाजाच्या सर्वच थरातून आजही होतो व तो असाच होत राहील. कारण साधकामध्ये नवचैतन्य ओतणारी ही संजीवनी विद्याच ठरली आहे.

-----

ॐ

अध्यात्मप्रेमी कविवर पं. दौलतरामजी कृत

# छहढाला

## (सुबोध मराठी भावानुवाद)

-- -- OO -- --

## पहिली ढाल

मंगलाचरण (वृत्त सोरठा)

तीन भुवनमें सार, वीतराग विज्ञानता ।
शिवस्वरूप शिवकार, नमहुँ त्रियोग सम्हारिकैं ।।१।।

शब्दार्थ : शिवस्वरूप = कल्याणमय. शिवकार = कल्याणकारी. सम्हारिकैं = सावधानतापूर्वक. त्रियोग = मनवचनकायेने.

अन्वयार्थ : (तीन भुवनमें सार) या तीन लोकांमध्ये सारभूत उत्कृष्ट वस्तु म्हणजे (वीतराग विज्ञानता) रागद्वेषादि दोषांनी रहित असे केवलज्ञान आहे. आणि तेच (शिवस्वरूप शिवकार) साक्षात कल्याणरूप व कल्याण करणारे आहे. त्यास (त्रियोग) मनवचनकायेने (सम्हारिकैं) सावधानतापूर्वक (नमहु) नमस्कार करतो.

भावार्थ : ज्ञान हेच जीवाचे स्वरूप किंवा तत्त्व आहे. ते ज्ञान संसारामध्ये अनादिकाळापासून रागादि विकारवश ज्ञेयामध्ये आसक्त होऊन




अज्ञानरूप परिणमले आहे आणि दुःखाचे एकमात्र कारण झाले आहे. जेव्हा ज्ञान आपल्या शुद्ध आत्मतत्त्वाच्या आश्रयाने ज्ञेयात आसक्त न होता मात्र जाणते, तेव्हा तेच ज्ञान विज्ञान म्हटले जाते. लोकांमध्ये ज्यास विज्ञान (Science) म्हणतात ते खऱ्या अर्थाने विज्ञान नव्हे, कारण तेही विकारांनी प्रेरित व रंजित आहे. खरे विज्ञान वीतरागतेपूर्वक उत्पन्न होते. वीतरागता ही विज्ञानाची जननी आहे. जाणण्याच्या मागचे विकाराचे प्रयोजन



नष्ट झाले तर तेच जाणणे चित्कलेचा विलास आहे. असे विज्ञान हा जीवाचा सहजभाव आहे. तेच साक्षात हित आहे आणि हितकारीही आहे अर्थात हिताच्या प्राप्तीचे साधनही हेच यथार्थ ज्ञान आहे. आत्मा परमात्मा होतो तो याच वीतराग विज्ञानाने.

पंचणमोकार महामंत्रात ज्या पाच परमेष्टींना नमस्कार केला आहे, त्यांच्या परमेष्टीपणाचे कारण हेच वीतराग विज्ञान आहे. अरहन्त-सिद्ध हे साक्षात वीतरागविज्ञानमय आहेत. आचार्य उपाध्याय साधु हे वीतरागविज्ञानतेच्या मार्गाला लागलेले पथिक आहेत, साधक आहेत; म्हणून कोणत्याही एका व्यक्तीस नमस्कार न करता अत्यंत वरच्या भूमिकेवरून श्रेष्ठत्वाचे गमक अशा गुणांना-वीतरागविज्ञानतेला-येथे नमस्कार केला आहे. गुणांना मंगलाचरणरूपाने नमस्कार करतात; यात वीतरागप्रणीत शासनावरील निष्ठा जशी प्रगट होते तद्वत् प्राचीन वीतरागी संतांच्या वाणीचे अनुसरण करण्याची नम्रताही सूचित होते. ।।१।।

### अंतिम प्रयोजनाचा निर्देश आणि ग्रंथरचनेचा उद्देश

जे त्रिभुवनमें जीव अनंत, सुख चाहैं दुःखतैं भयवन्त ।
तातैं दुखहारी सुखकारि कहैं सीख गुरू करुणाधारि।।२।।

शब्दार्थ : चाहैं = इच्छा करतात. सीख = शिक्षा, उपदेश.



अन्वयार्थ : (जे त्रिभुवनमें अनंत जीव) या तीन लोकांमध्ये जे अनंत प्राणी आहेत ते (सुख चाहैं दुखतैं भयवन्त) सुखाची इच्छा करतात आणि दुःखाला भितात. (तातैं करुणा धारि[१] गुरू) म्हणून दया करून आचार्य (दुखहारी सुखकारि सीख कहैं) दुःखाचा नाश करणारा आणि सुखास देणारा उपदेश देतात.

भावार्थ - या जगातील जीवमात्राच्या सर्व व्यवहाराचे एकमात्र प्रयोजन आहे. ते म्हणजे सुखाची इच्छा आणि दुःखाचा परिहार होय. सर्व प्राण्यांच्या सर्वच क्रिया याच एका मुख्य प्रयोजनानेच होतात म्हणून तेच जीवमात्राचे अंतिम प्रयोजन आहे, परंतु विकारांनी प्रेरित झाल्यामुळे त्यांच्या या मूळ प्रयोजनाचाच घात होतो. ह्या प्रयोजनाची सिद्धी करणारा अमोघ उपदेश व मार्ग दयाळू गुरू सांगतात. ।।२।।

उपदेश ऐकण्याची प्रेरणा आणि संसारपरिभ्रमणाच्या कारणाचा निर्देश

ताहि सुनो भवि मन स्थिर आन, जो चाहो अपनो कल्यान ।
मोह-महामद पियो अनादि, भूलि आपको भरमत वादि ।।३।।



---



शब्दार्थ : भवि = हे भव्य जीवा ! महामद = तीव्र दारू, मद्य. वादि = निष्कारण, भरमत = भटकत आहेत.

अन्वयार्थ : (भवि) हे भव्य जीवानो ! (जो अपनो कल्यान चाहो) जर आपण आपले हित इच्छित असाल तर (मन स्थिर आन) मन स्थिर करून [विषयकषायादिकांपासून निवृत्त करून] (ताहि सुनो) तो श्रीगुरूंचा उपदेश ऐका ! या संसारात प्रत्येक प्राणी (अनादि) अनादि काळापासून (मोह-महामद पियो) मोहरूपी महामद प्यालेला आहे आणि (आपको भूलि वादि भरमत) स्वतःला विसरून मात्र निष्कारण भटकतो आहे.

भावार्थ : हे जीवांनो ! तुम्ही निश्चल शांत चित्ताने हा गुरूचा उपदेश ऐका ! संसारी जीवाच्या या व्यर्थ भटकण्याचे निदान गुरूंनी सांगितले आहे. जसे कुशल वैद्य रोगाचे निदान करतो, लक्षण सांगतो, इलाज सांगतो; तसेच वीतरागी सन्त हे जीवमात्राचे अकारण वैद्य आहेत व ते प्रथमतः रोगाचे निदान सांगतात व लक्षणे सांगतात, नंतर कारणे सांगून उपचार सांगतात. सर्व संसारी जीवांना भवबंधनाचा रोग जडलेला आहे. त्याचे मूळ कारण हा जीव मोहरूपी मदिरा पिऊन स्वतःला विसरला आहे हेच आहे. दारूच्या नशेत दारूडया स्वतःचे कुलशील विसरतो. मानवाला न शोभणाऱ्या क्रिया करतो. तद्वत् हा प्राणी मिथ्यात्वरूप मद्याचे प्राशन करून स्वतःला विसरतो व अस्वाभाविक आत्मविरोधी क्रिया करतो. जो भव धारण करतो तसे स्वतःला मानून आपल्या चैतन्यस्वरूपाला विसरतो व विनाकारणच चारही गतींमध्ये भवभ्रमण करतो. ।।३।।

या ग्रंथाला लाभलेले पूर्वपरंपरेचे पाठबळ व निगोददशेचे वर्णन

तास भ्रमन की है बहु कथा पै कछु कहूं कही मुनि जथा।
काल अनंत निगोद मँझार बीत्यो एकेन्द्री तन धार ।।४।।

शब्दार्थ : पै = परंतु, मँझार = मध्ये (निगोदामध्ये). बीत्यो = व्यतीत केला.

अन्वयार्थ : (तास भ्रमन की कथा बहु है)त्या संसारातील परिभ्रमणाची कथा पुष्कळच मोठी आहे.(पै जथा मुनि कही) परंतु ज्याप्रमाणे पूर्व मुनींनी जशी सांगितली त्याप्रमाणे(कछु कहू) थोडी फार सांगतो. (एकेन्द्री तन धार अनन्त काल निगोद मँझार बीत्यो) एकेन्द्रिय[१] शरीर धारण करून या जीवाने निगोदामध्ये[२] अनंत काळ व्यतीत केला.

भावार्थ - त्या संसारभ्रमणाचे (जीवसमासाचे[३] आणि पंचपरिवर्तनाचे स्वरूप) करणानुयोगाच्या गोम्मटसारादि ग्रंथांमध्ये विस्ताराने सांगितलेले आहे. त्याला अनुसरून कवी येथे त्याचे अत्यंत अल्प दिग्दर्शन करतात. परिभ्रमणाचा बहुतेक काळ एकमात्र स्पर्शनेन्द्रिय शरीर धारण करून निगोददशेमध्ये व्यतीत केला आहे. संसारामध्ये त्याचा निवास बहुधा निगोदामध्ये स्थायी असतो व इतरत्र जाऊन पुनः यावे त्याप्रमाणे तो अन्य स्थावर व त्रस पर्याय धारण करतो. नित्यनिगोदातून निघून त्रसपर्यायामध्ये परिभ्रमणाचा उत्कृष्ट काळ केवळ दोन हजार सागरापेक्षा काही अधिक आहे. जीव बहुभाग काळ एकेंद्रिय दशेत आणि त्यातही बव्हंशी निगोदातच व्यतीत करतो. ।।४।।

---



## निगोद व एकेंद्रिय दशेतील दुःख

एक स्वासमें अठदस बार, जन्म्यो मर्‍यो भर्‍यो दुखभार ।
निकसि भूमि जल पावक भयो, पवन प्रतेक वनस्पति भयो ।।५।।




शब्दार्थ : अठदस = अठरा. भर्‍यो = सहन केले. निकसि = बाहेर पडून. पावक = अग्नी. पवन = वारा. थया = झाला.

अन्वयार्थ : निगोददशेमध्ये हा जीव (एक स्वासमें अठदस बार जन्म्यो मर्‍यो) एका श्वासामध्ये अठरा वेळ जन्मला आणि मेला व त्याने (दुखभार भर्‍यो) दुःखाचे ओझे सहन केले. (निकसि भूमि जल पावक पवन भयो) तेथून बाहेर पडून पृथ्वी, जल, अग्नी व वायू झाला आणि (प्रतेक वनस्पति भयो) प्रत्येक वनस्पती झाला.

भावार्थ : जन्म व मरणाचे दुःख प्रत्यक्ष अनुभूत आहे. जन्मताना बालकास होणाऱ्या वेदना जरी त्यास आठवल्या नाहीत तरी इतरांच्या अनुभवास येतात. मरणाचे दुःखही अनुभवास येते. असे हे जन्ममरणाचे दुःख निगोददशेमध्ये सारखे सुरूच आहे. जन्माचे दुःख भोगत श्वास घेतो न घेतो तोच मरण समोर उभे ! त्या दुःखाची कल्पनाही भयानक आहे. तेथून बाहेर पडून[१] तो पृथ्वी, जल,

अग्नी, वायू व प्रत्येक वनस्पती होतो. या अवस्थेत होणारे दुःख सांगणेही कठीण व त्याचा प्रतिकार करणेही कठीण आहे. केवळ प्राप्त दुःखे भोगणे एवढाच मार्ग आहे. ।।५।।

तिर्यंच गतीमध्ये त्रस पर्यायाची दुर्लभता व त्यातील दुःख

दुर्लभ लहि ज्यों चिन्तामणी त्यौं परजाय लही त्रसतणी
लट पिपीलि अलि आदि शरीर, धर-धर मऱ्यो सही बहु पीर ।।६।।



शब्दार्थ : लही = प्राप्त होते. लट = अळी. पिपीलि = मुंगी. अलि = भुंगा. पीर ष दुःख, पीडा.

अन्वयार्थ : या जीवाने (ज्यों चिन्तामणी दुर्लभ लहि) ज्याप्रमाणे चिन्तामणी रत्न दुर्लभतेने प्राप्त होते(त्यौं त्रसतणी पर्याय लहि) त्याप्रमाणे एकेंद्रिय अवस्थेमधून त्रसपर्याय दुर्लभतेने प्राप्त होते. (लट पिपीलि अलि आदि शरीर धर-धर मऱ्यो) अळी [द्वीन्द्रिय] मुंगी [त्रीन्द्रिय] भुंगा [चतुरिन्द्रिय] वगैरेंचे शरीर वारंवार धारण करून तो मेला आणि(बहु पीर सही) अतिशय दुःख सहन केले.

भावार्थ : जसे चिंतामणी रत्न प्राप्त होणे महाकठीण आहे. तसेच एकेंद्रियातून त्रसपणा मिळणे महाकठीण आहे. त्या त्रस पर्यायांतही या जीवाने अळी, मुंगी, भुंगा आदि हीन शरीर धारण करून खूप दुःख सहन केले. हे त्रस असून त्यांना स्थावरापेक्षा ज्ञानदर्शनाची शक्ती काहीशी अधिक



आहे. परंतु तेही प्राप्त परिस्थितीचे शिकारच असतात. दुःख भोगण्यालीकडे त्यांनाही अन्य काहीच करता येत नाही. मरणाचे भय, भूक-तहान आदि पीडा प्रत्यक्ष दृग्गोचर आहेत. ।।६।।

तिर्यंच गतीमध्ये संज्ञी व असंज्ञी जीवाचे दुःख

कबहूँ पंचेंद्रिय पशु भयो, मन बिन निपट अज्ञानी थयो ।
सिंहादिक सैनी व्है क्रूर, निबल पशू हति खाये भूर ।।७।।



शब्दार्थ : निपट = अत्यन्त, सैनी = संज्ञी, हिताहिताचा विवेक असणारे, हति = मारून. भूर = खूप, भरपूर.

अन्वयार्थ : (कबहूँ पंचेंद्रिय पशु भयो) हा जीव कधीकाळी पंचेन्द्रिय पशू झाला परंतु (मन बिन निपट अज्ञानी थयो) मन नसल्याने अत्यन्त अज्ञानी झाला. कदाचित् (क्रूर सिंहादिक सैनी व्है) संज्ञी होऊन क्रूर सिंहादिकांचे भव घेऊन (भूर निबल - पशू हति खाये) अनेक निर्बल पशूंना [गाय, शेळी वगैरेंना] ठार मारून खाल्लेत.

भावार्थ : पंचेन्द्रिय अवस्था इन्द्रियांनी परिपूर्ण दशा. ह्यातही

कित्येक असंज्ञी[1] तर कित्येक संज्ञी असतात. असंज्ञी असल्यामुळे मनाच्या अभावी हितहिताचा निर्णय होत नाही व दुःख टाळण्याचा समीचीन उपायही होत नाही. कदाचित संज्ञी झाला तरी क्रूर वाघ सिंह होऊन नाना दुबळ्या जीवांना ठार करतो. त्यांचे भक्षण करतो. अर्थात तेव्हाही मनाचा उपयोग हित-अहिताच्या निर्णयासाठी होत नाही. एकूण अज्ञान आणि भूक, तहान वगैरे पिच्छा सोडत नाहीत व दुःखही संपत नाही. ।।७।।

### तिर्यंचगतीतील निर्बलांचे दुःख

कबहूँ आप भयो बलहीन, सबलनि करि खायो अतिदीन ।
छेदन भेदन भूख पियास, भारवहन हिम आतप त्रास ।।८।।



शब्दार्थ : पियास = तहान, हिम = थंडी, आतप = ऊन.

अन्वयार्थ : (कबहूँ आप भयो बलहीन) कधी हा जीव स्वयं दुबळा झाला आणि (अतिदीन सबलनि करि खायो) अति दीन होऊन अन्य सबल प्राण्यांकडून भक्षण केला गेला. (छेदन भेदन भूख पियास





भारवहन हिम आतप त्रास) आणि छेदला जाणे, तुकडे होणे, भूक, तहान, अधिक ओझे वाहणे, थंडी, प्रखर ऊन आदि कष्ट सहन केले.

भावार्थ : कधी हा जीव स्वयं दुबळा होतो आणि अधिक बलशाली प्राण्यांकडून त्रस्त होतो. मार खाणे, अवयव कापले जाणे, भूक-तहान, बोचणारी थंडी व प्रखर ऊन आदि कष्ट सहन करणे ही तिर्यंच गतीतील दुःखे प्रत्यक्ष नजरेला येतात. ।।८।।

### तिर्यंच गतीतील दुःखाची अधिकता व नरकगतीच्या प्राप्तीचे कारण

वध-बंधन आदिक दुख घने कोटि जीभतैं जात न भने ।
अति संक्लेशभावते मर्‍यो घोर श्वभ्रसागरमें पर्‍यो ।।९।।



शब्दार्थ : घने = भरपूर. भने = सांगणे. श्वभ्र = नरक.

अन्वयार्थ : (वध-बंधन आदिक घने दुख)वध, बंधन वगैरे इतकी नाना दुःखे या जीवाने तिर्यंच गतीत सहन केली आहेत की त्यांचे (कोटि जीभतैं भने न जात) वर्णन कोटी जिभांनी होऊ शकत नाही.(अतिसंक्लेश भावते मऱ्यो) आणि तेथे तो अत्यन्त संक्लेश परिणामांनी मरतो व(घोर श्वभ्रसागरमें पऱ्यो) भयानक नरकरूपी समुद्रात जाऊन पडतो.

भावार्थ : या जीवाने तिर्यंच गतीमध्ये मारले जाणे, बांधले जाणे वगैरे अनेक दुःखे सहन केली आहेत. त्या दुःखांचे वर्णन कोटी जिभांनी होऊ शकत नाही. त्या दुःखाचे मूळ कारण माहीत नसल्यामुळे दुःख दूर करण्याचा समीचीन प्रयत्न होत नाही व त्यामुळे परवश होऊन संक्लेश परिणामांनी दुःखे सहन करतो. त्यांनी व्याकूळ होऊन मरतो व समुद्राप्रमाणे अपार घोर अशा नरकामध्ये जातो. ।।९।।

### नरकातील जमीन व नद्यांचे वर्णन

तहाँ भूमि परसत दुख इस्यो, बीछू सहस डसैं नहि तिस्यो ।
तहा राध-शोणित-वाहिनी, कृमिकुलकलित देहदाहिनी ।।१०।।





अन्वयार्थ : (तहाँ भूमि परसत इस्यो दुःख)त्या नरकामध्ये भूमीला स्पर्श होताक्षणीच असे दुःख होते की(सहस बीछू डसैं तिस्यो नहि)हजार विंचू चावले तरी तसे दुःख होत नाही, तसेच(तहा राधशोणितवाहिनी) त्या नरकामध्ये रक्त आणि पूं यांनी भरून वाहणारी वैतरणी नावाची नदी असून ती (कृमिकुलकलित देहदाहिनी) नाना क्षुद्र जंतूंनी भरलेली व शरीराला दाह उत्पन्न करणारी आहे.

भावार्थ : त्या नरकातील जमिनीला स्पर्श करताक्षणीच अशा अपार वेदना होतात की हजारो विंचू चावल्याच्या वेदनाही कमीच पडाव्यात. तेथे वैतरणी नावाची नदी असून रक्त आणि पूं सदृश आहे. तिचे पाणी असंख्य क्षुद्र कीटाणूंनी भरलेले आहे. शरीराचा दाह शांत होण्यासाठी नदीमध्ये डुंबावे त्याचप्रमाणे दाह शांत होण्यासाठी नारकी त्या नदीत उडी घेतात परंतु वेदना शांत होण्याऐवजी दाह मात्र वाढतो.

कोणत्याही दुःखाचे मूळ कारण तर शरीरामध्ये ममता आणि आत्मत्वबुद्धि हेच आहे. परंतु तेथे भूमी व नदी तेथील दुःखाला अनुकूल निमित्तमात्र आहे. ।।१०।।

### नरकातील सेमर वृक्षाचे वर्णन व थंडीउष्णतेचे दुःख

सेमरतरु दलजुत असिपत्र, असि ज्यों देह विदारें तत्र ।
मेरु समान लोह गलि जाय, ऐसी शीत उष्णता थाय ।।११।।

शब्दार्थ : दलजुत = पानांनी सहित. असिपत्र = तलवारीचे पाते. त्याप्रमाणे विदारैं = फाडतात.



अन्वयार्थ : (तत्र असिपत्र ज्यों दलजुत सेमर तरु) त्या नरकात तलवारीच्या पात्याप्रमाणे धारदार पानांनी सहित असे सेमर वृक्ष आहेत की जे (असि ज्यों देह विदारै)तलवारीप्रमाणे शरीर फाडून टाकतात. (तत्र मेरु समान



लोह गलि जाय) तसेच तेथे मेरूपर्वताएवढा लोखंडाचा गोळा गळून जाईल (ऐसी शीत उष्णता थाय) अशी थंडी आणि उष्णता आहे.

भावार्थ : त्या नरकामध्ये सेमर नावाचे नाना वृक्ष आहेत. त्यांची पाने तलवारीच्या पात्याप्रमाणे धारदार आहेत. नारकी जीव छायेच्या आशेने त्या झाडाखाली जातात आणि जेव्हा त्यांची पाने गळून अंगावर पडतात तेव्हा ती अंग सोलून काढतात. तेथे काही नरकामध्ये उष्णता[१] एवढी

---

१. मेरुसमं लोहपिण्डं सीददं उण्हे विलब्भि पक्खितं ।
ण लहदि तलप्पदेसं विलीयदे मयणखण्डं वा ।।
मेरुसमं लोहपिण्डं उण्हं बीदे विलब्भि पक्खितं ।
ण लहदि तलं पदेसं विलीयदे लवणखण्डं वा ।।



असते की मेरू पर्वताएवढा लोखंडाचा गोळाही पाणीपाणी होऊन जाईल. कोठेकोठे थंडी पण भयंकर असते, सर्द हवेने मीठ विरघळावे त्याप्रमाणे मेरुपर्वताएवढा लोखंडाचा गोळाही विरघळून जाईल. ।।११।।

### नरकातील तहानेचे दुःख व असुरकुमार देवांचा आगलावेपणा

तिल तिल करहि देहके खण्ड, असुर भिडावैं दुष्ट प्रचण्ड ।
सिंधु नीरतैं प्यास न जाय, तो पण एक न बूंद लहाय ।।१२।।



शब्दार्थ : तिलतिल = तिळाप्रमाणे लहान लहान. खंड = तुकडे. भिडावैं = भांडण लावून लढवितात. सिंधु = समुद्र. नीरतैं = पाण्याने. बूंद = थेंब.

अन्वयार्थ : तेथील नारकी जीव(तिलतिल देहके खण्डए करहि)एक दुसऱ्याच्या शरीराचे तिळातिळाप्रमाणे तुकडे करतो. (दुष्ट असुर प्रचण्ड भिडावैं) दुष्ट असुरकुमार देव त्यांना परस्परांत खूप लढवितात.(सिंधुनीरतै प्यास न जाय) सागराएवढ्या पाण्यानेही तहान जाणार नाही, एवढी तहान लागते. (तो पण एक बूंद न लहाय)तरी पण पाण्याचा एक थेंबही मिळत नाही.

भावार्थ : नारकी जीव त्वेषाने परस्परांच्या शरीराचे तिळाएवढे तुकडे

करतात. एकसारखे ते परस्परांना दुःखच देत असतात. (त्यांचे शरीर वैक्रियिक असल्यामुळे शरीराचे तुकडे झाले तरी ते पाऱ्याप्रमाणे परत एकत्र मिळून जातात.) सर्वत्र दुःखदायक सामग्रीचा भडिमार असताना ''नको हे जिणे'' म्हणून ते दुःखापासून सुटका करून घेण्यासाठी आत्मघाताची इच्छा करतात. परंतु त्यांना अपमृत्युही नाही. आयुष्य संपेपर्यंत याचप्रकारे दुःख सोसण्याशिवाय अन्य गतीच नाही. म्हणूनच नरकायूला अशुभ प्रकृती म्हटले आहे. तिर्यंचानाही साधारणतः आपला भव संपावा असे वाटत नाही.

अत्यन्त संक्लेश परिणामांचे अम्ब, अम्बाबरीष आदि जातीचे असुरकुमार देव पहिल्या तीन नरकांपर्यंत जाऊन आपल्या अवधिज्ञानाने त्यांना गत जन्मातील वैर सांगून क्रूरतेने व कुतूहलाने आपसात भांडण लावून लढवितात व स्वतः आनंदित होतात. त्या नारकी जीवांना तहानसुद्धा इतकी जबरदस्त लागते की, सागराइतके पाणी पिऊनही तहान जाणार नाही. परंतु पाण्याचा एक थेंबही मिळत नाही. ।।१२।।

### नरकातील भुकेचे दुःख, त्यांचे आयुष्य व मनुष्यभवाच्या प्राप्तीचे वर्णन

तीन लोकको नाज जु खाय, मिटैं न भूख कणा न लहाय ।
ये दुख बहु सागरलौं सहै, करमजोगतैं नरगति लहै ।।१३।।






शब्दार्थ : नाज = धान्य. कणा = कणाएवढा दाणा. सागर = अपार असंख्य वर्षे. लौं = पर्यंत. करमजोगतैं = कर्मयोगाने, दैवयोगाने.

अन्वयार्थ : (तीन लोककौ नाज जु खाय) तीन लोकांतील धान्य खाल्ले तरी (भूख न मिटै कणा न लहाय) भूक शांत होत नाही परंतु धान्याचा एक कणही मिळत नाही. (ये दुख बहु साबर लौं सहै) ही दुःखे अनेक सागरापर्यंत सहन करतो. आणि (करमजोगतैं - नरगति लहै) कधी काळी दैवयोगाने मनुष्यगती प्राप्त करतो.

भावार्थ : नरकामध्ये भुकेची वेदनाही एवढी जबर असते की या विश्वातील सर्व धान्य भक्षण करूनही ती शांत होणार नाही. परंतु तेथे एक कणही मिळत नाही. अशी ही अपार दुःखे एक दोन दिवस नव्हे कित्येक वर्षेही नाही तर एकसारखी असंख्य करोडो वर्षेगणती सहन करावी लागतात. मध्यन्तरी त्यांचे आयुष्य समाप्त होत नाही आणि दुःखापासून सुटका होत नाही. कषायपरिणती व विषयवासना अतिशय जास्त असते. परंतु त्यांच्या पूर्तीची साधने तेथे मुळीच नाहीत. ज्ञानशक्ती जास्त परंतु तिचा विनियोग तत्त्वनिर्णयासाठी होत नाही. कषायपुष्टी करताच होतो. त्यामुळे जे दीर्घायुष्य देवमनुष्यादी गतीमध्ये सुखास कारणभूत असते ते येथे दुःखदायकच असते. या तीव्र वेदनेच्या अनुभवानेही कदाचित हा तत्त्वाभिमुख होऊन सम्यग्दर्शनाची प्राप्ती करून घेऊ शकतो. व्रतपरिणाम होत नसल्यामुळे देवायूंचा बंध मुळीच होत नाही. कदाचित् मध्यम लेश्येच्या परिणामामुळे मनुष्यगतीमध्ये जन्म घेतो. ।।१३।।

### मनुष्यगतीतील गर्भनिवासाचे व जन्माचे दुःख

जननी-उदर बस्यों नवमास, अंग सकुचतैं पाई त्रास ।
निकसत जे दुख पाये घोर, तिनको कहत न आवै ओर ।।१४।।

शब्दार्थ : बस्यों = राहतो. अंग सकुचतैं = शरीर आखडल्यामुळे. ओर = अंत.

अन्वयार्थ : मनुष्यगतीमध्ये प्रथमतः तर (जननी-उदर नवमास



बस्यों ) मातेच्या पोटात नऊ महिने राहतो;(अंग सकुचतैं त्रास पाई) अंग आखडून राहावे लागत असल्यामुळे अपार कष्टच प्राप्त करतो.(निकसत जें घोर दुख पाये) बाहेर पडताना जे भयंकर दुःख भोगतो(तिनको कहत ओर न आवै) ते सांगताना त्याला अंतच येत नाही. ते असीम आहे.

भावार्थ : मनुष्यभवामध्ये प्रथमतः तर आईच्या पोटात नऊ महिने राहावे लागते, तेथे अंग संकोचल्याने अपार वेदना होतात, मातेच्या द्वारेच भूक-तहान-हवा प्राप्त होत असल्याने मोठ्या कष्टाने शरीर तग धरते आणि बाहेर पडताना एवढे कष्ट होतात की त्याचे वर्णनही अशक्य आहे. जन्माचे दुःख नंतर स्मरत नाही पण इतरांना ते प्रत्यक्ष दिसते. भूक, थंडी, गरमी यांनी ते बालक टाहो फोडते. अशा दुःखांच्या विस्मृतीनेच केवळ मानव पुनः सुखाच्या कल्पनेत रमतो. ।।१४।।

### मनुष्यगतीतील तीन अवस्था

बालकपनमें ज्ञान न लह्यो, तरुणसमय तरुणीरत रह्यो ।
अर्धमृतकसम बूढापनो, कैसे रूप लखै आपनो ।।१५।।

शब्दार्थ : न लह्यो = प्राप्त करीत नाही. अर्धमृतकसम = अर्धमेल्याप्रमाणे. बूढापनो = म्हातारपण. लखै = प्राप्त होईल.

अन्वयार्थ : या जीवाला (बालकपनमें ज्ञान न लह्यो) बालपणामध्ये ज्ञानाचा लाभच झाला नाही. (तरुणसमय तरुणीरत रह्यो) यौवनामध्ये





पत्नीसह विलासात दंग राहतो.(अर्धमृतकसम बूढापनो) आणि म्हातारपण म्हणजे तर अर्धमेल्यासारखीच दशा. [कारण तेव्हा अवयव शिथिल होऊन ते दुबळे होतात.] (कैसे आपनो रूप लख्यौ) या प्रकारे मानव जन्माचा आदि, मध्य व अंतभाग व्यतीत झाला असताना त्यांना आपल्या स्वतत्त्वाची प्राप्ती कशी होणार ?

भावार्थ : ज्याप्रमाणे उसाचा खालचा भाग (बूडभाग) खाण्यास योग्य नसतो त्याप्रमाणे बालपणसुद्धा धर्माच्या, स्वरूपाच्या प्राप्तीकरिता योग्य नाही. उसाचा शेंडाही उपयोगाचा नसतो. तद्वत् म्हातारपणही सर्व अवयव गळून जात असल्यामुळे धर्म साधण्यास योग्य नसते. तारुण्यात सामर्थ्याचा विकास असतो, परंतु सामर्थ्य शृंगारविलासात खर्ची घातल्याने ''मी कोण ? मी या संसारात का भटकतो ? माझे कर्तव्य काय ?'' याचा विचार करून तत्त्वज्ञानाची प्राप्ती करून घेण्यास सवडच काढत नाही. याप्रमाणे सारा मानवजन्म स्वतःचे काही एक प्रयोजन न साधता व्यर्थ जातो. ।।१५।।

### देवगतीमध्ये भवनत्रिकांचे दुःख

कबहुँ अकामनिर्जरा करै, भवनत्रिकमै सुरतनु धरै ।
विषय-चाह-दावानल दह्यो, मरत विलाप करत दुख सह्यो ।।१६।।

शब्दार्थ : विषयचाहदावानल = विषयांची इच्छा हाच दावानल. सुरतनु = देवाचे शरीर.




अन्वयार्थ : मनुष्यभवामध्ये (कबहुँ अकामनिर्जरा करै) हा जीव कधीकाळी अकामनिर्जरा[१] करतो. मरणानंतर (भवनत्रिकमें सुरतनु धरै) भवनवासी, व्यंतर, ज्योतिष्कवासी या तीन हीन देवांमध्ये देवशरीर धारण करतो. (विषयचाहदावानल दह्यो) तेथेही विषयवासनेच्या अग्नीने सारखा पोळतच असतो. [त्यामुळे आकुलताच असते; समाधान नसते.] (और मरत विलाप करत दुख सह्यो) आणि मरतानाही शोक करीत करीत दुःख भोगतो.

भावार्थ : मनुष्यभवातही सुखदुःखांचे हेलकावे खात खात हा जीव कधी काळी स्वेच्छेने नव्हे तर परवश मंदकषायरूप परिणामांनी वेदना शांतपणाने सहन करतो. त्यामुळे पापकर्मांची काहीशी निर्जरा होते. त्या मंदकषायरूप लेश्यापरिणतीने कदाचित् देवगतीमध्ये भवनवासी आदि तीन प्रकारच्या हीन देवांमध्ये जन्म घेतो. तेथेही सुखसमाधान कसे ते नसतेच. सदैव विषयवासनेची ओढ ही आहेच. वासनारूपी अग्नीने तो देव

---



सारखा जळत असतो. विषयवासना हेही दुःखच आहे. त्यात सुख असते तर आतुर होऊन या जीवाने विषयामध्ये झेप पुनःपुन्हा कशाकरिता घेतली असती ? आमरण विषयवासनेने संतप्त होऊन विलाप करीत मरणालाही कवटाळतो. मरतानाही ही भोगसामग्री येथेच राहणार, कोणास ठाऊक पुढे मिळणार की नाही ? या चिंतेने पुनः विलाप करतच मरतो. ।।१६।।

### वैमानिक देवांचे दुःख

जो विमानवासी हुं थाय, सम्यकदर्शनबिन दुख पाय ।
तहतैं चय थावर-तनू धरै, यो परिवर्तन पूरे करै ।।१७।।



शब्दार्थ : हूं = देखील. थाय = झाला. तहतैं = तेथून. चय = च्युत होऊन, निघून. तनु = शरीर. यो = याप्रमाणे.

अन्वयार्थ : (जो विमानवासी हूं थाय) जरी तो कदाचित् विमानवासी वैमानिक देव झाला तरी (सम्यकदर्शनबिन दुख पाय) यथार्थ, वास्तव दृष्टीविना-सम्यग्दर्शनाशिवाय दुःखच प्राप्त करतो. (तहतैं चय थावर-तनु धरै) तेथून च्युत होऊन पुनरपि स्थावर शरीर धारण करतो. (यो परिवर्तन पूरे करै) याप्रमाणे परिभ्रमणाचे चक्र पूर्ण करतो.

भावार्थ : कदाचित तो वैमानिक देव झाला तरी विषयतृष्णा

सुटलेली नसते. सुख आत्माधीन आहे. बाह्य विषयसामग्रीच्या आधीन नाही, मी ज्ञानमात्र आत्मा आहे. मी शरीर नव्हे. अशी यथार्थ समीचीन दृष्टीच त्याला प्राप्त झालेली नसते. तो विषयानंदात मग्न राहतो. तृष्णा हेच महान् दुःख आहे, कारण तृष्णा आणि समाधान याचा विरोध आहे. विषयतृष्णेच्या आर्त ध्यानाने मरून हा देव पुनरपि स्थावर शरीर धारण करतो. याप्रमाणे परिभ्रमणाचे एक वर्तुळ पूर्ण करतो. या तऱ्हेने हा जीव अनंत परिवर्तने करीत आलेला आहे. ।।१७।।

तात्पर्य हे की, संसारात कोणताही भव, कोणतीही गती, कोणताही पर्याय सुखद नाही. संसार म्हणजेच संयोगाने प्राप्त झालेल्या सामग्रीमध्ये ममता, रागद्वेष बुद्धी. जेथे मोहममता आहे तेथे दुःख ठेवलेलेच आहे. ज्यांचे परिणमन कदापि स्वाधीन नाही अशा विषयसुखाची, धनादी सामग्रीची मोहममता करून विफलतेशिवाय दुसरे पदरी पडणार ते काय ? कोणतीही सामग्री, संयोग स्वयं सुखदुःखाचे कारण नाही. अन्य सामग्रीला सुखदुःखाचे कारण मानून त्यासंबंधी रागद्वेष करणे हे मिथ्यात्व आहे व ते दुःखाचे मूळ कारण आहे. सम्यग्दर्शनाशिवाय मिथ्यात्वामुळेच आजवर प्राणी दुःखी झाला आहे. आणि तत्त्वाबाबत यथार्थ दृष्टी प्राप्त झाली तर ती दृष्टी सुखाचे साधन आहे. कसे तेच पुढे दुसऱ्या ढालीमध्ये कविवर सांगणार आहेत.

## पहिली ढाल - सारांश

या जगातील जीवमात्र सुखाची प्राप्ती आणि दुःखाचा परिहार इच्छितो. परंतु आत्मतत्त्व आणि विश्व यांचे यथार्थ स्वरूप समजल्याशिवाय या सुखाच्या प्राप्तीच्या प्रयोजनाची सिद्धी अशक्य आहे. या प्रयोजनाची सिद्धी करणारा उपदेश श्रीगुरू दयाळू होऊन भव्य जीवांना देतात.

या जीवाला संसारामध्ये सुख न मिळता दुःखच प्राप्त होते. याचे कारण अज्ञानामुळे संसाराचे स्वरूपच तो लक्षात घेत नाही. विश्वातील



नाना पदार्थ आपआपल्या स्वभावाने आहेत. ते तत्त्वतः न सुखरूप आहेत, न दुःखरूप आहेत. परंतु या विश्वातील ज्ञेयांना जाणणारा हा जीव त्या पदार्थांना जाणताना मोही होऊन तेथे भ्रमाने एकत्वबुद्धी करतो व रागीद्वेषी होतो. बाह्य परिकर दुःखाचे कारण नसून त्याबाबत मोहभाव हेच दुःखरूप आहेत व संसाराचे मूळ आहेत. नव्हे तोच संसार आहे ! हे रागद्वेषमोहरूप परिणाम चार गतीरूप संसारामध्ये संयोगाच्या लक्ष्याने (पर्याय बुद्धीने) आपल्याच अज्ञानाने होतात. संसारदुःखाचे अल्पसे दिग्दर्शन करतात.

तिर्यंचगतीतील दुःख - कर्मबंधनाच्या रोगाने जर्जर झालेले संसारी जीव चार गतींमध्ये भटकतात. त्यांपैकी बहुभाग काळ तिर्यंचगतीतील निगोददशेतच जातो. तेथे एका श्वासात अठरा वेळा जन्ममरण होते, ज्ञानाची अतिहीनता आहे. नंतर महत्प्रयासाने तो भूमि, जल, अग्नि, वायु प्रत्येक वनस्पती या स्थावरांत जन्म घेतो. तेथून कधीकाळी कष्टाने त्रस पर्याय धारण करतो. द्वींद्रियादिक असंज्ञी दशा प्राप्त करून छेदणे, जळणे आदि दुःखे भोगतो. कदाचित् संज्ञी होतो तेथेही स्वयं निर्बळ होऊन सिंहव्याघ्रादि क्रूर प्राण्यांचे भक्ष्य बनतो. तर कधी सबळ बनून निर्बलांना त्रस्त करतो. तिर्यंचगतीमध्ये भूक, तहान, ऊन, थंडी, अवयवांचा छेद अतिभारवहन आदि नाना दुःखे प्रत्यक्षच दिसून येतात. ती दुःखे भोगून अति संक्लेशपरिणामांनी मरतो व नरकगतीत जन्म घेतो.

नरकगतीचे दुःख - नरकगतीतीत दुःखाला तर पारावारच नाही. तेथील भूमी स्पर्श होताक्षणीच असंख्य इंगळ्या चावल्याप्रमाणे बोचणारी आहे. दाह असह्य होऊन नदीच्या प्रवाहात डुबकी मारावी तर ती वैतरणी नदी जीवजंतू व रक्तादिकांनी भरलेली असल्यामुळे देहाचा दाह अधिकच वाढविणारी आहे. तेथील सेमर वृक्षाखाली छायेसाठी जावे तरी त्याची तरवारीसारखी पाने अंग छेदून टाकतात. तेथे थंडी व उष्णता भयानक असते. तीन लोकांतील धान्य खाऊन व समुद्राएवढे पाणी पिऊनही शांत होणार नाही एवढी भूक व तहान लागते. पण धान्याचा कण व पाण्याचा थेंब सुद्धा मिळत नाही. इष्ट सामग्रीचा संपूर्ण अभाव आणि अनिष्ट सामग्रीचा

मात्र संयोग होतो. तेथील जीव अवधिज्ञानाने वैर आठवून परस्परांना डागतात, तळतात. एवढेच नव्हे असुरकुमार देवही तीन नरकांपर्यंत जाऊन त्यांना वैराचे स्मरण करून देतात व कुतूहलाने दुष्ट बुद्धीने त्यांना झुंजवितात. अशी अपार दुःखे भोगल्याशिवाय सुटका नाही. आत्मघाताचा प्रयत्न करूनही मरण येत नाही व आयुष्य संपत नाही. सगळी साधने केवळ दुःखाचीच आहेत. तेथे मरून कदाचित् दैवयोगाने मनुष्यगती प्राप्त करतात.

मनुष्यगतीचे दुःख – मनुष्य गतीमध्येही जन्मताना दुःख आणि देह सुटतानाही दुःख. जीवनामध्ये रोग, आघात, भूकंप आणि नाना आपत्ती येतात. त्यातील बालपण अज्ञानात व क्रीडेत जाते तर तारुण्य विलासात व्यर्थ खर्ची पडते आणि म्हातारपण म्हणजे जिवंतपणीचे मरण असते. अवयव शिथिल होतात. ज्ञानशक्ती दुबळी बनते. दुःखावरील अमोघ उपाय म्हणजे तत्त्वज्ञान. त्याचा विचार-करण्यासाठी अवसरच मिळत नाही. म्हणून जीव विषयतृष्णा, कषाय आणि अन्य आपत्तींनी अगदी हैराण होतो. कदाचित् प्राप्त आपत्तीमध्ये परवश मंदकषायांनी वेदना सहन करून देवगतीतही जन्म घेतो.

देवगतीचे दुःख – बहुधा तर हीन अशा भवनत्रिक देवांमध्ये जन्म घेऊन विषयतृष्णेच्या चिखलात रुतून बसतो. कदाचित तो वैमानिक देव झाला तरी समीचीन तत्त्वदृष्टी प्राप्त न झाल्याने तृष्णेचे दुःख तर सुटतच नाही. विषयाची आसक्ती एवढी जबर असते की, मरताना वियोगाच्या भयाने शोक करीतच मरतो. मरणसमयीच्या आर्त ध्यानाने पुनरपि एकेन्द्रिय तिर्यंच, स्थावर होतो. याप्रमाणे हे परिवर्तनाचे वर्तुळ पूर्ण करतो.

या प्रकारे जीव तत्त्वज्ञानाच्या अभावी आपल्याच विकारी रागद्वेषभावांनी कोणत्याही गतीमध्ये दुःखी असतो. देहाची प्रीती आणि जगण्याची आशा व मरणाचे भय यामुळे स्वयं दुःखी होतो व त्याचे खापर दुसऱ्यावर फोडतो. या मिथ्यात्वाचे स्वरूप दुसऱ्या ढालीमध्ये सांगणार आहेत.



## पहिली ढाल : लक्षणसंग्रह

(१) अकामनिर्जरा : सहन करण्याची व निर्जरेची इच्छा नसतानाही जीव परवश भूक, तहान आदि वेदना सहन करतो, परंतु तेव्हा तीव्र कर्मोदयात रत न होता परवश होऊन मंदकषायपूर्वक पुरुषार्थाने सहन करतो त्यामुळे जी कर्माची निर्जरा होते त्यास अकामनिर्जरा म्हणतात.

(२) अग्निकायिक : अग्नी हेच ज्याचे शरीर आहे असा स्थावर जीव.

(३) असंज्ञी : ज्यांना मन म्हणजे हिताहिताचा विचार करण्याची क्षमता नाही अशा जीवास असंज्ञी म्हणतात.

(४) इन्द्रिय : इन्द्र म्हणजे आत्मा. आत्म्याच्या चिन्हास, (ज्यामुळे आत्म्याची ओळख पटते त्यास) इन्द्रिय म्हणतात. ती पाच आहेत.

(५) एकेन्द्रिय : ज्यांना मात्र एकच स्पर्शनेन्द्रिय आहे असा जीव.

(६) गतिनामकर्म : ज्या कर्माच्या उदयाने जीवाचा आकार व परिणाम नारक, तिर्यंच, मनुष्य, देवासारखा होतो ते गतिनामकर्म होय.

(७) त्रस : त्रस नामकर्माच्या उदयाने स्पर्शनेंद्रियासह रसनेन्द्रियापासून तो कर्णेन्द्रियापर्यंत इन्द्रिये धारण करणारा जीव.

(८) तिर्यंचगति : तिर्यंच गति नामकर्माच्या उदयाने प्राप्त होणारा पर्याय तिर्यंचगति होय.

(९) देवगति : देवगति नामकर्माच्या उदयाने प्राप्त होणारा भव पर्याय देवगती होय.

(१०) नरक : लोकाकाशात अधोलोकात सात भूमींची रचना आहे. तेथे जन्मल्यापासून तो मरेतोवर शब्दातीत वेदना होतात, परस्परांना दुःख देतात, ते स्थान.

(११) नरकगति : नरकगति नामकर्मांच्या उदयाने प्राप्त होणारी

गती, पर्याय ती नरकगती होय.

(१२) निगोद : साधारण नामकर्माच्या उदयाने जे अनंत जीव एका शरीराच्या आश्रयाने राहतात व जे तेथेच युगपद् जन्मतात, मरतात, साधारण आहार व श्वास घेतात त्या साधारण वनस्पतिकायिकांना निगोद म्हणतात.

(१३) नित्यनिगोद : जे जीव अनादि काळापासून आजपर्यंत त्रसपर्याय प्राप्त न करता निगोददशेत जन्ममरण करतात अशी जीवराशी पुढे ते त्रस पर्याय प्राप्त करू शकतात.

(१४) परिवर्तन : द्रव्य, क्षेत्र, काल, भव व भावरूप संसार चक्रामध्ये परिभ्रमण करणे.

(१५) पंचेन्द्रिय : ज्यांना पाचही इन्द्रिये आहेत असे जीव.

(१६) पृथ्वीकायिक : पृथ्वी हेच ज्याचे शरीर आहे असा जीव. तो नियमाने एकेन्द्रिय व स्थावर असतो.

(१७) प्रत्येक वनस्पती : जेथे एका शरीराचा स्वामी एकच जीव आहे असे वृक्ष, फळ वगैरे, एकेन्द्रिय जीव.

(१८) भव्य : ज्यांना तीन काळात केव्हा तरी रत्नत्रयाच्या प्राप्तीची योग्यता आहे असे जीव.

(१९) भवनत्रिक : भवनवासी, व्यंतर व ज्योतिष्क देव.

(२०) मन : हिताहित तसेच उपदेशादिकाचा स्वीकार करण्याच्या योग्यतेसहित असणाऱ्या ज्ञानविशेषाला भावमन म्हणतात व त्याला निमित्तभूत अष्टदलकमलाच्या आकाराचे हृदयस्थानी असणारा, मनोवर्गणेपासून बनलेला विशिष्ट पुद्‌गलस्कंध त्यास द्रव्यमन म्हणतात.

(२१) मनुष्यगती : मनुष्यगती नामकर्माच्या उदयाने प्राप्त होणारी गती, पर्याय मनुष्यगती होय.

(२२) मोह : शरीरादि परद्रव्याशी जी एकत्वबुद्धी त्यास मिथ्यात्व मोह म्हणतात.



(२३) लोक : जेथे धर्मादिक सहा द्रव्ये असतात त्यास लोक म्हणतात.

(२४) विमानवासी : ऊर्ध्वलोकामध्ये - स्वर्गादिकांमध्ये राहणारे देव.

(२५) वीतराग :

> आतंक जन्म अभिमानहि मृत्यु शोक । (आतंक = रोग)
> चिंता क्षुधा भय तृषा रति मोह दुःख ।।
> निद्रा जरा अरति विस्मय घर्म रोष। (घर्म = घाम)
> ज्याते न दोष वदती अरिहंत त्यास ।।

हे अठरा दोष ज्यांना नाहीत असा निर्दोष परमात्मा.

(२६) सागर : दोन हजार कोस खोल व व्यासाचा गोल खड्डा करून त्यामध्ये ज्याचे कैचीने दोन तुकडे होणार नाहीत अशा एक ते सात दिवसांच्या उत्तम भोगभूमीतील मेंढ्यांच्या केसांनी तो भरावा. नंतर १००-१०० वर्षांनी एक एक केस काढता काढता जेवढ्या काळात तो खड्डा रिकामा होईल त्यास व्यवहारपल्य म्हणतात. असंख्यात व्यवहार पल्याचा एक उद्धारपल्य व असंख्यात उद्धारपल्याचा एक अद्धापल्य होतो. दहा कोडाकोडी (दहा कोडी x कोटी) अद्धापल्याच्या एक सागर होतो.

(२७) संज्ञी : ज्यांना मन म्हणजे हितहिताचा निर्णय करण्याची क्षमता आहे अशांना संज्ञी म्हणतात. देव, नारकी व मनुष्य संज्ञीच असतात. काही पंचेन्द्रय तिर्यंच संज्ञी असतात. शेष पंचेन्द्रिय व एकेन्द्रिय ते चतुरिन्द्रिय तिर्यंच नियमाने असंज्ञी असतात.

(२८) स्थावर : स्थावर नामकर्माच्या उदयाने पृथ्वी आदी एकेन्द्रिय पर्याय धारण करणाऱ्या जीवांना स्थावर म्हणतात.

## पहिली ढाल : भेदसंग्रह

एकेन्द्रियांचे पाच भेद : पृथ्वीकायिक, जलकायिक, तेजकायिक, वायुकायिक व वनस्पतिकायिक.

गति : चार - मनुष्यगति, तिर्यंचगति, देवगति व नरकगति.

जीव : दोन - संसारी आणि मुक्त.

त्रस : चार भेद - द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय व पंचेन्द्रिय.

देव : चार भेद - भवनवासी, व्यंतर, ज्योतिष्कवासी, वैमानिक.

पंचेन्द्रिय : दोन - संज्ञी आणि असंज्ञी.

योग : तीन - मन, वचन आणि काय.

लोक : तीन - उर्ध्वलोक, मध्यलोक व अधोलोक.

वनस्पति : दोन - साधारण व प्रत्येक

संसारी : दोन त्रस आणि स्थावर; अथवा संज्ञी व असंज्ञी अथवा पाच-एकेन्द्रिय, द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय, पंचेन्द्रिय.

□ □ □ □ □

## दुसरी-ढाल

[पद्धरि छंद, श्लोकामध्ये चरण ४, प्रत्येक चरणात मात्रा १५]

संसार परिभ्रमणाची कारणे मिथ्यादर्शनादि आहेत

ऐसे मिथ्या दृगज्ञानचरन, वश भ्रमत भरत दुःख जन्म मरण।
तातै इनको तजिए सुजान, सुन तिन संक्षेप कहू बखान ।।१।।



शब्दार्थ : दृग = दर्शन, दृष्टि. चरण = चारित्र, आचरण. भरत = भोगता भोगता. सुजान = उत्तमप्रकारे समजून. तजिए = सोडावे. बखान = वर्णन.

अन्वयार्थ : हा जीव (मिथ्या दृगज्ञानचरणवश) मिथ्यादर्शन

मिथ्याज्ञान-मिथ्याचारित्राच्या आधीन होऊन (ऐसे जन्ममरण दुख भरत) मागील ढालीमध्ये सांगितल्याप्रमाणे जन्म-मरणाचे दुःख भोगत भोगत चारही गतींमध्ये (भ्रमत) भटकत फिरतो, (तातै इनको सुजान तजिए) म्हणून यांना उत्तमप्रकारे समजून घेऊन सोडावे. (तिन संक्षेप बखान कहू सुन) त्याचे संक्षेपात वर्णन सांगतो. हे भव्य ! ते ऐक !

भावार्थ : प्रथम ढालीमध्ये सांगितल्याप्रमाणे हा जीव या चतुर्गतीरूप संसारात जन्ममरणादी दुःखे सहन करीत भटकत आहे. याचे कारण स्वतत्व आणि वस्तुतत्त्वाविषयी विपरीत मान्यता, विपरीत ज्ञान व रागादिरूप विपरीत आचरण हे आहे. कोणताही परिग्रहाचा संयोग हा सहज नियोगाने असतो. परंतु तो संयोग स्वयं सुखदुःखरूप नसतो. रागी जीव तेथे इष्टानिष्टबुद्धि करून सुखदुःख मानतो. मिथ्यादर्शनज्ञानचारित्र हेच संसारात परिभ्रमणाचे मूळ कारण असल्याने त्यांना वास्तविक जाणून घेऊन सोडले पाहिजे. म्हणून त्याचे संक्षेपाने वर्णन करतो. हे भव्यजीव ! ते ऐक !

### अगृहीत मिथ्यादर्शन आणि जीवतत्त्वाचे लक्षण

जीवादि प्रयोजनभूत तत्त्व, सरधै तिनमाहिं विपर्ययत्व ।
चेतनको है उपयोग रूप, बिनमूरत चिनमूरत अनूप ।।२।।





शब्दार्थ : सरधै = श्रद्धान करतो. प्रयोजनभूत = सुखप्राप्ति व दुःखपरिहार ह्या प्रयोजनाची सिद्धी करणारे. बिनमूरत = स्पर्श-रस-गंध-वर्णांनी रहित. चिनमूरत = चैतन्यमय, चिदाकार. अनूप = उपमारहित, अनुपमेय.

अन्वयार्थ : (जीवादि प्रयोजनभूत तत्त्व) जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष ही प्रयोजनभूत तत्त्वे असून अज्ञानी जीव (तिनमाहि विपर्ययत्व सरधै) त्यांमध्ये विपरीत श्रद्धान करतो, त्यांना यथार्थ मानत नाही - (चेतनको रूप उपयोग बिनमूरत चिन्मूरत अनूप हैं) जीवाचे स्वरूप उपयोग असून तो स्पर्शरसगंधवर्णाने रहित, साक्षात् चैतन्याची मूर्ती आहे. व या दृश्य विश्वांतील कशाचीही उपमा त्याला देता येत नाही.

भावार्थ : जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा व मोक्ष ही सात प्रयोजनभूत तत्त्वे आहेत. यांना जाणून स्वरूपाची साधना केली तर संसारदुःखाचा नाश होतो. अनंत सुख प्राप्त होते. म्हणून त्यांना प्रयोजनभूत म्हटले आहे. त्याचे यथावत् श्रद्धान करणे हे सम्यग्दर्शन आहे. परंतु हा मोही जीव त्यांचे अयथार्थ (विपरीत) श्रद्धान करतो. हेच मिथ्यादर्शन सर्व अनर्थाचेमूळ आहे.

या सात तत्त्वांपैकी जीवाचे स्वरूप उपयोग हे आहे. उपयोग म्हणजेच ज्ञान आणि दर्शन यांचे परिणाम. जीवामध्ये पुद्गलाच्या स्पर्शरसगंधवर्णाचा अभाव आहे म्हणून तो बिनमूरत म्हणजे अमूर्तिक आहे. तो साक्षात् चैतन्यमूर्ती आहे. हे दृश्य विश्व पुद्गलमय असल्यामुळे जीवास विश्वातील अन्य कशाचीच उपमा देता येत नाही. आता विपरीत श्रद्धान कसे करतो हे सांगतात. ।।२।।

### जीवतत्त्वाबाबत विपरीत मान्यता

पुद्गल, नभ धर्म अधर्म काल, इनते न्यारी है जीव चाल ।
ताको न जान विपरीत मान, करि करै देहमें निज पिछान ।।३।।

शब्दार्थ : नभ = आकाश. न्यारी = वेगळी. जीवचाल = जीव परिणाम. पिछान = परिचय, ओळख.



अन्वयार्थ : (पुद्‌गल-नभ-धर्म-अधर्म-काल) पुद्‌गल आकाश, धर्म अधर्म, व काल ही पाच अजीव, जड द्रव्ये असून(जीव चाल इनतैं न्यारी है) जीवाचा स्वभाव - परिणाम यापासून वेगळा आहे. (ताकों न जान विपरीत मान करि) त्या आत्मस्वभावाला न ओळखता विपरीत स्वीकार करून (देहमें निज पिछान करै) जड शरीरास हा आत्मा आहे असे मानतो, जड शरीरासच आत्मा मानतो.

भावार्थ : पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश व काल ही अचेतन जड द्रव्ये आहेत. आत्मा या सर्वांपासून आपल्या उपयोग लक्षणाने वेगळा आहे. अर्थात त्या पाचही अचेतन द्रव्यांमध्ये उपयोग हे लक्षण नाही. ते केवळ आत्म्यामध्येच आहे. अशा रीतीने शरीर वगैरे पुद्‌गलादिकांपासून भिन्न आत्म्याला तर तो ओळखत नाही, उलटपक्षी आत्म्याला जड देहरूप किंवा क्रोधादि स्वभावमय मानतो. देहामध्ये आत्मत्वबुद्धी करतो. मी शरीर आहे, मी शरीराचे कार्य करू शकतो, इच्छेनुसार शरीराची जोपासना व व्यवस्था करू शकतो इत्यादी विपरीत मान्यता करतो. हेच जीवतत्त्वाचे विपरीत श्रद्धान आहे. त्यामुळे तो शुद्ध स्वरूपास अहर्निश पुद्‌गलादि परद्रव्याचीच उठाठेव करतो. ।।३।।

### शरीरादि परवस्तूसंबंधी मिथ्यादृष्टीचा विचार

मैं सुखी दुखी मैं रंक राव, मेरो धन गृह गोधन प्रभाव ।
मेरे सुत तिय मैं सबल दीन, बेरूप सुभग मूरख प्रवीन ।।४।।





शब्दार्थ : रंक = गरीब. राव = श्रीमंत. प्रभाव = मोठेपणा, सन्मान. तिय = स्त्री. बेरूप = कुरूप. सुभग = सुंदर.

अन्वयार्थ : (मैं सुखी दुखी) मी सुखी आहे, मी दुःखी आहे (मैं रंक राव) मी गरीब आहे, मी श्रीमंत आहे, (मेरो धन गृह गोधन प्रभाव) माझे धन वैभव, माझे घर, माझ्या गाई-म्हशी, माझा प्रभाव [अधिकार सत्ता] (मेरे सुत तिय) हा माझा मुलगा आहे, ही माझी पत्नी आहे (मैं सबल दीन) मी शक्तिशाली आहे, मी दुर्बल आहे (बेरूप सुभग मूरख प्रवीण) मी कुरूप आहे, मी सुंदर आहे, मी मूर्ख आहे, मी हुशार आहे इत्यादी विपरीत कल्पना करतो.

भावार्थ : शरीराला आत्मा मानल्याने इन्द्रियांना संतुष्ट करणे क्रमप्राप्तच आहे. इन्द्रियांची पुष्टी व चोचले पुरविण्यासाठी बाह्य इष्ट सामग्रीचा संयोग मिळविणे व अनिष्ट संयोग दूर करणे याही गोष्टी सहजच आल्यात. त्या शरीराच्या अवस्था व बाह्य इष्ट अनिष्ट सामग्रीच्या संयोगाने तो आपणास सुखी आणि दुःखी मानतो. धनसंयोगाने अथवा वियोगाने आपणास श्रीमंत अथवा दरिद्री मानतो. हे धन, घर, गाई वगैरे व मोठे घराणे वगैरे साक्षात वेगळे व स्वाधीन नसलेले दिसून येत असूनही ते सर्व माझे आहेत असे मानतो. आपल्या शरीराशी संबद्ध मुलगा पत्नी वगैरे माझे असून मीही त्यांचाच आहे असे मानतो. सुदृढ शरीर व बाह्य शस्त्रादिकाने आपणास शक्तिमान मानतो व त्याच्या अभावाने आपणास दीन दुबळा मानतो. शरीराच्या रंगादिकावरून आपणास सुंदर, सुरूप मानतो व

नसेल तर बेरूप मानतो. तसेच पदवी आदिकाने आपणास शहाणा आणि नसेल तर मूर्ख समजतो. सारांश, एक देहालाच आत्मा मानल्याने सर्व पुद्गलाशी आपले नाते जोडतो व उघड उघड अन्य पुद्गल परिणामांना आत्मरूपाने स्वीकारतो. हीच जीवतत्त्वाची विपरीत मान्यता आहे. कारण जीवाचे स्वरूप या सर्वापेक्षा विलक्षण आहे असे मागील श्लोकात स्पष्टपणे सांगितले आहे. ।।४।।

### अजीव तत्त्व व आस्रव तत्त्वाची विपरीत मान्यता

तन उपजत अपनी उपज जान, तन नशत आपको नाश मान।
रागादि प्रगट जे दुःखदैन तिनही को सेवत गिनत चैन ।।५।।



शब्दार्थ : उपजत = उत्पन्न होताना. दुःखदैन = दुःख देणारे, सेवत = सेवन करताना. गिने, गिनत = समजतो, मानतो. चैन = मजा, आनंद.

अन्वयार्थ : (तन उपजत उपज जान) हा मिथ्यादृष्टी जीव शरीर उत्पन्न झाले असता आपलीच उत्पत्ती मानतो आणि (तन नशत आपको नाश मान) शरीर नष्ट होताना आपलेच मरण व नाश मानतो. (प्रगट जे रागादि दुःखदैन) स्पष्टपणे हे रागादिक विकार दुःख देणारे आहेत परंतु (तिनहीको सेवत चैन गिनै) त्यांचेच सेवन करताना सुख मानतो.

भावार्थ : अजीव तत्त्वाची विपरीत मान्यता - अज्ञानी असे मानतो की, शरीराची प्राप्ती किंवा मरण हा आत्म्याचाच जन्म किंवा मृत्यू आहे.



वस्तुतः आत्मवस्तू किंवा पुद्गलपरमाणू अनादिनिधन आहेत. आत्म्याला न जन्म न मरण. पुद्गलाच्या शरीरादिक परिणामांची दशा हा पुद्गलाचा धर्म. पण त्यास पुद्गलाचा धर्म न मानता आत्मस्वभाव मानतो. पुद्गलाच्या जड कर्मोदयाच्या निमित्ताने होणारे विकारही चैतन्यासारखे भासले तरीही ते स्वभावाची विस्मृती असताना परद्रव्याच्या सन्मुख वृत्तीमुळे होतात, अतएव तेही तत्त्वतः आत्मस्वभावरूप (आत्मतत्त्व) नसून परभावच आहेत. परंतु त्यांना तो आत्मतत्त्व मानतो. स्व आणि पर दोहोंचीही मान्यता विपरीत असल्यामुळे स्वपरभेदाच्या अभावी जीवतत्त्व (स्वतत्त्व) व अजीवतत्त्व (परतत्त्व) दोहोंनाही विपरीत मानतो. हेच मिथ्यात्वी जीवाचे जीव व अजीव तत्त्वाचे अयथार्थ श्रद्धान होय.

आस्रवतत्त्वाचे विपरीत श्रद्धान : वस्तुतः कोणताही दुसरा चेतन किंवा जड पदार्थ आत्म्याचे यत्किंचितही बरेवाईट करू शकत नाही; किंवा सुखदुःख व जन्ममरण देऊ शकत नाही. परंतु अज्ञानी ही वस्तुस्थिती अंतःकरणपूर्वक स्वीकारीत नाही. अंतर्यामी तो परद्रव्यास आपले बरेवाईट करणारे व आपणास दुसऱ्याचे बरेवाईट करणारा मानतो. परद्रव्यांचे परिणाम त्यांच्या त्यांच्या स्वभावानुसार यथायोग्य घडत असताना त्यांच्या अवलंबनाने तो आपल्या चैतन्य स्वभावास विसरून राग द्वेषादि विकार करतो आणि परसंयोग सहज प्राप्त झाला असतानाही आपणास पराचा कर्ताहर्ता मानतो. याच्या विकारानुकूल पराचे परिणमन घडले तर माझ्या केल्याने घडले असा अहंकार करतो आणि न घडले तर दैवास दोष देतो. वस्तुस्वभावाचे ज्ञान नसल्यामुळे वैफल्याने ग्रस्त होऊन निराश होतो. याप्रमाणे हा जीव पराचे काहीच करू शकत नाही तरीही आपल्या मोहाच्या नशेत ''मी केले'' अशा भ्रमात असतो, त्यातही अपार कष्ट व दगदगच असते. आणि प्रतिकूल घडले तर दुःखाला सीमाच नसते. याप्रमाणे आत्मा स्वयं रागद्वेष करतो व त्यामुळे कष्टी होतो. हे राग-द्वेष-मोह संसाराचे मूळ आहेत. दुःखरूप आहेत. परंतु अज्ञानाने हा रागद्वेषातच रस घेतो. हेच आगामी आस्रवाचे कारण आहेत. म्हणून अशुभ किंवा शुभ रागादिक हे यथार्थपणे
आस्रवाचे कारण आहेत. म्हणून अशुभ किंवा शुभ रागादिक हेच यथार्थपणे

आस्रवतत्त्व आहे, परंतु हा अज्ञानी त्यांना सुखरूप मानतो, त्या रागद्वेषापैकी मंद कषायरूप शुभभावांना आस्रवाचे कारण मानत नाही; शुभ रागरूप परिणामाला संवरनिर्जरेचे-धर्माचे साधन मानतो. हे आस्रवतत्त्वाचे विपरीत श्रद्धान आहे. ।।५।।

### बंध आणि संवर तत्त्वाची विपरीत मान्यता

शुभ-अशुभ-बंधके फल मँझार, रति अरति करै निजपद विसार ।
आतमहितहेतु विराग-ज्ञान, तिनि लखै आपको कष्टदान ।।६।।



शब्दार्थ : मँझार = मध्ये. रति अरति = राग आणि द्वेष. विसार = विसरून. कष्टदान = कष्ट देणारे. लखै = मानतो. विराग-ज्ञान = वैराग्य व स्वपरभेदविज्ञान.

अन्वयार्थ : मिथ्यादृष्टी जीव (निजपद विसार) आपल्या आत्मस्वरूपाला विसरून (बंधके शुभ अशुभ फल मँझार) कर्मबंधाच्या चांगल्या किंवा वाईट फलामध्ये (रति अरति करै) राग आणि द्वेष-इष्ट आणि अनिष्ट बुद्धि करतो. (आतमहितहेतु विराग ज्ञान) आत्म्याच्या कल्याणाला कारण वैराग्य आणि स्वपरभेदविज्ञान आहे परंतु (ते आपको कष्टदान लखै) त्यांना मात्र हे आत्म्याला कष्टप्रद, दुःखदायक आहेत असे मानतो.

भावार्थ : बंधतत्त्वाची विपरीत मान्यता = कर्मोदयाला अनुसरून शरीरादिकांचा व धनादिकांचा तसेच विकारांचा संयोग अथवा वियोग प्राप्त होतो. अज्ञानी त्यांना इष्ट किंवा अनिष्ट मानतो व सुखी आणि दुःखी होतो. अहंकाराने आपणास त्यांचा कर्ता हर्ता मानतो व केवळ विकाकरून



खेदखिन्न होतो. पुत्र-पत्नी आदिकांच्या संयोगाने आनंदित होतो, व पुत्रवियोग रोग आदिकाने कष्टी होतो. याप्रमाणे परपदार्थाबाबत कर्तृत्वाचा अहंकार व इष्टानिष्टबुद्धी दोन्ही सारखीच अहितकारी आहेत. ही इष्टानिष्टबुद्धी व ममत्व बंधाचे कारण आहे. अतएव बंधतत्त्व आहे. परंतु असे न मानता तेथे पुण्य-पाप असा भेदविकल्प करतो. पुण्यास हितरूप व उपादेय आणि पापास मात्र अहितरूप व हेय असा भेद करतो. याप्रमाणे बंधतत्त्वाचा निर्णय न करता तो बंधासही विपरीत मानतो.

संवरतत्त्वाची विपरीत मान्यता : कर्मबंधन रोकण्याचे एकमेव साधन म्हणजे स्वपरभेदविज्ञान आणि वैराग्य, रागादिक विकारासंबंधी परत्वाची भावना हेच होय. परंतु अज्ञानीला हे भयंकर कष्टाचे वाटते. कारण त्याला तत्त्वाची खरी ओळखच नसते. बाह्य क्रियाकांडाला तो संवराचे कारण मानतो. स्वभावामध्ये स्थिरता करून रागादिकांचा अभाव हे वैराग्य आहे. स्वपरभेदविज्ञान आणि वैराग्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, व ते दोन्ही युगपत् असतात. ही दोन संवराची कारणे आहेत. परंतु त्यास कठीण समजून अन्य केवळ शुभ परिणामास मात्र संवराचे कारण मानतो. हेच संवरतत्त्वाचे विपरीत श्रद्धान होय. ।।६।।

### निर्जरा व मोक्षतत्त्वाचे विपरीत श्रद्धान व अगृहीत मिथ्याज्ञान

रोके न चाह निजशक्ति खोय, शिवरूप निराकुलता न जोय ।
योही प्रतीतिजुत कछुक ज्ञान, सो दुखदायक अज्ञान ज्ञान ।।७।।



शब्दार्थ : चाह = इच्छा. खोय = व्यर्थ घालवून. शिवरूप = मोक्षरूप. न जोय = पाहात नाही, मानत नाह कछुक = काहीसे. प्रतीतिजुत = श्रद्धायुक्त, अंतरंग स्वीकारपूर्वक.

अन्वयार्थ : मिथ्यादृष्टी जीव (निजशक्ति खोय चाह न रोके) आपली शक्ती व्यर्थ घालवून इच्छेला मात्र रोकत नाही. (निराकुलता शिवरूप न जोय) आकुलतेच्या अभावाला मोक्षाचे स्वरूप मानीत नाही.(योहि प्रतीतिजुत कछुक ज्ञान) आणि जे काही अंतरंग श्रद्धापूर्वक थोडं बहुत ज्ञान आहे(सो दुखदायक अज्ञान जाग) ते दुःखदायक रागादि विकारांनी सहित व प्रेरित असल्यामुळे वास्तविक अज्ञानच जाणा. आणि हे परोपदेशाविना अनादिकाळापासून चालू आहे, म्हणून त्यास अगृहीत म्हणतात.

भावार्थ : निर्जरा तत्त्वाची विपरीत मान्यता :रागादिकांचा अभावपूर्वक आत्मस्वरूपामधील स्थिरता व दृढता हाच संवर आहे आणि निर्जरा आहे. त्यामुळे कर्मबंधनाच्या अनुकूल भूमिकेचा अभाव होतो. म्हणजे कर्मांचा बंध न होता संवर होतो व निर्जरा होते. परंतु परद्रव्याकडे झुकणाऱ्या या विकारप्रवृत्तीला-इच्छेला आळा न घालता हा अज्ञानी आपली शक्ती वाया घालवितो. वास्तविक शुभ-अशुभ इच्छेचा निरोध हे यथार्थ तप आहे. त्यामुळे खरी निर्जरा होते. परंतु हा अज्ञानी या अंतरंग तपाशिवाय केवळ बाह्य अनशनादिकास अथवा पंचाग्नि साधनादिकांना निर्जरेचे व मोक्षाचे कारण मानतो. पुण्य व पाप दोहोपासून निवृत्त झाल्यानंतर होणाऱ्या आत्मस्थिरतेची त्याला ओळखही नसते, म्हणून त्यास निर्जरा तत्त्वाचे यथार्थ श्रद्धान नसते.

मोक्षतत्त्वाचे अयथार्थ श्रद्धान : वास्तविक सांसारिक सुखदुःखाचे स्वरूप इच्छा-आकुलता हे आहे. मोक्ष हा यापेक्षा विलक्षण आहे. मोक्ष आकुलतेने सर्वथा रहित आहे. परंतु हा अज्ञानी जीव त्याची कल्पनाही करू शकत नाही. तो तर स्वर्गादिकाप्रमाणेच परंतु अधिक प्रमाणात सुखाचे स्थान म्हणजे मोक्ष असे मानतो. संसारसुख व मोक्षसुख यांची जात एकच मानतो. त्यामुळे त्यास मोक्षतत्त्वावचेही यथार्थ श्रद्धान नसते.



याप्रमाणे अज्ञानी जीवाला या सात तत्त्वांबाबत विपरीत मान्यता (गैरसमज) असते. कोणाही अन्ममतवादी उपदेशकाच्या उपदेशाशिवाय अनादिकालीन अज्ञानामुळे ही सहज प्रवृत्ती आहे. असेच अंतरंगातून तो स्वीकारतो. सहजपणे मानतो म्हणून हे अगृहीत मिथ्यादर्शन आहे. अशी प्रवृत्ती निगोदापासून तो असंज्ञी पंचेन्द्रियापर्यंत सर्वांची व अज्ञानी संज्ञी जीवांची असते.

अगृहीत मिथ्यादर्शन : याप्रमाणे अगृहीत मिथ्यात्व असताना जे काही ज्ञान असते ते विकारांनी सहित व प्रेरितच असते व ते अज्ञानाच्या तोडीचेच असते. नव्हे, वास्तविक ते अज्ञानच आहे. त्यामुळे जीवाचा कल्याणमार्ग बिघडतो. प्रतीतियुक्त ज्ञानाचेच खरे मोल असते. प्रतीतिविना तर शब्दार्थरूप शुष्क तत्त्वज्ञानही असू शकेल, पण ते अज्ञानाच्याच तोडीचे असते. कारण, तसा अंतरंगात श्रद्धेने स्वीकार करीत नसल्याने ज्ञानही सहजच विपरीत असते. हेच अगृहीत मिथ्याज्ञान होय. ।।७।।

### अगृहीत (निसर्गज) मिथ्याचारित्राचे लक्षण

इन जुत विषयनिमें जो प्रवृत्त ताकों जानो मिथ्याचरित्त ।
यें मिथ्यात्वादि निसर्ग जेह, अब जे गृहीत सुनिये सुतेह ।।८।।

शब्दार्थ : जुत = सहित, युक्त. जेह = जे. तेह = ते, त्यांना.

अन्वयार्थ : (इन जुत) या अगृहीत मिथ्यादर्शन व मिथ्याज्ञानाने सहित (जो विषयनिमें प्रवृत्त) जे विषयकषायामध्ये सहज प्रवृत्त होणे(ताकों मिथ्याचरित्त जानो) त्याला अगृहीत-निसर्गज मिथ्याचारित्र समजा.(यो निसर्ग मिथ्यात्वादि जेह) याप्रमाणे जे अगृहीत-निसर्गज-मिथ्यात्वादिक त्यांचे स्वरूप जाणावे. (अब जे गृहीत सुतेह सुनिये) आता गृहीत मिथ्यात्वादिकांचे स्वरूप सांगतात. ते चांगले ऐका.

भावार्थ : अशी परोपदेशादिकाशिवाय सहज अनादि अज्ञानामुळे मिथ्यादर्शन व मिथ्याज्ञानाची प्रवृत्ती असते, तत्पूर्वक या जीवाला सहजच परोपदेशाशिवाय इन्द्रियविषयासंबंधी तृष्णा आणि कषायामध्ये जी प्रवृत्ती असते त्या प्रवृत्तीलाच अगृहीत-निसर्गज मिथ्याचारित्र म्हणतात.

याप्रमाणे परोपदेशाशिवाय निसर्गतः असणारे जे मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान व मिथ्याचारित्र आहे त्यांचे वर्णन केले. आता गृहीत मिथ्यादर्शनादिकांचे वर्णन करतात ते ऐका. ।।८।।

### गृहीत मिथ्यादर्शन व कुगुरूचे लक्षण

जे कुगुरू कुदेव कुधर्म सेव, पोषैं चिर दर्शनमोह एव ।
अंतर रागादिक धरैं जेह, बाहर धन अंवरतैं सनेह ।।९।।

### गाथा १० पूर्वार्ध

धारैं कुलिंग लहि महत-भाव ते कुगुरू जनम-जल-उपल-नाव ।

शब्दार्थ : सेव = सेवन करतात. पोषैं = पुष्ट करतात. सनेह = प्रेम ठेवतो. महत भाव = महात्मेपण. उपल = दगडाची बनलेली.

अन्वयार्थ : (जो कुगुरू कुदेव कुधर्म सेव) जो कुगुरू, कुदेव व कुधर्माचे सेवन करतो (चिर दर्शनमोह एव पोषैं) तो सदैव दर्शनमोहच [मिथ्यात्व] पुष्ट करतो (जेह अंतर रागादिक धरै) जो अंतरंगात रागादिक कषायविकारांना धारण करतो आणि (बाहर धन अंबरतैं सनेह) बाह्यतः धन, कपडालत्ता यामध्ये आसक्ती करतो, (महत-भाव लहि) महात्मेपणाचे ढोंग घेऊन (कुलिंग धारैं) त्याला न शोभणारे कुत्सित लिंग-वेष-धारण करतो (ते कुगुरू, जनम-जल-उपल-नाव) तो कुगुरू असून तो संसारसमुद्रामध्ये दगडी नौकेप्रमाणे बुडविणारा आहे.

भावार्थ : कुगुरू, कुदेव आणि कुधर्माचे जे सेवन (आराधना) करतात ते या अनादिकालीन एकत्वरूप मोहाला-मिथ्यात्वालाच पुष्ट करतात. देव, गुरु, शास्त्र व धर्म ही वस्तुतः तत्त्वांचे ज्ञान होण्यास व आत्म्याला



ओळखण्यास निमित्तभूत उत्कृष्ट साधने आहेत, परंतु अज्ञानामुळे खऱ्या देवगुरुशास्त्रधर्मांची प्रतीती होत नाहीच. उलट आपल्या विपरीत मान्यता पोसणाऱ्या कुगुरूदेवधर्मादिकांना मानतात. त्यामुळे अज्ञान दूर होण्याऐवजी अतत्त्वश्रद्धान दृढ होते. अंतरंगामध्ये मिथ्यात्व वाढविण्यास निमित्त कुगुरूदेवादिकांची सेवा हे गृहीत-अधिगमज-मिथ्यादर्शन होय.

कुगुरूचे स्वरूपः जे अंतरंगातून रागादि विकारांनी बरबटलेले असतात आणि बाह्यतः जे धन, कपडालत्ता यावर आसक्ती ठेवून परिग्रह जवळ बाळगतात, परंतु महंतपणा मात्र मिरवून जे बाह्यतः खोटा वेष धारण करतात ते कुगुरू होत. वस्तुतः एक बाह्य वेष सोडला तर इतर सामान्य जन आणि यांच्यात अंतरंग विपरीत मान्यता समान असतात. परंतु उपदेश करण्याच्या व इतरांना फसविण्याच्या कलेने ते स्वतःचा गुरुपणा मिरवतात. इतरांना सुखाच्या नावाखाली संसारमार्गाचा उपदेश देतात. असे हे कुगुरु होत. संसारात बुडणाऱ्या जीवांना तारण्याकरिता जणू दगडाची नौकाच ! त्यामुळे संसारसागर पार होण्याची तर आशाच नसते, परंतु त्यात बुडण्याची मात्र निश्चितता असते.

जिनधर्मामध्ये कषायांचा व विषयांच्या आशेचा अभाव हे सद्गुरूचे अंतरंग चिन्ह सांगितलेले असून तत्पूर्वक सद्गुरुचे बाह्य तीनच लिंग[१] सांगितले आहेत. एकतर निर्ग्रन्थ दिगंबर लिंग (वेष), दुसरे उत्कृष्ट श्रावकाचे (१०-११ प्रतिमा धारण करणाऱ्या) शुल्लक ऐल्लकाचे लिंग, आणि तिसरे उत्कृष्ट श्राविकेचे आर्यिकेचे लिंग (वेष). त्या बाह्य वेषाबरोबर अंतरंग विशुद्धि आणि तदनुकूल व्यवहार आवश्यक असतो. अंतरंग लक्षण नसेल तर केवळ बाह्य-लिंग मोक्षमार्गामध्ये प्रयोजनभूत नाही. बाह्य-लिंगाच्या सद्भावात जर वीतरागता असेल तर ते धर्माचे व गुरुपणाचे साधन आहे. म्हणून गुरूची निवड कसून करावयास हवी. या बाह्य लिंगास सोडून जे अन्य सरागी वेष धारण करतात, काठी भांडी वगैरे परिग्रह ठेवतात, मूलगुणाची पालना करीत नाहीत, पंचाग्निसाधनासारखी हिंसेने युक्त

तपश्चरण करतात ते सर्व कुगुरू होत. ते स्वतः तर स्वयं बुडालेले आहेतच परंतु इतरांनाही बुडविणारेच आहेत. त्यांची सेवा आदर-वैय्यावृत्य न करणे हे मोक्षमार्गामध्ये आवश्यक आहे. ।।९।।

### कुदेवाचे स्वरूप

जे राग-द्वेष-मलकरि मलीन, वनिता-गदादि-जुत चिन्ह चीन ।।१०।।
ते हैं कुदेव तिनकी जु सेव, शठ करत न तिन भव-भ्रमण-छेव ।

शब्दार्थ : मलकरि = दोषांनी. वनिता = स्त्री. चीन = ओळखले जातात. छेव न = (त्यांचे संसार परिभ्रमण) संपत नाही.

अन्वयार्थ : (जे राग-द्वेष मलकरि मलीन)जे राग-द्वेषादि दोषांनी अशुद्ध व विकारी आहेत, (वनिता-गदादि-जुत चिन्ह चीन) स्त्री गदा आदींनी युक्त अशा बाह्य चिन्हांनी ओळखले जातात (ते कुदेव है) ते कुदेव होत. ते देवत्वाचे स्वरूप नव्हे. (तिनकी जु सेव शठ करत) जे अज्ञानी त्यांची भक्ती करतात (तिन भव-भ्रमण न छेद) त्यांच्या संसारात भ्रमणाला अंत नाही. संसारभ्रमण नाहीसे होत नाही.

भावार्थ : ज्यांनी अठरा दोषांना जिंकून केवलज्ञान प्राप्त करून घेतले आहे आणि जे समीचीन मोक्षमार्गाचे (प्रवचन) निरूपण करतात तेच खरे देव होत. हा अरिंहतपणा आत्म्याचा उत्कृष्ट आदर्श होय. त्यांची सेवा भक्ती आदिकांनी मोक्षमार्ग प्राप्त होऊन जीवाचे कल्याण होते. उलट पक्षी जे विकारांनी बरबटलेले असून बाह्यतः दोषांचे प्रदर्शक चिन्ह असे स्त्री-गदा-वस्त्र-चक्षु आदि परिग्रहांनी सहित आहेत, ते देव नसून देवाभास-कुदेव आहेत. अज्ञानी प्राणी ऐहिक पुत्रादिकाच्या प्रयोजनाने कल्पित मिथ्या देवदेवतांचे पूजनादिक करतात व त्यामुळे संसारदुःखाचा नाश होणे तर दूरच राहते परंतु ते आणखी संसाराच्या खोल गर्तेत रुतून बसतात व दुःखच भोगतात. म्हणून एकमात्र सर्वज्ञ वीतराग देव सोडून जे काही अन्य भवनवासी व्यंतर आदि देवदेवता, ग्रह आदि आहेत, किंवा अन्यमत कल्पित सरागी देव आहेत ते कुदेव असून पूजायोग्य नाहीत. ते



देवगतीतील असले तरी रत्नत्रयरूप-मोक्षमार्गाच्या प्राप्तीसाठी आराधना करण्यायोग्य देव नाहीत. म्हणून खऱ्या आत्मकल्याणाची इच्छा करणाऱ्यांनी त्यांची पूजा अर्चा करू नये. ।।१०।।

### कु-धर्माचे आणि गृहीत मिथ्यादर्शनाचे स्वरूप

रागादि-भावहिंसा समेत, दर्वित त्रस-स्थावर मरन-खेत ।।११।।
जे क्रिया तिन्हैं जानहुं कुधर्म, तिन सरधै जीव लहै अशर्म ।
याकौं गृहीत-मिथ्यात्व जान, अब सुन गृहीत जो है अजान ।।१२।।




शब्दार्थ : समेत = युक्त, सहित. दर्वित = द्रव्य. मरणखेत = मरणाचे स्थान. अशर्म = दुःख.

अन्वयार्थ : (रागादि-भावहिंसा समेत) रागद्वेष आदि भावहिंसेने सहित तसेच (त्रस स्थावर मरण खेत) त्रस आणि स्थावर जीवाच्या मरणाचे आयतन-निवास [आश्रय] अशा (दर्वित समेत) द्रव्यहिंसेने सहित (जे क्रिया तिन्है कुधर्म जानहूं) ज्या क्रिया त्यांना कुधर्म समजा. (तिन सरधै जीव अशर्म लहे) त्याची श्रद्धा करण्याने जीव दुःख प्राप्त करतो (याकौं गृहीत मिथ्यात्व जान) या कुगुरूदेवधर्माच्या सेवनादिकास गृहीत मिथ्यात्व समजा. (अब जो गृहीत अजान है सो सुन) आता ज्यास गृहीत मिथ्याज्ञान म्हणतात त्याचे स्वरूप ऐका.

भावार्थ : रागादि विकारांची उत्पत्ती हीच भावहिंसा होय आणि

स्वपराच्या द्रव्यप्राणांचा घात करणे ही द्रव्यहिंसा होय. या दोन्ही हिंसेने[1] सहित-त्रसस्थावर जीवांच्या घाताने सहित - ज्या यज्ञयागादिक क्रिया, मूढ लोकभ्रम किंवा हिंसायुक्त रूढी आहेत त्यांना कुधर्म म्हणतात. त्याचे श्रद्धान व सेवन केल्याने मिथ्यादर्शन पुष्ट होऊन दुःखच मिळते. म्हणून हे सर्व त्याज्य होत.

या कुगुरु, कुदेव व कुधर्माचे श्रद्धान, सेवन, पूजन, इत्यादिकांना गृहीत मिथ्यात्व म्हणतात. ।।१२।।

आता गृहीत मिथ्याज्ञानाचे स्वरूप सांगतात.

### गृहीत मिथ्याज्ञानाचे स्वरूप

एकान्तवाद-दूषित समस्त, विषयादिक-पोषक अप्रशस्त ।
रागीकुमतिनकृत श्रुतका अभ्यास, सो है कुबोध बहु देन त्रास।।१३।।



अन्वयार्थ : (एकान्तवाद-दूषित) एकान्तवादरूप कथनामुळे मिथ्या आणि (विषयादिक पोषक) विषयकषायादिकांना पुष्ट करणारी (रागी कुमतिनकृत अप्रशस्त समस्त श्रुतका अभ्यास) रागी व मिथ्याज्ञानींनी रचलेली जी सर्वच मिथ्या शास्त्रे आहेत. त्यांचे धर्मभावनेने अध्ययन-अध्यापन वगैरे करणे (सो कुबोध है) ते गृहीत मिथ्याज्ञान होय. (बहु त्रास देन) या जीवास अतिशय दुःख देणारे आहे.

---



भावार्थ : जगामध्ये सर्व वस्तू स्वभावाने नित्यानित्यात्मक, एकानेक रूप आहेत. त्यापैकी प्रयोजनाने एका धर्मास मुख्य करून दुसऱ्यास गौण करून कथन करण्याची जी शैली त्यास नयवाद म्हणतात. आणि दोन्ही धर्मास युगपत् ग्रहण करणारे ज्ञान म्हणजेच स्याद्वाद किंवा प्रमाण होय. परंतु एक धर्म सांगताना वस्तूच्या दुसऱ्या अंशाचा सर्वथा निषेध करणे हा एकान्तवाद होय. काही (सांख्य वगैरे) वस्तूला सर्वथा नित्य मानतात तर काही (बौद्धादिक) सर्वथा अनित्य मानतात. वेदान्ती वस्तू एक ब्रह्मरूप अद्वैतरूप मानतात आणि कित्येक द्रव्य व त्यांच्या गुणांना पृथक मानून समवायाने द्रव्यास गुणवान् मानतात. अशी शास्त्रे वस्तुतत्त्वाचे अयथार्थ कथन करणारी आहेत. त्यामुळे मोक्षमार्गाचे प्रयोजन सिद्ध होत नाही, म्हणून ही कुशास्त्रे आहेत.

तसेच काही शास्त्रे धर्माच्या नावाखाली विषयकषायांचे पोषण करतात, हिंसेला धर्म सांगतात, मद्यमांसादिकांचा निषेध करीत नाहीत, दयादानादि शुभरागभावास मोक्षाचे कारण सांगतात, तोच गृहस्थाचा धर्म आहे असे सांगतात. अन्यमतकल्पित व श्वेतांबरादि रचित शास्त्रामध्ये अशा विषयकषायांना पोषक विविध कथन आहे. तीही शास्त्रे अप्रशस्त मिथ्या होत. जेथे देवादिकांच्या स्वरूपात किंवा द्रव्यादिकांच्या स्वरूपात व मोक्षमार्ग निरूपणात विपरीतपणा आहे तेथे अन्य तत्त्वाचे कथन जरी वरवर ठीक वाटले तरी त्यातही बाधाच येते असे समजावे. म्हणून ती शास्त्रे आत्म्याचे अहितच करणारी आहेत.

अशी कुगुरूंनी रचलेली शास्त्रे धर्मबुद्धीने लिहिणे, लिहवून घेणे, वाचणे, वाचन करविणे, शिकणे-शिकविणे, ऐकणे-ऐकविणे हे सर्व गृहीत मिथ्याज्ञान होय. ।।१३।।

### गृहीत मिथ्याचारित्राचे लक्षण

जो ख्याती-लाभ-पूजादि चाह, धरि करत विविध-विध देहदाह ।
आतम अनात्मके ज्ञान-हीन, जे जे करनी तन करन-छीन ।।१४।।

शब्दार्थ : ख्याती = कीर्ती. पूजा = मानसन्मान. चाह धरी = इच्छा करून. छीन = क्षीण, कृश.

अन्वयार्थ : (जो ख्याति-लाभ-पूजादि चाह घरी)जे कीर्ती, लाभ, सन्मानदिकांची इच्छा धरून (विविध-विध देहदाह करत) नाना प्रकारचे पंचाग्निसाधन करणे, एका पायावर उभे राहणे या सारखे देहास कष्ट देणारे तप करतात, [त्यात कषाय मात्र कमी झाले नसतात व हिंसादिकांचा संभव असतो] (आतम अनात्मके ज्ञानहीन) व आत्मा-अनात्मा या संबंधी स्वपरभेदविज्ञानाने रहित (तन छीन करन) केवळ शरीर क्षीण करणाऱ्या (विविध-विध जे जे करनी करत) नानाप्रकारच्या ज्या ज्या क्रिया आहेत त्या सर्वांना मिथ्याचारित्र समजावे.

भावार्थ : कषाय न घटविल्याने कसलेही धर्मसाधन संभवनीय नसताना हे कीर्ती, सन्मान, ऐहिक लाभादिकांच्या प्रयोजनाने, नानाप्रकारे देहास कष्ट मात्र देतात, त्यात स्वपरभेदविज्ञानाची जाणीवही नसते; ते सर्व क्रियाकाण्ड म्हणजे मिथ्याचारित्र होय. ।।१४।।

### मिथ्याचारित्राच्या त्यागाचा व आत्महित साधण्याचा उपदेश

ते सब मिथ्याचारित्र त्यागि, अब आतमके हित-पंथ लाग ।
जग-जाल भ्रमणको देहुँ त्याग, अब दौलत ! निजआतम सुपाग ।।१५।।

शब्दार्थ : जगजालभ्रमणको = या संसाराच्या जाळ्यांत भटकण्याचा. हितपंथ = कल्याणाचा मार्ग. सुपाग = चांगला तल्लीन हो.

अन्वयार्थ : हे आत्मन् ! (ते सब मिथ्याचारित्र त्यागि) त्या सर्व मिथ्याचारित्राचा परिशेषन्यायाने मिथ्यादर्शन-ज्ञानाचा त्याग करून (अब आतमके हित पंथ लाग) आता आत्म्याच्या कल्याणाच्या मार्गाला लाग. (जगजालभ्रमणको देहुँ त्याग) संसारजाळात भटकणे सोडून दे(अब दौलत) म्हणून कवि स्वतःला संबोधून म्हणतात, ''हे दौलतराम !''(निज आतम सुपाग) आपल्या आत्मस्वरूपात लीन-हो कसा !





भावार्थ : आत्मकल्याणाची इच्छा करणाऱ्या भव्य जीवाने मिथ्यादर्शनज्ञानचारित्राचा त्याग करावा, तत्त्वाचा निर्णय करून सम्यग्दर्शन-ज्ञानचारित्राचा स्वीकार करावा, आणि आत्मकल्याणाच्या मार्गाला लागावे. दुसऱ्यास उपदेश करून लाभ काय ? प्रथम तर स्वतःला सावरणे जरूर आहे. म्हणून कविवर आपल्याच आत्म्यास संबोधून पुण्यपाप वगैरे विकाराच्या चक्रातून बाहेर पडून आत्मस्वरूपात लीन होण्याची प्रेरणा करतात. ।।१५।।

या दुसऱ्या ढालीमध्ये जीवांचा खरा शत्रू जे मिथ्यादर्शनादिक आहेत त्याचे स्वरूप सोप्या भाषेत स्पष्ट केले आहे. मिथ्यादर्शनादि अगृहीत व गृहीत असे दोन प्रकारचे आहेत. अगृहीताला निसर्गज आणि गृहीताला अधिगमज-परोपदेशजन्य म्हणतात. निगोदापासून असंज्ञी पंचेंद्रिय देवनारकीपर्यंत सर्वच संज्ञी मिथ्यादृष्टी जीवांना अगृहीत मिथ्यात्वादिक असतातच. गृहीत मिथ्यात्वादि मात्र संज्ञी पंचेन्द्रियांनाच असतात. मुक्तीचा

पुरूषार्थ संज्ञी पंचेन्द्रियच करू शकतात. त्याकरिता समीचीन क्रम असा की, प्रथमता खऱ्या देवगुरूशास्त्राचे श्रद्धान भक्ती यांचे अवलंबन घ्यावे. कुदेवादिकांचे सेवन वगैरे गृहीत मिथ्यात्वाचा त्याग करावा, त्यायोगे अतत्त्वश्रद्धानाचा पीळ ढीला होतो. त्यानंतर अगृहीत मिथ्यादर्शनादिकांचा त्याग करावा व यथार्थ रत्नत्रयाचा स्वीकार करावा.

याकरिता हे आत्मन ! या मिथ्यादर्शनाचा त्याग करून आत्महित साधून घे ! आत्मस्वरूपात लीन हो ! संसाराचा व संसारदुःखाचा स्वयमेव नाश होईल !

## दुसरी ढाल : सारांश

हा जीव या संसारामध्ये नाना योनी आणि गतींमध्ये भटकतो याचे कारण, ''मी कोण ? माझे या विश्वाशी नाते काय ?'' या मूलभूत प्रश्नाचा विचार करून आयुष्याची दिशा आजपावेतो ठरविली नाही हेच आहे. यालाच ''सम्यग्दर्शन बिन दुख पाय'' असे कवींनी म्हटले आहे. स्वतत्त्वाबाबत विपरीत मान्यता त्यामुळे सहज पुष्ट होते. अर्थात मिथ्यादर्शनज्ञानचारित्र हा संसारमार्ग असून मिथ्यादर्शन हे त्याचे मूळ आहे.

आत्महित साधण्याकरिता, सुखी होण्याकरिता प्रथम (१) खऱ्या देवगुरूशास्त्राची यथार्थ प्रतीति; (२) प्रयोजभूत जीवादि सप्त तत्त्वांची यथार्थ प्रतीति; (३) स्वपरतत्त्वाची श्रद्धा आणि (४) आपल्या शुद्ध आत्म्याची अनुभूति या गोष्टी आवश्यक आहेत. जोपर्यंत या पद्धतीने निश्चय सम्यग्दर्शन प्रगट होत नाही तोपर्यंत दुःखाचा नाश होऊन आत्म्याचा उद्धार होणे, सुख मिळणे अगदी अशक्य आहे.

जीवादि सप्ततत्त्वांच्या विपरीत मान्यतेला मिथ्यादर्शन म्हणतात. अज्ञानी जीवास आपल्या चैतन्यस्वरूपाची ओळख न झाल्याने तो रागादिविकाररूप भावकर्म, ज्ञानावरणादि द्रव्यकर्म व शरीरादि नोकर्म आणि आत्मा यांना एकरूप मानतो. अशाप्रकारे जीव आणि अजीव दोहोंसंबंधी गैरसमज झाल्यामुळे त्या आधारावर तो विपरीत कषायरूपाने



प्रवृत्त होतो. रागादिक हे आस्त्रवभाव असून ते चित्स्वभावापासून वेगळे असल्यामुळे हेय आहेत; विकारांशी तादात्म्य हे बंधतत्त्व किंवा संसारतत्त्व आहे; असे न मानता, रागादिकांना सुखरूप मानून बिचाऱ्या जड कर्मावर व संयोगावर रुष्ट होतो. यावर हमखास उपाय म्हणजे पुण्य व पाप या दोन्ही विकारापासून अलिप्त होऊन आपल्या ज्ञायकभावाच्या आश्रयाने स्वरूपात रमणे हा आहे. परंतु हे लक्षात न घेता केवळ बाह्य क्रियाकाण्डमात्राने कर्मांना रोकून दूर करता येईल असे मानतो. हा जीव अशा प्रकारे मूलभूत तत्त्वासंबंधी अशी विपरीत मान्यता अज्ञानाने निसर्गतःच कोणी न सांगता, न शिकविता करीत आला आहे. अशा प्रकारे सर्वच अज्ञानी जीव या अगृहीत मिथ्यात्वाने पछाडलेले आहेत.

कदाचित जीव संज्ञी झाला तर कुगुरुदेवादिकांच्या उपासनादिकांनी आपला हा मिथ्या भ्रमच पुष्ट करतो. वास्तविक देव-गुरु-शास्त्र-ह्या रत्नाची परीक्षा करायला हवी. परंतु तेथे विवेक बाजूला ठेवून अंधश्रद्धेने त्यांची मानमान्यता करतो व दुर्लभ मानवजन्म वाया घालवितो, अनंत संसारच वाढवितो.

याप्रमाणे प्राण्याने अनंत जन्म व्यर्थ घालविले आहेत. आता तरी खरे देवगुरूशास्त्र या रत्नांचा परीक्षापूर्वक स्वीकार करून तत्त्वज्ञानाची प्राप्ती करून घ्यावी, निश्चयरत्नत्रयाची प्राप्ती करून घ्यावी व त्याद्वारा आत्महित साधावे हेच उचित आहे.

## दुसरी ढाल : भेदसंग्रह

(१) पाच इन्द्रियांचे विषय :

| | | |
|---|---|---|
| स्पर्शनेन्द्रियाचा स्पर्श | | रसनेन्द्रियाचा रस |
| घ्राणेन्द्रियाचा गंध | चक्षुरिन्द्रियाचा वर्ण | कर्णेन्द्रियाचा शब्द |

(२) तत्त्वे : सात आहेत. जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष.

(३) द्रव्ये : सहा - जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल, यातील जीव तेवढा चेतन आहे त्यास सोडून शेष जड अजीव द्रव्ये आहेत.

(४) मिथ्यादर्शन : दोन-अगृहीत व गृहीत.
(५) मिथ्याज्ञान : दोन-अगृहीत व गृहीत.
(६) मिथ्याचारित्र : दोन-अगृहीत व गृहीत.

अगृहीत = निसर्गज
गृहीत = अधिगमज

## दुसरी ढाल : लक्षणसंग्रह

(१) अनेकान्त : प्रत्येक वस्तूमध्ये वस्तुपणा टिकविणारे अस्तित्वनास्तित्व, नित्यत्व-अनित्यत्व आदि शब्दशः परस्परविरूद्ध असे दोन प्रतिपक्षी धर्म अपेक्षा भेदाने युगपत प्रकाशित होतात यास अनेकान्त म्हणतात. जसे घट स्व-स्वरूपाने अस्तिरूप आहे तर अन्य पदार्थाच्या अपेक्षेने-परचतुष्ट्याचा घटामध्ये अभाव असल्यामुळे घट नास्तिरूप आहे.

(२) अमूर्तिक : स्पर्श, रस, गंध, वर्ण या पुद्गलाच्या गुणसमूहास समुच्चयाने रूप किंवा मूर्त म्हणतात. म्हणून पुद्गल मूर्तिक किंवा रूपी आहे आणि जीव व अन्य अजीव द्रव्यात ते गुण नसल्याने ते अमूर्तिक आहेत. स्पर्शरसगंधवर्णाने रहित आहेत ते अमूर्तिक असे समजावे.

(३) आत्मा : जो उपयोगस्वरूप म्हणजे ज्ञानदर्शनादि गुणांनी परिणामांनी युक्त आहे तो आत्मा आहे. त्यालाच जीव म्हणतात.

(४) उपयोग : आत्म्याच्या जाणणे (ज्ञान) व पाहणे (दर्शन) या शक्तींच्या चैतन्यानुविधायी परिणामास-व्यापारास - उपयोग म्हणतात.

(५) एकान्तवाद : वस्तूमधील परस्पर सापेक्ष अनेक धर्माची सत्ता न मानता अन्य धर्माचा सर्वथा निषेध करून एका धर्मास स्वीकारणे हा एकान्तवाद होय.

(६) दर्शनमोह : मोहनीयकर्म हा द्रव्यमोह व तत्त्वांची विपरीत



मान्यता हा भावमोह.

(७) द्रव्यहिंसा : त्रस व स्थावर जीवांच्या प्राणाचा वियोग करणे.

(८) भावहिंसा : मोहरागद्वेषादि विकारांच्या उत्पत्तीला भावहिंसा म्हणतात.

(९) मिथ्यादर्शन : दर्शनमोहाचे लक्षण पहा.

अगृहीत मिथ्यात्वादि व गृहीत मिथ्यात्वादि.

(१) अगृहीत मिथ्यात्व : परोपदेशाशिवाय निसर्गतः अनादि अज्ञानाने जे होते ते. गृहीत मिथ्यात्व : उपदेशाच्या निमित्ताने होते ते.

(२) अगृहीत मिथ्यात्वादि निगोदियापासून असंज्ञी पंचेंद्रियांपर्यंत सर्वच जीवांना असतात. आणि संज्ञी पंचेन्द्रियांनाही (सम्यक्त्व प्राप्त होईपर्यंत) असू शकतात. तर गृहीत मिथ्यात्वादि संज्ञी पंचेन्द्रियांनाच होतात. गृहीत मिथ्यात्वासह सर्वत्र अगृहीत मिथ्यात्व असतेच.

आत्मा आणि जीव यांचा अर्थ एकच आहे. दर्शनमोह, मिथ्यात्व मिथ्यादर्शन यांचाही अर्थ एकच आहे.

□ □ □ □ □

# तिसरी-ढाल

(नरेन्द्र छन्द, जोगीरासा)

हिताचा निर्णय आणि दोन प्रकारे मोक्षमार्गाचे कथन

आतमको हित है सुख सो सुख, आकुलता बिन कहिये ।
आकुलता शिवमाहिं न तातैं, शिवमग लाग्यो चहिये ।।
सम्यकदर्शन ज्ञान-चरन शिव, - मग सो दुविध विचारो ।
जो सत्यारथरूप सो निश्चय, कारण सो ववहारो ।।१।।







शब्दार्थ : शिवमाहिं = मोक्षामध्ये. शिवमग = मोक्षमार्ग. लाग्यो चहिये = लागले पाहिजे.

अन्वयार्थ : (आतमको हित सुख है) खरे सुख हे आत्म्याचे हित [कल्याण] आहे. (सो सुख आकुलताबिन कहिये) ते सुख आकुलतेने रहित सांगितले आहे. (आकुलता शिवमाहिं न) आकुलता मोक्षामध्ये नाही [म्हणून यथार्थ सुख मोक्षामध्येच आहे.] (तातै शिवमग लाग्यो चहिये) अतएव मोक्षमार्गाला लागले पाहिजे, मोक्षाचा उपाय करण्यास उद्युक्त झाले पाहिजे. (सम्यकदर्शन-ज्ञान-चरन शिवमग) सम्यकदर्शनज्ञानचारित्र हा मोक्षाचा मार्ग आहे (सो दुविध विचारो) त्या मोक्षमार्गाचा विचार दोन प्रकारे होतो. एक निश्चयाने आणि दुसरा व्यवहाराने (जो सत्यारथरूप सो निश्चय) तो सत्यार्थरूप आहे, तो निश्चय मोक्षमार्ग होय आणि (जो कारन सो ववहारो) त्या निश्चय मोक्षमार्गाचे जे कारण तो व्यवहार मोक्षमार्ग होय.

भावार्थ : प्रत्येक प्राणिमात्र सुखाची इच्छा करतो. म्हणून आत्म्याचे कल्याण सुखाची प्राप्ती हेच आहे. आणि ते सुख यथार्थ की, जेथे दुःखाचा, आकुलतेचा लवलेशही नाही. जेथे कषायवृत्ती आणि विषयवृत्ती असते तेथे आकुलता असतेच. हे सर्वांना अनुभवाने कळू शकते व हे दुसऱ्या ढालीमध्ये कवीने सांगितले आहे. या चतुर्गतीरूप संसारामध्ये सर्व प्राणिमात्र विषयकषायांनी बरबटले आहेत. म्हणून यथार्थ, खरे सुख हे सांसारिक विषयसुखात नसून ते संसारापासून विलक्षण मोक्षदशेमध्ये आहे. अतएव मोक्षाचा उपाय साधण्याकरिता प्रयत्न केला पाहिजे.

## मोक्ष व मोक्षमार्गाचे स्वरूप

मोक्ष ही आत्म्याची सर्व प्रकारे स्वतंत्र, सर्वथा स्वाधीन व शुद्ध अवस्था आहे. त्याचे कारणही आत्माच असला पाहिजे. कारण आत्म्याचे परिणाम परपदार्थद्वारा उत्पन्न होऊ शकत नाहीत. आत्माच स्वयं आत्मपरिणामस्वरूप परिणमू शकतो. अन्य कोणीही नाही. अतएव सम्यग्दर्शनज्ञान-चारित्र हा आत्म्याचाच स्वाधीन परिणाम आहे व तोच मोक्षमार्ग आहे. दुसऱ्या

ढालीमध्ये पाहिले आहे की, मिथ्यादर्शन-ज्ञान-चारित्र हे संसाराचे व दुःखाचे कारण आहेत. जीवमात्र अनादि काळापासून मिथ्यादर्शन-ज्ञान-चारित्राने ग्रस्त आहेत. जेव्हा त्यांचा विषय बदलतो आणि जे शुद्ध आत्म्यास जाणून श्रद्धान करतो, सत्यार्थ समीचीन असते तेव्हा त्यास सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र नाव प्राप्त होते व तोच सुखाचा-मोक्षाचा मार्ग आहे.

मोक्षाचे स्वरूप आत्म्याची सर्वथा शुद्ध अवस्था हे आहे. अतः आत्म्याचे स्वरूपही एकच आणि शुद्ध आत्मदशाही एकच आहे हे ओघानेच येते. जर मोक्षाचे स्वरूप एकच आहे तर त्याच्या प्राप्तीचा मार्गही एकच आहे. म्हणजे तत्त्वतः मोक्षमार्ग हा एकच आहे. परंतु त्याचा विचार आणि कथन दोन प्रकारे होते.

## व्यवहार व निश्चय मोक्षमार्ग

वस्तूच्या निरूपणाचे दोन प्रकार आहेत व एकाच निश्चय व दुसऱ्यास व्यवहार असे म्हणतात. वस्तूच्या यथार्थ वास्तविक गुणधर्माचे कथन ते निश्चय कथन असून काही प्रयोजनाने एका वस्तूच्या गुणधर्माचा अन्य वस्तूवर आरोप करून कथन करणे यास व्यवहार-कथन म्हणतात. जसे घट हा मातीचा बनला आहे. म्हणून घट मातीचा म्हणणे हे निश्चय-कथन आहे; तर त्यात तूप भरले म्हणून तूपसंयोगाने तुपाचा घट म्हणणे हे व्यवहार-कथन होय. अनेक घटांतून इष्ट तो तूपाने भरलेला घट ओळखण्याकरिता तूपाचा घट असेही कथन करण्याचा प्रकार आहे. वस्तुतः घट तर तुपाचा नाही, परंतु संयोगाकडे दृष्टी ठेवून तुपाच्या गुणधर्माचा घटावर आरोप करण्यात येतो; त्यास उपचार म्हणतात. निश्चयाचा विषय वस्तुस्वरूप असल्यामुळे यथार्थ असतो. परंतु व्यवहाराचा विषय वस्तुस्वरूप नसून उपचरित असल्यामुळे असत्यार्थ असतो. परंतु त्याचे प्रयोजन विशिष्ट घटाचे ज्ञान करून देणे हे आहे. त्यामुळेच व्यवहाराने कथन करण्याची शैली आहे. अर्थात् निश्चयाचे, वस्तुस्वरूपाचे ज्ञान करून देणे हे व्यवहार कथनाचे प्रयोजन आहे. या दोन प्रकाराने जाणण्याच्या किंवा कथन करण्याच्या शैलींना निश्चयनय व व्यवहारनय असे म्हणतात.



यद्यपि तत्त्वतः मोक्षमार्ग एक आहे, तरी त्याचेही कथन आगमामध्ये उपरोक्त दोन प्रकारे केले आहे. मोक्षाचे जे यथार्थ वास्तविक कारण, जो उपाय तो निश्चय मोक्षमार्ग आहे. त्याचे ज्ञान करून देण्याच्या प्रयोजनाने जो वास्तविक मोक्षमार्ग तर नाही परंतु त्यावर साहचर्यामुळे मोक्षमार्गाचा आरोप करून जे कथन केले जाते तो व्यवहार मोक्षमार्ग होय. अर्थात् व्यवहार मोक्षमार्ग हा कथनमात्र असून साहचर्यामुळे केलेला तो उपचार आहे. यथार्थपणे तर सम्यग्दर्शनज्ञानचारित्ररूप आत्म्याचा परनिरपेक्ष स्वाधीन परिणाम हाच मोक्षमार्ग आहे. परंतु त्यावेळी सुदेवादिकांची श्रद्धा आदि भावांचे साहचर्य अवश्यंभावी असते. म्हणून त्यालाही व्यवहाराने मोक्षमार्ग म्हटले आहे; कारण त्यावरून व्यवहाराने अंतरंग सम्यक्त्वादिकांचा बोध होऊ शकतो.

म्हणजेच जे मोक्षाचे वास्तविक कारण आहे, ज्याच्या सद्भावामध्ये मोक्षाचे कार्य निश्चित झालेच पाहिजे तो निश्चयमोक्षमार्ग होय. आणि साहचर्यावरून निश्चयाचा बोध करून देण्यास जो कारण किंवा त्या वास्तविक कारणाचा जो बाह्य आश्रय तो व्यवहार मोक्षमार्ग होय. निश्चय सम्यग्दर्शनादिक हा निश्चयमोक्षमार्ग तर त्याला आश्रयभूत देवादिकांचे श्रद्धानादि हे व्यवहाररत्नत्रय असून तो व्यवहार मोक्षमार्ग आहे.

## निश्चय मोक्षमार्ग व व्यवहार मोक्षमार्ग यांची एकतर्फी व्याप्ती

यावरून वास्तविक मोक्षमार्गाचे जे अवश्य सहचारी भव असतात तेथेच हा उपचाराचा व्यवहार करण्यात येतो हे लक्षात येते. अंतरंग सम्यग्दर्शनविशुद्धिबरोबर बाह्यतः सुदेवादिकांच्या भक्तीचा, श्रद्धेचा भाव अवश्यंभावी असतो. म्हणून यद्यपि तो शुभ रागभाव आहे तरी तेथेच सम्यग्दर्शनाचा उपचार होऊ शकतो. अन्यत्र कुदेवादिकांच्या श्रद्धानादिकांमध्ये नाही. कारण कुदेवादिकांचे श्रद्धान असतांना सम्यग्दर्शन असतच नाही. अंतरंग विशुद्धीबरोबर तदनुकूल बाह्य व्यवहार हा भूमिकेप्रमाणे अवश्यमेव असतो. परंतु बाह्यतः जरी व्यवहार असेल तरी तेथे अंतरंगविशुद्धी असलीच पाहिजे असा काही नियम नाही.

खऱ्या देवादिकांचा निर्णय हे निश्चय रत्नत्रयाचे निमित्त आहे.

या सम्यग्दर्शनादि अंतरंग निर्मल परिणामांची उत्पत्ती ही आत्म्याच्या नित्य शुद्ध स्वरूपाच्या अवलंबनाने होते हे खरे आहे. परंतु त्या शुद्ध स्वरूपाची ओळख ही खऱ्या देवगुरूशास्त्राच्या स्वरूपाच्या चिंतनाने होते. म्हणून ते देवादिक निमित्त आहेत. एरव्ही जीवास आत्मस्वरूपाची ओळख होण्याचे साधन ते कोणते ? या संसारात तर अन्य कोणताही पदार्थ आत्मसमान नाही; साक्षात् शुद्ध बनलेले अरिहंत परमात्माच या संसारीजीवांना शुद्ध स्वरूपाचे ज्ञान करून देण्यास समर्थ आहेत. हेच प्रवचनसार ग्रंथामध्ये आचार्य कुंदकुंद देवांनी सांगितले आहे की, मोहाची निरगाठ उकलण्याला व आत्म्याची ओळख करण्याला अरिहंताच्या द्रव्यगुण पर्यायांचे ज्ञान हे कारण होते व त्यामुळे प्राणी स्वभावसन्मुख बनतो. म्हणून त्यास व्यवहारसम्यग्दर्शन म्हटले आहे. अर्थात् सम्यक्त्वाची उत्पत्ती आणि सुदेवादिकांचा योग यामध्ये एक मध्यदुवा आहे. तो म्हणजे त्यांचा स्वरूप विचार करून जीवाचा उपयोग स्वभावसन्मुख झाला पाहिजे. हे जसे साक्षात कारण आहे, तसे अरिहंतादिक हे साक्षात् कारण नाहीत; तर ते तत्त्वचिंतनाच्या उपयोगाचा आधार आहेत. म्हणून त्यास व्यवहाराने कारण म्हणतात. म्हणून व्यवहारास निश्चयाचे कारण, हेतू असे येथे म्हटले आहे. ॥१॥

आता निश्चयमोक्षमार्गाचे स्वरूप सांगतात

परद्रव्यनितैं भिन्न आपमैं, रुचि सम्यक्त्व भला है ।
आपरूपको जानपनौ सो, सम्यकज्ञान कला है ॥
आपरूपमें लीन रहैं थिर, सम्यकचारित सोई ।
अब व्यवहार मोखमग सुनिये हेतु नियतको होई ॥२॥

शब्दार्थ : रुचि = श्रद्धान, प्रतीती. भला = वास्तविक. जानपनौ = जाणणे, अनुभवणे. कला = प्रकाश. थिर = निश्चलपणे. हेतु = निमित्त, कारण, बाह्य सहकारी कारण, बाह्य आश्रयकारण. नियत = निश्चय.





अन्वयार्थ : (परद्रव्यनितैं भिन्न आपमैं) परद्रव्यापासून भिन्न वेगळ्या अशा आत्म्यामध्ये (रुचि सम्यक्त्व भला है) रुची निश्चय-प्रतीती हे निश्चय (यथार्थ) सम्यग्दर्शन होय. तसेच [परद्रव्यापासून भिन्न](आपरूपको जानपनौ) आत्म्याला जाणणे अनुभवणे (सो सम्यगज्ञान कला है) हा सम्यग्ज्ञानाचा प्रकाश आहे. (आपरूपमैं थिर लीन रहै) परद्रव्यापासून भिन्न आत्मस्वरूपामध्ये निश्चलपणे रत होणे, स्थिर होणे (सोई सम्यकचारित) तेच निश्चय सम्यकचारित्र होय. (अब व्यवहार मोखमग सुनिये) आता व्यवहार मोक्षमार्ग ऐका. (नियतको हेतु होई) तो व्यवहार मोक्षमार्ग हा निश्चयासाठी निमित्त, बाह्य सहकारी कारण आहे.

## निश्चय रत्नत्रयाचे स्वरूप

भावार्थ : आत्मा परद्रव्यापासून सर्वस्वी भिन्न आहे. याचा अर्थ आत्म्याचा स्वभाव परद्रव्य, परद्रव्याचे गुण यापासून तर पृथक आहेच परंतु परद्रव्याच्या लक्ष्याने होणाऱ्या विकारापासूनही आत्मा स्वभावाने भिन्न आहे हा आहे. पर्यायामध्ये पराच्या लक्ष्याने आत्म्यामध्ये विकार होतात हे तर खरेच आहे. परंतु ते कर्माच्या उदयात स्वयं होतात; म्हणून ते उदयाप्रमाणेच किंवा संयोगाप्रमाणे क्षणिक आहेत. स्वभाव नित्य त्रिकालवर्ती आहे. म्हणून शुद्ध सहज नित्य स्वभावाची दृष्टी, रुची असली म्हणजे पर्यायामध्ये विकार असले तरी ते स्वभाव नाहीत, अशी प्रतीती होते, त्यामुळे विकारांना आत्मस्वरूपाने तो स्वीकारीत नाही. जेथे विकारांना स्वभावरूपाने स्वीकारतो तेथे सदैव पराधीनताच असते. म्हणून परद्रव्यापासून

भिन्न याचा अर्थ बाह्य नोकर्म, सूक्ष्म द्रव्यकर्म व आत्म्याचे विकार म्हणजे भावकर्म यांपासून पृथक असा आहे.

अशा भिन्न आत्मस्वरूपाची प्रतीती हे निश्चय सम्यग्दर्शन होय. ज्याप्रमाणे लोकांमध्ये सामान्य जनांना शरीर म्हणजे मी अशी सहज प्रतीती असते त्याप्रमाणे जेव्हा शरीरास आत्मा न मानता मी म्हणजे परद्रव्य, शरीर व विकारापासून भिन्न असा केवळ ज्ञायक-जाणणारा शुद्ध आत्मा आहे अशी सहज प्रतीती होते तेव्हा ते निश्चय (यथार्थ) सम्यग्दर्शन होय.

अशा प्रतीतिपूर्वक परद्रव्यापासून भिन्न आत्म्याला जाणणे, अनुभवणे हे निश्चय सम्यग्ज्ञान होय. केवळ शब्दार्थरूप ज्ञान सम्यग्ज्ञान नव्हे, तर प्रतीतियुक्त ज्ञान जे दुसऱ्या ढालीमध्ये सांगितले आहे त्याप्रमाणे शुद्ध आत्म्याला प्रतीतीपूर्वक जाणणे, अनुभवणे हे निश्चय सम्यग्ज्ञान होय.

परद्रव्यापासून भिन्न आत्म्यामध्ये निश्चलपणे स्थित होणे याला निश्चय सम्यक्चारित्र म्हणतात. अनादी काळापासून विकार आणि जाननस्वभाव यात भेद न करता अज्ञानी एकरूप विपरीत प्रवृत्ती करीत आला आहे. सारांश, रागादि विकारापासून निवृत्त होऊन मात्र चैतन्यस्वभावी आत्म्यामध्ये अविचल स्थिरता हे सम्यक्चारित्र होय.

वास्तविक निश्चय सम्यग्दर्शनज्ञानचारित्र हा साक्षात मोक्षमार्ग आहे. कारण मोक्ष हीही आत्म्याची अत्यन्त शुद्ध अवस्था असून त्याचे कारणही शुद्ध स्वभावाच्या आश्रयाने होणारी श्रद्धेची ज्ञानाची व चारित्राची शुद्ध स्वरूपामध्ये प्रवृत्ती हेच आहे.

परंतु या अंतरंग शुद्धतेबरोबर काही बहिरंग परिकर असतो. तोही तदनुकूलच असतो. या साहचर्यामुळे त्या प्रवृत्तीमध्ये, यद्यपि तो शुभोयोगरूप आहे तरी, उपचार करून व्यवहाराने त्यास मोक्षमार्ग म्हटले आहे. साहचर्याने तो अंतरंग शुद्धतेचा गमक-बोधक असतो. तसेच सुदेवादिकांच्या आश्रयाने तो स्वरूपाचे ज्ञान करून घेतो म्हणून त्या बाह्य शुभोपयोगरूप व्यापारास व्यवहार मोक्षमार्ग म्हणतात. असा व्यवहारही वस्तुतः जेथे निश्चय असतो तेथेच संभवतो. ज्याप्रमाणे मातीमध्ये घटनिर्मितीचे कार्य झाले तरच



कुंभारामध्ये कर्तेपणाचा उपचार होतो, तसेच निश्चय असेल तरच निमित्तामध्ये मोक्षमार्गपणाचा उपचार होतो. निश्चयाशिवाय व्यवहार हा खरा व्यवहारच नव्हे. तो द्रव्यनिक्षेपाने व्यवहार असू शकेल एवढेच. व्यवहार मोक्षमार्ग हा निश्चय मोक्षमार्गाचे निमित्त आहे, याचा हा अभिप्राय आहे. हे मागील श्लोकतील कारण व हेतु या शब्दावरूनही स्पष्ट होते. व्यवहार रत्नत्रयाने निश्चयरत्नत्रय होतेच असा याचा अर्थ नाही. तर निश्चय असताना आपआपल्या भूमिकेमध्ये योग्य असा व्यवहार असतोच व त्या समवेत असणारी अंतरंगशुद्धताच यथार्थ मोक्षमार्ग आहे असे त्यावरून समजावे. ।।२।।

### व्यवहार सम्यग्दर्शनाचे स्वरूप

जीव अजीव तत्त्व अरु आस्त्रव, बंध रु संवर जानो ।
निर्जर मोक्ष कहे जिन तिनको, ज्यौं को त्यौं सरधानो ।।
है सोई समकित व्यवहारीी, अब इन रूप बखानौ ।
तिनको सुनि सामान्य-विशेषैं दिढ प्रतीति उर आनौ ।।३।।



शब्दार्थ : अरु = आणि. ज्यों को त्यों = जसे आहे तसेच. सरधानौ = श्रद्धा, प्रतीती करणे. दिढ = दृढ. उर आनो = अंतर्यामी धारण करा.

अन्वयार्थ : (जिन जीव अजीव अरू आस्त्रव बंध रु संवर निर्जर मोक्ष तत्त्व कहे) जिनेन्द्र भगवंतांनी जीव-अजीव आणि आस्त्रव, बंध व संवर, निर्जरा, मोक्ष ही तत्त्वे सांगितली आहेत(तिनको जानो, ज्यों को त्यों सरधानो) त्यांना जाणून जसे आहे तसे श्रद्धान करा. (सोई व्यवहारी

समकित है) त्या सप्त तत्त्वांची श्रद्धा हे व्यवहार सम्यग्दर्शन आहे.(अब इन रूप बखानो)आता या सात तत्त्वांचे स्वरूप सांगतात(तिन को सामान्यविशेषैं सुनि) त्यांना सामान्यपणे आणि विशेषपणे - संक्षेपाने आणि विस्ताराने ऐकून (उर दिढ प्रतीति आनो)अंतरंगामध्ये दृढ प्रतीती धारण करा.

भावार्थ : अंतरंगामध्ये जेव्हा निश्चयसम्यग्दर्शन असते तेव्हा बाह्यतः भेदरूप सात तत्त्वांचे श्रद्धान असते. जेव्हा निश्चय सम्यग्दर्शनच नसते तेव्हा या सात तत्त्वांचे स्वरूप समजण्यात घोटाळा असतो. त्याचे स्थूल दिग्दर्शन दुसऱ्या ढालीमध्ये केलेच आहे. म्हणून अंतरंग श्रद्धेच्या निर्मलतेपूर्वक सात तत्त्वांची श्रद्धा हे व्यवहार सम्यग्दर्शन आहे. जेव्हा तत्त्वार्थसूत्रामध्ये ''तत्त्वार्थश्रद्धानं सम्यग्दर्शनं'' असे आचार्य सांगतात तेव्हा त्यामध्ये हाच अविनाभाव त्यांना अभिप्रेत आहे. त्यावरून निश्चय सम्यग्दर्शनाशिवाय कोणास तत्त्वार्थश्रद्धानरूप व्यवहार सम्यग्दर्शन होते असे समजू नये. निर्मल श्रद्धेबरोबर राग दशेमध्ये अशी सविकल्प श्रद्धा व शुभपरिणती असते व ती सम्यक्त्वाला बाधक नाही असे समजावे, म्हणूनच त्यामध्ये मोक्षमार्गाचा उपचार होऊ शकतो. ।।३।।

### जीवतत्त्वाचे स्वरूप व भेद

बहिरातम, अंतरआतम, परमातम जीव त्रिधा है ।
देह जीवकों एक गिनै, बहिरातमतत्त्व मुधा है ।
उत्तम, मध्यम, जघन त्रिविधके, अंतर आतमज्ञानी ।
दुविध संग बिन शुध-उपयोगी, मुनि उत्तम निजध्यानी ।।४।।

शब्दार्थ : त्रिधा = तीन प्रकारचा. एक गिने = एक मानतो. मुधा = मूढ. संगबिन = परिग्रहरहित. शुध = शुद्ध.

अन्वयार्थ : (जीव बहिरातम, अंतरआतम, परमातम त्रिधा है) आत्मतत्त्व, बहिरात्मा, अंतरात्मा आणि परमात्मा याप्रकारे तीन भेद रूप आहे. (देह जीवको एक गिने) जो देह आणि आत्म्यास एक मानतो तो (बहिरातम) बहिरात्मा असून तो (तत्त्वमुधा है) तत्त्वामध्ये मूढ असतो;





अविवेकी असतो. (अंतर) अंतरात्मा (उत्तम मध्यम जघन त्रिविध के) उत्तम, मध्यम व जघन्य असे तीन प्रकारचे आहेत. (आतमज्ञानी द्विविध संगबिन शुध उपयोगी निजध्यानी मुनि उत्तम) अंतरंग व बहिरंग या दोन प्रकारच्या परिग्रहांनी रहित शुद्धोपयोगी व आत्मध्यानी मुनी उत्तम अंतरात्मा होत.

भावार्थ : येथे जीव तीन प्रकारचे सांगितले आहेत. गति, इन्द्रिय इत्यादिकांच्या अपेक्षेने भेद न करता अंतरंग श्रद्धा व तत्स्वरूप साक्षात परिणमन या अपेक्षेने हे तीन भेद केले आहेत. इतर प्रकारच्या सर्व भेदांचा अंतर्भाव यामध्ये होते. (१) बहिरात्मा, (२) अंतरात्मा व (३) परमात्मा.

बहिरात्मा : जो शरीरादि बाह्य पदार्थामध्ये आत्मत्वबुद्धि करतो तो बहिरात्मा होय. त्याला जीव अजीवाचे, स्वपराचे भेदज्ञान नसते. त्यामुळे तो अविवेकी असतो. आस्रवबंध हे हेय तत्त्व असून संवर, निर्जरा व मोक्ष हे उपादेय तत्त्व आहे असाही त्यास हेयोपदेय विवेक नसतो. म्हणून तो तत्त्वमूढ, मिथ्यादृष्टी असतो.

अंतरात्मा : जो भेदविज्ञानद्वारा आत्मस्वरूपाला शरीरादि परद्रव्यापासून व विकारापासून भिन्न मानतो तो अंतरात्मा होय. जो विकारापासून

आत्मस्वभाव वेगळा मानीत नाही तो आपल्या आत्म्यास परापासून वेगळा करू शकत नाही. कारण विकार हे सदैव परासह एकत्वबुद्धीने किंवा पराच्या लक्ष्याने होतात. अंतरात्मा तीन प्रकारचे आहेत. (१) उत्तम, (२) मध्यम (३) जघन्य.

उत्तम अंतरात्मा : जे रागादि अंतरंग परिग्रहाने व धनधान्य गृह आदि बहिरंग परिग्रहाने रहित असतात, विषयकषायांनी रहित असतात, शुद्धोपयोगात लीन असतात, आपल्या शुद्ध आत्म्याचे ध्यान करतात असे मुनीराज उत्तम अंतरात्मा जाणावेत. ।।४।।

### मध्यम आणि जघन्य अंतरात्मा व सकल परमात्म्याचे स्वरूप

मध्यम अंतर आतम हैं जे देशव्रती आगारी[१] ।
जघन कहे अविरत-समदृष्टि, तीनो शिवमगचारी ।।
सकल निकल परमातम द्वैविध, तिनमें घाति निवारी ।
श्री अरहन्त सकल परमातम, लोकलोक-निहारी ।।५।।

शब्दार्थ : कल = शरीर. निकल = शरीररहित.

अन्वयार्थ : (जे आगारी, देशव्रती हैं ते मध्यम अंतर आतम है) तसेच जे देशव्रती-बारा व्रते व अकरा प्रतिमा पाळणारे पाचव्या गुणस्थानातील श्रावक-आहेत ते मध्यम अंतरात्मा होत.(अविरत समदृष्टि जघन कहे) व्रते नसणारे अविरत सम्यग्दृष्टी हे जघन्य अंतरात्मा होत. (तीनो शिवमगचारी) हे तीनही अंतरात्मे मोक्षमार्गामध्ये विहार करणारे आहेत.(परमातम सकल निकल द्वैविध) परमात्मा सशरीरी अशरीरी या प्रकारे दोन प्रकारचे आहेत. (तिनमें घातिनिवारी लोकालोकनिहारी श्री अरिहन्त)त्यापैकी चार घातिकर्मांचा नाश करणारे, लोक व अलोकास साक्षात् जाणणारे व पाहणारे श्री अरिहन्त भगवान हे (सकल परमातम) सशरीरी परमात्मा होत.

भावार्थ : मध्यम अंतरात्मा - शुभोपयोगी अनगार साधू व जे



देशव्रती गृहस्थ आहेत ते मध्यम अंतरात्मा होत.

जघन्य अंतरात्मा : देह व आत्मा यांना भिन्नभिन्न स्वीकारणारे अविरत (संयमाने रहित) सम्यग्दृष्टी जघन्य अंतरात्मा होत.

बहिरात्मा हा संसारमार्गाचा : दुःखमार्गाचा पथिक आहे. तीनही प्रकारचे अंतरात्मे हे मुक्तिमार्गाचे पथिक आहेत. अंतरात्मा शरीरी व संसारी आहेत परंतु शरीरात व संसारामध्ये राहून शुद्ध आत्म्याची रुची असल्याने ते मुक्तिमार्गाचे पथिक आहेत. बहिरात्मा अनंतसंसारीच आहेत.

ज्यांना आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाची साक्षात् प्राप्ती झाली आहे ते परमात्मा होत. परमात्मा दोन प्रकारचे आहेत. (१) सकल व (२) निकल.

सकल परमात्मा : ज्यांना चार घातिकर्मांचा नाश झाल्याने केवलज्ञान व केवलदर्शन आदि अनंत चतुष्टय प्राप्त झाले आहे, स्वरूपप्राप्ती झाली आहे, परंतु जे शरीरसहित आहेत ते सकल परमात्मा होत. ।।५।।

### निकल परमात्म्याचे स्वरूप व तीन आत्म्यामध्ये हेयोपादेयता

ज्ञानशरीरी त्रिविध कर्ममल-वर्जित सिद्ध महन्ता ।
ते हैं निकल अमल परमातम, भोगैं शर्म अनंता ।।
बहिरातमता हेय जानि तजि, अन्तर आतम हूजै ।
परमातमको ध्याय निरंतर, जो नित आनंद पूजै ।।६।।

शब्दार्थ : ज्ञानशरीरी = ज्ञान हेच ज्यांचे शरीर आहे. निकल = शरीररहित. अमल = निर्दोष. शर्म = सुख. तजि = सोडून. हूजै = व्हावे.

अन्वयार्थ : (ज्ञानशरीरी त्रिविधकर्ममलवर्जित) ज्ञान हेच ज्यांचे शरीर आहे, जे द्रव्यकर्म, नोकर्म [शरीरादी] व भावकर्म या तीन प्रकारच्या कर्ममलाने सर्वथा रहित आहेत,(अमल महन्ता सिद्ध निकल परमातम है) म्हणून जे निर्दोष व महान आहेत असे सिद्ध भगवान निकल परमात्मा होत. (ते अनंता शर्म भोगे) ते अनंत सुखाचा आस्वाद घेतात. (बहिरातमता हेय जानि तजि) बहिरात्मता, मिथ्यादृष्टिपणा,

परसमयपणा [तो शरीरादि परास समय-आत्मा-मानतो म्हणून परसमय आहे] हेय जाणून त्याचा त्याग करावा, (परमातमको निरंतर ध्याय) परमात्म्याचे निरंतर ध्यान करून (अंतर आतम हूजै) अंतरात्मा व्हावे, (जो नित आनंद पूजै) की, ज्यामुळे नित्य परम आनंद प्राप्त होतो.

भावार्थ : निकल परमात्मा-जे ज्ञानावरणादि द्रव्यकर्म, शरीरादि नोकर्म व रागादि भावकर्म या तीन कर्म दोषांनी रहित असल्यामुळे सर्वप्रकारे अमल निर्दोष आहेत, ज्ञानमात्र शरीर धारण करणारे असल्यामुळे महान आहेत ते निकल सिद्ध परमात्मा होत. ते बाह्य विषयादिकांच्या साधनाविना अनुपम आत्मजन्य आनंदाचा आस्वाद घेतात.

सर्वच जीवमात्र हा जसा या तीन अवस्थेमध्ये विभक्त होतो, तसेच प्रत्येक जीवामध्ये हे तीन आत्मपर्याय विवक्षावक्ष असतात. मिथ्यादृष्टी जीवही जरी तो वर्तमान पर्यायामध्ये बहिरात्मा आहे तरी स्वभावअपेक्षेने परमात्मा व शक्तीअपेक्षेने अथवा भाविनैगमनयाच्या अपेक्षेने अंतरात्मा आहे. साक्षात परमात्मा हा पर्याय अपेक्षेने शुद्ध असला तरी भूतनैगमनयाने तो बहिरात्मा आणि अंतरात्मा आहे. अंतरात्मा हा भूतनैगमनयाने बहिरात्मा तर भाविनैगमनयाने व स्वभाव अपेक्षेने परमात्मा आहे.

जीव हा अनादिकाळापासून प्रथमतः बहिरात्मा आहे. परंतु ज्ञानी जीव मिथ्यादृष्टिपणा (बहिरात्मा) हेय जाणून त्याचा त्याग करतो. प्रत्येक जीवामध्ये स्वभाव अपेक्षेने सदैव विद्यमान असणारा जो परमात्मा त्यांच्या ध्यानाने, आश्रयानेच बहिरात्मतेचा त्याग होतो. प्रथमतः अन्य परमात्म्याच्या निमित्ताने आपणामध्ये स्वभावअपेक्षेने विद्यमान परमात्म्याच्या स्वरूपाचे ज्ञान होते, उपयोगाने ध्यानद्वारा त्याचा आश्रय घेतला की शुद्ध आत्मतत्त्वाची प्रतीती होते व तो अंतरात्मा होतो. अंतरात्मा साधन अपेक्षेने उपादेय तत्त्व आहे, तर परमात्मा हे सर्वथा उपादेय व साध्य तत्त्व आहे, बहिरात्मपणा सोडून व परमात्म्याचे ध्यान करून अंतरात्मा बनावे. स्वयं साक्षात परमात्मा बनावे. असा हा मोक्षाचा, आत्म्याच्या यथार्थ विकासाचा यथार्थ मार्ग आहे. याच मार्गाने परमानंदाची प्राप्ती होते. ।।६।।



### अजीवाचे भेद व लक्षण

चेतनता बिन सो अजीव है, पंचभेद ताके हैं ।
पुद्‌गल पंच वरण रस गंध दु, फरस वायु जाके है ।।
जिय पुद्‌गलको चलनसहाई, धर्म द्रव्य अनरूपी ।
तिष्ठत होय अधर्म सहाई, जिन बिनमूर्ति निरूपी ।।७।।



शब्दार्थ : वरण = वर्ण, रंग. फरस = स्पर्श. वसु = आठ. बिनमूर्ति. अनरूपी = अरूपी, स्पर्शरसगंधवर्णरहित, तिष्ठत = स्थिर राहण्यास.

अन्वयार्थ : (चेतनता बिन सो अजीव है) जो चैतन्याने रहित आहे तो अजीव होय. (ताके पंच भेद है) त्याचे पाच भेद आहेत. [१. पुद्‌गल २. धर्म ३. अधर्म ४. आकाश व ५. काल] (जाके पंच वरण रस दु गंध वसु फरस है) ज्याला पाच वर्ण, पाच रस, दोन गंध व आठ स्पर्श आहेत (पुद्‌गल) तो पुद्‌गल आहे. (जियपुद्‌गलको चलनसहाई) जीव आणि पुद्‌गलास गमनामध्ये जो सहायक-निमित्त आहे (सो अनरूपी धर्मद्रव्य) ते अमूर्तिक धर्मद्रव्य आहे. आणि जीव व पुद्‌गलांना (तिष्ठत सहाई होय) गतिपूर्वक स्थितीमध्ये-स्थिर राहण्यास-निमित्त आहे. (बिनमूर्ति

अधर्म) ते अमूर्तिक अधर्मद्रव्य आहे, असें(जिन निरूपी) जिनेन्द्र भगवंतानी सांगितले आहे.

भावार्थ : ज्यामध्ये चेतना नाही त्यास अजीव म्हणतात. अजीवाचे पाच प्रकार आहेत. (१) पुद्‌गल (२) धर्म (३) अधर्म (४) आकाश आणि (५) काल.

पुद्‌गलद्रव्य - स्पर्श-रस-गंध-वर्ण यांना रूप वा मूर्ती म्हणतात, ज्यामध्ये पाच प्रकारचा वर्ण, पाच रस, दोन गंध व आठ स्पर्श आहे ते पुद्‌गल द्रव्य होय. पुद्‌गल तेवढे मूर्तिक आहे. शेष द्रव्ये अमूर्तिक आहेत.

धर्मद्रव्य - जे द्रव्य गमन करण्यास उद्युक्त अशा समस्त जीव पुद्‌गलांना गतीमध्ये साह्यकारी-निमित्त आहे ते धर्मद्रव्य होय. जसे पाणी माशांना गमनामध्ये उदासीन निमित्त आहे तसे धर्मद्रव्य उदासीन निमित्त आहे.

अधर्मद्रव्य - जे द्रव्य स्थिर राहण्यास उद्युक्त अशा सर्वच जीव पुद्‌गलांना स्थिर राहण्यास निमित्त आहे ते अधर्मद्रव्य होय. ज्याप्रमाणे वृक्ष पथिकांना छाया देण्यास उदासीन निमित्त आहे. जेथे जीव पुद्‌गलाची गती आहे तेथे धर्मद्रव्य आहे आणि स्थिती आहे तेथे अधर्मद्रव्य आहे.

गमनक्रिया व चालताना स्थिर होण्याची क्रिया जीव पुद्‌गलामध्येच होते. कारण ही दोनच द्रव्ये क्रियावान् आहेत. गमन करण्याची व स्थिर राहण्याची शक्तीही त्या त्या जीवाची व पुद्‌गलाचीच आहे. जेव्हा त्यांच्या स्वभावाने गतिपरिणाम किंवा स्थितिपरिणाम होतो तेव्हा त्यांना धर्म व अधर्म द्रव्ये जबरीने प्रेरणा करीत नाहीत; स्वयं स्वभावतः गतिस्थिती रूपाने परिणम होणाऱ्या जीव पुद्‌गलांना ती द्रव्ये अनुक्रमे त्या परिणामास निमित्तमात्र असतात. जेथे जेथे समस्त जीवांचे व पुद्‌गलांचे गमन आहे तेथे धर्मद्रव्य प्रसररूप (विस्ताररूप) आहे व गमनपूर्वक स्थिती आहे तेथे प्रसररूप अधर्मद्रव्य आहे. एवढाच त्याचा अर्थ आहे.ही दोन द्रव्ये जेवढ्या भागात व्यापून असतात तेवढ्या आकाशास लोकाकाश म्हणतात. जीव व पुद्‌गलामध्ये गति परिणाम किंवा स्थितिपरिणाम होतो तेव्हा त्यामध्ये बहिरंग निमित्त लोकव्यापी धर्म व अधर्म द्रव्य आहेत. ।।७।।



## आकाशद्रव्य, कालद्रव्य व आस्त्रव तत्त्वाचे स्वरूप

सकल-द्रव्यको वास जासमें सो आकाश पिछानो ।
नियत वरतना निशि-दिन सो, विवहारकाल परिमानो ।।
यों अजीव, अब आस्त्रव सुनिये, मन-वच-काय त्रियोगा ।
मिथ्या-अविरति अरु कषाय, परमाद-सहित उपयोगा ।।८।।



शब्दार्थ : नियत = निश्चय, परिमानो = जाना. निशि = रात्र.

अन्वयार्थ : (जासमे सकल द्रव्यको वास)ज्यामध्ये सर्व द्रव्यांना अवकाश [जागा] असतो (सो आकाश पिछानो) ते आकाशद्रव्य जाणा. (वर्तना नियत) वर्तना निश्चय-काल आहे. (निशिदिन सो विवहारकाल परिमानो) रात्र, दिवस, घटका, समय आदि कालद्रव्याच्या स्थूल सूक्ष्म पर्यायांना व्यवहार-काल जाणा. (यों अजीव) याप्रमाणे अजीव तत्त्वाचे वर्णन झाले. (अब आस्त्रव सुनिये)आता तिसरे आस्त्रव तत्त्वाचे स्वरूप ऐका. (मन-वच-काय त्रियोगा) मन, वचन व कायेच्या आश्रयाने आत्मप्रदेशांची चंचलता रूप तीन प्रकारचा योग,(मिथ्या-अविरति-कषाय अरु परमादसहित उपयोगा) मिथ्यात्व, अविरति, कषाय आणि प्रमादसहित आत्म्याचा उपयोग हे आस्त्रव तत्त्व होय.

भावार्थ : आकाशद्रव्य - जे द्रव्य सर्व द्रव्यांना साधारण अवगाह-जागा-देण्यास निमित्त आहे त्यास आकाशद्रव्य म्हणतात. तेही अमूर्तिक असून अनंतप्रदेशी, अतिविस्तृत एक अखंड द्रव्य आहे. ते अति विशाल असल्यामुळे त्यास अवगाह देण्यास निमित्त म्हटले आहे.

कालद्रव्य : जे द्रव्य सर्व द्रव्यांच्या परिणमण्यामध्ये निमित्तमात्र

आहे, त्यास कालद्रव्य म्हणतात. हे लोकाकाशाच्या प्रत्येकप्रदेशावर एकेक स्थित आहे. ते त्या प्रदेशात स्थित असणाऱ्या परमाणू आदि द्रव्यांना कुंभाराच्या चाकाच्या खिळीप्रमाणे उदासीन निमित्त आहे, त्यास वर्तना, (परिणमविणारा) म्हणतात. परिवर्तन करण्याची शक्ती प्रत्येक द्रव्याची स्वतःचीच असून आपआपल्या परिणामाचा ते द्रव्यच स्वयं कर्ता आहे. कालद्रव्य नाही. त्याच्या दिवस-घटका-समय इत्यादि स्थूल सूक्ष्म पर्यायास व्यवहारकाल म्हणतात. क्रियावान जीव आणि पुद्‌गलामध्येच गतिस्थिति असल्यामुळे त्याच्या गति व स्थितिपरिणामास बाह्य आश्रय अनुक्रमे लोकव्यापी धर्म व अधर्मद्रव्ये आहेत. ही द्रव्ये प्रत्येक असंख्यात प्रदेशी व अखंड एक एक द्रव्य आहेत. तसेच सर्व द्रव्याचा अवगाह स्वप्रदेशात असतानाही त्यांना अवगाहासाठी बाह्य आश्रय लोकालोकव्यापक एक आकाशद्रव्य आहे. द्रव्याच्या परिणतीमध्ये एक एकप्रदेशी कालाणू द्रव्य उदासीन निमित्त कारण आहे. सारांश, कोणतेही द्रव्य अन्य कोणत्याही द्रव्याच्या परिणमनाचा निश्चयाने कर्ता नाही. ही चारही द्रव्ये अमूर्तिक आहेत.

याप्रमाणे अजीव तत्त्वाचे वर्णन झाले.

आस्त्रव तत्त्व - आस्त्रवाचे पाच भेद आहेत. (१) मिथ्यात्व, (२) अविरति, (३) प्रमाद, (४) कषाय व (५) योग.जीवाच्या या पाच प्रकारच्या परिणामांना आस्त्रव तत्त्व म्हणतात. त्यासच भावास्त्रव असेही म्हणतात व त्या परिणामांच्या निमित्ताने ज्ञानावरणादि कर्मे येतात तो द्रव्यास्त्रव होय. ।।८।।

### बंध, संवर, निर्जरा तत्त्वाचे स्वरूप

ये ही आतमको दुखकारन तातैं इनकों तजिये ।
जीवप्रदेश बंधै विधिसों सो बंधन कबहू न सजिये ।।
शम-दमते जो कर्म न आवैं, सो संवर आदरिये ।
तप-बलतै विधि-झरन निरजरा ताहि सदा आचरिये ।।९।।

शब्दार्थ : तजिए = सोडावे. विधिसों = कर्मासह (विधी = कर्म.







सौ = सह). न सजिये = युक्त होऊ नये. विधि-झरण = कर्माचे गळणे, एकदेश निघून जाणे.

अन्वयार्थ : (ये ही आतमको दुखकारन)हे योग व कषायादिक परिणाम-आस्त्रवभाव-आत्म्याला दुःखाकरिता कारण आहेत.(तातैं इनको तजिये) म्हणून त्यांना सोडावे.(जीवप्रदेश विधिसौं बंधै) आत्मप्रदेश कर्म परमाणूंशी परस्पर बांधले जातात (सो बंधन कबहू न सजिये)तो बंध असून त्यात कदापि युक्त होऊ नये(शमदमतैं जो कर्म न आवे)कषायांचा अभावरूप आत्म्याचा शम परिणाम व इन्द्रिय निरोधरूप दम परिणाम यांनी नवीन कर्मांचे न येणे (सो संवर आदरिये) हे संवर तत्त्व आहे. त्याचे ग्रहण करावे. (तपबलतैं विधि-झरन) तपोबलाने कर्मांचे एकदेश खिरणे (निरजरा, ताहि सदा आचरिये) हे निर्जरा तत्त्व असून त्यांचे आचरण निरंतर करावे.

भावार्थ : रागादिक विकार परवस्तूचे परिणाम नसून जीवाचेच विभाव परिणाम आहेत. ते कर्मबंधाचे व दुःखाचे कारण आहेत, म्हणून ते विकार वास्तविक आस्त्रव असून हेय आहेत.

बंधतत्त्व : आत्म्याचा उपयोग रागादि परिणामांशी एकरूप तन्मय होणे म्हणजे भावबंध होय. हाच जीवबंध होय. नूतन कर्मांचा पूर्वबद्ध कर्मपरमाणूंशी स्निग्धता-रूक्षतेमुळे होणारा बंध हा अजीवबंध होय. जीवप्रदेश व कर्मप्रदेश अन्योन्य प्रविष्ट होऊन त्यांचा जो अन्योन्य अवगाह होतो तो जीव पुद्‌गलात्मक उभयबंध होय. आस्रवद्वारा आलेले कर्मपरमाणू त्याच क्षणी ज्ञानावरणादि रूपाने परिणमतात (प्रकृतिबंध), त्याच्या प्रदेशांचे ज्ञानावरणादिरूपाने परिणमन होते कर्मपरमाणूंचे वर्गीकरण होते (प्रदेशबंध), त्यांची जीवाच्या प्रदेशांमध्ये राहण्याची कालमर्यादा ठरते (स्थितिबंध), व प्रकृतीला अनुसरून फल देण्याची शक्ती उत्पन्न होते (अनुभागबंध) हे सर्व एकाच समयात घडते.

संवर तत्त्व : ज्याप्रमाणे नौका फुटली असल्यास ती बुडू नये म्हणून प्रथम छिद्र बंद करावे लागते. त्याचप्रमाणे संसारसागरात बुडू नये म्हणून कर्म येण्याचे द्वार प्रथम बंद करावे लागते. रागद्वेषाशी विकारांनी कर्म येते. म्हणून रागादि विकारांचा अभाव, आत्मतत्त्वामध्ये रुचि वगैरे हे भाव संवरतत्त्व आहे. रागादि कषायांचा अभाव असणे यास शम म्हणतात. व इन्द्रियांच्या विषय प्रवृत्तीला रोकणे याला दम म्हणतात. या शम व दमामुळे नूतन कर्माचे न येणे याला द्रव्यसंवर म्हणतात.

संवर व निर्जरेला सुरुवात सम्यग्दर्शनाच्या उत्पत्तीपासून होते. प्रत्येक समयी जीवास कर्माची निर्जरा संवराशिवाय सुरूच असते, तिचा मोक्षमार्गामध्ये उपयोग नाही. कषायविरहित शुद्ध निश्चय रत्नत्रयाचे परिणाम हेच संवराला साक्षात कारण आहेत. त्यावेळी भूमिकेनुसार असणारा व्रतादि व्यवहार हा शुभोपयोगरूप मंदकषायरूप आहे. वस्तुतः तो शुभबंधास कारण आहे. संवरनिर्जरेला नाही. त्यास शुभास्रव म्हणून त्याचे तत्त्वार्थसूत्राच्या सातव्या अध्यायात निरूपण आहे.

निर्जरा तत्त्व : स्वभावसन्मुख दर्शनज्ञानचारित्राच्या प्रवृत्तिपूर्वक, शुभाशुभ इच्छेचा निरोध करणे यास तप म्हणतात. त्यामुळे पूर्वीचे कर्म उदयाला येऊन निघून जाते; म्हणून त्या इच्छानिरोधरूप परिणामास भावनिर्जरा म्हणतात व कर्माचे एकदेश निघून जाणे यास द्रव्यनिर्जरा म्हणतात.



या सात तत्त्वांचे केवळ लक्षण भेद वगैरे जाणणे एवढे मात्र प्रयोजनभूत नाही. तर त्यात हेयोपदेय विवेक करणे हे प्रयोजनभूत आहे. परमात्मतत्त्व हे मोक्षतत्त्वच आहे; ते साध्यतत्त्व आहे; अतएव उपादेयही आहेच. बहिरात्मतत्त्व हा कर्मोदयानुसार होणारा विकारी परिणाम आहे. म्हणून ते तत्त्व जीव स्वभावापासून कथंचित् भिन्न असल्यामुळे अजीवतत्त्व असून हेय आहे. अन्य अजीव द्रव्ये तर न हेय आहेत न उपादेय आहेत, ती मात्र ज्ञेय आहेत. अस्राव व बंध ही संसारास कारणभूत तत्त्वे असल्यामुळे हेय आहेत. जेव्हा जीवात्मा बहिरात्मा, विकार, आस्रव बंध यांना हेयरूपाने स्वीकारतो तेव्हा तीच शुद्ध आत्म्याची प्रतीती आहे व तीच संवरनिर्जरारूप आहे. म्हणजे या तत्त्वश्रद्धानाची अंतिम परिणती शेवटी शुद्ध आत्म्याच्या प्रतीतीतच होते. म्हणून शुद्ध आत्मतत्त्वाच्या प्रतीतील निश्चय सम्यग्दर्शन म्हटले आहे व तत्त्वार्थ श्रद्धान त्याचे कारण असल्यामुळे त्यास व्यवहारसम्यग्दर्शन म्हटले आहे. ।।९।।

### मोक्षतत्त्व व व्यवहार सम्यक्त्वाचे लक्षण व त्याचे निमित्त

सकल कर्मतें रहित अवस्था, सो शिव थिर सुखकारी ।
इह विधि जो सरधा तत्त्वनकी, सो समकित व्यवहारी ।।
देव जिनेंद्र, गुरु परिग्रह बिन, धर्म दयाजुत सारो ।
येहू मान समकितको कारन, अष्ट अंगजुत धारो ।।१०।।




शब्दार्थ : सरधा = श्रद्धा, प्रतीती. दयाजुत = दयामय. सारो = सारभूत.

अन्वयार्थ : (सकल कर्मते रहित अवस्था) संपूर्ण कर्मांनी रहित आत्म्याची अवस्था म्हणजे (सो थिर सुखकारी शिव) शाश्वत सुखकारक

मोक्ष होय. (इहविधि जो तत्त्वनकी सरधा) याप्रमाणे जे सात तत्त्वांचे श्रद्धान (सो व्यवहारी समकित) ते व्यवहार सम्यक्त्व होय. (देव जिनेन्द्र) वीतराग सर्वज्ञ जिनेन्द्र भगवान हेच देव, (गुरु परिग्रह बिन) निर्गंथ हेच गुरू व (दयाजुत धर्म सारो) दयामय धर्म हे सारभूत आहेत. (येहू समकितको कारण मान) हेच सम्यक्त्वाला [निमित्त] कारण जाणावेत. (अष्ट अंगजुत धारो) हे सम्यग्दर्शन आठ अंगाने सहित धारण करावे.

भावार्थ : मोक्षतत्त्व - द्रव्यकर्म, नोकर्म व भाव कर्मांनी सर्वथा रहित व सर्वथा सुखमय अशा आत्म्याच्या अवस्थेला मोक्ष म्हणतात. म्हणजे साक्षात् शुद्ध आत्म्याची उपलब्धी हा भावमोक्ष व संपूर्ण कर्माच्या क्षयास द्रव्यमोक्ष म्हणतात. याप्रमाणे सात तत्त्वांच्या श्रद्धानास व्यवहार सम्यक्त्व म्हटले आहे.

वीतराग व सर्वज्ञ जिनेन्द्र भगवान् हेच देव, निर्गंथ व आत्मध्यानी साधू हेच गुरू व दयामय आत्मकल्याणकारी धर्म हाच धर्म. याप्रमाणे श्रद्धा असेल तर देव, गुरू व धर्म हे सम्यक्त्वाच्या उत्पत्तीला निमित्त आहेत. अतएव देवगुरूशास्त्र हे सम्यक्त्वाचे निमित्त असल्यामुळे त्याची परीक्षा करणे अगत्याचे आहे. वीतराग देव सोडून अन्य ग्रहादिक व भूतादिक देव, अन्य परिग्रही साधू व हिंसाप्रधान धर्म यांचा रत्नत्रयाच्या उत्पत्तीशी कारणसंबंध मुळीच नाही. उलटपक्षी ते मिथ्यात्वच दृढ करण्यास कारण आहेत. देवदेवता ज्या आहेत, त्यापैकी काही स्वयं सम्यग्दृष्टीही असतात. एतावता त्या पूजनीय मात्र नाहीत. त्याही स्वयं भगवंताच्या पूजकच आहेत. स्वतःला पूज्य समजत नाहीत. सम्यग्दृष्टी जीवाला हा विवेक असतो. ।।१०।।

### सम्यक्त्वाचे पंचेवीस दोष व आठ अंग

वसुमद टारि निवारि त्रि-शठता, षट अनायतन त्यागो ।
शंकादिक वसु दोष विना संवेगादिक चित पागो ।।
अष्ट-अंग अरु दोष पचीसों तिन संक्षेपे कहिये ।
बिन जाने तैं दोष गुननकों कैसे तजिये गहिये ।।११।।

शब्दार्थ : वसुमद = आठ प्रकारचा गर्व. टारि = सोडून. निवारि = सोडून, टाकून. त्रिशठता = तीन मूढता. अनायतन = आयतन म्हणजे आश्रय. जे धर्माचे आश्रयस्थान नाही ते अनायतन होय.



अन्वयार्थ : (वसुमद टारि) आठ प्रकारचा गर्व सोडून (त्रिशठता निवारि) तीन मूढतांचा त्याग करून (षट अनायतन त्यागो) सहा अनायतनाचा त्याग करा. (वसु शंकादिक दोष बिना) आठ शंकादिक दोषांनी रहित होऊन (संवेगादि चित पागो) संवेगादिक गुणामध्ये चित्त लीन करा. (तिन अष्ट अंग अरु पचीसों दोष संक्षेपे कहिये) ते आठ अंग आणि पंचवीस दोष यांचे संक्षेपाने वर्णन करतात. (बिन जाने तैं) कारण जर त्या गुणदोषांचे ज्ञानच नसेल तर (दोष गुननको कैसे तजिये गहिये) दोषांना कसे सोडता येईल किंवा गुणांना कसे ग्रहण करता येईल ?

भावार्थ : आठ मद, आठ शंकादिक दोष, तीन मूढता व सहा अनायतन हे सम्यक्त्वाचे पंचेवीस दोष आहेत, त्यांचा त्याग करावा. आठ अंग व प्रशम, संवेग, अस्तिक्य, अनुकंपा या गुणांचा अंगीकार करावा. गुणदोषांचे स्वरूप समजल्याशिवाय दोषांचा त्याग व गुणांचे ग्रहण कसे होणार ? म्हणून कवी त्यांचे संक्षेपाने वर्णन करतात. ।।११।।



सम्यक्त्वाचे आठ अंग व आठ दोष

जिनवचनमें शंका न धारि वृष, भव-सुख-वांछा भानै ।
मुनितन देख मलिन न धिनावे तत्त्व-कुतत्त्व पिछानै ।।
निजगुन अरु पर औगुन ढांके, वा निजधर्म बढावैं ।
कामादिककर वृषतैं चिगते निजपरको सु दिढावै ।।१२।।
धर्मीसों गऊबच्छप्रीतिसम, कर जिनधर्म दिपावै ।।
इन गुनतै विपरीत दोष वसु, तिनको सतत खिपावै ।।१३।।



शब्दार्थ : वृष = धर्म. शंका = संशय. भानै = न करावी. न घिनावै = किळस, घृणा न करावी. ढाकै = झाकून टाकावे. चिगते = च्युत होत असताना. दिढावै = दृढ करावे. गऊबच्छप्रीतिसम = गायवासरू यांच्या प्रेमाप्रमाणे.

अन्वयार्थ : (जिनवचनमें शंका न धारि)जिनेन्द्र भगवंताच्या वचनामध्ये शंका ठेवू नये. हे निःशंकित अंग होय(वृष भवसुखवांछा भानै) धर्म धारण



करून तेथे संसारसुखाची इच्छा न करावी हे निःकांक्षित अंग होय.(मलिन मुनितन देख न घिनावे) साधूचे मलिन शरीर पाहून घृणा न करावी. हे निर्विचिकित्सा अंग होय(तत्त्वकुतत्त्व पिछाने)तत्त्व आणि कुतत्त्व ओळखावे हे अमूढदृष्टि अंग होय(निजगुण अरु परऔगुण ढांकै)आपले गुण आणि दुसऱ्याचे दोष झाकावे. हे उपहगून अंग होय (वा निजधर्म बढावैं) अथवा आपल्या आत्मधर्माचे संवर्धन करावे. हे उपबृंहण अंग होय(कामादिककर वृषते चिगते) काम वगैरे दोषांनी धर्मापासून च्युत होत असतांना(निजपरको सुदिढावैं)धर्मात आपणास किंवा दुसऱ्यास चांगले स्थिर करावे हे स्थितीकरण अंग होय(धर्मीसो गऊ-बच्छ प्रीतिमम कर) साधर्मी बांधवावर गाईच्या वासरांवरील प्रीतिप्रमाणे निरपेक्ष प्रीती करावी है वात्सस्य अंग होय.(जिनधर्म दिपावै) जिनधर्माचा उद्योत करणे हे प्रभावना अंग होय(इन गुनतै विपरीत वसु दोष) या गुणांच्या विपरीत आठ दोष आहेत.(तिनको सतत खिपावै) त्यांना नेहमी दूर करावे.

भावार्थ : सम्यक्त्वाची रक्षा होऊन वृद्धी करणारे आठ गुण आहेत. त्यांना अष्ट अंग म्हणतात. अंगाविना शरीर जसे अपूर्ण असते तसे या आठ गुणांच्या अभावी सम्यग्दर्शनामध्ये न्यूनता राहते. त्या अंगांचे थोडक्यात स्वरूप याप्रमाणे आहे.

१. निःशंकित -तत्त्व हेच असून असेच आहे या प्रकारे जिनवचनामध्ये-तत्त्वामध्ये दृढ विश्वास ठेवणे हे निःशंकित अंग होय.

२. निःकांक्षित अंग - संसारसुखाची इच्छा न करणे हे निःकांक्षित अंग होय.

सम्यग्दृष्टी किंवा व्रती गृहस्थास प्रयोजनभूत तत्त्वामध्ये कधीही संदेह असत नाही. तसेच त्याची आत्मतत्त्वामध्ये अविचल श्रद्धा असते व संसारातील भोग आणि विषयसुख हे हेयच असते असाही त्याचा अंतर्यामी दृढ विश्वास असतो. म्हणून जरी तो गृहस्थ आहे तथापि त्याला हे दोन गुण असण्यात विरोध नाही.

३. निर्विचिकित्सा अंग - शरीर अपवित्र असूनही धर्माने पवित्र

अशा मुनी आदिकांचे मलिन शरीर पाहून गुणांचे स्मरण करणे, शरीराची घृणा न करणे हे निर्विचिकित्सा अंग होय.

४. अमूढदृष्टी अंग - सत्य असत्य तत्त्वांचा निर्णय करून मूढतेमध्ये न अडकता दृष्टी स्वच्छ निर्दोष ठेवणे हे अमूढदृष्टी अंग होय.

५. उपगूहन अंग - आपले गुण सांगून आत्मप्रशंसा न करणे व दुसऱ्यांचे दोष झाकणे हे उपगूहन अंग होय. अथवा या अंगालाशास्त्रामध्ये उपबृंहण असेही नाव आहे. स्वपराच्या आत्मधर्माची वृद्धी करणे हे उपबृंहण अंग होय.

६. स्थितीकरण अंग - काम विकारादिक दोष अथवा आपली असमर्थता यामुळे रत्नत्रय धर्मापासून भ्रष्ट होत असताना स्वतःला किंवा दुसऱ्यास धर्ममार्गामध्ये स्थिर करणे हे स्थितीकरण अंग होय.

७. वात्सल्य अंग - धर्मात्मा जीवावर वत्सलभाव ठेवणे, त्यांच्या आपत्तीचे निवारण शक्तीनुसार करणे हे वात्सल्य अंग होय.

८. प्रभावना अंग - पूजा, दान, तप, ज्ञानातिशय या द्वारा आत्मधर्म व जिनधर्माचा उद्योत करणे हे प्रभावना अंग होय.

सम्यक्त्वाच्या या अंगांच्या विपरीत (प्रतिपक्षी असलेले) आठ दोष आहेत. १. शंका, २. कांक्षा, ३. विचिकित्सा, ४. मूढदृष्टि, ५. अनुपगूहन अथवा अनुपबृंहण, ६. अस्थितीकरण, ७. अवात्सल्य व ८. अप्रभावना. त्यांना सदैव दूर करावे. ।।१३।।

## आठ मदांचे वर्णन

(श्लोक १३ वा उत्तरार्ध व १४ वा पूर्वार्ध)

पिता भूप व मातुल नृप जो, होय तो न मद ठानै ।
मद न रूपको मद न ज्ञानको, धनबलको मद भानै ।।१३।।
तपको मद न मद जु प्रभुताको, करै न सो निज जानै ।
मद धारै तो येहि दोष वसु समकितको मल ठानै ।।१४।।







शब्दार्थ : भूप, नृप = राजा. मातुल = मामा.

अन्वयार्थ : (जो पिता भूप वा मातुल नृप होय) जर पिता किंवा मामा राजा असेल (तो मद न ठानै) तरी गर्व करू नये. (न रूपको मद) रूपाचा गर्व करू नये. (न ज्ञानको मद) ज्ञानाचा गर्व न करावा. (धनबलको मद भानै) धन आणि शरीरसामर्थ्याचा अभिमान सोडावा.(न तपको मद) न तपाचा गर्व करावा. (जु प्रभुताको मद न करै) आणि सत्तेचाही मद करू नये. हे मद सोडले तरच (सो निज जानै) तो आपल्या आत्मतत्त्वास जाणतो; आणि (मद धारै तो ये ही वसु दोष) अभिमान ठेवला तर हेच आठ दोष (समकितको मल ठानै) सम्यक्त्वाला मलिन करतात.

भावार्थ : (१) पिता वगैरे पितृपक्षास कुल म्हणतात. कुलपरंपरागत राजेपणा आदिकांचा अभिमान करणे हा कुलमद होय. (२) मामा वगैरे मातृपक्षास जाती म्हणतात. त्यातील राजेपणा वगैरे मोठेपणाचा अभिमान करणे हा जातिमद होय. (३) शारीरिक सौंदर्याचा अभिमान करणे हा घनमद होय. (६) आपल्या शरीरसामर्थ्यांचा अभिमान करणे हा बलमद

होय. (७) व्रत उपवासादिक तपाचा अभिमान करणे हा तपोमद होय. (८) आपल्या सत्तेचा मोठेपणा अभिमान करणे हा पूजामद होय.

ज्याचा अज्ञानी गर्व करतो त्या या आठही वस्तू आपल्या स्वाधीन नसून पराधीन आहेत, क्षणिक आहेत. आत्मतत्त्वापासून विलक्षण आहेत. त्यामुळे त्या अभिमान करण्याच्या लायकीच्या नाहीत. आपल्या महान चैतन्यशक्तीची जाणीव नसल्यामुळे अज्ञानी अभिमानात फसतो व स्वतःला तसेच आपल्या धर्माला विसरतो. म्हणून हे आठ प्रकारचे मद सम्यक्त्वाचे आठ दोष आहेत; ते सम्यक्त्व दूषित करतात.

### सहा अनायतन व तीन मूढता दोष
(श्लोक १४ वा उत्तरार्ध)

कुगुरू-कुदेव-कुवृष-सेवककी, नहिं प्रशंस उचरै है ।
जिनमुनि जिनश्रुत बिन कुगुरादिक, तिन्हे न नमन करै है ।।१४।।

अन्वयार्थ : (कुगुरु-कुदेव-कुवृष-सेवककी) कुगुरु, कुदेव व कुधर्म तसेच त्यांच्या उपासकांची (प्रशंस नहिं उचरै है) प्रशंसा न करणे हा षट अनायतन त्याग होय. (जिन मुनि जिनश्रुत बिन कुगुरादिक) जिनेन्द्र भगवान, निर्ग्रंथ मुनि व जिनशास्त्र सोडून कुदेव, कुगुरू व कुशास्त्र (तिन्है नमन न करै है) त्यांना नमस्कार करीत नाही हा तीन-मुढता-त्याग होय.

भावार्थ : षट् अनायतन - कुदेव, कुगुरु व कुधर्म तसेच त्याचे उपासक यांच्या निमित्ताने धर्माची व रत्नत्रयाची वृद्धी होत नाही, उलट हानीच होते म्हणून ह्यांना अनायतन म्हणतात. त्यांची प्रशंसा, स्तुती वगैरे करण्याने सम्यक्त्व दूषित होते. म्हणून या सहा अनायतनाचा त्याग करावा. अनायतन सहा असल्यामुळे त्यासंबंधीचे दोष सहा आहेत असे समजावे.

तीनमूढता - देव, गुरू व धर्माबाबत यथार्थ निर्णय न करता भ्रमबुद्धी - मूढभाव ठेवणे यास मूढता म्हणतात. आश्रयभेदाने मूढता तीन प्रकारची आहे. (१) लोभवश, भयवश किंवा स्नेहवश निर्दोष व सर्वज्ञ जिनेन्द्र भगवान सोडून अन्य छद्मस्थांची किंवा ग्रहादि व यक्षयक्षिणी वगैरेंची पूजा-अर्चा-सेवा करणे ही देवमूढता होय. यापूर्वी ग्रहादिक रत्नत्रयाच्या



उत्पत्तीला व वृद्धीला कारण नाहीत हे सूचित केलेच आहे. हे देव आहेत. त्यापैकी काही सम्यक्त्वीही आहेत. परंतु इतर भक्ताप्रमाणे ते पूजक आहेत. परंतु धर्मामध्ये आराध्य म्हणून पूजनीय नाहीत. तर ते फक्त साधर्मी आहेत. (२) जे परिग्रह व आरंभाने रहित असून आत्मज्ञान व ध्यानात लीन आहेत तेच गुरू होत. त्यांना सोडून परिग्रहींना साधू मानणे, लोभ भय किंवा स्नेहाने गुरू मानून त्यांची सेवा करणे ही गुरूमूढता होय. (३) रत्नत्रय धर्माशी संबंध नसताना अज्ञानवश चालू असणाऱ्या रूढींनाच धर्म मानणे ही लोकमूढता-धर्ममूढता होय. याप्रमाणे सम्यक्त्वाचे आठ अंग व पंचेवीस दोषांचे वर्णन झाले. ।।१४।।

### सम्यग्दर्शनाचे माहात्म्य

दोषरहित गुनसहित सुधी जे, सम्यकदरश सजै है ।
चरितमोहवश लेश न संजम, पै सुरनाथ जजै हैं ।।
गेही पै गृहमें न रचें ज्यों जलतैं भिन्न कमल हैं ।
नगरनारिको प्यार यथा, कादेमें हेम अमल है ।।१५।।



शब्दार्थ : सजे = भूषित, सजलेले. सुरनाथ = देवेन्द्र. जजै है = पूजा करतात. गेही = गृहस्थ. रचे = गुंग, दंग. नगरनारि = वेश्या. कादेमें = चिखलात. हेम = सोने.

अन्वयार्थ : (जे सुधी) जे सम्यग्दृष्टी जीव (दोषरहित गुनसहित सम्यकदरश सजै है) पूर्वोक्त २५ दोषांनी रहित व आठ गुणांनी सहित अशा सम्यग्दर्शनाने विभूषित आहेत. (चरितमोहवश लेश संजम न) परंतु त्यांना चारित्रमोहनीय कर्माच्या उदयवश संयमाचा लवलेशही नाही (पै सुरनाथ जजै

है) तथापि देवेन्द्रादिक सुद्धा त्यांची पूजा करतात.(गेही पै गृहमें न रचै) गृहस्थ असूनही गृहप्रपंचामध्ये रंगलेले-आसक्त-नाहीत.(ज्यो जलतै भिन्न कमल है) ज्याप्रमाणे सरोवरात पाण्यापासून कमल भिन्न आहे तद्वत् ते घरात असून घरापासून अलिप्त-वेगळे आहेत अथवा (यथा नगरनारीको प्यार) घर भोगविषयादिकावरील त्यांचे प्रेम वेश्येच्या प्रेमाप्रमाणे वरपांगी असते, किंवा (कादेमें हेम अमल है)चिखल मातीतही सोने न गंजता शुद्धच राहते तसे घरात राहूनही ते आसक्तीने पीडलेले नसतात.

भावार्थ : जो विवेकी श्रद्धेने शुद्ध आत्मतत्त्वाचा स्वीकार करतो आणि त्याचबरोबर २५ दोषांनी रहित व आठ अंगांनी युक्त सम्यग्दर्शनाने भूषित असतो त्याची महत्ता अलौकिक असते. तो इतर सामान्यजनाप्रमाणे गृहकार्यरत दिसतो, कदाचित् चारित्रमोहजनित दुर्बलतेमुळे तो संयमाचा स्वीकार करीतही नाही, तरीही स्वर्गातील इन्द्रादिक त्याचा सत्कार करतात. सम्यग्दर्शनरूपी रत्नाच्या प्रकाशाने त्याचे अंतरंग उजळून निघालेले असते. त्यामुळे सम्यक्त्वी धर्मात्मा देवांनाही आदरणीय होतो. ज्याप्रमाणे पाण्यापासून कमल भिन्न असते किंवा मातीने सोने मलिन होत नाही तद्वत् गृहरत असूनही तो घर वगैरे परिग्रहास पर मानतो म्हणून श्रद्धेने घरापासून वेगळाच असतो. वेश्येचे प्रेम जसे दिखाऊ असते तसे सम्यग्दृष्टीचे घरादिकांवरील प्रेम दिखाऊच असते, तेथे तो आसक्त नसतो.

यद्यपि संयमाने पूजनीयता व श्रेष्ठत्व येते तथापि संयमात समीचीनता सम्यग्दर्शनपूर्वकच येते. सम्यग्दृष्टी गृहस्थास बाह्यतः संयम नसूनही अंतरंगातून परिग्रहास तो परच मानतो. म्हणून संयमविरहित सम्यग्दृष्टीचे देवेन्द्रादि पूजा-सन्मान करतात. कारण त्याची दृष्टी गृहकार्ये करीत असतानाही आपल्या शुद्ध स्वरूपावरून ढळलेली नसते, हेच त्याच्या महनीयतेचे गमक आहे.।।१५।।

## सम्यक्त्वाची महिमा

प्रथम नरकबिन षट भू ज्योतिष, वान भवन षंढ नारी ।
थावर विकलत्रय पशुमें नहिं, उपजत समकित धारी ।।



तीन लोक तिहु काल मांहिं नहि, दर्शनसम सुखकारी ।
सकल धरमको मूल यही, इस बिन करनी दुखकारी ।।१६।।



शब्दार्थ : षट भू = सहा नरकभूमी. वान = व्यंतर. षंढ = नपुंसक विकलत्रय = द्वीन्द्रिय, त्रींद्रिय व चतुरिन्द्रिय. करनी = क्रियाकांड.

अन्वयार्थ : (समकितधारी) निर्मल सम्यग्दर्शन धारण करणारा जीव (प्रथम नरकबिन षट भू) पहिला नरक सोडून अन्य सहा नरकात तसेच (ज्योतिष-वान-भवन-षंढ-नारी) ज्योतिषी, व्यंतर, भवनवासी, नपुंसक, स्त्री (थावर-विकलत्रय-पशुमें उपजत ताही)स्थावर, द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय, कर्मभूमीतील तिर्यंच या पर्यायामध्ये उत्पन्न होत नाही(तीनलोक तिहु काल मांहि दर्शनसम सुखकारी नहिं)तीन लोक आणि तीन काळांत सम्यक्त्वासारखे सुखप्रद काहीही नाही.(यही सकल धर्मको मूल)हेच सम्यक्त्व सर्व धर्माचे मूळ आहे.(इसबिन करनी दुखकारी)या सम्यक्त्वाशिवाय सर्व क्रियामात्र दुःखदायक आहेत.

भावार्थ : एक तर सम्यग्दृष्टी जर मनुष्य व तिर्यंच असेल तर तो देवायूचाच बंध करील. अथवा देव नारकी असेल तर मनुष्याचाच बंध करील. त्यास नरकायू व तिर्यंचायूचा बंधच होत नाही. जर त्याने सम्यक्त्वप्राप्ती पूर्वी नरकायूचा बंध केला असेल तर तो फक्त पहिल्या

नरकातच जाईल. दुसऱ्या ते सातव्या सहा नरकात जाणार नाही. तिर्यंचायू व मनुष्यायूचा बंध केला असेल, तर भोगभूमीत तिर्यंच किंवा मनुष्य होईल. देवामध्येही जाईल तर भवनत्रिकामध्ये तो उत्पन्न होत नाही. तो वैमानिक देवच होतो. सम्यग्दृष्टी मरून स्थावर, विकलेन्द्रिय, कर्मभूमिज मनुष्य व तिर्यंच, नपुंसक, स्त्री होत नाही, कारण मरताना अशी अशुभ लेश्या सम्यग्दृष्टीला होऊच शकत नाही.

तीन लोक व त्रिकालात या सम्यक्त्वासारखा हितकारी कोणीच नाही. एकदा सम्यग्दर्शनाने दृष्टी यथार्थ झाली म्हणजे तो परापासून सुखदुःख मानीतच नाही, त्यामुळे त्याला दुःखाचे कारणच उरलेले नसते. या सम्यग्दर्शनामुळे ज्ञान आणि चारित्राला समीचीनता प्राप्त होते. म्हणून सम्यग्दर्शन हे रत्नत्रयरूप धर्माचे मूळ कारण आहे. मूळाशिवाय जसा वृक्ष टिकू शकत नाही तद्वत् सम्यक्त्वाशिवाय ज्ञानचारित्रही यथार्थ राहू शकत नाही. सम्यक्त्व कायम ठेवून चारित्रापासून भ्रष्ट झालेला जीव परत स्वतःला चारित्रामध्ये स्थिर करू शकेल, कारण तो मोक्षमार्गापासून भ्रष्ट नाही. परंतु सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट झालेला मोक्षमार्गापासून भ्रष्टच आहे. परंतु सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट झालेला मोक्षमार्गापासून च्युत होऊन संसारमार्गाच्या घसरगुंडीला लागतो. तो सर्वप्रकारे भ्रष्टच आहे. सम्यग्दर्शनाशिवाय क्रियाकाण्ड हे संसाराचे व दुःखाचेच साधन आहे. म्हणून जीवनातील आद्य कर्तव्य सम्यग्दर्शनाची प्राप्ती हेच आहे. ।।१६।।

### सम्यग्दर्शनाची श्रेष्ठता सांगून सम्यक्त्वाची प्रेरणा

मोक्षमहल की प्रथम सीढी, या बिन ज्ञान चरित्रा ।
सम्यकता न लहैं सो दर्शन धारो भव्य ! पवित्रा ।।
दौल ! समझ सुन चेत सयाने, काल वृथा मत खोवै ।
यह नर-भव फिर मिलन कठिन है, जो सम्यक् नहि हौवै।।१७।।

शब्दार्थ : चेत = सावध हो. सयाने = शहाणा, समजूतदार. मत खोवै = दवडू नको.





अन्वयार्थ : (मोक्षमहलकी प्रथम सिढी) सम्यग्दर्शन ही मोक्षरूपी महालाची प्रथम पायरी आहे. (या बिन ज्ञानचरित्रा सम्यकता न लहै) या सम्यग्दर्शनाशिवाय ज्ञानचारित्राला सम्यकपणा प्राप्त होत नाही (सो भव्य ! पवित्रा सम्यग्दर्शन धारो) म्हणून हे भव्य जीवांनो ! पवित्र सम्यग्दर्शन धारण करा. (दौल ! समझ सुन चेत सयाने) [कवि स्वतःलाच संबोधून म्हणतो] हे दौलतराम ! तू समजून घे ! ऐक ! बा ज्ञानी जीवा सावध हो !(काल वृथा मत खोवै) व्यर्थ काळ दवडू नकोस.(जो सम्यक् नही होवै) जर सम्यग्दर्शन प्राप्त झाले नाही तर (फिर यह नरभव मिलन कठिन है) पुनश्च हा मानवजन्म मिळणे अतिशय दुरापास्त आहे ! कठिण आहे !

भावार्थ : मोक्षरूपी महालात प्रवेश करण्यासाठी रत्नत्रयाच्या पायऱ्या आहेत. सम्यग्दर्शन ही पहिली पायरी आहे. सम्यग्दर्शनापासूनच धर्माची सुरुवात होते. सम्यग्दर्शनाशिवाय असलेले ज्ञानचारित्र हे मिथ्याज्ञान व मिथ्याचारित्र असते; बाह्यतः कितीही संयम किंवा तप असो तरीही ते सम्यकचारित्र संज्ञेला प्राप्त होत नाही; ज्ञानही सम्यग्ज्ञान होत नाही. प्रत्येकाने स्वात्मसंबोधन करावे. म्हणून कवी स्वतःलाच संबोधून प्रेरणा करतात की दौलतराम ! ऐक ! ऊठ, जागा हो ! तत्त्व समजून घे ! सम्यग्दर्शनाची प्राप्ती करून घे ! हा दुर्लभ मानवजन्म प्राप्त करूनही जर सम्यग्दर्शनाची साधना केली नाहीस तर तो वाया जाईल. नंतर पुनरपि मानवजन्म प्राप्त होणे अत्यन्त कठीण आहे. ।।१७।।

## तिसरी ढाल : सारांश

जीवाचे अंतिम प्रयोजन आणि खरे हित यथार्थ सुख प्राप्त करणे हेच आहे. संसारामध्ये यथार्थ सुख नाही. कारण सांसारिक सुख हे परिणामी दुःखरूप, कष्टपूर्ण व आकुलतामय आहे. कष्ट, दगदग व आकुलतेने रहित असे सुख म्हणजे मोक्षच आहे. म्हणून मोक्षप्राप्तीचा पुरुषार्थ करावा.

मोक्षप्राप्तीचे साधन सम्यग्दर्शनज्ञानचारित्राची एकता हे आहे. वस्तुतः मोक्षमार्ग एकच आहे. परंतु त्यांचे निरूपण दोन प्रकाराने केले आहे. निश्चय रत्नत्रय हा सत्यार्थ मोक्षमार्ग आहे तर व्यवहार मोक्षमार्ग हा त्याच्याशी अविरोधीपणाने असणारा शुभभाव आहे. परंतु तो निश्चयाचा हेतू-निमित्त असल्यामुळे त्यास व्यवहाराने उपचाराने मोक्षमार्ग म्हणतात.

आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाची प्रतीती हे निश्चय सम्यग्दर्शन आहे, शुद्ध आत्म्याचे निर्दोष जाणणे, अनुभवणे हे निश्चय सम्यग्ज्ञान आहे; आणि रागादिकांचा अभाव करून शुद्ध आत्मस्वरूपात स्थिरता हे निश्चय सम्यकचारित्र आहे. भेदरूप सप्त तत्त्वांचे श्रद्धान, खऱ्या देवगुरूशास्त्राचे श्रद्धान हे व्यवहार सम्यग्दर्शन आहे. सप्ततत्त्वादिकांचे निर्दोष ज्ञान हे व्यवहार सम्यग्ज्ञान आहे आणि पाच महाव्रते समिती आदि पालन करणे हे व्यवहारानरे सम्यकचारित्र आहे. व्यवहार रत्नत्रय हा विकल्पात्मक, शुभरागरूप असल्यामुळे पुण्यबंधाचे कारण आहे. परंतु तो शुभराग निश्चयरत्नत्रयासह भूमिकेनुसार अवशपणे असतो. म्हणून त्यास उपचाराने मोक्षमार्ग म्हटलेआहे.

सम्यक्त्वाचे पंचवीस दोष आहेत. ८ अंगविरोधी दोष, ६ अनायतन, ८ मद व ३ मूढता. ते टाळून सम्यग्दर्शन निर्मळ बनवावे व आठ अंग तसेच प्रशम, संवेग आस्तिक्य, अनुकंपा हे सम्यक्त्वाचे गुण आहेत ते पाळावे.

सम्यग्दर्शन हा आत्म्याचा शुद्धभाव आहेत. ८ अंगविरोधी दोष, ६ अनायतन, ८ मद व ३ मूढता. ते टाळून सम्यग्दर्शन निर्मळ बनवावे व आठ अंग तसेच प्रशम, संवेग आस्तिक्य, अनुकंपा हे सम्यक्त्वाचे गुण आहेत ते पाळावे.

सम्यग्दर्शन हा आत्म्याचा शुद्धभाव आहे तो ज्यास प्रगट झाला तो १ स्थावर, २, विकलत्रय, ३ भवनत्रिक, तसेच स्त्रीपर्याय, नपुंसकत्व;नारक व तिर्यंच याय पर्यायांना प्राप्त होत नाही. कारण सम्यक्त्व असताना तसा आयुचा बंधच होत नाही. जर त्याने सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीपूर्वी तिर्यंच, मनुष्य, देव व नरक यांचा बंध केला असेल तर तो भोगभूमीमध्ये तिर्यंच अथवा मनुष्य होतो; वैमानिक देवच होतो अथवा पहिला नरक सोडून सहा नरकांत जात नाही. एरवी सम्यग्दृष्टी तिर्यंच व मनुष्य मरून वैमानिक देवच होतो आणि सम्यग्दृष्टी देव व नारकी हे कर्मभूमीत उत्तम क्षेत्रात मनुष्यच होतात.



असा हा निश्चय सम्यग्दर्शनाचा महिमा आहे. चारित्रमोहाच्या उदयाने-दुबळेपणा असतो. त्यामुळे तो सम्यग्दृष्टी संयम व व्रते पाळू शकत नाही, तरीही तो इंद्रादिक देवांना पूजनीय होतो. सम्यग्दर्शन हेच सर्व धर्माचे मूळ आहे आणि मिथ्यादर्शन संसाराचे मूळ आहे. सम्यग्दर्शनाशिवाय असणारे ज्ञान व चारित्र हे मिथ्याज्ञान व मिथ्याचारित्रच म्हटले जाते. असा सम्यग्दर्शनाचा अपार महिमा आहे. म्हणून जिनवाणीचा अभ्यास, तत्त्वचर्चा, सत्संगती व तत्त्वविचार आदि प्रयत्न करून सम्यग्दर्शनाची प्राप्ती करून घ्यावी. हेच मानवजन्माचे साफल्य आहे. जर मनुष्यभव प्राप्त करून सम्यग्दर्शनाची प्राप्ती झाली नाही तर पुनः मनुष्यभव, सुकुल, खऱ्या देवादिकांचा लाभ हा सुयोग प्राप्त होणार नाही व अनंत संसारात भटकावे लागेल. म्हणून सम्यग्दर्शनाची प्राप्ती हरप्रकारे करून घ्यावी.

## तिसरी ढाल : लक्षणसंग्रह

(१) अनायतन : आयतन = आश्रय. कुदेव, कुगुरू, कुधर्म व या तिहींचे उपासक हे सहा धर्माचे आश्रयस्थान नाहीत. म्हणून ते अनायतन होत. अधर्माची स्थाने आहेत.

(२) अनायतन दोष : कुदेव, कुगुरू, कुधर्म आणि त्यांचे उपासक यांची प्रशंसा करणे.

(३) अनुकंपा : प्राणिमात्रांवर दयाभाव, मैत्रीभाव.

(४) अरिहन्त : चार घातिकर्म व तज्जन्य अठरा दोष या विकारांचा नाश करून ज्यांनी अनंतचतुष्टयाची प्राप्ती करून घेतली आहे असे वीतराग सर्वज्ञ परमात्मा अरिहंत होत.

(५) अलोक : जेथे आकाशशिवाय अन्य द्रव्ये नाहीत फक्त आकाशच आहे, त्यास अलोक म्हणतात.

(६) अविरति : पाच इन्द्रिये व मन यांचे विषय तसेच पाच स्थावर व त्रस यांची हिंसा यापासून निवृत्त न होणे. त्यांचा बुद्धिपूर्वक त्याग न करणे ही अविरती होय. ५ इंद्रिये मन तसेच षट्काय जीव यामुळे अविरती १२ प्रकारची आहे.

(७) अविरत सम्यग्दृष्टी : व्रतरहित विरती नसणारा सम्यग्दर्शनयुक्त चतुर्थ गुणस्थानातील जीव.

(८) आस्तिक्य : जीवादि सात तत्त्वे, सहाद्रव्ये, आत्मा यांच्या अस्तित्वाबाबत दृढ विश्वास असणे त्यास आस्तिक्य म्हणतात.

(९) कषाय : जे शुद्ध आत्मस्वभावाचा घात करतात, दुःख देतात असे मिथ्यात्व क्रोध मान माया लोभादिक विकार हे कषाय होत.

(१०) गुणस्थान : मोह आणि योग यांच्या निमित्ताने आत्म्याच्या दर्शनचारित्र या गुणांच्या होणाऱ्या तरतमरूप (हीनाधिकरूप) अवस्थेला गुणस्थान म्हणतात.

(११) घातिकर्म : अनंतज्ञानादि अनुजीवी गुणांच्या परिणामांना रोकण्यास निमित्त असणाऱ्या कर्मास घातिकर्म म्हणतात. ती चार आहेत. ज्ञानावरण-दर्शनावरण-मोहनीय-अंतराय.

(१२) चारित्र मोहनीय कर्म : रागादि विकारांना निमित्तभूत तसेच आत्म्याच्या सम्यक्चारित्र परिणामास रोकण्यास निमित्तभूत कर्म चारित्रमोहनीय कर्म होय.

(१३) जिनेन्द्र : अरिहंताचे लक्षण पहा.

(१४) देवमूढता : भय, आशा, स्नेहादिकामुळे रागीद्वेषी देवांची (अदेव व कुदेवांची) उपासना, पूजा, वंदनादिक करणे ही देवमूढता होय.

(१५) देशव्रती : श्रावकांच्या अकरा प्रतिमा व बारा व्रते धारण करणारा पंचम गुणस्थानवर्ती श्रावक देशव्रती जाणावा.



(१६) निमित्तकारण : जे कारण स्वयं कार्यरूप तर होत नाही परंतु सहाय्यकमात्र असते, कार्यासह अविनाभावीरूपाने असते व त्यामुळे कार्याचा बोध करून देते ते निमित्तकारण होय.

(१७) नोकर्म : कर्मफल भोगण्यामध्ये निमित्त तसेच कर्मग्रहणास बाह्यतः जे किंचित् कारण आहे अशा औदारिकादि शरीर बनण्यास योग्य पुद्गलवर्गणेला नोकर्म म्हणतात.

(१८) पाखंडी मूढता (गुरूमूढता) : रागद्वेषी व परिग्रहांनी सहित धारण करणाऱ्या साधूंची उपासनादि करणे ही गुरुमूढता होय.

(१९) पुद्गल : ज्यामध्ये स्पर्श-रस-गंधवर्ण आहेत, जे पूरण (दुसऱ्यात मिसळणे) व गलन (त्यापासून गळणे) स्वभावी आहेत त्यास पुद्गल म्हणतात.

(२०) प्रमाद : स्वरूपामध्ये असावधानतापूर्वक प्रवृत्ती किंवा धार्मिक कार्यात अनुत्साह असणे यास प्रमाद म्हणतात.

(२१) प्रशम : अनंतानुबंधी कषायाच्या अभावात शेष कषायांची आंशिक मंदता होणे यास प्रशम म्हणतात.

(२२) भावकर्म : मोहजनित मिथ्यात्व, राग, द्वेष, क्रोधादिक कषाय व विकाररूप जीवाचे मलिन परिणाम हे भावकर्म होय.

(२३) लोकमूढता : धर्मबुद्धीने पर्वतावरून उडी घेणे, नदी व सागरामध्ये स्नान करणे, संक्रांतीला दान देणे, अयोग्य क्रियाकाण्डात प्रवृत्त होणे ही लोकमूढता जाणावी.

(२४) विशेषगुण : जे सर्व द्रव्यात नसून विशिष्ट द्रव्यात असतात ते त्या द्रव्याचे विशेष गुण होत. जसे जीवाचे चैतन्य चारित्र वगैरे.

(२५) शुद्धोपयोग : शुभाशुभ रागादिकापासून परिणती हटवून उपयोग परिणती आत्मस्वरूपामध्ये स्थिर होणे म्हणजे शुद्धोपयोग होय.

(२६) सामान्यगुण : जे गुण सर्व द्रव्यात असतात ते सामान्य गुण होत. जसे अस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, प्रमेयत्व वगैरे.

(२७) सामान्य : प्रत्येक वस्तूतील त्रिकाळी द्रव्यगुणरूप व्यापकभावास सामान्य म्हणतात. व्यापक द्रव्यसामान्य.

(२८) सिद्ध : आठ कर्माचा नाश झाल्यामुळे ज्यांचे स्वाभाविक आठ गुण प्रगट झाले आहेत असे अशरीरी परमात्मा.

(२९) संवेग : संसारापासून भीती आणि धर्म व धर्मफलामध्ये उत्साह. तसेच पंचपरमेष्ठी व साधर्मीमध्ये प्रीतिभाव यासही संवेग म्हणतात.

(३०) निर्वेद : संसारातील भोग व शरीरसंबंधी विषयापासून तत्त्वज्ञानपूर्वक उदासीनता म्हणजे निर्वेद होय.

## तिसरी ढाल : भेदसंग्रह

अजीवद्रव्ये : पाच (१) पुद्गल द्रव्य, (२) धर्मद्रव्य, (३) अधर्मद्रव्य, (४) आकाशद्रव्य व (५) कालद्रव्य.

अंतरंग परिग्रह : चौदा. (१) मिथ्यात्व, ४ कषाय ९ नोकषाय (१) मिथ्यात्व, (२) क्रोध, (३) मान, (४) माया, (५) लोभ, (६) हास्य, (७) रती, (८) अरती, (९) शोक, (१०) भय, (११) जुगुप्सा, (१२) पुंवेद, (१३) स्त्रीवेद, (१४) नपुंसकवेद.

आस्रवभाव : सत्तावन. ५. मिथ्यात्व, १२ अविरती, २५ कषाय १५ योग.

कारण : दोन. (१) उपादान कारण व (२) निमित्त कारण.

द्रव्यकर्म : आठ. ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय, मोहनीय, आयु, नाम, गोत्र व अंतराय.

प्रमाद : पंधरा. ४ विकथा, ४ कषाय, ५ इंद्रिय, १ निद्रा, १ प्रणय.

बहिरंग परिग्रह : दहा. शेत, घर, सोने, चांदी, धन, धान्य, दासी, दास, वस्त्रे आणि भांडीकुंडी.



गर्व : आठ. कुल, जाती, रूप, ज्ञान, धन, बल, तप व प्रभुत्व या आठसंबंधी अभिमान.

मिथ्यात्व : पांच. १ विपरीत, २ एकान्त, ३ विनय, ४ संशय, ५ अज्ञान.

रस : पाच. गोड, खारट, कडू, तिखट व आंबट.

रूप (वर्ण) : पाच. १ काळा, २ पिवळा, ३ निळा, ४ लाल, ५ पांढरा.

गंध : दोन. सुगंध व दुर्गंध.

स्पर्श : आठ. १ हलका, २ भारी, २ स्निग्ध, ४ रूक्ष, ५ मृदु, ६ कठोर, ७ शीत व ८ उष्ण.

## तिसरी ढाल : परस्परामधील अंतरप्रदर्शन

(१) आस्रव आणि बंध : जीव रागादिरूप झाला असता कार्माण वर्गणेमध्ये कर्मरूप परिणमन हा द्रव्यास्रव आणि त्यांचे जीवप्रदेशामध्ये अन्योन्यप्रवेश हा द्रव्यबंध होय.

तसेच रागद्वेषमोहरूप भाव हा भावास्रव तर त्यांच्याशी उपयोगाशी तन्मयता स्निग्धता हा भावबंध होय.

हे चारही एका समयात असतात.

(२) अनायतन आणि मूढता : अनायतनामध्ये कुदेवादिकांची प्रशंसा मात्र असते तर मूढतेमध्ये त्यांची उपासना पूजा वंदना असतात.

(३) कुल व जाति : पित्याच्या वंशास कुल व मातेच्या वंशास जाति म्हणण्यात येते.

(४) धर्मद्रव्य व धर्म : धर्मद्रव्य हे सहा द्रव्यांपैकी अमूर्त द्रव्य आहे तर धर्म हा वस्तूचा स्वभाव किंवा गुण आहे. आत्म्याच्या विकासाला साधनभूत परिणामांना धर्म म्हणतात.

(५) निश्चयनय व व्यवहारनय : निश्चयनय हा वस्तूच्या यथार्थ द्रव्यगुणपर्यायस्वरूपाचे कथन करतो. तर व्यवहारनय एकाच्या गुणधर्माचा

अन्यावर आरोप-उपचार करून कथन करतो. जसे मातीची घागर म्हणजे हा निश्चयनय तर तुपाचा संयोग पाहून तुपाची घागर म्हणणे हा व्यवहारनय.

(६) सकलपरमात्मा व निकल परमात्मा : सकलपरमात्मा अरिहन्त. चार घातिकर्मांनी रहित व अनंत चतुष्टय यांनी युक्त परमात्मा.

निकलपरमात्मा = सिद्ध. आठ कर्म व शरीराने रहित आणि आठ गुणांनी सहित मुक्त जीव.

(७) सामान्यगुण व विशेषगुण : सामान्य गुण सर्व द्रव्यात असतात. जसे अस्तित्व वगैरे. अमूर्तत्व हा पुद्‌गल सोडून शेष ५ द्रव्यांचा सामान्य गुण आहे. विशेष गुण विशिष्ट द्रव्यात असतात. जसे ज्ञान जीवाचा विशेष गुण आहे. मूर्तपणा पुद्‌गलाचा विशेष गुण आहे इत्यादी.

# चौथी-ढाल

(सम्यग्ज्ञान व दशचारित्राचे वर्णन)

## सम्यग्ज्ञानाचे लक्षण

सम्यक श्रद्धा धारि पुनि, सेवहुँ सम्यकज्ञान ।
स्व-पर अर्थ बहु धर्मजुत, जो प्रगटावन भान ।।१।।



शब्दार्थ : प्रगटावन = प्रगट करण्यास, प्रतिभासित करण्यास, भान = सूर्य.

अन्वयार्थ : (सम्यक श्रद्धा धारि) सम्यग्दर्शन धारण करून (पुनि सम्यग्ज्ञान सेवहुँ) पुनश्च सम्यग्ज्ञानाचे सेवन करावे की (जो बहु धर्मजुत स्व-पर अर्थ प्रगटावन भान) जे नाना धर्मांनी युक्त स्वपर पदार्थांना प्रगट करण्यास, प्रतिभासित करण्यास सूर्याप्रमाणे आहे.

भावार्थ : सम्यग्दर्शनपूर्वक सम्यग्ज्ञानाची आराधना करावी. ज्याप्रमाणे सूर्य सर्व पदार्थांना तसेच स्वतःस आपणास प्रकाशित करतो. त्याप्रमाणे जे नाना धर्मांनी युक्त स्वतःला[१], जाणणाऱ्या ज्ञानास, आत्म्यास आणि परपदार्थाला यथार्थपणे प्रकाशित करते ते सम्यग्ज्ञान होय. ।।१।।

---

१. स्वापूर्वार्थव्यवसायात्मकं ज्ञानं प्रमाणम् । (परीक्षामुख प्र. अ. सूत्र १) अपूर्व स्व आणि पर अर्थाचा जे ज्ञान निर्णय करते ते सम्यग्ज्ञान होय.

### सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानामध्ये अंतर

सम्यक साथै ज्ञान, होय पै भिन्न अराधो ।
लक्षण श्रद्धा जान, दुहू में भेद अबाधो ।।
सम्यक कारन जान, ज्ञान कारज है सोई ।
युगपद होतैं हू, प्रकाश दीपकतैं होई ।।२।।



अन्वयार्थ : (सम्यक साथै ज्ञान होय)सम्यग्दर्शनाबरोबर ज्ञान सम्यग्ज्ञान होते. (पै भिन्न अराधौ) परंतु त्याची आराधना वेगळी करावी. (लक्षण श्रद्धा जान) त्यांचे लक्षण क्रमाने श्रद्धा आणि जाणणे आहे. या लक्षणभेदामुळे (दुहू मे भेद अबाधौ) दोहोमध्ये अंतर निर्बाध सिद्ध आहे.(सम्यक कारण जान) सम्यग्दर्शन हे कारण समजा(ज्ञान कारज है) सम्यग्ज्ञान हे कार्य आहे. (सोई) हाही त्यामध्ये भेद आहे. (युगपद होतैं हू) ते युगपत् एकाच क्षणी होतात तरी (प्रकाश दीपकतै होई) ज्याप्रमाणे प्रकाश दिव्यापासून होतो त्याप्रमाणे सम्यग्ज्ञान सम्यग्दर्शन पूर्वकच होते. प्रकाश आणि दिवा यामध्ये तसेच सम्यग्ज्ञान आणि सम्यग्दर्शन यामध्ये युगपत् कार्यकारणभाव आहे.

भावार्थ : सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान हे दीपक व प्रकाशाप्रमाणे युगपत् होतात. परंतु त्यामध्ये भेदही आहे.

एकतर दोहोंचे लक्षण भिन्न आहे. सम्यग्दर्शनाचे लक्षण श्रद्धा आहे तर ज्ञानाचे लक्षण जाणणे हे आहे. हे दोन्ही एका आत्म्याचेच वेगळे गुण



आहेत. सम्यग्दर्शन श्रद्धा गुणाचा शुद्ध पर्याय तर सम्यग्ज्ञान ज्ञान गुणाचा शुद्ध पर्याय आहे. जरी त्यांचा आधार एक आत्माच आहे तरी त्यात लक्षणभेदाने अंतर आहे.

तसेच सम्यग्दर्शन हे कारण असून सम्यग्ज्ञान हे कार्य आहे, याही अपेक्षेने त्यांच्यात अंतर आहे.

प्रश्न - युगपत असणाऱ्या ज्ञानश्रद्धानामध्ये कार्यकारणपणा कसा ?

उत्तर - ते असेल तर हे असते या अपेक्षेनेही कार्यकारणपणा असतो. जसा दीप असताना प्रकाश असतो; म्हणून यद्यपि एकाच काळी आहेत तरीही दीपक कारण असून प्रकाश हे कार्य आहे. तसेच सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान युगपत होत असतानाही सम्यग्दर्शन असतानाच ज्ञान सम्यग्ज्ञान होते. म्हणून सम्यग्दर्शन हे कारण व सम्यग्ज्ञान हे कार्य आहे. जो पावेतो सम्यग्दर्शन होत नाही तोपावेतो ज्ञान सम्यग्ज्ञान म्हटले जात नाही. ।।२।।

### सम्यग्ज्ञानाचे भेद, परोक्ष व देशप्रत्यक्षाचे लक्षण

तास भेद दो है परोक्ष, परतच्छ तिनमाहीं ।
मति श्रुत दोय परोक्ष, अक्ष मनतैं उपजाहीं ।।
अवधिज्ञान मनपर्जय दो है देशप्रतच्छा ।
द्रव्य-क्षेत्र-परिमान लिये जानैं जिय स्वच्छा ।।३।।

शब्दार्थ : परतच्छ = प्रत्यक्ष. देशप्रतच्छा = देशप्रत्यक्ष. अक्ष = इन्द्रिये. परिमान = मर्यादा. लिये = घेऊन. स्वच्छा = स्पष्ट.

अन्वयार्थ : (तास भेद हो, परोक्ष परतच्छ) त्याचे दोन भेद आहेत. (१) परोक्ष व (२) प्रत्यक्ष. (तिनमाहीं मतिश्रुत दोय परोक्ष) त्या पाच सम्यग्ज्ञानामध्ये मतिज्ञान व श्रुतज्ञान ही दोन ज्ञाने परोक्ष आहेत. कारण (अक्ष मनतैं उपजाहीं) ही इन्द्रिये व मनाच्या निमित्ताने उत्पन्न होतात. (अवधिज्ञान मनपर्जय दो देशप्रतच्छा है) अवधिज्ञान व मनःपर्यायज्ञान ही दोन देशप्रत्यक्ष आहेत. (द्रव्य-क्षेत्र-परिमान लिये) द्रव्य क्षेत्राच्या मर्यादिपूर्वक (जिय स्वच्छा जानै) जीव, रूपी द्रव्यांचा स्पष्ट विशद प्रतिभास करतो.



भावार्थ : जे ज्ञान संशय, विपर्यय व अनध्यवसाय या तीन दोषांनी रहित होऊन स्वपर अर्थाचा निर्णय करते ते सम्यग्ज्ञान होय.अशी ज्ञाने पाच आहेत. मति, श्रुत, अवधि, मनःपर्यय व केवल. त्यापैकी मतिज्ञान व श्रुतज्ञान परोक्ष आहेत. जे ज्ञान इन्द्रिये व मन यांच्या निमित्ताने पदार्थांना अस्पष्ट जाणते ते परोक्ष ज्ञान होय. हे पराधीन असते. अवधिज्ञान व मनःपर्यायज्ञान देशप्रत्यक्ष आहेत. जे द्रव्यक्षेत्रकालभावाच्या मर्यादापूर्वक रूपी पदार्थांना आत्मिक साह्याने (इन्द्रियादिकांचे साह्य न घेता) विशद जाणते ते देशप्रत्यक्ष होय. या दोन ज्ञानांना द्रव्यक्षेत्रादिकांची मर्यादा आहे. ।।३।।

सकल-प्रत्यक्षाचे स्वरूप व ज्ञानाची महिमा

सकल द्रव्य के गुन, अनंत परजाय अनंता ।
जानै एकै काल, प्रगट केवलि भगवन्ता ।।
ज्ञान समान न आन, जगतमें सुखको कारन ।
इह परमामृत जन्म-जरा-मृति-रोग-निवारन ।।४।।

शब्दार्थ : परजाय = पर्याय. प्रगट = विशदपणे, स्पष्टपणे. आन = दुसरे. जन्म - जरामृतिरोग = जन्म, म्हातारपण व मरणरूपी रोग.





अन्वयार्थ : (केवली भगवंता) केवली भगवान् (सकल द्रव्यके अनंत गुन अनंता परजाय) सर्व द्रव्यांचे अनंत गुण व अनंत पर्याय (एकै काल प्रगट जानै) यांना युगपत् स्पष्टपणे जाणतात. (जगतमें ज्ञान समान आन सुखको कारन न) या जगामध्ये ज्ञानासारखे दुसरे कोणतेही सुखाचे कारण नाही. (इह जन्म-जरा-मृति-रोग-निवारन परमामृत) या लोकामध्ये ते जन्म-म्हातारपण-मृत्यु या रोगाला दूर सारणारे परम अमृत आहे.

भावार्थ : केवलज्ञान हे सकल-प्रत्यक्ष आहे. जे ज्ञान तीन लोकांतील सर्व पदार्थांना त्यांच्या अनंत गुणपर्यायांसहित युगपत् केवळ आत्मिक शक्तीने स्पष्टपणे जाणते ते सकल प्रत्यक्ष केवलज्ञान होय. केवली भगवान् तीन लोकातील यच्चायावत् पदार्थांना त्यांचे अनंत गुणधर्म व पर्यायधर्मासह युगपत् जाणतात. यावरून ते जसे आत्म्यास जाणतात तसेच सर्व पदार्थांना जाणतात हे न्यायप्राप्त आहे.

या सम्यग्ज्ञानाव्यतिरिक्त अन्य कोणतेही सुखाचे कारण नाही. ज्ञान हेच सुखदुःखाचे कारण आहे. बाह्य वस्तू सुखदुःखाचे कारण नाही. म्हणून सम्यग्ज्ञान हे सुखाचे व मिथ्याज्ञान हे दुःखाचे कारण आहे. ज्ञान ज्ञेयास जाणत असताना आपल्या भिन्न-स्वतंत्र ज्ञायक स्वभावाची जाणीव ठेवून मात्र जाणते, रागादिरूपाने परिणत होत नाही तेव्हा ते सम्यग्ज्ञान म्हटले जाते. सम्यग्ज्ञानामध्ये रागादिकांचा अभाव आहे व परापासून भिन्न अशा जाणणाऱ्या आत्म्याची जाणीव आहे. म्हणून ते सुखाचे कारण आहे. उलटपक्षी मिथ्या ज्ञान ज्ञेयास जाणताना ज्ञेय ज्ञायक यांना भिन्न न करता जाणते व रागादिरूप परिणमते म्हणून ते दुःखाचे कारण आहे. ।।४।।

ज्ञानी व अज्ञानी यांच्या कर्मनिर्जरेसंबंधी विशेषता

कोटी-जनम तप तपैं, ज्ञान विन कर्म झरैं जे ।
ज्ञानीके छिनमांहि, त्रिगुप्तितैं सहज टरै ते ।।
मुनिव्रत धार अनंतबार ग्रीवक उपजायो ।
पै निज-आतमज्ञान, बिना सुख लेश न पायो ।।५।।



शब्दार्थ : झरै = निघून जातात. छिनमें = क्षणात. टरै = टळतात, नाश पावतात. अनंतबार = अनंत वेळा.

अन्वयार्थ : (ज्ञान विन कोटि-जनम तप तपै)सम्यग्ज्ञानाशिवाय कोटि जन्म तप केले असताना (जे कर्म झरै) जेवढ्या कर्माची निर्जरा होते (ते ज्ञानी के त्रिगुप्तितै छिनमांहिं सहज टरै)तेवढे कर्म ज्ञानीला तीन गुप्तीच्या निमित्ताने-मन, वचन, कायेचा सम्यक् निरोध केल्याने, क्षणमात्रात सहजासहजी निघून जातात. (मुनिव्रत धार अनंतबार ग्रीवक उपजायो) अनंतवेळा मुनिव्रताचा स्वीकार करूनही नवग्रैवेयकामध्ये हा जीव उत्पन्न झाला. (पै निज आतम ज्ञान बिना)परंतु आपल्या आत्मतत्त्वाच्या ज्ञानाशिवाय (लेश सुख न पायो)त्यास लेशमात्र सुख मिळाले नाही.

भावार्थ : ज्ञानी म्हणजे सम्यग्ज्ञानी. स्वपरभेद-विज्ञानपूर्वक जो जाणतो तोच ज्ञानी, सम्यग्ज्ञानी होय. स्वपर भेदज्ञान न करता जो जाणतो तो ज्ञेयज्ञायक संकर करतो; ज्ञायक व ज्ञेयांमध्ये भेद करीत नाही. अतएव तो अज्ञानी आहे. कारण यद्यपि तो ज्ञेयास जाणतो तथापि ज्ञेयास जाणणाऱ्या



ज्ञायक अशा स्वतःच्या आत्म्यास जाणत नाही; म्हणून तो अज्ञानीच आहे. त्याचे ज्ञान अज्ञानासारखेच आहे. अज्ञानी तत्त्वनिर्णय न करता कोट्यवधी जन्म तपश्चरण करतो; परंतु ज्ञानाविना तो जेवढ्या कर्माची निर्जरा करतो तेवढे कर्म ज्ञानी मनवचनकायप्रवृत्तीचा सम्यक निरोध करून लीलेने क्षणमात्रात नष्ट करतो, कारण त्या अज्ञानीला अज्ञानामुळे कर्म येणे तर अविरत सुरूच आहे; त्यास संवर व संवरपूर्वक निर्जरा होतच नाही, तपश्चरणाने अकामनिर्जरा होते तीही अत्यल्प. मोक्षमार्गात तिचे प्रयोजन नाही. त्यामुळे तो द्रव्यलिंगी मुनी होऊन तप करतो, नवग्रैवेयकांपर्यंत उत्पन्नही होतो. परंतु आत्मज्ञानाच्या अभावी, त्यास थोडेही सुख मिळत नाही. उलट तो अनंत संसारी होऊन दुःखच भोगतो. म्हणून सम्यग्दर्शन व ज्ञानपूर्वक असणारे चारित्र व तपश्चरण मोक्षमार्गात कार्यकारी आहे. ही ज्ञानाची विशेषता आहे.

अज्ञानी तत्त्वज्ञानाविना जे काही व्रततप करतो ते सर्व बालतप बालव्रत म्हटले जाते. अशा बालव्रत-तपामध्ये उद्यम करून द्रव्यलिंगी मुनी मंदकषाय व शुभ लेश्या यामुळे नव ग्रैवेयकापर्यंत देवगतीत उत्पन्न होतो. पण त्याला संवरपूर्वक कर्मक्षय मुळीच होत नाही. भेदविज्ञानाविना तो संसारात आकुलित होऊन परिभ्रमण मात्र करतो. ।।५।।

ज्ञानाचे दोष व जिनवाणीच्या अभ्यासाची प्रेरणा

तातैं जिनवरकथित, तत्त्व-अभ्यास करीजै ।
संशय विभ्रम मोह, त्यागि आपो लखि लीजै ।।
यह मानुष-परजाय, सुकुल, सुनिवौ जिनवानी ।
इह विधि गये न मिलै, सुमणि ज्यों उदधि समानी ।।६।।

शब्दार्थ : तातैं = म्हणून. विभ्रम = विपर्यय. मोह = अनध्यवसाय, सुनिवौ = श्रवण. सुमणि = उत्तम रत्न. समानी = सामावलेले, डुंबलेले.

अन्वयार्थ : (तातैं जिनवर-कथित तत्त्व-अभ्यास करीजे)म्हणून जिनेन्द्रांनी सांगितलेल्या तत्त्वांचा अभ्यास करावा, (संशय विभ्रम मोह





त्यागि) संशय[1], विपर्यय आणि अनध्यवसाय या तीन दोषांचा त्याग करून (आपो लखि लीजे) आपल्या आत्म्याकडे लक्ष एकाग्र करावे.(यह मानुष परजाय, सुकुल; जिनवानी सुनीवौ) हा मानवजन्म, उत्तम कुल व जिनवाणीचे श्रवण (इह विधि गये न मिलै) असा हा योग जर एकदा वाया गेला तर परत मिळत नाही. (ज्यों उदधि समानी सुमणि) जसे समुद्रामध्ये सामावलेले उत्तम रत्न पुनः मिळणे कठीण आहे.

---



भावार्थ : या प्रकारे सम्यक्त्वपूर्वक ज्ञान हे ज्ञानहीन चारित्रापेक्षाही श्रेष्ठ असल्यामुळे प्रथमतः ज्ञानाची साधना करावी. त्याकरिता जिनेन्द्रांनी सांगितलेल्या तत्त्वांचा वारंवार अभ्यास करून तेच संस्कार करावेत.ज्ञानाची उपासना करताना संशय, विपर्यय व अनध्यवसाय हे तीन दोष टाळावेत. आत्मज्ञानाची प्राप्ती करून घ्यावी. तत्त्व हे आहे की ते आहे अशा दोन विरुद्ध बाजूंना स्पर्श करणारे ज्ञान संशयज्ञान आहे. जसे हा पुरुष आहे की बुंधा आहे. विरुद्ध बाजूला स्पर्श करणाऱ्या विपरीत ज्ञानास विपर्यय म्हणतात. जसे बुंध्यास माणूस जाणणे; मी शरीर आहे असे ज्ञान. आणि काही तरी आहे अशा प्रकारे अनिर्णयात्मक ज्ञान अनध्यवसाय आहे. जसे मी काहीतरी आहे असे जाणणे. हे ज्ञानाचे तीन दोष टाळून तत्त्वांचा यथार्थ निर्णय करावा. हा मानवजन्म, उत्तम कुल व जिनवाणीचे श्रवण असा हा मणिकांचन संयोग प्राप्त होणेच दुर्लभ ! तो संयोग प्राप्त होऊन ही जर तो व्यर्थ दवडला तर पुनः मिळणे कठीण आहे. जसे सागरतळाशी बुडून सामावलेले रत्न पुनरपि प्राप्त होणे अति कठीण आहे. ।।६।।

सम्यग्ज्ञानाची महिमा व त्याचा उपाय

धन समाज गज बाज, राज तो काज न आवै ।
ज्ञान आपको रूप भये, फिर अचल रहावैं ।।
तास ज्ञान को कारन स्व-पर-विवेक बखान्यो ।
कोटि उपाय बनाय भव्य ताको उर आन्यो ।।७।।



शब्दार्थ : गज = हत्ती. बाज = घोडा. राज = राज्य. काज न आवै = कामी येत नाही. समाज = कुटुंब व मित्र परिवार. अचल = स्थिर.

अन्वयार्थ : (धन, समाज, गज, बाज, राज तो काज न आवै) धन, कुटुंब, मित्रपरिवार, हत्ती, घोडे, राज्य, कोणताही बाह्य परिग्रहाचा संयोग हा या कल्याणमार्गामध्ये काहीच कामी येत नाही.(आपको रूप ज्ञान भये) आत्म्याचे स्वरूप ज्ञान एकदा प्राप्त झाले तर ते (फिर अचल रहावै) पुनश्च स्थिर राहते. (तास ज्ञानको कारण स्व-पर-विवेक बखान्यो) त्या सम्यग्ज्ञानाचे कारण स्वपरभेदविज्ञान हे आहे.(कोटि उपाय बनाय) कोटी उपाय करून (भव्य ताको उर आन्यो) हे भव्य जीवांनो ! या भेदविज्ञानाचा अंगीकार करा.

भावार्थ : या संसारात प्राणीमात्र देहाची रक्षा व परिग्रहाचा संचय याकरिता आपले सर्व आयुष्य वेचतो. परंतु यातील एकही गोष्ट या श्रेयोमार्गामध्ये जीवाच्या उपयोगी येत नाही; कारण एकतर ते परद्रव्य आहेत, तसेच ते क्षणिक आहेत. आत्म्याचे स्वरूप एक ज्ञान मात्र असून तेच शाश्वत आहे. एकदा जर ज्ञान प्राप्त झाले, प्रतीती झाली तर त्याचा नाश होत नाही. कारण तो आत्म्याचा स्वभाव आहे. त्या सम्यग्ज्ञानाचे कारण स्वपरभेदविज्ञान हे आहे. स्वपरभेदज्ञानपूर्वक ज्ञान हेच सम्यग्ज्ञान आहे. म्हणून सर्वच उपाय योजून भेदविज्ञानाची प्राप्ती करून घेणे श्रेयस्कर आहे. ।।७।।

सम्यग्ज्ञानाची महिमा व तृष्णाग्नी शमविण्याचा उपाय

जे पूरब शिव गये, जाय, अब आगे जै हैं ।<br>
सो सब महिमा ज्ञानतनी, मुनीनाथ कहै हैं ।।<br>
विषय-चाह-दव-दाह जगत-जन अरनि दझावै ।<br>
तास उपाय न आन, ज्ञान-धन-धान बुझावै ।।८।।

शब्दार्थ : पूरब = पूर्व काळात. जाय = जात आहेत. दवदाह = दावाग्नि, वनातील भयानक आग. अरणि = अरण्य, वन. दझावै = जाळतो. धन = मेघ. घान = वर्षा.







अन्वयार्थ : (जे पूरब शिव गये) भूतकाळात जे कोणी मोक्षास गेले आहेत, (अब जाय) आता वर्तमानकाळी जात आहेत व (आगे जै हैं) भावी काळात जे मोक्षास जातील (सो सब ज्ञानतनी महिमा) ते सर्व भेदविज्ञानानेच, हा भेदविज्ञानाचा महिमा आहे, असे (मुनीनाथ कहै हैं) मुनीश्वर सांगतात. (जगतजन अरनि) या विश्वातील जीवमात्र अरण्याप्रमाणे असून (विषयचाहदवदाह) त्यांना विषयतृष्णेचा हा दावाग्नि (दझावै) जाळतो आहे. (तास आन उपाय न) तो विझविण्यासाठी अन्य उपाय नाही. (ज्ञानधन-घान बुझावै) सम्यग् ज्ञानरूपी मेघांची घनघोर वर्षाच त्या अग्नीला विझवेल.

भावार्थ : मोक्ष हे जीवमात्राचे अंतिम साध्य आहे. जे जीव सिद्ध झालेले आहेत, होत आहेत व होतील ते सर्व या भेदविज्ञानेच ! असे

मुनीश्वर सांगून गेलेत. श्रीमद् अमृतचंद्रसूरि समयसारच्या आत्मख्याती टीकेत सांगतात -

भेदविज्ञानतः सिद्धा सिद्धा ये किल केचन ।

तस्यैवाभावतो बद्धा बद्धा ये किल केचन ।।

खरोखर जे कोणी सिद्ध झाले आहेत ते सर्व या भेदविज्ञानानेच व जे काही कोणी बद्ध आहेत (संसारात अडकले आहेत) ते सर्व या भेदविज्ञानाच्या अभावानेच. सर्व प्राणिमात्र विषयतृष्णेच्या अग्नीने होरपळलेले आहेत. प्रत्येक जीवामध्ये भडकलेला हा विषयवासनेचा दावाग्नि विझविण्यास अन्य कोणतेही साधन नाही. अरण्यात पेटलेला अग्नी मुसळधार वृष्टीच विझवू शकतो. अन्य कोणतेही साधन नाही. तसेच हा विषयतृष्णेचा दावाग्नी भेदविज्ञानाच्या मुसळधार वर्षावानेच विझतो. मोहनदी पार करण्याचा एकमात्र उपाय स्वपरभेदविज्ञानच आहे व अरिहंताच्या स्वरूपाचे परिज्ञान व आगमाचा अभ्यास हे भेदविज्ञानास कारण आहेत असे प्रवचनसारमध्ये आचार्य श्री कुंदकुंददेवांनी सांगितले आहे. ।।८।।

पुण्यपापामध्ये हर्षविषादाचा निषेध व कथनाचा सार

पुण्य-पाप-फलमाँहि, हरख बिलखौ मत भाई ।

यह पुद्गल परजाय, उपजि बिनसै फिर थाई ।।

लाख बातकी बात यहि, निश्चय उर लावो ।

तोरी सकल जग-दंद-फंद निज आतम ध्यावो ।।९।।

शब्दार्थ : फलमाहिं = फलामध्ये. हरख = हर्ष, आनंद. विलखो = खेद, विषाद. दन्दफन्द = झगडे. तोरी = तोडून, सोडून.

अन्वयार्थ : (भाई ! पुण्य-पाप-फलमाहिं) हे हितेच्छू जीवा ! पुण्य आणि पापाच्या फलामध्ये(मत हरख विलखौ) हर्ष विषाद करू नको. (यह पुद्गल परजाय उपजि, विनसै, फिर थाई) कारण की पुण्य पाप हा








पुद्गलाचा पर्याय असून उत्पन्न होतो, नष्ट होतो व पुनः होतो. [स्थिर नाही] (निश्चय यही लाख बात की बात उर लावो) वास्तविक ही लाख गोष्टीतील गोष्ट अंतरंगात ठसवून घे. (सकल जग दंद-फंद तोरि) जगामधील सर्व भानगडी तोडून दंद-फंद बाजूला सारून (निज आतम ध्यावो) सदैव आपल्या शुद्ध आत्मतत्त्वाचे ध्यान कर !

भावार्थ : इष्ट असे घरदार, पुत्र, धनादिक ही सुखाची सामग्री पुण्याने प्राप्त होते म्हणून पुण्याचे फल आहे. अनिष्ट असे पुत्रादिक रोग आदि सामग्री पापोदयाने प्राप्त होते म्हणून ते पापाचे फल आहे. मूढ प्राणी इष्ट सामग्री प्राप्त झाली असता रागबुद्धि करून हर्षित होतो आणि

अनिष्ट सामग्रीचा संयोग घडला असता द्वेषबुद्धीने खेदखिन्न होतो. परंतु संयोग-वियोग तर सृष्टिक्रमानुसार उपादान-निमित्ताच्या नियमानुसार सहज घडणारा योग आहे. ती सामग्री स्वयं स्वभावाने न इष्ट आहे न अनिष्ट आहे. त्यामुळे ती न हेय आहे न उपादेय आहे. केवळ ज्ञेयमात्र आहे. तो सामग्रीसंयोग पुद्‌गलाच्या स्वभावक्रमाने होणारा परिणाम आहे. ते आपआपल्या स्वभावाने उत्पन्न होतात, नष्ट होतात व पुनः उत्पन्न होतात.

कर्मफलामध्ये इष्टानिष्ट बुद्धि करून हर्षविवाद करणे हे अज्ञान आहे. त्यामुळे कर्मफलामध्ये ममत्व उत्पन्न होते. अज्ञानी पुद्‌गलास आत्मरूपाने स्वीकार करतो व ते पुद्‌गल त्याला घट्ट पकडते. म्हणून तत्त्वज्ञवृत्तीने पुद्‌गलपर्यायाचे क्षणिक रूप समजून घेऊन तेथे रागद्वेष न करणे, या जगजालातून सुटका करून घेणे व एकमात्र शुद्ध आत्म्याची उपासना करणे हीच लाखात एक अशी सारभूत गोष्ट आहे. हाच सुखी होण्याचा मोक्षप्राप्तीचा यथार्थ उपाय आहे. ।।९।।

चारित्र धारण करण्याची प्रेरणा, चारित्राचे भेद

सम्यकज्ञानी होइ, बहुरि दृढ चारित लीजै ।
एकदेश अरु सकलदेश तस भेद कहीजै ।।
त्रस हिंसाको त्याग, वृथा थावर न संघारै ।
परवधकार कठोर, निंद्य नहिं वयन उचारै ।।१०।।

शब्दार्थ : बहुरि = पुनः. न संघारै = संहार न करावा. वयन = वचन.

अन्वयार्थ : (सम्यकज्ञानी होइ) सम्यज्ञानी होऊन (बहुरि दृढ चारित लीजै) पुनः दृढ चारित्र अंगीकारावे.(तस एकदेश अरु सकलदेश भेद कहीजै) त्याचे एकदेश [अणुव्रत] व सकलदेश [महाव्रत] असे दोन भेद सांगितले आहेत. [पैकी गृहस्थाच्या एकदेश चारित्राचे वर्णन करतात.] (त्रस हिंसाको त्याग) त्रस हिंसेचा त्याग करून (वृथा थावर न संधारै) व्यर्थ स्थावर जीवांचा संहार करू नये. [ हे पहिले अहिंसाणुव्रत होय](परवधकार, कठोर, निंद्य वयन नहि उचारै) अन्य जीवाच्या वधास





कारणभूत, कर्कश, निंदानालस्तीने भरलेले वचन उच्चारू नये. [ हे सत्याणुव्रत होय.]

भावार्थ : सम्यग्ज्ञानाच्या उपासनेपूर्वक सम्यक्‌चारित्राची साधना करावी. सम्यक्‌चारित्र दोन प्रकारचे आहे. (१) एकदेश चारित्र व (२) सकलचारित्र. त्यापैकी सकलचारित्राचे वर्णन ६ व्या ढालीमध्ये करणार असून आता एकदेश चारित्राचे वर्णन करतात. एकदेश चारित्राची अकरा स्थाने आहेत. त्यांपैकी प्रथम स्थान दार्शनिक श्रावक व दुसरे व्रती श्रावक. आता श्रावकाच्या बारा व्रतांचे वर्णन करतात.

श्रावकाच्या बारा व्रतामध्ये पाच अणुव्रते अंतर्भूत आहेत. अणुव्रतामध्ये स्थूल पंचपापांचा त्याग आहे. प्रमादपूर्वक व संकल्पपूर्वक होणाऱ्या पापांचा एकदेश त्याग गृहस्थानी अवश्य करावा. हिंसादि पापे ही घातपातादि बाह्य क्रियेवर अवलंबून नाहीत. अंतरंग विकार, प्रमाद व संकल्प जेथे आह्ेत तेथे हिंसादिक पापे होतात. म्हणून प्रमादपूर्वक व संकल्पपूर्वक त्रसहिंसेचा त्याग

व निष्कारण स्थावरहिंसेचा त्याग हे प्रथम अहिंसाणुव्रत होय व कषायाच्या आवेशात दुसऱ्याच्या वधास कारणभूत, निन्द्य व कठोर भाषा न वापरणे हे सत्याणुव्रत होय. ।।१०।।

### अचौर्याणुव्रत, ब्रह्मचर्याणुव्रत, परिग्रहपरिमाणाणुव्रत व दिग्व्रताचे स्वरूप

जल मृतिका बिन और, नाहिं कछु गहे अदत्ता ।
निज वनिता बिन सकल, नरिसौ रहै विरत्ता ।।
अपनी शक्ति विचार परिग्रह थोरो राखे ।
दशदिशि गमन-प्रमान ठान, तसु सीम न नाखे ।।११।।



शब्दार्थ : मृतिका = माती. अदत्ता = न दिलेले. वनिता = स्त्री. विरत्ता = विरक्त. थोरो = थोडा. ठान = ठरवून. न नाखै = उल्लंघन न करावी.

अन्वयार्थ : (जल मृतिका बिन और कछु) पाणी व माती. यांशिवाय काहीही (अदत्ता नाही गहै)न दिलेले घेऊ नये. (निज वनिता बिन सकल नारिसौ विरत्ता रहै)स्वस्त्री सोडून अन्य स्त्रियांपासून विरक्त राहावे. (अपनी शक्ति विचार) आपल्या शक्तीचा विचार करून (थोरो परिग्रह राखै) थोडा परिग्रह ठेवावा. (दशदिशी गमन प्रमान ठान) दहाही



दिशांमध्ये गमनाचे प्रमाण ठरवून (तसु सीम न नाखै) त्याच्या सीमेचे उल्लंघन करू नये.

भावार्थ : प्रमादकषाय यांच्या आधीन न होता पाणी व मातीशिवाय अन्य कोणतीही वस्तू दिल्याशिवाय न घेणे हे अचौर्याणुव्रत होय.

प्रमादत्यागपूर्वक स्वस्त्री सोडून अन्य स्त्रियांची अभिलाषा व भोग यापासून निवृत्त होणे हे ब्रह्मचर्याणुव्रत होय.

लोभत्यागपूर्वक दहा प्रकारच्या परिग्रहाची शक्त्यनुसार मर्यादा ठरवून तिचे उल्लंघन न करणे हे परिग्रहपरिमाणाणुव्रत होय. याप्रमाणे ही पाच अणुव्रते आहेत. आता गुणव्रतापैकी दिग्व्रत सांगतात.

चार सरळ दिशा, चार तिर्यक् दिशा, अधोदिशा व ऊर्ध्व दिशा अशा दहा दिशांमध्ये गमनादिकाची मर्यादा ठरवून लोभाने त्याचे आजन्म उल्लंघन न करणे हे दिग्व्रत होय. ।।११।।

### देशव्रताचे स्वरूप

### (१२ व्या श्लोकाचा पूर्वार्ध)

ताहूमें फिर ग्राम, गली, गृह, बाग, बजारा ।
गमनागमन प्रमान ठान अन सकल निवारा ।।

शब्दार्थ : गृह = घर. बजारा = बाजार. निवारा = त्याग केला. अन = अन्य.

अन्वयार्थ : (ताहूमें फिर ग्राम, गली, गृह, बाग, बजारा) त्या दिग्व्रताच्या मर्यादितेही पुनः गाव, गल्लीबोळ, घर, बाग, बाजार आदिकांची (गमनागमन प्रमान ठान) जाण्यायेण्याची मर्यादा काही कालापुरती करून (अन सकल निवारा) इतर सर्वांचा त्याग करणे हे देशव्रत होय.

भावार्थ : दिग्व्रतामध्ये दहाही दिशांची जी मर्यादा ठरविली आहे त्यामध्येही काही काळापर्यंत पुनश्च पोटमर्यादा करून त्याबाहेर जाणे येणे आदि व्यवहाराचा त्याग करणे हे देशव्रत होय. दिग्व्रतामध्ये आजन्म मर्यादा असते. तर देशव्रतामध्ये सीमेची मर्यादा काही काळापुरती असते. ।।१२।।

## अनर्थदण्ड व्रताचे स्वरूप

काहूंके धनहानि किसूं जय हार न चिंतै ।
देय न सो उपदेश, होय अध बनिज कृषी तैं ।।१२।।
कर प्रमाद जल भूमि, वृक्ष पावक न विराधै ।
असि धनु हल हिंसोपकरन नहि दे जस लाधै ।।
रागदोष करतार, कथा कबहू न सुनीजै ।
और हु अनरथदण्ड, हेतु अध तिन्है न कीजै ।।१३।।



शब्दार्थ : काहूंके = कोणाची. बनिज = व्यापार. पावक = अग्नी. न विराधै = विराधना (घात) न करावी. असि = तरवार. धनु = धनुष्य. हिंसोपकरण = हिंसेची उपकरणे, साधने. लाधै = प्राप्त करील. हल = नांगर.

अन्वयार्थ : (काहूंके धनहानि किसूं जय हार न चिंतै) कुणाची धनहानी तर कुणाच्या जय-पराजयाचे चिंतवन न करावे. [अपध्यान अनर्थदंडाचा त्याग] (अघ होय सो वनिज कृषीतै उपदेश न देय) पाप घडेल असा व्यापार शेती आदिकांचा उपदेश न द्यावा. [पापोपदेश अनर्थदण्डाचा त्याग] (प्रमादकर जल भूमि वृक्ष पावक न विराधै) प्रमाद वा कुतूहलवश पाणी, पृथ्वी, झाड, अग्नी आदिकांची विराधना न करावी. [प्रमादचर्या अनर्थदंडाचा त्याग] (असि धनु हल हिंसोपकरण दे जस नहिं लाधै) तलवार, धनुष्य, नागर आदि हिंसेची उपकरणे देऊन यश मिळवू नये.



[हिंसादान अनर्थदंडाचा त्याग] (रागदोष करतार कथा कबहू न सुनीजै) रागद्वेषांची उत्पादक कथा कधीही ऐकू नये व ऐकवूही नये. [दुश्रुती अनर्थदंडाचा त्याग] (अघहेतु और हू अनरथदण्ड) आणखी पापास कारणीभूत जो अनर्थदण्ड आहे (तिन्है न कीजै) तोही न करावा.

भावार्थ : अनर्थदण्ड पाच प्रकारचा आहे. त्याच्या त्यागाच्या अपेक्षेने अनर्थदण्डत्यागव्रताचे पाच प्रकारे कथन आहे.

(१) अपध्यान : अनर्थदण्ड पाच प्रकारचा आहे. त्याच्या त्यागाच्या अपेक्षेने अनर्थदण्डत्यागव्रताचे पाच प्रकारे कथन आहे.

(२) पापोपदेश : पापाला कारणीभूत असा व्यापारउदीम, शेतीबाबत उपदेश देणे. जसे मुलींचा व्यापार, चामड्याचा व्यापार, जंतु ठार करणे आदि उपदेश.

(३) प्रमादवर्या : प्रमादपूर्वक निष्कारण पाणी, अग्नी, वायु, वृक्ष, भूमि आदिकांची विराधना करणे, निष्कारण जमीन खोदणे, पाणी सांडणे, झाडे तोडणे वगैरे.

(४) हिंसादान : कीर्ती मिळविण्यासाठी हिंसादिक पापांना निमित्तभूत उपकरणे दानात देणे. जसे शस्त्रास्त्रे वाटणे वगैरे.

(५) दुःश्रुति : रागादि विकारांना उत्पन्न करणाऱ्या कथा ऐकणे व ऐकविणे. अशा ज्या निष्कारण मन-वचन-कायेच्या क्रिया असतील त्या सर्व अनर्थदण्ड होता. त्या सर्वांचा त्याग करावा. ।।१२-१३।।

## चार शिक्षाव्रताचे स्वरूप

धर उर समताभाव सदा सामायिक करिये ।
परव चतुष्टयमाहिं पाप तजि प्रोषध धरिये ।।
भोग और उपभोग नियमकरि ममत निवारै ।
मुनिको भोजन देय फेर निज करहि आहारै ।।१४।।

शब्दार्थ : परव = प्रत्येक पंधरवाड्यातील अष्टमी, चतुर्दशी हे पर्व दिन आहेत. प्रोषध = एकाशन. भोग = ज्याचा एकदाच आस्वाद घेता





येतो. जसे भोजनादिक. उपभोग = ज्याचा पुनः पुनः भोग घेता येतो. जसे वस्त्र वगैरे. नियम करि = नियम अथवा मर्यादा करून.

अन्वयार्थ : (उर समताभाव धर) अंतरंगात समताभाव धारण करून (सदा सामायिक करिये) दररोज नियमित सामायिक करावे. [सामायिक] (परव चतुष्टयमाहिं पाप तजि प्रोषध धरिये) अष्टमी, चतुर्दशी या पर्व दिवशी पापांचा त्याग करून प्रोषधपूर्वक उपवास करावा. [प्रोषधोपवास](भोग और उपभोग नियमकरि ममत निवारै) भोग आणि उपभोगांचा नियम करून त्यांचे ममत्व सोडावे. [भोगोपभोगपरिमाणव्रत] (मुनिको भोजन देय फेर निज करहि आहारै)मुनींना आहार देऊन नंतर



स्वतः भोजन करावे. [अतिथिसंविभाग].

भावार्थ : शिक्षाव्रते चार आहेत. ज्याप्रमाणे अणुव्रताच्या रक्षेकरिता गुणव्रते आहेत तद्वत चार शिक्षाव्रते आहेत. ते मुनींच्या व्रताची पालना करण्याचे शिक्षण देतात.

(१) सामायिक : आपला उपयोग स्वभावसन्मुख करून दिवसातून दोन किंवा तीन वेळ योगप्रवृत्तीला रोकून आत्मचिंतवन करणे, ध्यान करणे हे सामायिक होय.

(२) प्रोषधोपवास : दर पंधरवाड्यात एक अष्टमी व एक चतुर्दशी येते. याप्रमाणे महिन्यातून चार पर्वदिवशी सर्व व्यापारादिक आरंभकार्ये सोडून धर्मध्यानसहित प्रोषधपूर्वक उपवास करणे यास प्रोषधोपवास म्हणतात. पर्वदिवसाच्या पूर्वीच्या व नंतरच्या दुसऱ्या दिवसाला एकाशन करावे. जर पर्वदिवशी उपवास न करता एकाशन करणे असेल तर आदल्या व नंतरच्या दिवशी (सप्तमी, नवमी, त्रयोदशी, पौर्णिमा वा अमावस्येला) दोनच वेळ आहार घ्यावा. इतर वेळ धर्मध्यान व स्वाध्यायात व्यतीत करावा.

(३) भोगोपभोग परिमाण : भोग आणि उपभोग विषयांचे परिमाण करून इतर विषयांचा यावज्जीव वा काही काळ त्याग करणे हे भोगोपभोग परिमाण व्रत आहे.

(४) अतिथिसंविभाग : मुनी, क्षुल्लकादि अतिथींना विधिपूर्वक आहारदान देऊन नंतरच स्वयं भोजन करणे हे अतिथिसंविभाग व्रत होय. ॥१४॥

### अतीचार त्याग व सल्लेखनेचा उपदेश

बारह व्रतके अतीचार, पन पन न लगावै ।<br>
मरनसमय संन्यास, धारि तसु दोष नसावै ॥<br>
यो श्रावक व्रत पाल, स्वर्ग सोलह उपजावै ।<br>
तहतैं चय नरजन्म पाय, मुनी व्हैं शिव जावै ॥१५॥

शब्दार्थ : पन = पाच. संन्यास = सल्लेखना, समाधि. चय = च्युत होऊन.



अन्वयार्थ : (बारह व्रतके पन पन अतीचार न लगावै) बारा व्रतांचे पाच पाच अतीचार दोष लागू देऊ नयेत. (मरन समय संन्यास धारि) मरणसमयी समाधि घेऊन (तसु दोष नसावै) त्या व्रतातील दोषांचा नाश करावा. (यो श्रावकव्रत पाल) याप्रमाणे श्रावकाची व्रते निरतिचार पाळून तो (स्वर्ग सोलह उपजावै) सोळाव्या स्वर्गापर्यंत उत्पन्न होतो.(तहतैं चय) स्वर्गापासून च्युत होऊन(नरजन्म पाय) मनुष्यभव धारण करून(मुनी व्है शिव जावै) मुनी होतो व मोक्षास जातो.

भावार्थ : या बारा व्रतांचे प्रत्येकी पाच पाच अतीचार सांगितले आहेत. त्या अतीचार दोषांना व्रती श्रावकाने टाळावे.

शेवटी मरण अवश्यंभावी दिसत असताना त्यावेळी विधिपूर्वक आहारादिकांचा त्याग करून शरीर व कषाय घटवून आत्मसावधानतेपूर्वक देह सोडावा. यासच समाधिमरण, सल्लेखना, पंडितमरण म्हणतात. कोणताही परिग्रह बरोबर येत नाही हे सुनिश्चित आहे. तेव्हा मरणाच्या वेळी तरी स्वयं त्यांचे ममत्व सोडून त्याग करावा. देहावरील ममत्वही सोडावे, हा त्यातील उत्तम भाव आहे. सल्लेखना म्हणजे सम्यगरीतीने शरीर व कषाय कृश करणे. समाधि म्हणजे आत्मस्वरूपात लीनता.समाधिपूर्वक मरण हा जीवितमंदिराचा कलश आहे.

याप्रमाणे व्रते पाळून समाधिमरण साधून शुभ लेश्येमुळे सोळाव्या स्वर्गापर्यंत देवगतीत जातो. तेथे मरून मनुष्यजन्म धारण करतो, मुनि होतो व मोक्षास जातो. धर्माची पूर्णता मोक्षात आहे. सर्वार्थसिद्धि तीर्थंकर वगैरे



पदांची प्राप्ती हे धर्माचे साक्षात् फल नसून रत्नत्रयाशी अविनाभावी शुभ परिणामाची फळ आहे. अविनाभावामुळे त्यास व्यवहाराने धर्माचे फळ म्हणतात.

## चौथी ढाल : सारांश

सर्व जीवांना ज्ञान तर असते. परंतु ते सम्यग्दर्शनाच्या अभावी ज्ञेय-ज्ञायक-विवेकरहित व मोहरागादि विकारसहित असल्यामुळे मिथ्याज्ञान म्हटले जाते. सम्यग्दर्शनाच्या उत्पत्तीच्या क्षणीच विद्यमान मिथ्याज्ञानही सम्यग्ज्ञानरूप परिणमते. कारण सम्यग्दर्शनाबरोबर ज्ञेय-ज्ञायक-विवेक अवश्यंभावी असतो व ते ज्ञान मोहाने-भ्रमाने रहित होतेम्हणून सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान यांची उत्पत्ती जरी युगपत आहे तरी सम्यग्दर्शन हे ज्ञानामध्ये समीचीनता आणण्यास कारण आहे, म्हणून सम्यग्ज्ञान कार्य आहे व सम्यग्दर्शन सम्यग्ज्ञानाचे कारण आहे.

सम्यग्ज्ञानाचे पाच भेद आहेत. १. मतिज्ञान २. श्रुतज्ञान ३. अवधिज्ञान ४. मनः पर्यायज्ञान व ५. केवलज्ञान. सम्यग्ज्ञानास प्रमाण म्हणतात. प्रमाण प्रत्यक्ष व परोक्ष असे दोन प्रकारचे आहे. जे ज्ञान मन व इन्द्रियपूर्वक होते ते परोक्षप्रमाण आहे; व इंद्रियादिकांच्या साह्याविना मात्र आत्मिक शक्तीने जे होते ते प्रत्यक्ष होय. मतिश्रुतज्ञान परोक्ष आहेत. अवधिज्ञान मनःपर्ययज्ञान विकल-प्रत्यक्ष व केवलज्ञान सकल-प्रत्यक्ष आहे.

ज्ञान हे सुखाचे साक्षात कारण आहे. इंद्रियसुखास कारणभूत इंद्रियज्ञान हे इंद्रियसुखाप्रमाणे हेय व तुच्छ आहे. जन्मजरामृत्यु या रोग त्रयाचा नाश करण्यासाठी सम्यग्ज्ञान हे परम अमृत आहे, रसायन आहे. ज्ञानामुळे चारित्रामध्ये यथार्थता येते. सम्यग्ज्ञानपूर्वक चारित्र हेच संवर निर्जरा व मोक्षाचे कारण आहे. अज्ञानपूर्वक चारित्राने संवर होत नाही व मोक्षाला कारणभूत निर्जरा होत नाही. अज्ञानपूर्वक मुनीवेश घेऊनही हा जीव अनंत संसारी राहतो. म्हणून सम्यग्ज्ञानाची उपासना करावी. ज्ञानाच्या उपासनेकरिता जिनवाणीचा स्वाध्याय हे हमखास साधन आहे. संशयादि तीन दोष टाळून तत्त्वांचा यथार्थ निर्णय करावा. हा नरभाव, सुकुल व

जिनवाणीचा योग पुण्याने प्राप्त झाला असून तो व्यर्थ न घालविणे हे शहाणपणाचे आहे.

सम्यग्ज्ञानाच्या उत्पत्तीचे कारण स्वपरविवेक आहे. कर्म, शरीर व रागादिकापासून आपल्या आत्म्यास भिन्न अनुभवणे हे भेदविज्ञान आहे. त्यामुळे ज्ञान, जरी ते अल्प असले तरीही सम्यक् होते म्हणून हरप्रयत्नाने भेदविज्ञानाची उपासना करावी.

सम्यक्श्रद्धेपूर्वक सम्यग्ज्ञान हेच एकमात्र मोक्षाचे कारण आहे. विषयतृष्णेचा भडकलेला हा अग्नी शांत करण्यास सम्यग्ज्ञान हे मुसळधार मेघवर्षावाप्रमाणे एकमात्र कारण आहे.

सम्यग्ज्ञानाचे फलित हे आहे की, पापरूप तीव्र कषाय व पुण्यरूप मंदकषाय हे दोन्ही संसारास कारण असल्यामुळे त्यांस हेय समजून त्या पासून निवृत्त व्हावे. पुण्यपापाच्या उदयाने जो इष्ट-अनिष्ट संयोग प्राप्त होतो. तो स्वयं स्वभावाने इष्टानिष्ट नसतो. तो पुद्गलाचा नैसर्गिक परिणाम आहे. त्यामध्ये हर्षविवाद न करणे हेच ज्ञानाच्या उपासनेचे एकमात्र फळ आहे. याकरिता जगजाळातून निवृत्त होऊन हरप्रकारे आत्मसाधना करावी.

सम्यग्ज्ञानपूर्वक चारित्राने जीवन संयमित बनवून त्यास आकार द्यावा. सम्यक्चारित्र पात्रभेदाने सकल व विकल दोन प्रकारचे आहे. सम्यग्दर्शनपूर्वक गृहस्थाच्या व्रतचारित्रास विकलचारित्र म्हणतात. श्रावकाची व्रते बारा आहेत. निरतिचार व्रते पाळून त्याद्वारा आत्मसन्मुख होण्यातच जीविताचे साफल्य व सार आहे.

वास्तविक आत्मस्वरूपात लीनता हेच सम्यक् चारित्र आहे. निश्चय चारित्र आहे. ते साक्षात मोक्षाचे कारण आहे. परंतु गृहस्थाच्या भूमिकेत हे व्रतांचे विकल्प अवश्य येतात. हे निश्चयाबरोबर सहचर असल्यामुळे त्यास व्यवहारचारित्र म्हणतात. शुभ-परिणामामध्ये असणारा रागांश हा बंधास कारण असतो. ते वस्तुतः चारित्र नव्हे. वीतराग परिणती हे चारित्र होय. हे कटाक्षाने लक्षात घ्यावे.



## चौथी ढाल : लक्षणसंग्रह

(१) प्रमाण : सम्यग्ज्ञानास प्रमाण म्हणतात. अपूर्व आणि स्वपरामध्ये विभक्त अर्थाचा जो ज्ञान निर्णय करते ते ज्ञान प्रमाण होय.

(२) परोक्ष : ज्याच्या उत्पत्तीमध्ये मन व इंद्रिये निमित्त असतात त्या ज्ञानास परोक्ष म्हणतात.

(३) प्रत्यक्ष : जे ज्ञान मात्र आत्मिक शक्तीनेच अन्य निमित्ताशिवाय ज्ञेयास स्पष्टपणे जाणते ते प्रत्यक्ष होय.

(४) मतिज्ञान : पदार्थ व इंद्रिये योग्य स्थानी असताना त्यांच्या निमित्ताने दर्शनानंतर प्रगट होणाऱ्या ज्ञानास मतिज्ञान म्हणतात.

(५) श्रुतज्ञान : मन व इंद्रियाच्या निमित्ताने मतिज्ञान होते. ते अवग्रह, ईहा, अवाय, धारणा या क्रमपूर्वक होते. तेच मतिज्ञानाचे चार भेद आहेत. मतिज्ञानाने जाणलेल्या पदार्थासंबंधी जे विशेष ज्ञान होते त्यास श्रुतज्ञान म्हणतात.

(६) अवधिज्ञान : द्रव्यक्षेत्रकालभावाच्या मर्यादेमध्ये जे रूपी पदार्थास आत्मिक शक्तीने स्पष्ट जाणते त्यास अवधिज्ञान म्हणतात.

(७) मनःपर्ययज्ञान : द्रव्यक्षेत्रकालभावाच्या मर्यादेत जे ज्ञान स्वपराच्या मनातील विचारास आत्मिक साह्याने स्पष्ट जाणते ते मनःपर्यय ज्ञान होय. येथे मन रूपी आहे म्हणून मनातील विषयही रूपी समजावा.

(८) केवलज्ञान : जे ज्ञान केवल आत्मद्वाराच, इंद्रियमनादिकांची अपेक्षा न ठेवता तीन लोकांतील सर्व पदार्थांना त्यांच्या अनंतगुणपर्यायासह युगपत् प्रकाशित करते ते केवलज्ञान होय.

(९) संशय : जे ज्ञान विरुद्ध दोन बाजूंना स्पर्श करते ते संशय ज्ञान होय. जसे, हा साप की दोरी असे विकल्पात्मक दोलायमान ज्ञान. मी आत्मा की शरीर ? असा विकल्प.

(१०) विपर्यय : विरुद्ध एका बाजूला स्पर्श करणारे ज्ञान विपर्यय

असा विपरीत निर्णय करणे होय. जसे, दोरीस साप जाणणे. मी म्हणजे शरीर आहे असे मानणे.

(११) अनध्यवसाय : अनिर्णयरूप ज्ञानास अनध्यवसाय म्हणतात. जसे, काही तरी आहे असे ज्ञान.

(१२) अणुव्रत : अंतरंगात अनंतानुबंधी व अप्रत्याख्यानावरणाच्या अनुदयामुळे पाच पापांच्या आंशिक निवृत्तीरूप आंशिक विशुद्धीला अणुव्रते म्हणतात. (आंशिक-एकदेश, स्थूलपणे.)

(१३) अतीचार : ज्यामध्ये व्रतांचा सर्वथा भंग (अनाचार) नसतो व पूर्णतः पालनही नसते त्यास अतीचार दोष म्हणतात.

(१४) अनर्थदण्ड : निष्प्रयोजन मनवचनकायेच्या अशुभ प्रवृत्तीला अनर्थदण्ड म्हणतात.

(१५) अनर्थदण्डव्रत : निष्प्रयोजन मनवचनकायेच्या अशुभ प्रवृत्तीचा त्याग करणे हे अनर्थदण्डव्रत होय.

(१६) गुण : जे द्रव्याच्या सर्व प्रदेशात व सर्व पर्यायात व्यापक असतात त्यांना गुण म्हणतात. गुण द्रव्याचा स्वभाव आहे.

(१७) गुणव्रत : जे मूलगुणास - अणुव्रतास पुष्ट करतात, ती व्रते गुणव्रते होत.

(१८) पर्याय : द्रव्याच्या किंवा गुणाच्या परिणमनास पर्याय म्हणतात.

(१९) महाव्रत : अंतरंगात बारा कषायांच्या (४ अनंतानुबंधी ४ अप्रत्याख्यानावरण, ४ प्रत्याख्यानावरण) अभावपूर्वक पंचपापांचा सर्वथा त्याग त्यास महाव्रत म्हणतात.

(२०) व्रत : अशुभापासून निवृत्ती व शुभामध्ये प्रवृत्तीला व्रत म्हणतात.

(२१) शिक्षाव्रत : जी मुनींच्या व्रताची पालना करण्याचे शिक्षण देतात ती व्रते शिक्षाव्रते होत.



(२२) संन्यास : सल्लेखना - मरणसमयी तत्त्वज्ञानपूर्वक तसेच विधीपूर्वक शरीर व कषाय घटविणे व आत्मध्यानात लीन होणे यास सल्लेखना म्हणतात. त्यालाच समाधिमरण म्हणतात.

## चौथी ढाल : भेदसंग्रह

प्रमाण : दोन. प्रत्यक्ष व परोक्ष.

परोक्ष ज्ञान : दोन. १. मतिज्ञान व २. श्रुतज्ञान.

प्रत्यक्ष : दोन. १. सकल प्रत्यक्ष (केवल) २. विकल प्रत्यक्ष (अवधि, मनःपर्यय).

ज्ञान : पाच. १. मति, २. श्रुत, ३. अवधि, ४. मनःपर्यय, ५. केवल.

ज्ञानाचे दोष : तीन. १. संशय, २. विपर्यय, ३. अनध्यवसाय.

सम्यक्चारित्र : दोन. १. एकदेश (अणुव्रत) व २. सर्वदेश (महाव्रत).

श्रावक व्रते : बारा. ५. अणुव्रते, ३. गुणव्रते, ४. शिक्षाव्रते.

दिशा : दहा. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, ईशान्य, वायव्य, नैऋत्य, आग्नेय, उर्ध्व व अधो.

विकथा : चार. १. स्त्रीकथा, २. भोजनकथा, ३. चोरकथा, ४. राजकथा.

अनर्थ दण्ड : पाच. १. अपध्यान, २. पापोपदेश, ३. प्रमादचर्या, ४. हिंसादान, ५. दुःश्रुति.

हिंसा : चार. १. संकल्पी, २. आरंभी, ३. उद्यमी, ४. विरोधिनी.

## चौथी ढाल : अंतरप्रदर्शन

दिग्व्रत आणि देशव्रत : दोहोमध्ये दहाही दिशांची मर्यादा असून त्याबाहेर गमनाचा व आरंभादिकांचा त्याग असतो. परंतु दिग्व्रतामधील मर्यादा ही आजन्म असते तर देशव्रतामध्ये दिग्व्रतांच्या मर्यादितही पुनः मर्यादा काही काळाकरिता करण्यात येते, ती आजन्म नसते.

यम आणि नियम : यम म्हणजे एखाद्या वस्तूचा आमरण त्याग करणे व नियम म्हणजे काही काळासाठी त्याग करणे.

परिग्रह परिमाण व भोगोपभोग परिमाण : परिग्रह परिमाणव्रतामध्ये जे परिग्रहाचे परिमाण असते त्यांतही पुनः भोगोपभोगाचे परिमाण कमी करणे हे भोगोपभोग परिमाण व्रत होय.

प्रोषध व उपवास : प्रोषधामध्ये आरंभ व विषयकषायादिकांचा त्याग असूनही एक वेळ भोजन असते. परंतु उपवासामध्ये अन्न, पेय, खाद्य व लेह्य या चारही आहारांचा सर्वथा त्याग असतो.

भोग आणि उपभोग : ज्याचे एक वेळ सेवन केले जाते तो भोग होय. जसे अन्न वगैरे. ज्याचे वारंवार सेवन केले जाते तो उपभोग होय. जसे - स्त्री, कपडा वगैरे.

अवधिज्ञान व मनःपर्ययज्ञान : जरी दोन्ही ज्ञाने प्रत्यक्ष आहेत व रूपी पदार्थास जाणतात तरी अवधिज्ञानाच्या विषयापेक्षा मनःपर्यायज्ञानाचा विषय अनंतपट सूक्ष्म असून तो स्व-पराच्या मनातील स्थित पदार्थ असतो. अवधिज्ञान मिथ्यादृष्टीलाही असू शकते. मनःपर्ययज्ञान संयमींना - मुनींनाच होते.

संशय आणि अनध्यवसाय : संशय ज्ञान हे फक्त परस्पर विरुद्ध दोनच बाजूंना स्पर्श करते. परंतु अनध्यवसायामध्ये तोही निर्णय नसतो. ते ज्ञान नाना कोटीला स्पर्श करते.

   

# पाचवी - ढाल

(बारा भावना)

चाल छन्द

भावनांचे प्रयोजन, त्यांचा स्वामी व फल यांचे वर्णन

मुनि सकलव्रती बड़भागी, भवभोगनतैं वैरागी ।
वैराग्य उपावन माई चिंत्यों अनुप्रेक्षा भाई ।।१।।



शब्दार्थ : बड़भागी = महान् पुरुषार्थी. उपावन = उत्पन्न करण्यासाठी. माई = माता.

अन्वयार्थ : (भाई मकलव्रती मुनि बड़भागी) हे बंधो ! महाव्रतधारी भावलिंगी मुनिराज महान पुरुषार्थी भाग्यशाली आहेत. कारण ते(भवभोनगतै बैरागी) संसारभोगापासून विरक्त आहेत. ते (वैराग्य उपावन माई) वैराग्य उत्पन्न करण्यास मातेप्रमाणे असणाऱ्या (अनुप्रेक्षा चिंत्यों) अनुप्रेक्षांचे-भावनांचे-चिंतवन करतात.

भावार्थ : पाच महाव्रतांना धारण करणारे दिगंबर भावलिंगी मुनी महान पुरुषार्थी व भाग्यवान् आहेत. ते शरीर आणि संसारभोगापासून

विरक्त आहेत. ज्याप्रमाणे माता मुलास जन्म देते तद्वत् या भावना वैराग्य उत्पन्न करतात. म्हणून मुनीराज या बारा भावनांचे चिंतवन करतात. ।।१।।

भावनांचे फल

इन चिन्तन सम-सुख[१] जागै, जिमि ज्वलन पवनके लागै ।
जबही जिय आतम जानै, तब ही जिय शिवसुख ठानैं ।।२।।



शब्दार्थ : जागै = प्रगट होते. जिमि = जसे. ज्वलन = अग्नि. जिय = जीव. ठानै = प्राप्त करतो.

अन्वयार्थ : (जिमि ज्वलन पवन के लागै जागै)जसे अग्नी वारा लागल्याने भडकतो तसेच बारा भावनांचे (चिंतन समसुख जागै)चिंतवन केले असता शमसुख [समतारूपी सुख] प्रगट होते.(तबही जिय शिवसुख ठानै) तेव्हाच जीव मोक्षसुख प्राप्त करतो.

भावार्थ : जसा वाऱ्याने अग्नी भडकतो, तसे भावनांच्या चिंतवनाने समतासुख उत्पन्न होते व वाढते. आणि जेव्हा जीव समतासुख प्राप्त करून शुद्ध आत्म्यास अनुभवतो तेव्हा याच मार्गाने तो मोक्षसुख मिळवितो. अर्थात् येथे भावनांच्या चिंतवनाने संसारभोगादिकांसंबंधी द्वेष उत्पन्न करण्याचे प्रयोजन नाही. तर उदासीनपणे त्यांच्या स्वरूपाचे चिंतवनाने त्यासंबंधी रागद्वेष हटवून वीतरागतेची, समतेची वाढ करणे हे त्यांचे प्रयोजन आहे

---



त्यामुळे वीतरागता-समता भाव वाढतो. आत्मा आत्मस्वरूपात लीन होतो व याच मार्गाने हा जीव मोक्ष प्राप्त करतो. ।।२।।

आता या बारा भावनांचे स्वरूप सांगतात -

१. अनित्य भावना

जोबन गृह गोधन नारी, हय गज जन आज्ञाकारी ।
इन्द्रिय भोग छिन थाई, सुरधनु चपला चपलाई ।।३।।



शब्दार्थ : जोबन = यौवन, तारुण्य. हय = घोडा. गज = हत्ती. आज्ञाकारी जन = सेवक. छिन = क्षण. थाई = स्थायी. सुरधनू = इन्द्रधनुष्य. चपला = वीज. चपलाई = चंचलता.

अन्वयार्थ : (जोबन, गृह, गोधन, नारी, हय, गज, आज्ञाकारी जन) यौवन, घर, गाई वगैरे, धन, स्त्री, घोडा, हत्ती, सेवक परिजन (इन्द्रिय भोग) आणि इन्द्रिय भोग हे सर्व (सुरधनु चपला चपलाई छिन थाई) इन्द्रधनुष्य किंवा वीजेप्रमाणे चंचल-क्षणस्थायी [नाशवंत] आहेत.

भावार्थ : तारुण्य, घर, गाय, म्हैस, स्त्रीपुत्रादिक, हत्तीघोडे, दासदासी व विषयभोग हे सर्व वीज चमकून नष्ट व्हावी त्याप्रमाणे क्षणमात्र टिकणारे आहेत. ज्या परिग्रहाच्या मागे लागून अज्ञानी जीव आपले बहुमोल जीवन माया घालवितो त्या पदार्थांचे स्वरूप हे असे आहे. हे नाशवंत आहेत यात

आश्चर्य नाही. कारण हे पुद्गलांचे पर्याय आहेत व पर्यायाचे स्वरूपच उत्तरक्षणी नाश पावणे हे आहे. हे पाहता पाहता नाश होणारे आहेत. या सर्वांना जाणणारा चैतन्यशाली आत्मा मात्र ध्रुव आहे, शाश्वत आहे.

अशा प्रकारे या परिग्रहाच्या स्वरूपाच्या चिंतवनाने जीव त्यामध्ये रागद्वेष न करता उदासीन होतो व स्व-स्वरूपाकडे वळतो व वीतरागतेची वृद्धी करतो. ।।३।।

## २. अशरण भावना

सुर असुर खगाधिप जेते, मृग ज्यों हरि काल दलै ते ।
मणि मंत्र तंत्र बहु होई, मरते न बचावै कोई ।।४।।



शब्दार्थ : असुर = राक्षस. खगाधिप = खग म्हणजे विद्याधर. त्याचा राजा किंवा चक्रवर्ती. हरि = सिंह. मृग = हरिण. दलै = नष्ट करतो.

अन्वयार्थ : (सुर असुर खगाधिप जेते) देव, दैत्य, राजा चक्रवर्ती जे जे आहेत त्या सर्वांना (हरि ज्यों मृग) सिंह ज्याप्रमाणे हरिणांना ठार करतो त्याप्रमाणे (काल ते दलै) यम-काल त्या सर्वांना नष्ट करतो. (मणि मंत्र तंत्र बहु होई) मणि, मंत्र, तंत्र, कितीही असले तरी (मरते कोई न बचावै) मरताना त्या असुरादिकांनाही कोणीही वाचवू शकत नाही.



भावार्थ : जे जे अनित्य आहे ते शरणभूत असत नाही. अज्ञानी जीव अनित्य वस्तूंना भ्रमाने शाश्वत व शरण मानून जीवन वाया घालवितात. म्हणून त्यांना परावृत्त करण्यासाठी अनित्य भावनेचाच प्रथम आधार आहे. अज्ञानी जीव प्राप्त पर्यायास आपले रूप समजतो, पर्यायाचा नाश होतांना मरणास घाबरतो. परंतु उत्पन्न झालेला पर्याय नष्ट तर होणारच, कारण तो तर आहेच मुळी पर्याय उत्पादव्यय हेच पर्यायाचे स्वरूप आहे. मरण ही त्याची सहज गती आहे. प्राप्त पर्याय व शरीराचा वियोग झाला तरी आत्मा नित्य आहे. मरण टाळण्यासाठी कोणीही समर्थ नाही, मंत्र तंत्रही कामी येत नाहीत. त्यामुळे व्यक्ती कितीही मोठी असो तिला मृत्युपासून वाचविण्यास कोणीही समर्थ नाही एक ज्ञानस्वरूपी स्वतःचा आत्माच स्वतःला मात्र शरण आहे. कारण त्याच्या आश्रयाने तो या नश्वर पर्यायाच्या अतीत होऊन शाश्वत सिद्धपदाची प्राप्त करतो.

अशा अशरणपणाचे चिंतवन केल्याने मरणाचे भय आपोआप नष्ट होते. मरण टाळण्यासाठी व्यर्थ धडपड मंदावते व तो एकमात्र आत्म्याचा आश्रय घेतो, वीतरागतेची वृद्धी करतो, शमसुख अनुभवतो व मोक्ष प्राप्त करून घेतो. ।।४।।

## ३. संसार भावना

चहुँगति दुख जीव भरे हैं, परिवर्तन पंच करे हैं ।
सब विधि संसार असारा, यामैं सुख नाहिं लगारा ।।५।।



शब्दार्थ : पंचपरिवर्तन = द्रव्य, क्षेत्र; काल, भव व भावरूप परिवर्तन. सबविधि = सर्वच प्रकारे. लगारा = थोडेही.

अन्वयार्थ : (चहुगति जीव दुःख भरे है) चारही गतीतील जीवमात्र दुःख सहन करतात व (पंच परिवर्तन करे है) पाच प्रकारे परिवर्तन अविरत करत आहेत. म्हणून (संसार सब विधि असारा) संसार हा सर्व प्रकारे असार आहे. (यामैं लगारा सुख नाहिं) त्यात थोडेही सुख नाही.

भावार्थ : या चतुर्गतीरूप संसारात कोणीही सुखी नाही. सर्वच दुःखी आहेत. याचे वर्णन पहिल्या ढालीमध्ये केलेच आहे. रहाट गाडग्याप्रमाणे संसारी प्राणी पाच प्रकारची परिवर्तने करतो. ज्या संसारावर, (पर्यायावर) जीवमात्र आत्मबुद्धी करून प्रीती करतो तो तर सर्वप्रकारे निःसार आहे. त्यात थोडेही सुख मुळीच नाही.

या प्रकारे संसारस्वरूपाचे चिंतवन केल्याने त्याची संसारावरील प्रीती (राग बुद्धी) हटते व संपूर्ण सुखमय आत्म्याची रुची निर्माण होते. अशा प्रकारे वीतरागतेची वृद्धी होऊन तो शुद्ध आत्म्याची प्राप्ती करतो व मोक्ष मिळवितो. ।।५।।

### ४. एकत्वभावना

शुभ अशुभ करम फल जेते, भोगै जिय एकहि ते ते ।
सुत दारा होय न सीरी, सब स्वारथके हैं भीरी ।।६।।





शब्दार्थ : दारा = पत्नी. सीरी = साथीदार, भागीदार. भीरी = संबंधी, नातलग.

अन्वयार्थ : (जेते शुभ अशुभ करम फल) जितके काही शुभ अशुभ कर्माचे फळ आहे, (ते ते जिय एकही भोगै) तितके हा जीव एकटाच भोगतो. (सुत दारा सीरी न होय) मुलगा पत्नी साथीदार होत नाहीत. (सब स्वारथके भीरी है) सर्वजण स्वार्थाचे सगेसोयरे आहेत.

भावार्थ : मोही अज्ञानी जीव मुलगा, पत्नी आदि कुटुंबी जनासाठी खस्ता खातो, पापे करतो. परंतु ते तर फक्त सुखाचे सोबती आहेत. त्या शुभ अशुभ कर्माचे फल भोगताना एकट्यालाच ते भोगावे लागते. त्यात कोणीही साथीदार होत नाहीत. या प्रकारे जसा जीव संसारामध्ये एकटाच आपल्या कर्माचा कर्ता व भोक्ता आहे तसाच तो मोक्षामध्येही आहे. याप्रमाणे फल भोगण्यात एकत्वाचे चिंतवन केल्याने स्त्रीपुत्रादि कुटुंबी जनासंबंधी राग घटतो, जीवाची आपल्या आत्मविकासाकडे ओढ लागते; तो शुद्ध आत्म्याशी तन्मय होतो. वीतरागतेची पुष्टी होते व वैराग्य दृढ होते. ।।६।।

### ५. अन्यत्व भावना

जल-पय ज्यौं जिय-तन मेला, पै भिन्न भिन्न नहिं भेला ।
जों प्रगट जुदे धन धामा, क्यों व्है इक मिलि सुत रामा ।।७।।



शब्दार्थ : पय = दूध. मेला = मेळ, संयोग. भेला = एकरूप. धामा = घर. मिलि = मिळून. इक = एक. रामा = स्त्री.

अन्वयार्थ : (जिय-तन मेला जल-पय ज्यौं)जीव आणि शरीर यांचा संयोग हा पाणी आणि दुधाच्या संयोगाप्रमाणे आहे(भेला नहिं) ते एकरूप नाहीत. (भिन्न भिन्न) तर ते वेगवेगळे आहेत.(प्रगट जुदे तो) तर प्रत्यक्ष भिन्न आहेत असे (धन घामा सुत रामा) धन, घर, पुत्र, स्त्री वगैरे हे(मिली क्यों इक व्है) मिळून काय एकरूप होतील ! अर्थात् नाही.

भावार्थ : हा मोही स्त्रीपुत्रादिकांकरिता काहीही पाप करतो. याचे कारण तो त्यामध्ये एकत्वबुद्धी करून त्यांना आपले मानतो. परंतु पर्यायासोबत आलेला देह आणि आत्मा हेही जेथे पाणी व दूध याप्रमाणे संयोगरूप असूनही भिन्नच आहेत तर धनगृहादि व स्त्रीपुत्रादि हे तर साक्षात् पृथक् आहेत. ते जीवाचे स्वकीय कसे होतील ?

अशा प्रकारे स्त्रीपुत्रादिकांपासून आत्म्याच्या अन्यत्वाचे चिंतवन केल्याने त्या परिग्रहापासून भेदविज्ञान होऊन त्यांच्या रागापासूनही हा जीव निवृत्त होतो. त्यामुळे वीतरागतेची वृद्धी होते व पृथक आत्म्याची प्रतीती होते. ही अन्यत्वभावना होय. ।।७।।

### ६. अशुचि भावना

पल-रुधिर-राध-मल-थैली, कीकस वसादितैं मैली ।
नवद्वार बहै घिनकारी, अस देह करै किम यारी ।।८।।





शब्दार्थ : पल = मांस. रुधिर = रक्त. राध = पू. मल = विष्ठा. कीकस = हाड. वसा = चरबी. मैली = मलीन. घिनकारी = घृणास्पद. यारी = प्रीती, आसक्ती.

अन्वयार्थ : जे [शरीर](पल-रुधिर-राध-मल-थैली) मांस, रक्त, पू, विष्ठादिकांची जणू पिशवीच आहे. (कीकस वसादितैं मैली) हाड चरबी वगैरेंनी मलीन आहे. (घिनकारी नवद्वार बहै) व ज्यामध्ये घृणा उत्पन्न करणारे नऊ दरवाजे सतत वाहत आहेत(अस देह यारी किम करैं ?) अशा या देहावर प्रीती कशी करावी ?

भावार्थ : धनधान्य स्त्रीपुत्रादिकांचे जाऊ द्या. परंतु शरीर तरी आपले आहे ना ! मग त्याची सेवा करणे भाग आहे असे मोही जीव म्हणतो. परंतु जन्मापासून प्राप्त झालेले हे शरीरही पू. रक्ताची जणूं पिशवी आहे, चरबी हाडांनी मलीन आहे व देहाच्या घाणेरड्या नऊ दरवाजाने सारखी घाण वाहत असते, असा देह प्रीती करण्याच्या लायकीचा तरी आहे का ? इतके करून कृतघ्न मित्राप्रमाणे शेवटी इंद्रिये म्हातारपणी जणू रजाच घेतात आणि जीवावर उपकार करीत नाहीत. अशा दुष्ट देहाची सेवा कशी करावी ?

शरीराच्या या घाणेरड्या स्वरूपाचे यथार्थ चिंतवन केल्याने या अज्ञानी जीवाला अनादिकालापासून जो देहासंबंधी आत्मबुद्धीचा मोह आहे तो दूर होतो. देहाचे दास्य संपते आणि तो स्वभावसन्मुख होऊन अत्यंत पवित्र शुचि आत्म्यात लीन होतो. वीतरागतेची वृद्धी होते. ही अशुचि भावना होय. ।।८।।

### ७. आस्रव भावना

जे योगनकी चपलाई, तातै होय आस्रव भाई ।
आस्रव दुखकार घनेरे, बुधिवंत तिन्हें निरवेरे ।।९।।

शब्दार्थ : योगनकी = मन, वचन, कायेची. चपलाई = चंचलता घनेरे = पुष्कळ. बुधिवन्त = बुद्धिमान पुरुष. निरवेरे = दूर करतो.



अन्वयार्थ : (भाई ! जो योगनकी चपलाई)हे बंधो ! मन, वचन, काय यांच्या निमित्ताने आत्मप्रदेशातील चंचलतारूप योग आहे; (तातै आस्त्रव होय) त्यामुळे आस्त्रव होतो. कर्म येतात.(आस्त्रव घनेरे दुखकार) या आस्त्रवास प्रेरक असे राग, द्वेष, मोह हे आस्त्रवभाव अतिशय दुःखकारी आहेत. (तिन्हैं बुधिवंत निरवेरे) त्यांना - आस्त्रवभावांना - बुद्धिमान पुरुष दूर करतो.

भावार्थ : धनधान्यादि, स्त्रीपुत्रादि, संसार व शरीर यांच्या स्वभावाचे चिंतवन केल्याने ही गोष्ट स्पष्ट होते की, हे तर परद्रव्याचे परिणाम आहेत. तत्त्वतः कोणतेही परद्रव्य इष्टानिष्ट नसून जीवास सुख-दुख देऊ शकत नाही. ते जीवाचे बरेवाईट करू शकत नाहीत. परंतु हा अज्ञानी जीव तेथे राग-द्वेष-मोह करतो तेव्हा मन-वचन-कायेच्या निमित्ताने आत्मप्रदेश कंपित होतात. त्या निमित्ताने कर्मांचा संचय होतो, शरीर प्राप्त होते व पुनश्च विषयप्रवृत्ती होते. याप्रमाणे जीवाचेच राग-द्वेष-मोह हे विकार यथार्थतः आस्त्रव असून तेच या जीवांचे शत्रू आहेत अतिशय दुःखकारक आहेत. म्हणून ज्ञानी मनुष्य परद्रव्यावर रोष न करता आपल्याच विकारांना दूर करण्याचा यत्न करतो.

अशा प्रकारे आस्त्रवाच्या स्वरूपाच्या चिंतवनाने आपल्याच रागद्वेषादि विकारामध्ये हेयबुद्धी उत्पन्न होते, आत्म्याचे ठिकाणी उपादेय बुद्धी उत्पन्न होते आणि वीतरागतेची वृद्धी होते. ही आस्त्रवभावना होय. ।।९।।



## ८. संवर भावना

जिन पुण्य-पाप नहिं कीना, आतम अनुभव चित दीना ।
तिनही विधि आवत रोके, संवर लहि सुख अवलोके ।।१०।।



शब्दार्थ : चित दीना = मन लावले. विधि = कर्म.

अन्वयार्थ : (जिन पुण्य-पाप नहिं कीना)त्याने पुण्य पापरूप शुभाशुभ परिणाम केले नाहीत, (आतम अनुभव चित्त दीना) आत्मानुभवात मन लावले, (तिनही आवत विधि रोके) त्यामुळे त्यास येणारे कर्म रोकले जाते. तेच जीव (संवर लहि सुख अवलोके) संवर साधून साक्षात परमसुख अनुभवतात.

भावार्थ : त्या कर्मास्त्रवास रोकण्याचा मार्ग कोणता ?कित्येक जीव दया, भक्ति आदि शुभ परिणामांनी संवर होऊन धर्म होतो असे मानतात. परंतु जसे अशुभ परिणाम धर्म नाही तद्वत शुभ परिणामही धर्म नाही. कारण दोन्ही शुभाशुभ परिणामामध्ये कषायांचा सद्‌भाव आहेच, तेथे एक द्रव्य दुसऱ्याचे बरेवाईट करू शकते असा कर्तृत्वाचा व्यामोह आहेच, आणि हा मोहच तर विकारांचा राजा आहे; विकारांचा जनक आहे. शुभाशुभ परिणामांमध्ये भेद करून शुभ परिणामांनी संवर व धर्म होतो असे मानणे हे अज्ञान आहे. शुभ परिणामही रागरूप असल्याने संवराचे कारण नसून ते आस्त्रवबंधाचे कारण आहेत. हे तत्त्व आहे. म्हणून शुभाशुभ परिणाम समान रीतीने आस्त्रवबंधाचे कारण आहेत जसे जाणून जो त्यांच्या अतीत होऊन

मात्र आत्मानुभवात लीन होतो तोच रागद्वेषमोहाच्या अतीत होऊन नवीन कर्मांना रोकतो. संवर प्राप्त करून परमसुखाचा साक्षात्कार करतो.

शुभभाव धर्म असून संवराचे कारण आहे व अशुभभाव अधर्म असून आस्त्रवाचे कारण आहे, असा त्यामध्ये भेद मानणे हा भ्रमच आहे. शुभाशुभ भाव दोन्ही परलक्ष्यी परिणाम असून आस्त्रवबंधरूप व आस्त्रवबंधास कारण आहेत. एक शुद्ध परिणती संवरनिर्जरेचे कारण आहे.

या प्रकारे संवराच्या स्वरूपाचे व संवराच्या कारणाचे चिंतवन केल्याने ज्ञानी पुण्यपापामध्ये अंतर करीत नाही, व सर्व सूक्ष्म-स्थूल विकारांना हेयपणाने स्वीकारतो, आत्मानुभवात रत होतो. त्याच्या वीतरागतेची वृद्धी होते व तो मोक्ष प्राप्त करतो. ही संवर भावना आहे. ।।१०।।

## ९. निर्जरा भावना

निज काल पाय विधि झरना, तासौं निज-काज न सरना ।
तपकरि जो कर्म खिपावै, सोई शिवसुख दरसावै ।।११।।



शब्दार्थ : विधि = कर्म. निज काल = आपली स्थिती. सरना = पूर्ण होणे. खिपावै = दूर करतो. दरसावै = प्राप्त करतो.

अन्वयार्थ : (निज काल पाय विधि झरना) आपली स्थिती पूर्ण झाल्यानंतर कर्म दूर होणे (तासौं निज-काज न सरना) एवढ्यानेच जीवाचे आपले काम-मोक्षाचे प्रयोजन-पूर्ण होत नाही. (तपकरि जो कर्म खिपावै) तपाने जो कर्माचा क्षय करतो (सोई शिव सुख दरसावै) तोच मोक्षसुख प्राप्त करतो.



भावार्थ : दुःखकारक आस्त्रवास रोकणे जसे आवश्यक असते तसेच पूर्वबद्ध कर्माची निर्जरा होणेही जरूरीचे असते. नवीन कर्मांना न रोकता पूर्वबद्ध कर्म तर प्रतिसमयास उदयाला येऊन निघून जातच असते. त्यामुळे जीवाचा तत्त्वतः लाभ काहीच नाही. उलट जीव विकारी होऊन नवीन कर्म बांधतो व अनंत संसारी होतो. म्हणून इच्छेचा निरोध करून जो यथाकाल नवीन कर्माना रोकतो व प्रयत्नाने पूर्वबद्ध कर्मांना निर्जरित करतो तोच मोक्षसुख प्राप्त करतो. सारांश सविपाक निर्जरा व अकाम निर्जरा प्रयोजनभूत नसून अविपाक व सकाम निर्जराच मोक्षमार्गात प्रयोजनभूत आहे.

याप्रमाणे निर्जरेच्या स्वरूपाचे चिंतवन केल्याने तो इच्छा निरोधरूप अंतरंग प्राप्त उत्साही होतो, आत्मस्वरूपात लीन होतो. वीतरागतेची वृद्धी होऊन मोक्ष प्राप्त करतो. ही निर्जराभावना होय. ।।११।।

## १०. लोकभावना

किन हू न कऱ्यो न धरै को, षट-द्रव्यमयी न हरै को ।
सो लोकमाहि बिन समता, दुख सहैं जीव नित भ्रमता ।।१२।।



शब्दार्थ : किन हू = कोणाकडून. कऱ्यो = केलेला. धरै = धारण करतो.

अन्वयार्थ : (षटद्रव्यमयी) हा लोक षट द्रव्यमय असून (किन हू न कऱ्यो) तो कोणीही केलेला नाही, त्यास (को न धरै) कोणी धारणही करीत नाही. (को न हरै) कोणी त्याचा नाशही करीत नाही. (सो लोकमाहिं) अशा या विश्वामध्ये (समता बिन) समतेशिवाय (जीव नित भ्रमता दुख सहै) जीव सदैव भ्रमण करीत करीत दुःखच सहन करतो.

भावार्थ : जर जीवाचे विकारच दुःख देतात व त्याचा ज्ञान स्वभावच सुखकारी आहे. तर या लोकाशी जीवाचे नाते ते काय ?लोक म्हणजे सहा द्रव्यांचा समूह. त्यामध्ये प्रत्येक द्रव्य स्वभावानेच अनादी काळापासून अस्तित्वमय आहे. वस्तुमध्ये स्वभावानेच प्रतिक्षण उत्पादव्यय होत आहेत. कारण वस्तू स्वभावाने उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे. त्यामुळे प्रत्येक वस्तू आपल्याच परिणामांचा कर्ता आहे. त्या लोकास कोणी उत्पन्न करणारा, रक्षण करणारा व नाश करणारा सर्वशक्तिमान परमेश्वर नाही. अशा या जगात प्रत्येक वस्तुमात्र भिन्न असताना व सर्व काही नियत स्वभावानुसार घडत असताना हा मूढ त्यामध्ये इष्टानिष्ट बुद्धी करतो, कर्तृत्वबुद्धी करतो व आपला जाननपणा व समबुद्धी सोडतो. यामुळे तो या संसारात सदैव परिभ्रमण करीत दुःखच भोगतो.

अशा प्रकारे लोकस्वभावाचे चिंतवन केल्याने जीव तेथे रागद्वेष करीत नाही व आपल्या चैतन्यरूप लोकामध्ये तन्मय होऊन विकारांची विषमता दूर करतो, वीतरागतेचा विकास करतो व मोक्ष प्राप्त करतो. ही लोक भावना आहे. ।।१२।।

### ११. बोधिदुर्लभ भावना

अंतिम ग्रीवकलौं की हद, पायो अनंत विरिया पद ।
पर सम्यकज्ञान न लाध्यो, दुर्लभ निजमैं मुनि साध्यो ।।१३।।

शब्दार्थ : विरियां = वेळा. लाध्यो = प्राप्त केले. साध्यो = साधन केले.





अन्वयार्थ : (अंतिम ग्रीवकलौं की हद पद) या जीवाने अंतिम ग्रैवेयकापर्यंतचे पद (अनंत विरिया पायो) अनंत वेळा प्राप्त केले. (पर सम्यकज्ञान न लाध्यो) परंतु सम्यग्ज्ञान प्राप्त केले नाही. (दुर्लभ मुनि निजमैं साध्यो) परंतु मुनींनी अशा दुर्लभ सम्यग्ज्ञानाची आपल्या आत्म्यामध्ये साधना केली.

भावार्थ : अशा या लोकांमध्ये मिथ्यादृष्टी जीवाने नव ग्रैवेयकापर्यंतचे पद अनंतवेळा प्राप्त केले. तेथे रागीद्वेषी होऊन खेद खिन्न झाला. परंतु त्याला लोकाच्या स्वरूपाचे सम्यग्ज्ञान न झाल्यामुळे आकुलतेने दुःखी झाला म्हणून मुनिराज सम्यग्ज्ञानाची साधना करून जन्म सफल करतात. या लोकात सर्व काही सुलभ आहे. मात्र एक सम्यग्ज्ञान तेवढे सुलभ नाही. येथे सम्यग्ज्ञान मध्यदीपक असल्यामुळे ते रत्नत्रयाचा प्रतीक आहे. दुर्लभ अशा रत्नत्रयाची प्राप्ती हेच अनंत सुखाचे साधन असून तेवढेच मानवजन्माचे साफल्य आहे.

सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राची एकता ही बोधी असून त्याची प्राप्ती मुमुक्षूने करून घ्यावी. अशा प्रकारे ज्ञानी आपल्या वीतरागतेची व रत्नत्रयाची सदोदित वृद्धी करतो. ही बोधिदुर्लभानुप्रेक्षा होय. ।।१३।।

### १२. धर्म भावना

जो भावमोहतैं न्यारे, दृग-ज्ञान-व्रतादिक सारे ।
सो धर्म जबै जिय धारै, तब ही सुख अचल निहारै ।।१४।।



शब्दार्थ : सारे = निश्चयरूप, यथार्थ.

अन्वयार्थ : (जे भावमोहतै न्यारे) अंतरंग भावमोहापासून [जीवाच्या विभाव परिणामापासून] वेगळे असे (सारे दृग-ज्ञान व्रतादिक) निश्चयरूप उत्कृष्ट दर्शनज्ञानव्रतादिक आहेत (सो धर्म जबै जिय धारै) तो धर्म हा जीव जेव्हा धारण करतो (तबहि अचल सुख निहारै) तेव्हाच अचल सुख [मोक्ष] पाहतो; प्राप्त करतो.

भावार्थ : मोह म्हणजे मिथ्यादर्शन, अतत्त्वश्रद्धानरूप परिणाम. धर्म सुखाचे-मोक्षाचे साधन आहे. परंतु सम्यग्दर्शनाविना बाह्य ज्ञानचारित्र हा धर्मच नव्हे. सम्यग्दर्शन हे धर्माचे मूळ आहे. जेव्हा जीव सम्यग्दर्शनपूर्वक ज्ञान चारित्राची साधना करतो तेव्हाच तो मोक्षसुख साक्षात् पाहतो. आत्म्याचा मोहविरहित सहज रत्नत्रयरूप परिणाम हाच यथार्थ धर्म आहे. व तोच मोक्षाचे कारण आहे. सारे हा शब्द व्यवहार रत्नत्रय यथार्थ धर्म नाही हे सूचित करतो.

अशा प्रकारे धर्मस्वरूपाचे चिंतवन केल्याने आपल्या धर्मसाधनेत तो अधिक उत्साहित होतो; आपल्या शुद्धतेची वृद्धी होते व क्रमशः मोक्ष प्राप्त होतो. ही धर्मभावना आहे. ।।१४।।

### उपसंहारपूर्वक मुनींच्या चारित्राच्या वर्णनाची प्रतिज्ञा

सो धर्म मुनिनकरि धरिये, तिनकी करतूति उचरिये ।
ताको सुनिये भवि प्रानी, अपनी अनुभूति पिछानी ।।१५।।



शब्दार्थ : करतूति = क्रिया, चारित्र. उचरिये = सांगतात. पिछानी = ओळख करा.

अन्वयार्थ : (सो धर्म मुनिनकरि धरिये) असा हा मोहरहित निश्चय रत्नत्रयरूप धर्म मुनीकडून धारण केला जातो; (तिनकी करतूति उचरिये) त्यांची क्रिया [चारित्र] सांगतात - पुढील सहाव्या ढालीमध्ये त्यांचे वर्णन करतात. (भवि प्रानी ताको सुनिये) भव्य जीवहो ! ते ऐका आणि (अपनी अनुभूति पिछानी) आपल्या आत्म्याच्या - अनुभूतीला ओळखा.

भावार्थ : असा हा मोहरहित निश्चय रत्नत्रयधर्म भावलिंगी दिगंबर जैन मुनी सर्वप्रकारे यथार्थपणे पाळतात. त्यांच्या महाव्रतादि सकल चारित्राचे व स्वरूपाचरण चारित्राचे वर्णन शेवटच्या सहाव्या ढालीमध्ये करतात. भव्य जीवहो ! ते ऐका आणि आपल्या आत्म्याचा अनुभव करा. ।।१५।।

## पाचवी ढाल : सारांश

सम्यग्दर्शनपूर्वक श्रावकाची व्रते पाळताना तत्त्वज्ञानाबरोबर वैराग्यही वाढते. आणि जीव मुनीपदाचा स्वीकार करण्यास उद्युक्त होतो. वैराग्याची उत्पत्ती आणि रक्षा याकरिता बारा भावनांचे चिंतवन आणि नित्य संस्कार या गोष्टी आवश्यक आहेत. उपयोगामध्ये स्वपरभेदविज्ञानाची स्थिरता म्हणजे बारा भावना असे म्हणता येते. ही स्थिरता चारित्राची पर्याय आहे. बारा भावना मुख्यतः मुनींना आणि गौणरूपाने श्रावकांना असतात.

यथार्थ बारा भावना सम्यग्दृष्टीलाच असतात. मिथ्यादृष्टीला बारा भावना असतात. पण त्या यथार्थ नसतात. त्या द्वेषरूपाच्या असतात. बारा भावनांचा उद्देश तत्त्वज्ञानपूर्वक वैराग्य उत्पन्न करणे व दृढ करणे हा आहे. त्याकरिता तो ज्या परिग्रह, भोग, शरीर व संसारादिकांच्या व्यापात अडकला आहे त्यांच्या स्वरूपाचा आणि मोक्षप्राप्तीच्या साधनभूत तत्त्वांचा विचार करतो. (१) यौवन, घर आदि सर्व अस्थिर आहेत. (२) संसारात प्राणिमात्रांस मृत्यू अटळ असल्यामुळे तो अशरण आहे. (३) संसारात सर्वत्र

सुखाचा अभाव असून दुःखच भरपूर आहे. (४) संसारात हा प्राणी जे करतो त्याचे फल तो एकटाच भोगतो, इतर स्वजन कोणीही साथीदार होत नाहीत. कारण (५) जेथे शरीरही आत्म्यापासून पृथक आहे तेथे स्वजन व परिग्रह हे तर साक्षात पृथकच आहेत. म्हणून (६) स्वजनांना स्व मानणे ही जशी मूढता आहे तसेच घाणेरड्या शरीरावर प्रीती करणे हेही अज्ञान आहे. (७) हा बाह्य संसार व परिग्रह स्वयं दुःखरूप नाही तर राग-द्वेष-मोह रूप परिणाम हे दुःखाचे व कर्मास्त्रवाचे मूळ आहे. (८) कोणताही शुभाशुभ विकार, कषाय हा मुळात आस्त्रवरूप आहे. त्या दोहोंपासून सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राचा परिणाम विलक्षण आहे, कारण तो चैतन्याचा विलास आहे. तो रत्नत्रय धर्म हा राग-द्वेष-मोहरूप आस्त्रवाचा नाश करतो व कर्म रोकतो. (९) प्रतिसमयाला होणारी सविपाक निर्जरा कार्यकारी नाही. तपाने होणारी निर्जरा ही मोक्षमार्गात प्रयोजनभूत आहे. (१०) आत्मा या लोकाचा ज्ञाता मात्र असून तो लोकात असून लोकांपासून भिन्न आहे. (११) लोकातील कोणतीही वस्तू किंवा पद हे दुर्लभ नसून एकमात्र रत्नत्रयाची प्राप्ती दुर्लभ आहे. (१२) मोहरहित रत्नत्रय हाच यथार्थ धर्म होय. अशा विचाराने तो संसारव्यापातून निवृत्त होतो, वीतरागता दृढ करतो व मोक्ष प्राप्त करतो. मात्र संसार भोग परिग्रहासंबंधी किळस व द्वेष ह्यांना यथार्थ भावना म्हणता येत नाही. तर तत्त्वज्ञानपूर्वक भोगादि स्वभावतः भिन्न आहेत असे जाणून वैराग्यपूर्वक स्व-स्वरूपामध्ये लीन होणे हीच खरी भावना असून ती संवरनिर्जरा व मोक्षाचे कारण आहे.

## पाचवी ढाल : लक्षणसंग्रह

(१) अनुप्रेक्षा (भावना) : भेदज्ञानपूर्वक संसार, शरीर, भोग आदींच्या स्वरूपाचे वारंवार अनुचिंतन करून परापासून निवृत्तिरूप उदासीनता व स्वरूपात लीनता यास भावना म्हणतात.

(२) अशुभोपयोग : मोह, हिंसादिक पापे, कषाय, व्यसने या कार्यामध्ये उपभोग व प्रवृत्ती.



(३) कर्म : आत्मा रागादि विकाररूप परिणमताना त्यास जे उदयरूप सूक्ष्म पुद्गल परमाणुस्कंध निमित्त असतात अथवा त्या निमित्ताने नवे सूक्ष्म कार्माणवर्गणारूप पुद्गल येतात त्यांना द्रव्यकर्म म्हणतात. विकार स्वयं जीवपरिणाम असल्यामुळे भावकर्म आहेत.

(४) गति : गतिनामकर्माच्या उदयाने होणाऱ्या नरक, तिर्यंच मनुष्य व देवरूप जीवाच्या अवस्थाविशेषाला गति म्हणतात.

(५) ग्रैवेयक : ऊर्ध्वलोकात १६ स्वर्गाचे वर व नऊ अनुदिशांच्या खालील देवांचा निवास.

(६) देव : जे देवगती नामकर्माच्या उदयाने अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ती, प्राकाम्य, ईशित्व व वशित्व या आठ ऋद्धीने सहित असतात ते देव होत. त्यांचे वैक्रियिक शरीर मनुष्याच्या आकाराचे असून सप्त धातूंनी रहित असते.

(७) धर्म : मोक्ष या श्रेष्ठ पदास पोहोचविण्यास साधनभूत आत्म्याचा निश्चय सम्यग्दर्शनज्ञानचारित्ररूप शुद्ध स्वभाव धर्म होय. उत्तम क्षमादिक अथवा अहिंसा हे त्याचे अवश्यंभावी बाह्यरूप आहे व साधन आहे.

(८) पाप : मिथ्यात्व - आत्माविषयक गैरसमज व हिंसादि अशुभ परिणामांना पाप म्हणतात.

(९) पुण्य : दया, दान, भक्ती व्रतादिक मंद कषायरूप परिणामांना पुण्यभाव म्हणतात. पाप-पुण्य दोन्ही आस्त्रवरूप आहेत, बंधाचे कारण आहेत.

(१०) बोधि : सम्यग्दर्शन-ज्ञान चारित्राच्या एकतेला बोधित म्हणतात.

(११) योग : मन-वचन-कायेच्या निमित्ताने आत्मप्रदेशामध्ये जी चंचलता येते तिला द्रव्ययोग म्हणतात. तर कर्म व नोकर्म यांना ग्रहण करण्यास निमित्तभूत जीवाच्या शक्तीला भावयोग म्हणतात.

(१२) शुभोपयोग : देवपूजा, स्वाध्याय, अणुव्रते, महाव्रते आदि शुभभावाच्या अवलंबनाने होणारी उपयोग परिणती म्हणजे शुभोपयोग होय.

### पाचवी ढाल : भेद संग्रह

अनुप्रेक्षा - बारा. अनित्य, अशरण, संसार, एकत्व, अन्यत्व, अशुचि, आस्त्रव, संवर, निर्जरा, लोक, बोधिदुर्लभ आणि धर्म.

निर्जरा - दोन. एका अपेक्षेने १ अकाम व २ सकाम. दुसऱ्या अपेक्षेने १ सविपाक व २ अविपाक.

योग - मुख्यतः दोन, द्रव्ययोग व भावयोग.

मन-वचन-कायेच्या निमित्ताने योग १५ प्रकारचा आहे. ४ मनोयोग, ४ वचनयोग, ७ काययोग.

परिवर्तन - पाच. १. द्रव्य, २. क्षेत्र, ३. काल, ४. भव व ५ भाव.

शरीराचे नव द्वार - दोन कान, दोन डोळे, दोन नाकपुड्या, एक तोंड व मलमूत्राचे दोन द्वार.

### पाचवी ढाल : अंतरप्रदर्शन

(१) अनुप्रेक्षा व भावना - हे दोन्ही एकार्थवाचक आहेत. त्यात अंतर नाही.

(२) एकत्व भावना आणि अन्यत्व भावना - एकत्वभावनेमध्ये सुखदुःख भोगण्यात आत्म्याच्या एकत्वाचे चिंतवन असते तर अन्यत्वभावनेत शरीर, स्वजन आदिकांच्या अन्यत्वाचे चिंतवन असते. दोहोंचे उद्दिष्ट स्वपरभेद-विज्ञान पुष्ट करून वीतरागता वाढविणे हेच आहे.

(३) धर्म आणि धर्मानुप्रेक्षा - धर्मामध्ये आत्मस्वरूपात श्रद्धा-ज्ञान-चारित्र आदि निज गुणांत स्थिर राहण्याची मुख्यता आहे. तर अनुप्रेक्षेत धर्मस्वरूपाच्या चिंतवनाची मुख्यता आहे. धर्म विशाल असून धर्मानुप्रेक्षा धर्माचा एक अंश आहे.

□ □ □ □ □

# सहावी ढाल

(हरिगीत छन्द)

### मुनींच्या सकल चारित्राचे वर्णन

षटकाय जीव न हननतैं, सबविध दरवहिंसा टरी ।
रागादि भाव निवारितैं, हिंसा न भावित अवतरी ।।
जिनके न लेख मृषा न जल मृण, हूँ बिना दीयो गहैं ।
अठदस-सहस विध शील धर, चिदब्रह्ममें नित रमि रहैं ।।१।।



शब्दार्थ : हनन = हिंसा, घात. भावित = भावरूप (भावहिंसा). मृषा = खोटे. मृणा = माती. चिद्ब्रह्म = चैतन्यमय आत्मस्वरूप.

अन्वयार्थ : (षटकाय जीव न हननतैं) पाच स्थावर व त्रस अशा सहा प्रकारच्या जीवांचा घात न केल्याने (सबविध दरवहिंसा टरी) सर्व प्रकारच्या

जीवांचा घात न केल्याने (सबविध दरवहिंसा टरी) सर्व प्रकारची द्रव्यहिंसा टळते व (रागादि भाव निवारितैं) रागादिक विकार भावांचे निवारण केल्याने (भावित हिंसा न अवतरी) भावहिंसा देखील होत नाही. [अशा प्रकारे द्रव्य-भावहिंसेचा त्याग हे अहिंसा महाव्रत होय.](जिनके लेष मृषान) त्या मुनींना थोडेसेही असत्य असत नाही. [सत्य महाव्रत](जल मृण हूं बिना दियो न गहै) पाणी व माती सुद्धा कोणी दिल्याशिवाय घेत नाहीत; [अचौर्य महाव्रत] (अठदससहस विध शील धर) अठराहजार शील-भेदांना धारण करून - (नित चिदब्रह्ममें रमि रहै) सदैव चैतन्यरूप आत्मस्वरूपात रमण करतात. [ब्रह्मचर्य महाव्रत].

भावार्थ : मुनीपणाचे लक्षण साम्य आहे. निश्चय सम्यग्दर्शन व ज्ञानपूर्वक स्व-स्वरूपात सदैव एकाग्रतेने रमण करणे हे साम्य आहे. वस्तुतः ही मुनीदशा बारा कषायांच्या (४ अनंतानुबंधी, ४ अप्रत्याख्यानावरण व ४ प्रत्याख्यानावरण) अभावामध्ये असणाऱ्या शुद्धतेची भूमिका आहे. प्रामुख्याने शुद्धोपयोग हे मुनीचे लक्षण व प्रधान कर्तव्य आहे. त्यामुळे सातवे गुणस्थान तर वारंवार होतेच. परंतु संज्वलन चारित्रमोहनीयाच्या तीव्र उदयामुळे प्रमाद व दुबळेपणा असतो व मन्दकषायरूप भाव अवश्य असतात. अशी भूमिका असताना सहावे गुणस्थानही वारंवार होते. तेव्हा पाच महाव्रते, समिती, गुप्ती, नग्नत्व आदि व्यवहार चारित्ररूप शुभभाव असतात. तो मुनीपणाशी अविरोधी शुभोपयोग आहे. साधू त्या रागरूप शुभोपयोगास उपादेय मानत नाही. परंतु तो कर्मोदयवश त्या भूमिकेमध्ये असतो मात्र अवश्य. त्या भूमिकेत पाच महाव्रते होतात.

(१) बाह्यतः पाच स्थावर व एक त्रस अशा षटकाय जीवांच्या हिंसेचा पूर्णपणे त्याग व अंतरंगातून रागादि विकारांचा निरोध या प्रकारे द्रव्यहिंसा व भावहिंसेचा त्याग हे अहिंसा महाव्रत होय.

(२) सर्व प्रकारे असत्याचा त्याग करणे हे सत्य महाव्रत होय.

(३) कोणी दिल्याशिवाय पाणी व मातीसुद्धा ग्रहण न करणे हे अचौर्य महाव्रत होय.



(४) ब्रह्म म्हणजे आत्मा. अठरा हजार शीलदोष टाळून आपल्या शुद्धात्मस्वरूपात लीन होणे, रमण करणे हे ब्रह्मचर्य महाव्रत होय. ।।१।।

## अपरिग्रह महाव्रत, ईर्या व भाषा समितीचे स्वरूप

अंतर चतुर्दश भेद बाहिर संग दशधा तैं टलैं ।
परमाद तजि चउ कर मही लखि समिति ईर्यातैं चलैं ।।
जग सुहितकर सब अहितहर श्रुति-सुखद सब संशय हरैं ।
भ्रम-रोग-हर जिनके वचन मुख-चंद्रतैं अमृत झरैं ।।२।।



शब्दार्थ : अंतर = अंतरंग (विकाररूप). संग = परिग्रह. चतुर्दश भेद = चौदा प्रकारचा. चउ कर = चार हात. मही = भूमी. श्रुतिसुखद = ऐकण्यास सुखकारक. भ्रमरोगहर = भ्रम रोगाचे, मिथ्यात्वाचे निवारण करणारे.

अन्वयार्थ : ते वीतराग महाव्रती मुनी (चतुर्दश भेद अंतर दशधा वाहिर संग तैं टलैं है) चौदा प्रकारचा अंतरंग परिग्रह व दहा प्रकारचा बहिरंग परिग्रह यांनी रहित असतात. [अपरिग्रह महाव्रत] तसेच ते पाच समिती पाळतात. (परमाद तजि चउ कर मही लखि इर्या-समिति-तैं चलैं) प्रमाद सोडून समोरची चार हात जमीन पाहून ईर्यासमितीपूर्वक गमन करतात. तसेच (जिनके मुखचंद्रतैं) त्यांच्या मुखरूपी चंद्रापासून (जग-

सुहित-कर सब अहितकर) जगाचे सुहित करणारे, सर्व अहिताचा नाश करणारे (सब संशय हरैं) सर्व संशयाचे निवारण करणारे व(भ्रमरोगहर) भ्रम [मूढता] रोग नाहीसा करणारे (वचन अमृत झरैं) वचनरूपी अमृत झरते. [भाषासमिती].

भावार्थ : चौदा प्रकारचा मिथ्यात्वादि अंतरंग परिग्रह व दहा प्रकारचा धनधान्यादी बहिरंग परिग्रह यांचा त्याग करणे हे अपरिग्रह महाव्रत होय. अशा प्रकारे त्यांना पाच पापांचा सर्वथा त्याग असतो.

त्या पाच पापांच्या त्यागपूर्वक जो काही आहार-विहार-उपदेश आदी प्रवृत्ती असते ती देखील प्रमाद सोडून सावधानतापूर्वक असते. प्रवृत्ती हा तर रागभाव आहे व तो बंधास कारण आहे. परंतु प्रमादाचा व बेसावधपणाचा त्याग असतो व असमीचीन प्रवृत्तीचाही अभाव असतो. त्यामुळे समिती हे संवराचे कारण सांगितले आहे. आहारविहार उपदेशादी क्रिया यथावत् सावधानतापूर्वक असतात. त्यामुळे घाईघाईने मिळेल तो सदोष आहार ते घेत नाहीत. न मिळाला तरी संतुष्ट असतात. असेच सर्व क्रियांबाबत समजावे.

ईर्या समिती - मुनी प्रमाद सोडून समोरील चार हात जागा पाहून सर्व जीवजंतूंचा वध टाळून सावधानपणे गमन करतात. ही ईर्या समिती होय.

भाषा समिती - तसेच त्यांनी असत्य व अप्रिय भाषणाचा त्याग तर महाव्रतातच केला आहे. आता ते जे वचन बोलतात ते सत्य, मित, सर्व जगास हितकारक, अहिताचा नाश करणारे, तत्त्वामधील संशय दूर करणारे व भ्रम नाहीसे करणारे असते. जणू मिथ्यात्व रोग दूर करण्यास ते मुखचंद्रातून स्त्रवणारे अमृतच आहे ! ही भाषा-समिती होय. ।।२।।

एषणा, आदाननिक्षेपण व व्युत्सर्ग समितीचे स्वरूप

छयालीस दोष बिना सुकुल, श्रावकतने घर अशन को ।
लें तप बढावन होत नहिं तन पोषते तजि रसन को ।।
शुचि ज्ञान संयम उपकरन लखिकैं गहैं लखिकैं घरैं ।
निर्जन्तु थान विलोकि तनमल मूत्र श्लेषम परिहरैं ।।३।।









शब्दार्थ : सुकुल = कुलीन. श्रावकतने = श्रावकाच्या. अशन = आहार, भोजन. रसन = सहा रस. दूध, दही, तेल, तूप, मीठ, साखर. ज्ञान उपकरण = शास्त्राची ज्ञानाची साधनसामग्री. शुचि = पवित्र. संयम उपकरण = पिंछी कमंडलू आदि संयमाची साधने. निर्जन्तु = जीवरहित. थान = स्थान. श्लेषम = शेंबूड, थुंकी. परिहरैं = सोडतात, टाकतात.

अन्वयार्थ : ते मुनी (तप बढावन हेत) तपाची वृद्धी व जोपासना व्हावी या हेतूने (रसन को तजि) सहा किंवा सहांपैकी एक दोन वा अधिक रस सोडून (तन नहिं पोषते) शरीर पुष्ट न करता मात्र(छयालीस दोष विना) छेचाळीस आहारदोष टाळून (सुकुल श्रावकतने घर अशनको लें) कुलीन

श्रावकाच्या घरी विधिपूर्वक आहार घेतात. [एषणा समिती] (शुचि ज्ञान संयम उपकरण) पवित्र असे शास्त्र वगैरे ज्ञानाची उपकरणे-साधने आणि पिंछी, कमंडलू वगैरे संयमाची साधने(लखिकैं गहैं लखिकैं धरैं) सांभाळून, पाहून सावधपणे घेतात व पाहूनच ठेवतात. [आदान-निक्षेपण समिती] (निर्जन्तु थान विलोकि तनमल मूत्र श्लेषम परिहरैं) जीवरहित स्थान पाहून शरीराचा मल [शौच], मूत्र शेंबूड, थुंकी, कफ वगैरे टाकतात. [उत्सर्ग समिती].

भावार्थ : प्रमाद सोडून आणि सावधानतापूर्वक ही विशेषणे तर प्रत्येक समितीला लागूच आहेत.

एषणा समिती - शरीराच्या पुष्टीसाठी नव्हे तर संयम व तपाच्या साधनेकरिता सहा किंवा काही रस सोडून छेचाळीस[१] आहारदोष टाळून कुलीन व्रती श्रावकाकडे विधिपूर्वक निर्दोष आहार मिळाला तर घेतात ही एषणा समिती होय.

आदाननिक्षेपण समिती - तसेच पिंछीने स्थान निर्जंतुक शुद्ध करू तेथे शास्त्रादिक ज्ञानाची उपकणे व कमंडलू वगैरे संयमाची उपकरणे ठेवतात किंवा घेतात. ही आदाननिक्षेपण समिती होय.

उत्सर्ग समिती - जीवरहित स्थान पाहून शौच, मूत्र, शेंबडू, थुंकी वगैरे मल टाकतात. ही उत्सर्ग समिती होय.

याप्रमाणे पाच पापे टाळूनही जी प्रवृत्ती असते त्यामध्ये वर सांगितल्याप्रमाणे समीचीनता व सावधानता ठेवतात. ।।३।।

## तीन गुप्ती व इन्द्रियजयाचे स्वरूप

सम्यक प्रकार निरोधि मन-वच-काय आतम ध्यावते ।
तिन सुथिर मुद्रा देखि मृग-गन उपल खाज खुजावते ।।
रस रूप गंध तथा फरस अरु शद्व शुभ असुहावने ।
तिनमें न राग विरोध पंचेन्द्रिय-जयन पद पावने ।।४।।





शब्दार्थ : सम्यक = भले प्रकार. निरोध = रोकून. सुथिर मुद्रा = स्थिर रूप. मृगगन = हरणांचे कळप. उपल = दगड. फरस = स्पर्श. सुहावने = शुभ. चांगले. विरोध = द्वेष.

अन्वयार्थ : (सम्यक प्रकार मन-वच-काय-निरोधि आतम ध्यावते) चांगल्या प्रकारे मनवचनकायेच्या प्रवृत्तीचा निरोध करून ते आपल्या शुद्ध आत्म्याचे ध्यान करतात. (तिन सुथिर मुद्रा उपल देखि) त्यांचे स्थिर रूप पाहून जणू दगड आहे असे समजून(मृग-गन खाज खुजावते) हरणाचे कळप आपली खाज खाजवून शांत करतात. (शुभ असुहावने) शुभ अशुभ, वाईट आणि चांगले (रस रूप गंध तथा फरस अरु शद्व) रस, रूप, गंध, स्पर्श आणि शद्व हे पंचेन्द्रियांचे विषय (तिनके न राग विरोध) त्यामध्ये रागद्वेष न करता (पंचेन्द्रिय जयन पद पावने) पाच इन्द्रियांचे विजेते होतात, जितेन्द्रियपद प्राप्त करतात.

भावार्थ : ऐहिक लाभलोभ, मान, कीर्ती आदींची अपेक्षा असू नये यासाठी प्रत्येक गुप्तीच्या मागे सम्यक् विशेषण जोडले आहे केवळ स्वरूपसाधनेकरिता समीचीनपणे अशुभ मनवचनकायेच्या प्रवृत्तीला रोकणे हीच तीन प्रकारची गुप्ती आहे. गुप्तीमुळे मुनींची स्थिर व निश्चल आकृती पाहून वनात हरणांचे कळप त्यांना दगड समजून आपली खाज शांत करतात.

तसेच स्पर्शनेन्द्रियादी पाच इन्द्रियांचे स्पर्श, रस, गंध, रूप व शद्व हे विषय चांगले वाईट कसेही असले तरी शुभ विषयात इष्टता (राग) करीत

नाहीत व अशुभ विषयात अनिष्टता, मानून द्वेष करीत नाहीत. त्यामुळे ते जितेन्द्रिय - पाच इन्द्रियांचे विजेते - असतात. ।।४।।

मुनींचे सहा आवश्यक व अन्य गुण

समता सम्हारैं, थुति उचारे, वंदना जिनदेव को ।
नित करैं श्रुति-रति, करै प्रतिक्रम, तजैं तन अहमेवको ।।
जिनके न न्हौन, न दन्तधोवन, लेश अंबर आवरन ।
भूमांहिं पिछली रयनि में कछु शयन एकासन करन ।।५।।



शब्दार्थ : समता = सामायिक. सम्हारे = सावधपणे करतात. थुति = स्तुती, विनंती, प्रार्थना. श्रुतिरति = जिनागमात प्रीति, स्वाध्यायामध्ये रूची. प्रतिक्रम = कृतापराधाबद्दल पश्चाताप व प्रायश्चित्त. तन अहमेव = शरीरामध्ये. आत्मपणा. न्हौन = स्नान. दंतधोवन = दात घासणे. अंबर = वस्त्र. रयनि में = रात्री. शयन = झोप. एकासन = एकाच कडेवर.

अन्वयार्थ : (समता सम्हारैं) मुनी सामायिक विधिवत् सावधानपणे करतात, (थुति उचारै) स्तुतिपाठ करतात, (जिनदेवको वंदना) जिनेन्द्र-



अरहंत-सिद्धांची वंदना करतात. (नित श्रुत-रति करैं) सदैव रुचिपूर्वक स्वाध्याय करतात, (करैं प्रतिक्रम) कृतपराधाबद्दल प्रतिक्रमण करतात, (तन अहमेव को तजै) शरीरावरील ममत्वाचा त्याग-कायोत्सर्ग-करतात, (जिनके न न्हौन) त्यांना स्नान नसते, (न दंतधोवन) दात घासणे नसते, (लेश अंबर आवरन न) लेशमात्र वस्त्रांचे आवरणही नसते(पिछली रयनिमें भूमांहि कछु एकासन शयन करन) झोप उत्तर रात्री जमिनीवर मात्र एका कडेवर घेतात; तीही अत्यल्पच असते.

भावार्थ : मुनींची सहा आवश्यक आहेत. अवश्य करण्यायोग्य कार्यांना आवश्यक म्हणतात. त्यात मुभा (सूट) नसते. (१) सामायिक, (२) खऱ्या देवगुरुशास्त्राची स्तुति, (३) जिनेन्द्रदेवांची वंदना, (४) शास्त्रस्वाध्याय, (५) दोषासंबंधी प्रतिक्रमण व (६) कायोत्सर्ग (शरीरावरील ममत्वाचा त्याग) ही सहा आवश्यके आहेत.

शरीरावरील ममत्व सोडल्यामुळे ते शरीरसंस्कारही करीत नाहीत त्यासाठी (१) स्नान करीत नाहीत. (२) दात घासत नाहीत. (३) सर्वथा वस्त्ररहित दिगंबर वेष धारण करतात व (४) उत्तररात्री एका कडेवरच जमिनीवर काहीशी झोप घेतात. ।।५।।

मुनींच्या इतर क्रिया व समता वृत्ती

इकवार दिन में ले अहार खडे अलप निज-पानमें ।
कचलोंच करत न डरत परिषहसों, लगें निज ध्यानमें ।।
अरि-मित्र, महल-मसान, कंचन-कांच, निंदन-थुति करन।
अर्ध्यावतारन असिप्रहारन में सदा समता धरन ।।६।।

शब्दार्थ : अलप = अल्प, थोडा. पानमें = हातात. कचलोंच = केशलोंच, केश आपल्या हाताने काढून टाकणे. परीषह = नैसर्गिक आपत्ती, दुःखे. कंचन = सोने. अर्ध्यावतारन = अर्ध्य प्रदान करणे. असिप्रहारन = तलवारीने प्रहार करणे, घाव घालणे.

अन्वयार्थ : (दिनमें इकवार खडे निज-पानमें अलप अहार लेत) दिवसातून एकदाच उभ्याने आपल्या हस्तपात्रामध्ये थोडासा आहार घेतात.





(कचलोंच करत) केशलोंच करतात. (परीषहसों न डरत) परीषहांना घाबरत नाहीत. (निजध्यानमें लगे) आत्मध्यानात लवलीन असतात. (अरिमित्र, महल-मसान, कंचन-कांच, निंदन-थुतिकरन, अर्ध्यावतारन-असिप्रहारन में) शत्रुमित्र, महलस्मशान, सोने व काच, निंदास्तुती, अर्ध्यावतारन व असिप्रहार या युगलामध्ये, (सदा समता धरन) राग-द्वेष न करता निरंतर समताभाव उदासीन वृत्ती धारण करतात.

भावार्थ - (५) मुनिराज दिवसातून एकदाच (एक भुक्त), (६) उभे राहून आपल्या हाताच्या पात्रात थोडा आहार घेतात. (७) केशलोंच करतात. आत्मध्यानात लीन होऊन परीषहांना घाबरत नाहीत. भूक, तहान आणि वेदनादि दुःखे उपस्थित झाली तरीही आकुल न होता आत्मध्यानात लीन



होतात. हाच परीषहजय आहे. अवशपणे तर भूकतहान आदी वेदना सर्वांनाच सहन करावी लागते. मुनींना सुद्धा तीव्र कर्मोदयामुळे त्या वेदना संभवतात. त्यांना परीषह म्हणतात. परंतु ते शांतपणाने तत्त्वज्ञानपूर्वक त्या वेदना, बावीस परीषह सहन करतात. त्याबद्दल विषाद करीत नाहीत व त्यामुळे आपल्या समतेपासून ढळत नाहीत. हा परीषहजय असून तो दिगंबर साधूंनाच संभवतो व तो संवर निर्जरेचे महान कारण आहे.

सर्व पदार्थांना, परिणामांना ते जाणतात. परंतु कोठेही इष्टानिष्टबुद्धी करून व्याकुळ होत नाहीत, सर्वत्र त्यांची समबुद्धी-उदासीनता असते. सोने असो की काचेचा तुकडा असो, शत्रू असो की मित्र असो, राजवाडा असो की स्मशान असो, कोणी निंदा करो की कोणी स्तुती करो, कोणी अर्ध्य उतारू देत की तलवारीने प्रहार करू देत, सर्वत्र त्यांची मध्यस्थवृत्ती समबुद्धी असते.

वेदना अनुभवताना तेथे सुखदुःखाची भावना हे तर आर्तरौद्र ध्यान आहे. अतएव परीषहामध्ये त्यांना सुखदुःखाचे वेदन नसते. तेथे इष्टानिष्टबुद्धी नसते. म्हणूनच ते त्यावर विजय मिळवितात.

याप्रमाणे पाच महाव्रते, पाच समिती, पाच इंद्रियनिरोध, सहा आवश्यके, अस्नान, दात न घासणे, नग्नत्व, भूमिशयन, एकवेळ आहार घेणे, उभ्याने आहार घेणे व केशलोच हे मुनीचे अट्ठावीस मूलगुण आहेत. ।।६।।

## मुनींचे बारा तप, दश धर्म

तप तपैं द्वादश, धरैं वृष दश, रतनत्रय सेवैं सदा ।
मुनि साथमें वा एक विचरै, चहै नहिं भवसुख कदा ।।
यों है सकल संजम, चरित, सुनिये स्वरूपाचरन अब ।
जिस होत प्रगटै आपनीं निधि, मिटै परकी प्रवृत्ति सब ।।७।।

शब्दार्थ : वृष = धर्म. चहैं नहीं = इच्छा करीत नाहीत. कदा = केव्हाही.

अन्वयार्थ : दिगंबर मुनी (द्वादश तप तपैं) बारा प्रकारची तपे आचरतात. (दश वृक्ष धरैं) दहा धर्म पाळतात, धारण करतात. (सदा रतनत्रय सेवैं) नेहमी सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राची आराधना करतात. (मुनि साथमें वा एक विचरैं) ते मुनी संघाबरोबर अथवा एकाकी विहार करतात. (कदा भवसुख चहैं नहि) कधीही संसारसुखाची इच्छा करीत नाहीत. (यों है संकल संजम) या प्रमाणे सकल संयम समजावा. (अब स्वरूपाचरन चरित सुनिये) आता स्वरूपाचरण चारित्राचे वर्णन करतात ते ऐका. (जिस होत) जे प्राप्त झाले असता (आपनो निधि प्रगटैं) आत्म्याचा आपला गुणसमूह प्रगट होतो व (सब परकी प्रवृत्ति मिटै) व परांतील सर्वच रागद्वेषप्रवृत्तीचा अभाव होतो.

भावार्थ : मुनिवर कर्मनिर्जरेकरिता उपवासादि सहा बहिरंग व प्रायश्चित्तादि सहा अंतरंग तप आचरतात, उपवासादि तप हे शरीरावर अवलंबून असल्यामुळे व इतरांना दिसून येतात म्हणून त्यांना बहिरंग तप म्हणतात. प्रायश्चित स्वाध्यायादि तप हे मनावर अवलंबून असून इतरांच्या सहज लक्षात येत नाहीत. म्हणून त्यास अंतरंग तप म्हणतात. या सर्व प्रकारच्या तपामध्ये अंतरंगात इच्छेचा निरोध असतो व तेच यथार्थ तप आहे. इच्छानिरोधाशिवाय केवळ बाह्य उपवासादिक निर्जरेचे व मोक्षाचे साधन नाही. म्हणून सर्वत्र इच्छेचा निरोध हाच तपाचा गाभा आहे. बाह्य तपे ही अंतरंग परिणामांच्या विशुद्धिकरिता सांगितली आहेत. ती सहजपणे शक्यत्यानुसार आचरावीत. म्हणून सम्यग्दृष्टीचा त्यासंबंधी जसा हटाग्रह नसतो तसाच त्यामध्ये अरतिभावही नसतो.

मुनींना बारा कषायाचा अभाव असतो. तसेच मुनी उत्तम क्षमादी दहा धर्माचे पालन करतात. मुनींना या धर्मपालनामध्ये ऐहिक लोभ, मानादिकांची अपेक्षा नसावी, म्हणून तेथे उत्तम विशेषण जोडले आहे. या धर्मांनी उत्तम मोक्षपदाची प्राप्ती होते; म्हणूनच त्यांना धर्म म्हटले आहे. मुनीश्वर अहर्निश नित्य रत्नत्रयाची उपासना करीत असतात.

निष्कर्ष हा की, वीतरागता, स्वरूपस्थिरता हाच यथार्थ धर्म असून व्रत तप परीषहादिक ही सर्व त्याची साधने आहेत. म्हणून त्यांना व्यवहाराने धर्म



म्हटले आहे असे समजावे. याप्रमाणे सकलचारित्राचे वर्णन केले.

आता स्वरूपाचरण चारित्राचे वर्णन करतात, ते ऐका. त्या स्वरूपाचरण चारित्रामुळे आत्म्याचा अनंतज्ञानादिक गुणनिधी प्रगट होतो आणि परपदार्थाभिमुख प्रवृत्ती, रागद्वेषप्रवृत्ती दूर होते. ।।७।।

## स्वरूपाचरण चारित्राचे वर्णन

जिन परम पैनी सुबुधि-छैनी डारि अंतर भेदिया ।
वरनादि अरु रागादितैं निजभावकों न्यारा किया ।।
निजमाहिं निजके हेतु निजकर आपको आपै गह्यो ।
गुन गुनी ज्ञाता ज्ञान ज्ञेय मँझार कछु भेद न रह्यो ।।८।।



शब्दार्थ : परम पैनी = अतिशय तीक्ष्ण. सुबुधि = प्रज्ञा, भेदविज्ञान. छैनी = छन्नी, (दोन तुकडे करणारे लोखंडी हत्यार) डारि = टाकून. भेदिया = भेद करतो. गुनी = गुणांनी सहित वस्तू, द्रव्य. मँझार = मध्ये.

अन्वयार्थ : (जिन परम पैनी सुबुधि छैनी डारि) ज्याने अत्यंत तीक्ष्ण प्रज्ञारूपी छन्नी वापरून (अंतर भेदिया) अंतरंगात भेदविज्ञान प्राप्त केले आहे त्यामुळे (वरनादि अरु रागदितैं निजभावको न्यारा किया) वर्णादिक पुद्गलाचे परिणाम आणि रागादिक जीवाचे कर्मनिमित्तक विकार या दोहोपासून आपल्या चैतन्यतत्त्वाला वेगळे केले, (निजमाहिं

निजके हेतु निजकर आपको आपै गह्यो) तेव्हा तो आत्मा आपल्याच आत्म्यामध्ये आपल्याच पासून आपल्याच करिता आपणा करवी स्वयं आपल्या आत्म्यालाच ग्रहण करतो, तसेच (गुन-गुनी ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय मँझार कुछ भेद न रह्यो) गुण न गुणी द्रव्य तसेच ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय यात काहीच अंतर राहात नाही. यांतील भेदबुद्धी नष्ट होऊन सर्व एक शुद्ध (अभेद) आत्मरूपच असतात.

भावार्थ : आता कवी स्वरूपाचरण चारित्राचे वर्णन करतात. चारित्राची व्याख्याच मुळी स्वरूपात स्थिरतापूर्वक रमण करणे ही आहे. त्यामुळे सर्वत्र सकल किंवा विकल सम्यक्‌चारित्रामध्ये हे लक्षण गर्भित असतेच. म्हणजे स्वरूपाचरण हे चारित्राचे लक्षणच आहे. सम्यग्दृष्टीला जे अविरतिपूर्वक चारित्र असते तेव्हा श्रद्धारूपाने तो स्वरूपात रमण करतो. अर्थात तेव्हा अव्रतरूप बाह्य प्रवृत्ती असते. परंतु त्यामुळे श्रद्धेची दृढता नाहीशी होत नाही. श्रावकदशेमध्ये व मुनी दशेमध्ये व्रतरूप शुभ प्रवृत्ती असताना हे स्वरूपाचरण, आठ किंवा बारा कषायांच्या अभावामुळे (गौणरूपाने) असते. परंतु जेव्हा तो सर्व परिग्रहापासून दूर होतो. शुभाशुभ विकल्पाच्या अतीत होतो, तेव्हा तो सर्वप्रकारे स्वरूपात लीन होतो, त्याचा उपयोग एक मात्र शुद्ध आत्म्याच्या आश्रयाने प्रवृत्त होतो. तेच निश्चयचारित्र होय. त्यालाच शुद्धोपयोग, श्रामण्य, साम्य, मुनीपणा म्हणतात. म्हणजे शुद्धोपयोगरूप स्वरूपाचरण हे मुख्यतया मुनींना असते. त्यांना शुभोपयोग हेयबुद्धिपूर्वक व गौणरूपाने असतो. त्या शुद्धोपयोगाचे ध्यानदशेचे हे वर्णन आहे.

जिनवाणीच्या अवलंबनाने स्वपराचा यथार्थ निर्णय करणारी प्रज्ञा हीच एक छन्नी आहे. तिला अंतरंगामध्ये टाकण्याने स्व आणि पर यांचा भेद होतो. तेव्हा वर्णादिक व शरीर कर्मादिक पुद्‌गलाचे परिणाम हे जसे भिन्न अनुभवात येतात, तसेच पुद्‌गलाच्या बाजूला उपयोग झुकल्याने होणारे जीवाचे रागद्वेषादिक विकारी परिणाम हे सुद्धा शुद्ध चैतन्याच्या अनुभवापासून भिन्नच अनुभवास येतात. कारण जीवाचे लक्षण रागादिक नसून चैतन्य आहे. याप्रकारे साक्षात् स्वपरभेदविज्ञान करून आपल्या शुद्ध



आत्म्याचा स्वीकार करतो, म्हणजे तद्रूप परिणमतो. त्यावेळी या क्रियेमध्ये एक आत्माच हा कारणरूप असतो. द्रव्य, गुण रूप किंवा ज्ञाता ज्ञान ज्ञेय असाही विकल्प नसतो. गुणगुणीभेद तर वस्तू जाणण्यासाठी होता; अनुभवामध्ये त्या भेदबुद्धीचे प्रयोजन राहात नाही. तसेच जाणणाराही आत्मा, ज्याला जाणावयाचे ते ज्ञेयही आत्माच व जाननक्रियारूपही आत्माच अशी निर्द्वंद अभेद (तन्मय) अवस्था असते. ।।८।।

## स्वरूपाचरण चारित्र

जह ध्यान ध्याता ध्येयको न, विकल्प वच भेद न जहा ।
चिद्‌भाव कर्म चिदेश करता, चेतना किरिया तहा ।।
तीनों अभिन्न अखिन्न शुध-उपयोगकी निश्चल दशा ।
प्रगटी जहा दृग-ज्ञान-व्रत ये, तीनधा एकै लसा ।।९।।



शब्दार्थ : ध्याता = ध्यान करणारा. ध्येय = ध्यान करण्यायोग्य वस्तू. वचभेद = वचनभेद. चिद्भाव = आत्म्याचे परिणाम. चिदेश = चित् + ईशः आत्मा. अखिन्न = निराबाध. लसा = शोभायमान होतात.

अन्वयार्थ : (जह ध्यान ध्याता ध्येयको न विकल्प)जेथे ध्येय, ध्यान ध्याता असा विकल्प [भेद] नसतो. म्हणजे ध्यान करणाराही आत्मा, ध्येयही आत्मा व ध्यान हीही आत्मपरिणती असते (जहा वच भेद न)जेथे वचनाचे

भेद नसतात. (तहा चिद्भाव कर्म) तेथे जीवाचा परिणाम हेच कर्म, (चिदेश करता) आत्मा हाच कर्ता व (चेतना किरिया) चेतन करणे, अनुभवणे हीच क्रिया आहे; अशा प्रकारे (तीनों अभिन्न अखिन्न) हे तीन अभिन्न निराबाध सिद्ध होतात; (जहा शुध उपयोग की निश्चल दशा प्रगटी) जेथे अशी शुद्धोपयोगाची अचल दशा प्रगट होते. (जहा दृगज्ञान-व्रत तीनधा एकै लसा) तेथे सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यकचारित्र हे तीनही एकरूप अभेद शोभायमान होतात.

भावार्थ : त्या शुद्ध भूमिकेत ध्यान करणाराही (विकाराला न अनुभवणारा) शुद्ध आत्माच, ध्यान करण्यायोग्य वस्तुही स्वयं शुद्ध आत्माच व एकाग्र ध्यानरूपही आत्माच अशी निर्विकल्प अभेद भूमिका असते. आर्तध्यान, रौद्रध्यान व सविकल्प धर्मध्यानात ही भूमिका नसते, वचनभेद हे प्रारंभी ज्ञान करून देण्याकरिता असतात. अनुभव त्यापुढची पायरी असल्यामुळे वचनविकल्पाचेही येथे प्रयोजन उरत नाही. तेव्हा कर्ता, कर्म व क्रिया तिन्ही एक शुद्ध आत्मरूपच असतात. तेथे भेदच नसतो. अभेद निराबाध शुद्धोपयोग प्रगट होतो. हीच उपयोगाची-ज्ञानगुणाच्या जाननक्रियेची, शुद्ध परिणती आहे. तेव्हा सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र अशी भेदरूपाने उपासना शिल्लक राहात नाही. तर तिन्ही आत्म्याचेच गुण असल्यामुळे शुद्ध आत्म्याच्या अवलंबनाने होतात म्हणून एक अभेदरूपाने शोभायमान होतात. अशी ही रत्नत्रयाची एकता हाच यथार्थ मोक्षमार्ग आहे. ।।९।।

## पुनश्च स्वरूपाचरण चारित्राचे वर्णन

परमान नय निक्षेप को न, उदोत अनुभवमें दिखै ।
दृग-ज्ञान-सुख-बलमय सदा, नहिं आन भाव जु मों विखै ।।
मैं साध्य साधक मैं अबाधक, कर्म अरु तसु फलनितै ।
चित-पिंड चंड अखंड सुगुन करंड पुनि च्युत कलनित ।।१०।।

शब्दार्थ : साध्य = प्राप्त करण्यायोग्य. साधक = प्राप्त करणारा. मों विखै = माझ्यामध्ये. पिण्ड = समूह, साठा. चण्ड = तेजस्वी. करंड = पेटारा. कलनि = अशुद्धता.





अन्वयार्थ : (अनुभवमें परमान नय निक्षेपको उदोत न दिखै) अनुभवामध्ये प्रमाण, नय व निक्षेपाचा विकल्प प्रगट दिसत नाही. (मै सदा दृग-ज्ञान-सुख-बलमय) असा अनुभव होतो की मी अनंतदर्शन, अनंतज्ञान, अनंतबल व अनंतसुखरूप आहे; (जु आन भाव मों विखै नहिं) आणि दुसरे कोणतेही संसारातील औपधिक भाव माझ्यामध्ये नाहीत; (मैं साध्य-साधक कर्म अरु तसु फलनितै मैं अबाधक) मी साध्य साधक किंवा कर्मफल वगैरे विकल्पांनी अबाधित आहे; अखण्ड आहे; (चितपिंड) मी चैतन्याचा पिंड आहे (चंड) तेजस्वी प्रकाशवान् आहे (अखंड) एक अभेद आहे, (सुगुण-करंड) सद्गुणांचा करंडा आहे (पुनि कलनितैं च्युत) आणि इतर सर्व अशुद्धतेपासून मुक्त आहे.

भावार्थ : अनुभवामध्ये प्रमाण, नय व निक्षपाचेही विकल्प उरत नाहीत. कारण ही सर्व सविकल्प दशेमध्ये प्राथमिक भूमिकेतील वस्तु स्वरूपाच्या निर्णयाकरिता साधने आहेत. अनुभवदशा ही त्याच्या अतीत आहे. तो असा अनुभव करतो की, मी अनंतदर्शन-ज्ञान-सुख वीर्यरूप आहे, अन्य कोणतेही तुच्छ औपधिक भाव माझ्या स्वरूपात मुळी नाहीतच. साध्य-साधक, कर्म व कर्मफल हेही विकल्प या अनुभवदशेत नाहीत. हे विकल्प माझ्या आत्मानुभव दशेत असत नाहीत. मी चैतन्याचा पिण्ड आहे,

उज्ज्वल तेजस्वरूप आहे, अन्य कोणतीही अशुद्धता माझ्या स्वरूपात नाहीच मुळी ! ।।१०।।

### या शुद्धोपयोगरूप स्वरूपाचरणाचे फल

यो चिंत्य निजमें थिर भये, तिन अकथ जो आनंद लह्यो ।
सो इंद्र नाग नरेंद्र वा, अहमिंद्रकै नाहीं कह्यो ।।
तबही शुकल ध्यानाग्निकरि, चऊ घाति विधि कानन दह्यो ।
सब लख्यो केवल ज्ञानकरि भविलोकको शिवमग कह्यो।।११।।



शब्दार्थ : अकथ = अवर्णनीय. शुकल = शुक्ल, निर्मल. कानन = अरण्य.

अन्वयार्थ : (यो चिंत्य निजमें थिर भये) याप्रमाणे शुद्ध आत्म्याचे एकाग्र चिंतवन करून जे आपल्या शुद्ध आत्मस्वरूपात स्थिर झाले आहेत (तिन जो अकथ आनंद लह्यो) त्यांना जो अवर्णनीय, शब्दातीत आनंद प्राप्त होतो(सो इंद्र, नाग, नरेंद्र या अहमिंद्रकैं नाहीं कह्यो) तो इन्द्र, नागेन्द्र, चक्रवर्ती वा अहमिन्द्रांनाही नसतो, असे शास्त्र - [आगम] सांगते (तब ही शुकल ध्यानाग्नि करि) तेव्हाच हा जीवात्मा शुक्लध्यानरूपी अग्नीने (चउ घाति विधि कानन दह्यो) चार घातिकर्माचे अरण्य जाळून भस्मसात् करतो, (केवलज्ञानकरि सब लख्यो) केवलज्ञानाने सर्व काही साक्षात् युगपत जाणतो (भविलोकको शिवमग कह्यो) व भव्य जीवांना मोक्षमार्गाचा उपदेश देतो.





भावार्थ : याप्रमाणे आत्मानुभवाचे वेळी एकाग्र चिंतवन करणाऱ्यांना एक आगळाच अपूर्व आनंद प्राप्त होतो; तो संसारात इन्द्र नागेश, चक्रवर्ती, अहमिन्द्र आदि कोणालाच प्राप्त होत नाही. तो आत्मानंदाचा शुक्लध्यानाचा अग्नी एकदा पेटला की तो चार घातिकर्माचे अरण्य जाळून भस्मसात करतो व आत्मा केवलज्ञान प्राप्त करून त्या द्वारा जगातील सर्व वस्तुमात्रांना त्यांच्या अनंत गुणपर्यायासह साक्षात् युगपत् जाणतो. त्यामुळे अप्राप्य काहीच नसते. तो स्वयं कृतकृत्य होतो व इतर मुमुक्षू जनांना मोक्षमार्गाचा उपदेशही देतो. याप्रमाणे केवलज्ञानादि चतुष्टयाची प्राप्ती शुद्धोपयोगाचे फळ आहे. ।।११।।

### सिद्ध दशेचे वर्णन

पुनि घाति शेष अघाति-विधि, छिनमाहि अष्टम भू वसे ।
वसु-कर्म विनसे सुगुन वसु सम्यक्त्व आदिक सब लसे ।।

संसार खार अपार पारावार, तरि तीरहिं गये ।
अविकार अकल अरूप शुध, चिद्रूप अविनाशी भये ।।१२।।



शब्दार्थ : घाति = घात करून, नाश करून. अघाति विधि = चार अघाति कर्म. अष्टम भू = लोकांतीचे सिद्धालय, सिद्ध शिला. वसु = आठ. लसे = शोभायमान होतात. पारावार = समुद्र. तरि = पोहून. अकल = शरीरविरहित.

अन्वयार्थ : (पुनि शेष अघाति-विधि घाति) पुनः बाकी उरलेल्या चार अघाति कर्मांचा नाश करून (छिनमाही अष्टम भू वसे) क्षणमात्रात सिद्धशीलतेवर विराजमान होतो, (वसु कर्म बिनसे) त्याची आठ कर्मे नष्ट होतात. (वसु सम्यक्त्व आदिक सब सुगुन लसे) सर्व सम्यक्त्वादिक आठ गुणांनी शोभायमान होतात. (संसार खास अपार पारावार) संसार हा अमर्याद क्षार समुद्र आहे. (तरि तीरहिं गये) तो पोहून जाऊन परतीराला, अंताला पोहोचतो व (अविकार अकल अरूप शुध अविनाशी) निर्विकार, शरीर विरहित, अमूर्तिक, पवित्र, शाश्वत (चिद्रूप भये) असा चिद्रूप, चैतन्यमय होतो.

भावार्थ : हा जीव १४ व्या गुणस्थानांत उरलेल्या चार अघाती कर्मांचा ऱ्हस्व अइउऋऌ यांच्या उच्चारणमात्र (क्षणमात्र) काळात नाश



करतो. तत्काल एका समयात सिद्धशीलेवर विराजमान होतो. आता तो; दुःखांनी भरलेला हा अमर्याद संसार-सागर पोहून त्याच्या परतीराला गेलेला असतो. (येथे दुःखमय संसारास खाऱ्या समुद्राची उपमा अगदी सार्थ आहे) तेथे तो अविकारी शाश्वत शरीररहित अमूर्तिक, अत्यंत पवित्र व चैतन्यरूप होऊन असाच अनंत काळ सुखाचा आस्वाद घेत राहतो. ।।१२।।

## सिद्ध अवस्थेचे वर्णन

निजमाहि लोक अलोक गुन परजाय प्रतिबिंबित थये ।
रहि है अनंतानंत काल यथा तथा शिव परनये ।।
धनि धन्य है जे जीव नर-भव पाय यह कारज किया ।
तिनही अनादि भ्रमन पंच प्रकार, तजि वर सुख लिया ।।१३।।



शब्दार्थ : परजाय = पर्याय. परनये = परिणत होतात. कारज = कार्य.

अन्वयार्थ : (निजमाही लोक अलोक गुन-परजाय प्रतिबिंबित थये) केवलज्ञानस्वरूप आपल्या आत्म्यामध्येच लोक, अलोक, सर्व गुणपर्याय प्रतिबिंबित होतात. (यथा शिव परनये) अशा शाश्वत मुक्तिरूपाने परिणत झालेले (तथा अनंतानंत काल रहि हैं) हे तसेच अनंतानंत काळपर्यंत राहतील.

(जे जीव नर-भाव पाय) ज्या जीवांनी दुर्लभ मनुष्यभव प्राप्त करून (यह कारज किया) हे मोक्षसिद्धीचे कार्य केले. (ते धनी धन्य हैं) ते जीव महान धन्य धन्य आहेत ! (तिन ही अनादी पंच प्रकार भ्रमण तजि) त्यांनी अनादी काळापासून चालू असणाऱ्या पाच प्रकारच्या परिवर्तनाचा त्याग करून (वर सुख लिया) उत्कृष्ट सुख प्राप्त करून घेतले आहे.

भावार्थ : केवलज्ञान हा आत्म्याचा वास्तविक सहज स्वभाव आहे. परंतु तो कर्मसंयोगाने झाकाळलेला होता. आता कर्माचे आवरण दूर होताच तो सहज स्वभाव प्रगट होतो. व्यक्त केवलज्ञान स्वरूपी आत्म्यामध्ये लोक-अलोक व अनंत गुणपर्याय एके वेळी प्रतिबिंबित होतात. मोहाच्या उदयाच्या अभावामध्ये इच्छा कशाचीही नसते. साध्य ते सर्व सिद्ध झालेले असते. त्यामुळे सिद्ध कृतकृत्य असतात आणि अशाच स्वभाव रूपाने अनंतानंत काळापर्यंत अनंत सुखाचा आस्वाद घेत आपल्याच स्वरूपात मग्न राहतात.

हा दुर्लभ मानवजन्म प्राप्त करून ज्यांनी हे स्वरूपप्राप्तीचे महान कार्य केले ते खरोखर धन्य धन्य होत ! त्यांनी दुःखरूप पंचपरिवर्तनमय संसाराचा नाश केला आहे व उत्तम सुख प्राप्त करून घेतले आहे. ।।१३।।

### रत्नत्रयाचे फल सांगून आत्महित साधण्याची प्रेरणा

मुख्योपचार दुभेद यौं बड़भागि, रत्नत्रय धरैं ।
अरू धरैंगे ते शिव लहै तिन सुजश-जल जग-मल हरै ।।
इमि जानि आलस हानि साहस ठानि यह सिख आदरौ ।
जबलौं न रोग जरा गहैं तबलौं जगत निजहित करौ ।।१४।।

शब्दार्थ : मुख्य = निश्चय. उपचार = व्यवहार. हानि = सोडून. ठानि = करून. सिख = उपदेश. जरा = म्हातारपण.

अन्वयार्थ : (यौं मुख्योपचार दुभेद रत्नत्रय) याप्रमाणे निश्चय आणि व्यवहार असे दोन प्रकारचे रत्नत्रय (बड़भागी धरैं) जे महाभाग धारण करतात (अरु धरैंगे) आणि पुढेही धारण करतील (ते शिव लहै) ते मोक्ष प्राप्त करतील. (तिन सुजशजल-जगमल हरैं) त्यांचे सुयशजल हे जगातील मलाचे-पापाचे निवारण करते. (इमि जानि) असे जाणून (आलस हानि) आळस सोडून (साहस ठानि) साहस करून (यह सिख आदरौ) या मोक्षमार्गाच्या शिकवणुकीचा आदर करा. (जबलौ रोग जरा न गहैं) जोपावेतो रोग आणि म्हातारपणा गाठत नाही (तबलौ जगत निजहित करौ) तोपावेतो या जगातील जीवांनी आपले हित साधून घ्यावे, हे उत्तम.



भावार्थ : याप्रमाणे व्यवहार रत्नत्रय आणि निश्चय रत्नत्रय असे रत्नत्रयाचे दोन भेद आहेत. त्यांपैकी निश्चय रत्नत्रय हा साक्षात मोक्षमार्ग असून व्यवहार रत्नत्रय हा त्याचा सहचर भाव आहे व निश्चयाचा गमक हेतू आहे, कारण आहे. जे महाभाग या दोहोंचा यथार्थ अंगीकार करतात तेच मोक्ष प्राप्त करतात. निश्चय रत्नत्रयरूपाने परिणमणे हाच निश्चय रत्नत्रयाचा अंगीकार आहे, तर व्यवहाररत्नत्रय म्हणजे अंतरंग निश्चयरत्नत्रयाबरोबर असणारा सहचर रागरूप शुभ परिणाम आहे. यद्यपि तो आस्त्रवास कारण असल्यामुळे हेय आहे, तथापि तो त्या त्या भूमिकेमध्ये अवश्य असतो. तो व्यवहाराने अंतरंग विशुद्धीचे कारण आहे. असे जाणून तेथे हेयबुद्धिपूर्वक प्रवृत्ती होणे हाच व्यवहार रत्नत्रयाचा अंगीकार आहे. साधकाच्या भूमिकेमध्ये व्यवहार रत्नत्रय येतेच. अशा महान आत्म्याच्या सुयश जलाने जगातील मल (पाप) नाहीसे होते. कविवर प्रेरणा करतात की, वरीलप्रमाणे यथार्थ जाणून आळस सोडा ! थोडे साहस करा ! व्यवहारातील साहस हा दुःखाचा गर्तेत फसण्याचा मार्ग आहे. हे तत्त्वनिर्णयाचे व स्वरूपसाधनेचे साहस आजवर या जीवाने केलेले नाही. तेव्हा धैर्याने या मोक्षमार्गाचा उपदेशाचा अंगीकार करा ! जोपर्यंत रोग आणि म्हातारपणाने गाठलेले नाही तोपर्यंत सर्व सामर्थ्य पणाला लावून हे जगतातील जीवांनो ! आपले हित साधून घ्या ! नाही तर जर रोग, म्हातारपण आले तर मोक्षमार्गाच्या उत्कट पुरुषार्थात न्यूनता व व्यत्यय येईल आणि मृत्युने गाठल्यानंतर पुनः मानवभव केव्हा मिळेल हे कोण सांगू शकेल ? म्हणून उठा ! वेळ दवडवू नका व आपले हित साधा ! ।।१४।।

अंतिम उपदेश व प्रेरणा

यह राग आग दहै सदा, तातै समामृत सेईये ।
चिर भजे विषय कषाय अब तौ, त्यागि निजपद बेईयें ।।
कहां रच्यो पर पद में न तेरो, पद यहैं, क्यों दुख सहै ।
अब दौल ! होऊं सुखी स्वपद रचि दाव मत चुको यहै ।।१५।।



शब्दार्थ : भजे = सेवन केले. निजपद = आपले स्वरूप, मोक्षपद. वेईये = अनुभवावे. रच्यो = मस्त होतोस. पद = अवस्था. दाव = अवसर.

अन्वयार्थ : (यह राग आग सदा दहै) हा रागरूपी अग्नी या प्राणी - मात्रास सदैव जाळत आहे (तातै समामृत सेईये) म्हणून समतारूपी अमृताचे सेवन करावे. (विषय कषाय चिर भजै) विषय आणि कषायांचे तर चिर काळापासून सेवन केले आहे. (अब तो त्यागि निजपद वेईये) आता तरी त्या विषयकषायांचा त्याग करून स्वरूपाचा अनुभव करावा. (पर पद में कहां रच्यो) परपदामध्ये [परद्रव्यामध्ये व कर्माच्या उदयरूप विकारामध्ये] का बरे दंग होतोस ?(यहै तेरो पद न) हे परभाव तुझे पद नव्हे. (क्यों दुःख सहै) का बरे दुःख सहन करतोस ?(दौल ! अब स्वपद रचि सुखी होय) अरे दौलतराम ! आता स्वपदामध्ये रत होऊन सुखी हो !(यह दाव मत चुकौ) हा दुर्लभ अवसर वाया घालवू नकोस !



भावार्थ : हा संसारी प्राणी सदैव रागरूपी अग्नीने होरपळत आहे. त्याचा इलाज म्हणून हा अनादी काळापासून विषय आणि कषायांचे सेवन करीत आला आहे. परंतु त्यामुळे ही रागाची-आसक्तीची आग विझण्याऐवजी भडकलेलीच आहे. म्हणून समतारूपी अमृताचे पान करावे, आता तरी विषयकषायांचा त्याग करून चैतन्यशाली आत्मस्वरूपाचा स्वीकार करावा, हे आत्मन् ! नरनारकादी पर्याय व विषयकषाय तुझे स्वरूप नव्हे ! यामध्ये तू काय म्हणून रत होतो आहेस ? का बरे निष्कारण दुःखाचा भार सहन करतो आहेस ? कविवर दौलतराम स्वतःलाच संबोधून म्हणतात - (कारण इतरांना संबोधन करण्यापेक्षा स्वतःलाच सावध करण्याची अधिक आवश्यकता आहे.) हे दौलतराम ! आपल्या ज्ञानस्वरूपात रत होऊन सुखी हो ! ही दुर्लभ सुसंधी चालून आली आहे ती हातची जाऊ देऊ नकोस !।।१५।।

ग्रंथरचनेचा काळ व कवीची प्रशस्ती

इक नव वसु इक वर्ष की, तीज शुकल वैशाख ।
१ ९ ८ १
कऱ्यो तत्त्व उपदेश यह, लखिं बुधजन को भाख ।।
लघु धी तथा प्रमादतै शद्व अर्थ की भूल ।
सुधी सुधार पढो सदा, ज्यों पावो भव-कूल ।।१६।।

पंडित बुधजनकृत छहढालेचा आधार घेऊन मी (पं. दौलतरामजीने) विक्रम संवत (१८९१ (अंकानां वामतो गतिः अंकांची गती उलटी असते या न्यायाने) वैशाख शुद्ध तृतीयेच्या दिवशी या छहढाला ग्रंथाची रचना केली. अल्प बुद्धी आणि प्रमादामुळे जर शब्दविषयक किंवा अर्थविषयक चूक आढळून येईल तर बुद्धिवंतांनी ती सुधारून घ्यावी, की ज्यामुळे हा भवसमुद्र पार करता येईल. ।।१६।।

## सहावी ढाल : सारांश

सहाव्या ढालीमध्ये मुनींचे सकलचारित्र आणि स्वरूपाचरण चारित्र यांचे वर्णन आहे.

स्वरूपाचरण हे चारित्राचे सामान्य स्वरूप आहे. रागादि विकारभाव व विषयादिकापासून निवृत्त होणे व आपल्या निर्विकार शुद्ध स्वरूपात लीन होणे हे चारित्र आहे. त्यासच स्वरूपाचरण चारित्र म्हणतात. चारित्राची सुरुवात सम्यग्दर्शनाबरोबरच होते. कारण सम्यग्दर्शन ज्ञान चारित्र यांची एकता हा मोक्षमार्ग आहे. चौथ्या गुणस्थानामध्ये असंयम असतानाही स्वरूपाचरण चारित्र असते. पुढे पुढे जसा जसा कषायांचा अभाव होतो तशी तशी स्वरूपात अधिक स्थिरता होते. म्हणून चौथ्या पाचव्या गुणस्थानात स्वरूपाचरण गौणरूपाने असते. तर पुढे मुनींना ते मुख्यरूपाने असते, स्वरूपाचरण चारित्र हे निर्विकल्प असते. भेदविज्ञानाच्या द्वारा प्रथम स्वरूपाचा निर्णय करून नंतर तो स्वरूपाचा स्वीकार करतो व त्यात लीन होतो. ज्ञान-ज्ञेय-ज्ञाता, ध्यान-ध्येय-ध्याता, प्रमाण-नय-निक्षेप इत्यादि कोणतेच विकल्प नसतात. ती आत्म-अनुभव दशा निर्द्वन्द असते. (एकमात्र आत्मध्यानरूप असते.) तेथे गुणभेदाचाही विकल्प नसतो, एक शुद्ध आत्म्याचे वेदन असते. या दशेलाच शुद्धोपयोग म्हणतात.

मुनींना बाह्यतः व्यवहारचारित्र असते. ते पाच महाव्रते, पाच समिती, तीन गुप्ती पाळतात, पाच इन्द्रियांचा निरोध करतात. दंतधावन करत नाहीत. स्नान करीत नाहीत, आहारही उभे राहून घेतात व तोही एकदाच घेतात. वेष दिगंबर असतो. जमिनीवर झोपही अल्पशी घेतात. केशलोच करतात. सर्वत्र त्याची समबुद्धी असते. असे मुनीवर ज्ञान व ध्यानात लीन असतात, शुद्धोपयोगमय होतात. शुद्धोपयोगाच्या प्रकर्षाने कर्माची निर्जरा होते. शुक्लध्यान होते, त्या शुद्ध निर्मल शुक्लध्यानाने क्रमाने प्रथमतः मोहनीय कर्माचा नाश होतो, नंतर ज्ञानावरण, दर्शनावरण व अंतराय या तीन घातिकर्माचा एकदम नाश होतो. आत्मा केवलज्ञानी होतो, अंती १४ व्या गुणस्थानात चार अघातिकर्मांचा नाश होतो व सिद्धपदाची प्राप्ती होते. तेथे आपल्या अनंतज्ञानादि गुणांनी शोभायमान असतात. अनंतकाळ अनंतसुखाचा अनुभव घेतात, संसारातील सर्व आकुलतेचा तेथे अभाव असतो, अशा अनुपम दशेत असेच अनंतकाळ राहतात. जीवमात्राचे हे अंतिम साध्य आहे. ज्यांनी मनुष्यभव प्राप्त करून मोक्षाची प्राप्ती करून घेतली ते खरोखरच धन्य होत ! धन्य होत !!



या प्रकारे जे साधनरूपाने व्यवहाररत्नत्रयाचा अंगीकार करून निश्चय रत्नत्रयाची प्राप्ती करून घेतात ते अवश्य मोक्ष मिळवितात. या जीवाने विषय आणि कषायामुळे संसारात परिभ्रमण केले आहे, परंतु त्यास खरे सुख व शांती मिळाली नाही, तो रागाने होरपळूनच निघाला. हे लक्षात घेऊन ग्रंथकार संबोधन करतात. हे आत्मन ! आता तरी विषयकषायांच्या मागे न लागता रत्नत्रयाची साधना कर ! निजपदाची प्राप्ती करून घे. अनंत सुखाचा आस्वाद घे ! पहा ही सुसंधी गमावू नकोस !

## सहावी ढाल : लक्षणसंग्रह

अंतरंग तप - जे मुख्यतः मनाच्या आश्रित असते आणि बाह्य जगास दिसून येत नाही ते तप अंतरंग तप होय.

अनुभव - श्रद्धेची, ज्ञानाची व चारित्राची (रमणतेची) प्रवृत्ती मात्र शुद्ध आत्म्याच्या सन्मुख होणे यास अनुभव म्हणतात.

अनुभव - स्वोन्मुख ज्ञान आणि सुखाचे वेदन. दोहोंचाही आशय एकच आहे.

आवश्यक - मुनींना अवश्य करण्यायोग्य असे नित्य कर्तव्ये.

कायगुप्ति - कायेच्या निमित्ताने होणारी आत्मप्रदेशांची चंचलता रोकून आत्म्यामध्ये लीनता ही कायगुप्ती होय.

गुप्ती - मन वचन काय यांची प्रवृत्ती सम्यक् रीतीने (भेदविज्ञानपूर्वक) रोकणे यास गुप्ती म्हणतात.

तप - इच्छेचा निरोध करून स्वस्वरूपात प्रतपन करणे यास तप म्हणतात.

ध्यान - एकाच ज्ञेय विषयामध्ये एकाग्रपूर्वक क्षायोपशमिक ज्ञानाची प्रवृत्ती रोकणे-स्थिर करणे (उपयोग एकाग्र करून इतरत्र न जाऊ देणे) यास ध्यान म्हणतात.

नय - जे ज्ञान वस्तूच्या एका अंशाला, धर्माला मुख्य करून व दुसऱ्या अशाला गौण करून वस्तूला जाणते तो नय होय. सम्यग्ज्ञानरूप श्रुतज्ञान प्रमाणांचा जो अंश त्यासही नय म्हणतात. दोहोंचाही भाव एकच आहे.

निक्षेप - पदार्थवाचक शब्दाचा पदार्थांमध्ये नामादि रूप जो व्यवहार होतो त्यास निक्षेप म्हणतात. निक्षेप हा नयाचा विषय असतो.

परिग्रह - निश्चयाने परवस्तूवरील ममताबुद्धीला - रागबुद्धीला परिग्रह म्हणतात. निमित्तभूत धनधान्यादि परिग्रह आहेत ते व्यवहारतः.

परीषह - भूक, तहान आदि दुःखवेदनांना परीषह म्हणतात.

परीषहजय - दुःखाचे कारणात दुःखी न होता व सुखाची कारणे मिळाली असता सुख न मानता मात्र ज्ञाता होऊन उदासीन राहणे हा परीषहजय होय.

प्रतिक्रमण - भूतकाळांतील मनवचनकायकृत कर्मापासून आत्मा वेगळा करणे.

प्रमाण - स्वपर अर्थाचा निर्णय करणारे सम्यग्ज्ञान.

बहिरंगतप - जे तप शरीरादि बाह्य पदार्थांच्या आश्रयाने होते व दुसऱ्यांना ज्ञात होते ते बहिरंग तप होय.

मनोगुप्ती - मनःप्रवृत्तीला विषयादिकांपासून हटवून स्वभावसन्मुख बनविणे ही मनोगुप्ती होय.

महाव्रत - पाच पापांचा तीन योगपूर्वक कृत कारित अनुमोदनेने सर्वथा त्याग करणे यास महाव्रत म्हणतात.



रत्नत्रय - सम्यग्दर्शन, ज्ञान व चारित्रास रत्नत्रय म्हणतात.

वचनगुप्ती - वीतरागतेपूर्वक स्वभावसन्मुख होऊन वचनप्रवृत्तीचा निरोध करणे ही वचन-गुप्ती होय.

शुक्लध्यान - अत्यंत निर्मल वीतरागतापूर्ण ध्यानास शुक्लध्यान म्हणतात.

शुद्ध - उपयोग - शुभाशुभ रागद्वेषादि विकारांनी रहित आत्मस्वरूपाकडे सन्मुख उपयोगाच्या स्थिर-प्रवृत्तीला शुद्धोपयोग म्हणतात.

समिति - प्रमादरहित यत्नाचारपूर्वक सावधान प्रवृत्तीला समिती म्हणतात.

स्वरूपाचरण चारित्र - आत्मस्वरूपामध्ये एकाग्रतापूर्वक लीनतेला स्वरूपाचरण चारित्र म्हणतात.

## सहावी ढाल : भेदसंग्रह

आवश्यक : सहा. (१) सामायिक (२) स्तुती (३) वंदना (४) स्वाध्याय (५) प्रतिक्रमण (६) कायोत्सर्ग.

अंतरंग परिग्रह : चौदा. १. मिथ्यात्व, ४ कषाय व ९ नोकषाय.

अंतरंग तप : सहा. (१) प्रायश्चित्त (२) विनय (३) वैय्यावृत्य (४) स्वाध्याय (५) व्युत्सर्ग व (६) ध्यान.

उपयोग तीन : १ शुद्ध उपयोग, २ शुभ उपयोग, ३ अशुभ उपयोग. चारित्राच्या मुख्यतेने हे उपयोगाचे कथन आहे. ज्ञानाच्या भाषेत हे चारित्राच्या अवस्थेचे कथन आहे. येथे ज्ञान व दर्शनगुणाच्या परिणामाची विवक्षा नाही.

आहारदोष : छेचाळीस. दात्याच्या आश्रयाने १६ उद्‌गम दोष, पात्राच्या आश्रयाने १६ उत्पादन दोष, आहारसंबंधी १० दोष व भोजनक्रियेसंबंधी ४ दोष.

चारित्र : तेरा. ५ महाव्रते, ५ समिति, ३ गुप्ती.

धर्म : दहा. १ उत्तम क्षमा, २ उत्तम मार्दव, ३ उत्तम आर्जव, ४ उत्तम शौच, ५ उत्तम सत्य, ६ उत्तम संयम, ७ उत्तम तप, ८ उत्तम त्याग, ९ उत्तम आकिंचन्य, १० उत्तम ब्रह्मचर्य.

मुनींचे मूलगुण : अठ्ठावीस. पाच समिती, पाच महाव्रते, पंचेन्द्रिय विजय, सहा आवश्यक, अस्नान, अदंतधावन, दिगंबरत्व, भूमिशयन, उभ्याने आहार, एकवेळ आहार, केशलोच.

सिद्धांचे गुण : आठ. आत्मविशुद्धीद्वारा आठ कर्मांच्या अभावामध्ये आत्म्याच्या गुणांचे आठ शुद्ध पर्याय उत्पन्न होतात. १. अनंतदर्शन, २. अनंतज्ञान, ३. सम्यक्त्व अनंतसुख, ४. अनंतवीर्य, ५. अव्याबाधत्व, ६. अवगाहनत्व, ७. सूक्ष्मत्व, ८. अगुरुलघुत्व.

नय : दोन निश्चयनय, व्यवहारनय, अन्य विवक्षेने १. द्रव्यार्थिक, २. पर्यायार्थिक.

निक्षेप : चार. नाम, स्थापना, द्रव्य, भाव.

प्रमाण : दोन प्रत्यक्ष व परोक्ष.

बहिरंग तप : सहा. १. अनशन, २. अवमोदर्य, ३. वृत्तिपरिसंख्यान, ४. रसपरित्याग, ५. विविक्त शय्यासन, ६. कायक्लेश.

परीषह : बावीस. क्षुधा, तृषा, शीत, उष्ण, दंशमशक, नाग्न्य, अरति, स्त्री, चर्या, निषद्या, शय्या, आक्रोश, वध, याचना, अलाभ, रोग, तृणस्पर्श, मल, सत्कार-पुरस्कार, प्रज्ञा, अज्ञान, अदर्शन.

शीलाचे १८००० विकल्प : अचेतन स्त्रीच्या अपेक्षेने ७२० अचेतन स्त्री तीन प्रकारची (कठोरस्पर्श, मृदुस्पर्श व चित्रपट) तिच्याशी कृत, कारित, अनुमोदित या तिहीने मन व वचन योगद्वारा, पाच इन्द्रियांनी चार संज्ञासहित (आहार, भय, मैथुन, निद्रा) द्रव्य व भाव अपेक्षेने सेवन ३x३ x २ x २ x ४ x २ = ७२० तसेच चेतन स्त्रीच्या अपेक्षेने -



स्त्री (देवी, मनुष्य स्त्री व तिर्यंचिणी) तीन प्रकारची. तिच्याशी उपरोक्त तीन कारणांनी तीन (मन-वचन-काय) योगद्वारा पाच इंद्रियांनी चार संज्ञासहित द्रव्याचे व भावाने सोळा प्रकारच्या कषायद्वारा सेवन (४ अनंतानुबंधी, ४ अप्रत्याख्यानावरण, ४ प्रत्याख्यानावरण व ४ संज्वलन) ३ x३ x ३ x ५ x ४ x २ x १६ = १७२८०.

वरील ७२० + १७२८० मिळून १८००० शीलदोषांचे विकल्प.

## सहावी ढाल : अंतरप्रदर्शन

(१) सत्य महाव्रत व भाषा समिती : सत्य महाव्रतामध्ये असत्याचा त्याग असतो. परंतु भाषा समितीमध्ये सत्य असून हितकारक मित व प्रिय बोलण्याची प्रवृत्ती आहे. अहित, अप्रिय, वचन, बडबडीचा निषेध असतो.

(२) नय आणि निक्षेप : नय ज्ञानाचा भेद असून निक्षेप हा शब्दाचा पदार्थामधील चार प्रकारचा व्यवहार आहे. निक्षेप हा नयाचा विषय आहे.

(३) प्रमाण व नय : प्रमाण ज्ञान सामान्य व विशेषात्मक संपूर्ण वस्तूला गौणमुख्य न करता जाणते तर नय ज्ञान वस्तूच्या एका अंशाला मुख्य करून व दुसऱ्यास गौण करून जाणते.

## छहढालेतील छंदवृत्ते

पहिली ढाल : मंगलाचरण - सोरठा छंदात असून शेष श्लोकांचा छंद चौपाई (जयकरी असेही त्यास म्हणतात) चरण चार, प्रत्येकी चरणात १५ मात्रा. चरणाचे शेवटी गुरु व लघुचा क्रम.

दुसरी ढाल : पद्धरी छन्द - चरण चार; प्रत्येक चरणात १६ मात्रा; यति-प्रत्येक आठ आठ मात्रांवर; शेवटी अक्षरे लघु, गुरु, लघु या क्रमाने येतात.

तिसरी ढाल : (नरेन्द्र छन्द) जोगीरासा, यालाच नरेन्द्र छन्द म्हणतात. यात चरण चार; प्रत्येक चरणात २८ मात्रा. यति-१६ आणि बारा मात्रांवर. शेवटी लघु, लघु, गुरु, गुरु आता क्रम असतो.

चौथी ढाल : छन्द रोला; यात चरण चार; प्रत्येक चरणात चोवीस मात्रा. यति-१४ आणि १० मात्रांवर. अंती बहुधा लघु, गुरू गुरू असा क्रम असतो.

पाचवी ढाल : छन्द चाल; यास सखी छन्दही म्हणतात. यात चरण चार; प्रत्येक चरणात १४ मात्रा असतात. यति-चरणाचे शेवटी गुरू, गुरू असा क्रम असतो. क्वचित लघु, गुरू असाही असतो.

सहावी ढाल : छन्द हरिगीता. यात चरण चार; प्रत्येक चरणात २८ मात्रा. यति - प्रत्येक १६ आणि १२ मात्रांवर. ५, १२, १९ व २६ वी मात्रा लघु असते. चरणाचे शेवटी बहुधा गुरू लघु, गुरु असा क्रम असतो.

## प्रश्नावली

### ढाल पहिली

१. असंज्ञी, उर्ध्वलोक, एकेंद्रिय, कर्म, गती, चतुरिंद्रिय, द्वींद्रिय, अधोलोक, पंचेंद्रिय, प्रत्येक जीव, मध्यलोक, साधारण जीव, त्रस जीव, यांची लक्षणे सांगा.

२. साधारण व प्रत्येक, त्रस व स्थावर, संज्ञी व असंज्ञी, सुख व दुःख यांमधील अंतर सांगा.

३. अनादि [संसार] परिभ्रमणाचे कारण, तसेच भवनत्रिकामध्ये उत्पन्न होणे व स्वर्गामधील दुःखाचे कारण सांगा.



४. खालील बाबीसंबंधी टिपणे द्या ?

निगोद, निर्बल पशु, मनुष्याची वृद्ध अवस्था, नारकी जीवांची भूक-तहान, थंडी, उष्णतेची दुःखे वैतरणी नदी, मन्दारमाला, मनुष्य गतीतील बाल, वृद्ध अवस्थेतील दुःखे, जीव व कर्माचा संबंध.

५. पहिल्या ढालेचा सारांश सांगा अथवा चार गतीमधील दुःखे यावर निबंध लिहा.

### ढाल दुसरी

१. व्याख्या लिहा.

अगृहीत मिथ्यादर्शन, अगृहीत मिथ्याज्ञान, अगृहीत मिथ्याचारित्र, कुदेव, कुगुरु, कुधर्म, गृहीत-मिथ्यादर्शन, गृहीत मिथ्याज्ञान, गृहीत मिथ्याचारित्र, जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश, काल, भावहिंसा, द्रव्यहिंसा, कुगुरु, परिग्रह.

२. मिथ्यादृष्टी जीव आत्मा, जन्म, मरण व अनिष्ट पदार्थ यासंबंधी कसा विचार करतो ?

३. गृहीत मिथ्यात्व व अगृहित मिथ्यात्व, कुगुरु व सुगुरु, कुधर्म सद्धर्म कुदेव-सुदेव यांमधील अंतर सांगा.

४. आत्मा व अनात्मा यांच्या ज्ञानाशिवाय सर्व क्रिया व्यर्थ आहेत हे कसे ?

५. तत्त्वाची ओळख न होण्यामधे दोष कोणाचा ?

### ढाल तिसरी

१. व्याख्या सांगा.

अजीव, अन्तरात्मा, बहिरात्मा, सकल-परमात्मा, निकलपरमात्मा, कषाय, निश्चय काललल, देव-मूढता, लोक-मूढता, कषाय, आस्त्रव, संवर, निर्जरा, अनायतन, निमित्तकारण.

२. टिपणे लिहा.
सात-तत्त्वे, आठ-मद (गर्व) व तीन मूढता, अनायतन, आठ-अंग, चौदा गुणस्थान, आठ-कर्म.

३. भेद स्पष्ट करा.
गृहीत-अगृहीत मिथ्यात्व, अंतरात्मा व बहिरात्मा, सम्यग्दृष्टीचे सप्ततत्त्व श्रद्धान व मिथ्यादृष्टीचे तत्त्वश्रद्धान.

४. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.
(१) मिथ्यात्वीपेक्षा सम्यक्त्वी श्रेष्ठ का ? (२) कुदेव कुगुरू व कुधर्म यांवर निष्ठा का ठेवू नये ? (३) रत्नत्रय सुखाचे कारण कसे ? (४) सम्यग्दर्शन हे धर्माचे मूळ का म्हणतात ?

## ढाल चौथी

१. लक्षणे सांगा.
अणुव्रत, अहिंसाणुव्रत, अचौर्याणुव्रत, गुणव्रत, अनर्थदंडव्रत, परोक्ष, मतिज्ञान, मनःपर्ययज्ञान, केवलज्ञान, अपध्यान, सामायिक, संशय, हिंसादान, शिक्षाव्रत, प्रमादचर्या, प्रोषधोपवास, दिग्विरती.

२. अंतर सांगा.
अणुव्रत-महाव्रत, दिग्व्रत-देशव्रत, प्रत्यक्ष-परोक्ष, देश प्रत्यक्ष सकल प्रत्यक्ष, पुण्यफल-पापफल, भावहिंसा-द्रव्यहिंसा.

३. भेद किती व कोणते हे सांगा.
अनर्थदण्ड, सम्यग्ज्ञान, व्रते, ज्ञानाचे दोष, पाप, विकथा, हिंसेचे प्रकार.

४. खालील विषयावर टिपणे लिहा.
(१) प्रोषधोपवासाचा विधी, (२) ज्ञानी व अज्ञानी जीवांची निर्जरा, (३) सल्लेखना व आत्मघात, (४) सम्यग्ज्ञानाची महिमा, (५) सप्त तत्त्व.

५. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.
(१) बारा व्रते, (२) सप्त तत्त्वे, (३) रत्नत्रय.



## ढाल पाचवी

१. व्याख्या लिहा.
शुभोपयोग, अशुभोपयोग, शुद्धोपयोग, अनुप्रेक्षा, बोधिदुर्लभभावना, समिती, भूमिशयन, सकलव्रत, अविपाक निर्जरा, संवरभावना, अन्यत्वभावना. धर्मभावना, योग.

२. परस्पर अंतर सांगा.
(१) एकत्वभावना व अन्यत्वभावना (२) अनुप्रेक्षा-भावना (३) धर्मद्रव्य-धर्मभावना व धर्म (४) सकामनिर्जरा-अकामनिर्जरा (५) शुभोपयोग-शुद्धोपयोग (६) द्रव्ययोग-भावयोग.

३. भेद किती व कोणते ते सांगा.
समिती, महाव्रत, आवश्यक, मलद्वार, परिवर्तन, सप्तधातु, इंद्रियांचे विषय.

## ढाल सहावी

१. व्याख्या लिहा.
(१) अंतरंग तप (२) निश्चयनय (३) व्यवहारनय (४) मनोगुप्ती (५) वचनगुप्ती (६) निक्षेप (७) ध्यान (८) अनुभव (९) स्वरूपाचरणचारित्र (१०) अघातिया कर्म.

२. खालील बाबीतील फरक सांगा.
गुप्ती-समिती, निश्चयचारित्र - व्यवहारचारित्र, नय - निक्षेप बहिरंगतप - अभ्यंतरतप, प्रमाण - नय, शुद्ध उपयोग - अशुभोपयोग.

३. खालील विषयक टिपणे लिहा.
स्वरूपाचरण चारित्र, मुनींचे २८ मुलगुण, अरिहंत दशा, मोक्ष अवस्था, मुनींचा आहार.

४. सहाव्या ढालीचा सारांश लिहा.

५. ग्रंथ-कर्त्याचा परिचय लिहा.

□ □ □ □ □

## दक्षिण भारतीय दिगंबर जैन महासभा : धर्मपरीक्षा कार्यालय - बाहुबली (कोल्हापूर)

### प्रश्नपत्रिका सन १९७७

प्रश्न १ ला - खालील कोणत्याही पाच शीर्षकांचे श्लोक शुद्ध लिहा.

| | |
|---|---|
| १. निकल परमात्म्याचे स्वरूप | २. सम्यग्ज्ञानाचे माहात्म्य |
| ३. निर्दोष व्रतपालनाचा महिमा | ४. मिथ्या देवाचे स्वरूप |
| ५. आठ अंगांचे लक्षण | ६. धर्मानुप्रेक्षा |
| ७. जगातील सर्व जीवांची इच्छा | ८. मिथ्याद्दष्टीचे विचार |

प्रश्न २ रा - खालीलपैकी कोणत्याही दहा शब्दांचा अर्थ लिहा.

१. पिछान, २. अनगारी, ३. वृष, ४. श्लेषम, ५. कादेमें, ६. चय, ७. तिय, ८. राध, ९. संग, १०. वसु, ११. लखि, १२. अक्ष, १३. बाज, १४. धनधान, १५. जोबन.

प्रश्न ३ रा - खालीलपैकी कोणत्याही पाच श्लोकांचा भावार्थ सुस्पष्ट लिहा.

१. सम्यकप्रकार निरोध मन वच काय आतम ध्यावतै ।
तिन सुथिर मुद्रा देखि मृगगण उपल खाज खुजावतै ।।

२. जगसुहितकर सब अहितहर श्रुतिसुखद सब संशय हरे ।
भ्रम-रोग-हर जिनके वचन मुखचंद्रतै अमृत झरे ।।

३. ज्ञानसमान न आन जगतमें सुखको कारण ।
इहि परमामृत जन्म, जरामृतिरोग निवारण ।।

४. यह मानुष परजाय, सुकुल सुनिवौ जिनवाणी ।
इहि विधि गए न मिले, सुमणि ज्यों उदधि समानी ।।



५. मोक्ष महलकी प्रथम सिढी या बिन ज्ञान चरित्रा ।
सम्यकता न लहे सो दर्शन धारो भव्य पवित्रा ।।
दौल समझ सुन चेत सयाने काल वृथा मत खोवे ।
यह नरभव फिर मिलन कठिन है जो सम्यक् नहिं होवे ।।

६. कोटि जनम तप तपै ज्ञान बिन कर्म झरैं जे ।
ज्ञानीके छिनमांहि त्रिगुप्तितैं सहज टरै ते ।
मुनिव्रत धार अनंत-बार ग्रीवक उपजायो ।
पै निज-आतम-ज्ञान विना सुखलेख न पायो ।।

७. पर द्रव्यनितै भिन्न आपमैं, रुचिं सम्यक्त्व भला है ।
आप रूपको जानपनो सो, मस्यग्ज्ञान कला है ।
आप रूप में लीन रहे स्थिर सम्यकचारित सोई ।
अब व्यवहार मोक्षमग सुनिए हेतु नियतको होई ।।

प्रश्न ४ था - संख्यांसह व सविस्तर नावे लिहा. (कोणतेही पाच)

१. आत्म्याचे भेद किती व कोणते ?
२. गुप्तीचे प्रकार किती व कोणते ?
३. अनर्थदंडाचे भेद किती व कोणते ?
४. तत्त्वे किती व कोणती ?
५. शिक्षाव्रते किती व कोणती ?
६. अणुव्रते किती व कोणती ?
७. समिती किती व कोणत्या ?
८. सम्यग्दर्शनाचे २५ दोष कोणते ?

प्रश्न ५ वा - खालील कोणत्याही ५ प्रश्नांची उत्तरे ग्रंथाधारे द्या.

१. सम्यग्द्दष्टी जीव कोठे उत्पन्न होत नाही ?
२. ज्ञानाचे तीन दोष कोणते ते सोदाहरण स्पष्ट करा.
३. संसारात फिरण्याची कारणे कोणती ? ती चुकविण्यास उपाय कोणता ?

४. पुद्गलामध्ये कोणते गुण नेहमी आढळतात ?
५. हर्षविषादादिक कां करू नये ? व त्याऐवजी काय करावे ?
६. सम्यक्त्वाने युक्त असा गृहस्थ घरात राहून देखील तो त्यापासून वेगळा कसा ते स्पष्ट करा.
७. बारा अनुप्रेक्षांच्या चिंतनाने काय होते ?
८. सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानामध्ये फरक कोणता ते सोदाहरण स्पष्ट करा.

प्रश्न ६ वा - फरक स्पष्ट करा. (कोणतेही तीन)

१. गृहीत मिथ्यात्व - अगृहीत मिथ्यात्व २.द्रव्य हिंसा-भाव हिंसा.
३. दिग्व्रत - देशव्रत ४.अणुव्रते - महाव्रते
५. एकत्वानुप्रेक्षा - अन्यत्वानुप्रेक्षा.

प्रश्न ७ वा - छहढाला या नावाची सार्थकता व ग्रंथकर्त्याचा परिचय लिहा.

## प्रश्नपत्रिका सन १९७६

प्रश्न १ - खालील श्लोक शुद्ध लिहा. (कोणतेही ५) १५

१. जिन वचन में शंका न धार....२. समता सम्हारै थुति....
२. सो धर्म मुनिनकरि... ४. जल मृतिका बिन....
५. सकल द्रव्यके गुण.... ६. चेतना बिन सो अजीव...
७. जो ख्याति लाभ.... ८. रोके न चाह निज...
९. जननी उदर वस्यो....

प्रश्न २ - योग्य शब्दार्थ द्या. (कोणतेही १५) १५

१. शिवमगचारी, २. अरति करै, ३. सुभग, ४. निपट, ५. कोईजीभतै, ६. उदधि, ७. उपल खाज खुजावतै, ८. नयन, ९. बाज, १०. सीख ११. जिनके वचन मुखचंद्रतै अमृत झरै, १२. सनेह, १३. कछुक ज्ञान, १४. आचरिये, १५. भवभ्रमण, १६. विधि, १७. कादेमे, १८. वृष, १९. अक्ष, २०. सीरी.



प्रश्न ३ - खालील कोणत्याही पाच श्लोकांचा भावार्थ सुस्पष्ट लिहा. १५

१. मोक्ष महलकी प्रथम सीढी या विन ज्ञान चरित्रा ।
सम्यकता न लहै सो दर्शन धारो भव्य पवित्रा ।
दौल समझ सुन चेत सयाने काल वृक्षा मत खोवे ।
यह नरभव फिर मिलन कठिन है जो सम्यक् नहि होवे ।।

२. ज्ञानसमान न आन जगतमें सुखको कारण
इहि परमामृत जन्म-जरामृति रोग निवारण ।

३. कोटि जनम तप तपै ज्ञान बिन कर्म झरै जे
ज्ञानीके छिनमाहिं त्रिगुप्तितै सहज टरै ते ।
मुनिव्रत धार अनंत-बार ग्रीवक उपजायो ।
पै निज मातम-ज्ञान बिना न सुखलेश पायो ।।

४. ताहि सुनो भवि मन थिर आन, जो चाहो अपनो कल्यान ।
मोह-महामद पियो अनादि, भूल आपको भरमत वादि ।।

५. जग सुहितकर सब अहितहर श्रुतिसुखद सब संशय हरै ।
भ्रम-रोग-हर जिनके वचन मुखचंद्र तै अमृत झरै ।।

६. बालकपन में ज्ञान न लह्यो, तरुण समय तरुणी-रत रह्यो ।
अर्धमृतकसम बुढापनो, कैसे रूप लखै आपनो ।।

७. जो योगन की चपलाई तातै होय आस्त्रव भाई ।
आस्त्रव दुखकार घनेरे, बुधिवंत तिन्हैं निरबेरे ।।

प्रश्न ४ - संख्यासह सविस्तर नावे लिहा. (कोणतेही ५) १५

१. सम्यक्त्वाचे दोष किती व कोणते ?
२. तत्त्वे किती व कोणती ?

३. अंगे किती व कोणती ?

४. शिक्षाव्रते किती व कोणती ?

५. अनायतने किती व कोणती ?

६. अनर्थदंडाचे भेद किती व कोणते ?

७. आत्म्याचे भेद किती व कोणते ?

८. धर्म किती व कोणते ?

प्रश्न. ५ - व्याख्या लिहा. (कोणतेही ५)

१. संसारभावना, २. प्रभावना अंग, ३. दिग्व्रत, ४. संवर, ५. भाषा समिती, ६. निकल परमात्मा, ७. व्यवहार सम्यग्दर्शन.

प्रश्न. ६ - कोणत्याही पाच प्रश्नांची योग्य तीच उत्तरे ग्रंथाधाराने द्या. १५

१. सम्यग्दृष्टी जीव कोठे उत्पन्न होत नाही ?

२. मिथ्यादृष्टी जीव स्वतःचा शरीराविषयी कसा विचार करतो ?

३. बारा अनुप्रेक्षांच्या चिंतनाने काय होते ?

४. निरतिचार श्रावकाची व्रते पाळल्याने कोणते फल मिळते ?

५. तिर्यंचगतीमध्ये कोणत्या प्रकारचे दुःख असते ?

६. संसारातील भ्रमणाची कारणे कोणती ? तो चुकविण्याचा कोणता मार्ग आहे ?

७. मुनींच्या सकल - चारित्राचे थोडक्यात वर्णन करा.

प्रश्न ७ - माहिती लिहा. (कोणतेही २) १५

१.देवगतीतील दुःख, २. मिथ्यात्व, ३. बारा व्रते, ४. सम्यग्ज्ञानाचे महत्त्व.



# प्रश्न-पत्रिका सन १९७५

प्रश्न १ - खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही ४) १६

१. या संसारात जीव कोणत्या कारणांनी फिरतो ?

२. मिथ्यादृष्टी जीवाची मान्यता कशी असते ?

३. खऱ्या सुखाचे स्वरूप कोणते व ते कोठे असते ?

४. ज्ञानी आणि अज्ञानी जीवामध्ये विशेषता कोणती ?

५. लोक व धर्म-भावनेचे स्वरूप काय ?

६. श्रावक व मुनी यांचे स्वरूप कोणते ?

प्रश्न २ - कोणत्याही ८ चा अर्थ लिहा. १६

१. मोहमहामद पियो अनादि भूल आपको भरमत वादि ।

२. दुर्लभ लहि ज्यों चिन्तामणि, त्यों पर्याय लहि त्रसतणी ।

३. तन उपजत अपनी उपज जान ।

४. पुण्य-पापफलमाहिं हरख विलखो मत भाई ।

५. ज्ञान समान न आन जगतमें सुख को कारन ।

६. चरितमोहवश लेख न संजम पै सुरनाथ जजे है ।

७. मृगगण उपल खाज खुजावते ।

८. यह राग आग दहे सदा तातें समामृत सेईए ।

९. सकल धर्म को मूल यही बिन करनी दुखकारी ।

१०. ज्ञानशरीरी त्रिविधकर्ममलवर्जित सिद्ध महंता ।

प्रश्न ३ - खालील श्लोक पूर्ण करा - (कोणतेही ५) १५

१. मैं सुखी दुखी मैं रंक राव....

२. जिन पुण्य पाप नहिं कीना....

३. कबहूं आप भयो बलहीन...

४. जे राग द्वेष मलकरि मलीन....

५. जलमृतिका बिन और नाहि कछु गहै अदत्ता....

६. अंतर चतुर्दश भेद बाहिर....
७. कोटि उपाय बनाय भव्य ताको उर आनो.

प्रश्न ४ - अर्थ लिहा. (कोणतेही १०) १०

१. उपल नाव, २. सीख, ३. शमदमतैं, ४. अनगारी, ५. ख्याति, ६. नयन, ७. उदधि, ८. वसु, ९. शिवमाहिं, १०. उपल खाज खुजावते, ११. जिनके वचन-मुखचंद्रतै अमृत झरे, १२. ज्ञान घन-घान बुझावै, १३. परम पैनी सुबुधि छैनी.

प्रश्न ५ -फरक स्पष्ट करा. १२

| | |
|---|---|
| १. अणुव्रत व महाव्रत | २. खरा देव व खोटा देव |
| २. दिग्व्रत व देशव्रत | ४. भोग व उपभोग |
| ५. संवर व निर्जरा | ६. धर्मद्रव्य व अधर्मद्रव्य |

प्रश्न ६ - खालीलपैकी कोणत्याही पाचांची संख्यांसह नावे लिहा - १५

| | |
|---|---|
| १. आत्मा किती प्रकारचा आहे ? | २. अंगे किती व कोणती ? |
| ३. द्रव्ये किती व कोणती ? | ४. अणुव्रते किती व कोणती ? |
| ५. तत्त्वे किती व कोणती ? | ६. मूढता किती व कोणत्या ? |

प्रश्न ७ - बारा व्रतासंबंधी थोडक्यात माहिती लिहा.

अथवा

खरा देव, खरा गुरु व खरे शास्त्र यासंबंधी २० ओळीत माहिती लिहा.

□ □ □ □ □

## आमची प्रकाशित पुस्तके

| | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १. | समयसार ( आत्मख्याती टीकेसह) आ. कुंदकुंद | ३१/- |
| २. | समयसार (आत्मख्याती व तात्पर्यवृत्ती टीकेसह) | ५१/- |
| ३. | प्रवचनसार (तत्त्वदीपिका टीकेसह) | ३०/- |
| ४. | प्रवचनसार (तत्त्वदीपिका व तात्पर्यवृत्ती टीकेसह) | ५०/- |
| ५. | मोक्षमार्गप्रकाश - पं. टोडरमलजी | ४०/- |
| ६. | तत्त्वार्थसूत्र (मोक्षशास्त्र) आ. गृद्धपिच्छ | ३०/- |
| | पुठ्ठा बांधणी प्रत | ५०/- |
| ७. | रत्नकरंडश्रावकाचार (आ. समंतभद्र) | १२/- |
| ८. | प्रवेशिका (पं. गोपालदासजी बरैया) | १२/- |
| ९. | द्रव्यसंग्रह (आ. नेमिचंद) | १२/- |
| १०. | छहढाला (पं. दौलतरामजी) | १२/- |
| ११. | भाग ३-४ | ६/- |
| १२. | भाग १-२ | ८/- |
| १३. | स्तोत्रसंग्रह | ११/- |
| १४. | भारती जैन तत्त्वमाला | |
| १५. | कथाकौमुदी | १२/- |
| १६. | नित्यनैमित्तिक पाठावली | ५०/- |

प्रती मिळण्याचे स्थान :

१. भरतेश ग्रंथ भांडार, मु. पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
२. महावीर ग्रंथ भांडार, वीरवाडी, मु. पो. कारंजा, जि. वाशीम
३. जीवराज जैन ग्रंथमाला, संतोष भवन, फलटनगल्ली, सोलापूर
४. पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, मु. पो. वेरूळ, जि. औरंगाबाद